



# जीवन गंगा

## आद्यकलश

संकलक : अच्युत सिध्दनाथ पोटभरे
एम्. ए., बी. टी.

श्रीसद्गुरु, योगिराज वामनरावजी दत्तात्रेय गुळवणी महाराज
यांचे जीवन चरित्र

# जीवन गंगा

( आद्यकलश - कालखंड - इ. स. १८८६ ते १९४० )
( जन्म ते वय वर्षे ५४ पर्यंत )

: लेखक :
अच्युत सिद्धनाथ पोटभरे
एम्. ए. बी. टी.

मूल्य रु. पस्तीस

श्रीवासुदेव निवास प्रकाशन, पुणे - ४

**प्रकाशक :**

विद्यावाचस्पती, श्री. द. धुं. कवीश्वर
प्रधान विश्वस्त, प. प. श्रीवासुदेवानंद
सरस्वती स्वामी महाराज व प. प.
श्री लोकनाथतीर्थ स्वामी महाराज
स्मारक ट्रस्ट, श्रीवासुदेव निवास, कर्वेपथ
४२ / १७ एरंडवन, पुणे ४११ ००४

●

© सर्व हक्क प्रकाशनाधीन

●

**प्रकाशन दिन :**

श्रीसद्‌गुरु गुळवणीमहाराज
१४ वी पुण्यतिथी, पौष व॥ ८ शके १८०९
दिनांक १२ जानेवारी १९८८

●

**चरित्र लेखक निवास :**

अच्युत सिद्धनाथ पोटभरे, एम्. ए. बी. टी.
'श्रीसिद्धनाथ निवास', सहकारनगर क्र. २,
पुणे ४११००९

●


**मुद्रक :**

शं. द. घाटपांडे
श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स
भाग्योदय, नाईक वाडी,
शिवाजी पथ, ठाणे ४००६०२

|| श्रीगुरु शरणम् ||



विष्णुरूपी श्री दत्तात्रेय



卐 卐 卐

हे परम सद्‌गुरु देवा !

आपणच भक्तरूपाने प्रगट झालेल्या
आपल्या प्रिय आणि दिव्य शिष्योत्तमाची
ही " जीवन गंगा "
आपल्या चरणकमली समर्पण.



# श्रीसद्गुरुवंदन व प्रार्थना

ॐकारा विश्वाकारा। चिद्घनपियूषधारा।
आनंदवनमयूरा। सद्गुरो वामना वंदितो ॥ १ ॥
भगवती सरस्वतिमाता। झाली आत्मविस्मृता।
तुझ्या रूपा न्याहाळता। तुझ्या रंगी रंगली ॥ २ ॥
भक्तमेळा सोहळा। आनंदान झाला गोळा।
साऱ्यांचा भाव भोळा। दंग होवोनि गेले तेथे ॥ ३ ॥
असे तुझे विराट दर्शन। पाहोनि मन माझे प्रसन्न।
पुनः पुनः करोनि वंदन। भिक्षा मी मागतो ॥ ४ ॥
सरस्वतीला सांगावे। माझे वाचे बसावे।
तुमचे शब्द सांगावे। भगवतीने माझे कानी ॥ ५ ॥
आपुल्या अंकी सरस्वति। तिच्या अंकावरी मी मंदमति।
आपण बसवावे जगत्पति। कृपा प्रेमाने जगद्गुरो ॥ ६ ॥
म्हणजे माझे मीपण जाईल। आपुले सर्व होईल।
जे जे काही घडेल। ते सारे आपुले इच्छे ॥ ७ ॥
आपण विश्वसत्ताधारी। चालवावी या जीवावरी।
आपुले पण धरून अंतरी। भिक्षा घालावी झोळीत ॥ ८ ॥
म्हणजे तुझ्या सत्तेने चालेन। तुझ्या सत्तेने बोलेन।
तुझ्याच सत्तेने लिहिन। निरंतर आयुभरी ॥ ९ ॥
सद्गुरूंनी भाव बघितले। धावतचि जवळी आले।
घट्ट अलिंगन दिधले। म्हणाले मी दत्त रे दत्त ॥ १० ॥
कृपा प्रेमाश्रूंनि मज न्हाणिले। पियूष धारांनी भिजविले।
रोम रोम पुलकित केले। विराट वामन सद्गुरूंनी ॥ ११ ॥
कृतीने सर्व सांगितले। झोळीत दान घातले।
झोळी सहित कवटाळिले। निःशब्द मी झालो ॥ १२ ॥
आता माझे काही नाही। माझी कृती काही नाही।
माझा मीच नाही। केवल श्रीगुरुदेवदत्त ॥ १३ ॥
कळसूत्री बाहुली। कळ दाबता चालली।
मंत्रमुग्ध सृष्टी केली। कर्तृत्व हे कोणाचे ॥ १४ ॥
सूत्रधाराने जरी बोलविले। बाहुलीतून शब्द आले।
तरी ते बाहुलीचे कां झाले। हे जाणावे जाणत्यांनी ॥ १५ ॥
बाहुलीने नमस्कार केला। तरी त्याचा त्यानेच घेतला।
काही कार्यभाग नाही राहिला। यंत्रारूढानिमायया ॥ १६ ॥

* * *

## प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचा
## सुमगल आशीर्वाद आणि प्रस्तावना

।। श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ।।

नौम्युदेति यदज्ञानाजगद्रज्ज्वहिवत्पुनः ।
यत्तत्वं मीलति ज्ञानां तं चिदानंदसद्‌गुरुम् ।।

द्विसाहस्त्री १।१

परम पूजनीय श्रीसद्‌गुरु योगिराज श्री. वामनरावजी गुळवणी महाराज यांचे विस्तृत जीवन चरित्र लिहिण्याचा संकल्प श्रीगुरुभक्त अच्युतराव पोटभरे यांनी केल्याप्रमाणे, श्रीगुरुकृपेने श्रींच्या जन्मशताब्दी महोत्सव प्रसंगी 'जीवनगंगा' अंतिम कलश हा चरित्र खंड, श्रीवासुदेव-निवास प्रकाशनातर्फे, प्रकाशित झाला. यामध्ये श्रीगुरुमहाराजांच्या जीवनातील शेवटच्या आठ वर्षांचा कालखंड आलेला आहे. वय वर्षे ८० ते ८८, इ. स. १९६७ ते १९७४ असा तो काल आहे. आता त्यांच्या जीवनचरित्रातील प्रारंभीचा काल 'जीवन गंगा' आद्यकलश हा कालखंड, श्रीगुरुमहाराजांच्या १४ व्या पुण्यतिथी प्रसंगी, दि. १२ जानेवारी १९८८ ला प्रसिद्ध होत आहे. श्रीगुरुस्थानातून हे चरित्र प्रकाशित करण्याचा सुयोग येत आहे ही गोष्ट श्रीगुरुकृपेची साक्ष असून सर्वांना आनंदवर्धिनी आहे.

प्रसिद्ध होणाऱ्या जीवनगंगेच्या आद्यकलशामध्ये श्रीगुरुमहाराजांच्या जन्मापासून वय वर्षे ५४ पर्यंतचा काल समाविष्ट आहे. इ. स. १८८६ ते १९४० पर्यंतचा हा चरित्र भाग आहे. आता यापुढील कालखंडाचा चरित्रभाग श्रीगुरुकृपेने यथायोग्यकाली प्रकाशित होऊन संपूर्ण चरित्र सुसंगतपणे पूर्ण होईल. सर्वांच्या संग्रही हे संपूर्ण चरित्र असावे म्हणजे सर्वांना सद्‌गुरूंची जीवनगंगा आपल्या सन्निध असल्याचे समाधान लाभेल.

ते हे गोष्टी रम्य । अमृतधारा धर्म्य ।
करिती प्रतीति गम्य । आइकोनी जे ।।
तैसेचि श्रद्धेचेनि आदरे । जयांचा ठायी विस्तरे ।
जीवी जया थारे । जे अनुष्ठिती ।।

श्रीज्ञानेश्वर माऊलींनी संतसत्पुरुषांच्या-सद्‌गुरूंच्या म्हणजे ईश्वराच्या कथा, त्यांचे चरित्रातील घटना-प्रसंग, गोष्टी या अमृतधारा असून त्यांच्या श्रवणानेही प्रचीती देणाऱ्या असतात असे म्हटले आहे. 'जीवन गंगा' हीसुद्धा एका महात्म्याची–सद्‌गुरूंची–जीवनगाथा आहे. या जीवनगंगेत श्रद्धेने आणि आदराने स्नान करून सद्‌गुरूंनी केलेल्या उपदेशाचे, दिलेल्या साधनेचे अनुष्ठान करण्याची तत्परता सर्वही वाचकांमध्ये निर्माण होईल. ईश्वरनिष्ठा–सद्‌गुरुनिष्ठा या माहात्म्य श्रवणाने दृढ होणार आहे. श्रीसद्‌गुरु शिष्यावर कृपा करून त्याला मोक्षप्राप्तीचे दिव्य साधन देतात. ते साधन दृढ निष्ठेने होण्यासाठी शिष्याची सद्‌गुरूवर आत्यंतिक श्रद्धा असावी लागते. श्रद्धा ही निःशंक करणारी, निःसंशय करणारी शक्ती आहे. ही साधनमार्ग आक्रमीत साधकाला पुढे पुढे नेत असते. अशा संतचरित्रामधून श्रद्धा पोसत जाते.

तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने पांडित्य येते, पण तेवढ्याने परमार्थ साधता येत नाही. त्यासाठी तसे आचरण मनाने आणि बुद्धिपूर्वक घडावे लागते. सद्‌गुरु हे कार्य करीत असतात. 'आधी केले मग सांगितले' असे त्यांचे जीवन असते. त्यांच्या विशुद्ध आचरणाचा नि वर्तनाचा प्रभाव एवढा असतो की ते न बोलता कार्याची प्रेरणा देत असतात. त्यांच्या जीवनदर्शनाने ज्ञान–भक्ती–कर्म–योग या सर्वही साधनमार्गाचे निःसंदिग्ध मार्गदर्शन होत असते. 'चित्ते वाचि क्रियायांच साधूनामेकरूपता' असे संत साधु असतात. त्यांचे चित्त–वाणी आणि वर्तन यामध्ये सुसंवाद असतो. श्रीसद्‌गुरु म्हणजे चालते बोलते धर्मशास्त्र असते, ईश्वरनिष्ठ भक्तीचे दर्शन असते.

मुक्तावस्था येण्यासाठी म्हणजे मोक्षप्राप्तीसाठी मनोनाश, वासनाक्षय आणि तत्त्वज्ञान यांचा पूर्ण अभ्यास व्हावा लागतो. यासाठी अनेक साधनमार्ग आहेत. प्रत्येक साधन अत्युच्च अवस्थेला गेल्यावर अन्य साधनांचा त्यात समन्वय होतो. त्या सहज समन्वयाची अवस्था येईपर्यंत

ती पूर्णावस्था संभवत नाही. ज्ञान–भक्ती–कर्म–योग या चारही साधन-मार्गांचा समन्वय जाणीवपूर्वक होऊ लागणे किंवा त्यात अविरोध निर्माण होणे ही गोष्ट अधिकारी सद्‌गुरूशिवाय संभवत नाही.

परीक्ष्य लोकान्कर्म चितान्ब्राह्मणो

निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन तद्विज्ञानार्थं

स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ।

मुण्डकोपनिषद् १–२–१२

साधकाची अवस्था ओळखून त्याला मार्गदर्शन करणारे अधिकारी सद्‌गुरु 'शाब्देपरे च निष्णाते' असतात. ते श्रोत्रिय, ब्रह्मनिष्ठ असतात. ही स्थिती योग मार्गाने दृढ होते. योगाबद्दल 'क्लेशोधिकतर' या भगवंताच्या शब्दाचा आधार देऊन त्या मार्गाकडे दुर्लक्ष होते. वास्तविक गीता हे ब्रह्मविद्येचे योगशास्त्र आहे. त्यामध्ये 'तस्मात योगी भवार्जुन' असा भगवंताचा अर्जुनाला उपदेश आहे. इतकेच नव्हे तर

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोधिका।

कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्मद्योगी भवार्जुन ।। भ. गी. ६।४६

असे स्पष्ट सांगितले आहे. श्रीगुरुमहाराजांमध्ये हा सर्व साधनमार्गांचा समन्वय प्रकर्षाने आढळतो. त्यामुळे त्यांना सर्वत्र विशेष आदर होता. त्यांना प्राप्त झालेली शक्तिपात-योग-विद्या ही साधनप्रणाली ही सर्व साधनांचा समन्वय साधणारी साधन प्रणाली आहे असे साधकांच्या सर्व तऱ्हेच्या अनुभवावरून दिसते. या शक्तिपातयोग साधनेने साधकाची साधना अन्तस्थ प्रेरणेने चालत असते. श्रीसद्‌गुरुकृपेने अन्तस्थ शक्ती जागृत होऊन कार्यरत होते. ही कृपा होण्याने साधकाचा साधनमार्ग मोकळा होतो. हा प्रारंभ आहे. परमभाग्याने हा साधन मार्ग मिळाला आहे. साधनेची शक्ती मिळाली आहे. समर्थ सद्‌गुरु शक्तिरूपाने अन्तस्थ होऊन मार्गदर्शन करीत आहेत, याचा लाभ याच देही याच डोळा घेणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

श्रीगुरुमहाराजांचे जीवन म्हणजे जीवन्मुक्त योगिराजाचे जीवन होते. सर्व जगाचा व्यवहार करून ते अलिप्त होते. सुखदुःखादी कोणत्याही स्थितीत ते आनंदाची प्रसन्नता उपभोगीत होते. त्यांचे अन्तःकरण आकाशाप्रमाणे व्यापक नि अती स्वच्छ होते. कोणत्याही कार्याचा त्यांना

अहंकार किंवा संशय नसे. ते लोकांना किंवा लोक त्यांना कंटाळत नसत. त्यांच्या शत्रु–मित्र भावना नष्ट झाल्या होत्या. हर्ष–क्रोध आणि भीती-पासून ते मुक्त होते. ते उत्तम कलावंत असून त्यांना कलांचा अभिमान नव्हता. त्यांच्या स्थिर चित्तामध्ये वृत्तीचे तरंग उठत नव्हते. आपल्या कार्यातील लाभालाभानिमित्त त्यांच्या चित्तामध्ये हर्ष–विषादादी पीडा निर्माण होत नसत. नित्य अनुसंधानमग्न असत. ही सर्व जीवनमुक्ताची लक्षणे त्यांचे ठायी विलसत होती. तत्त्वज्ञान, मनोनाश आणि वासनाक्षय यांचा त्रिवेणी संगम त्यांच्या जीवनतीर्थक्षेत्राचे प्रयागच होते. श्रीमद्-शंकराचार्य आपल्या जीवन्मुक्तानंद लहरीमध्ये अशा महात्म्याचे जे वर्णन करतात ते सर्व श्रीगुरुमहाराजांच्या ठायी प्रत्ययाला येत होते.

मौने मौनि गुणिनि गुणबान् पंडिते पंडितश्च
दीने दीनः, सुखिनि सुखवान् भोगिनि प्राप्त भोगः।
मुर्खे मुर्खो, युवतिषु युवा, वाग्मिनि प्रौढवाग्मी
धन्यः कोऽपि त्रिभुवनजयी योऽवधूतेऽवधूतः ॥ १ ॥

जो जसा भेटेल त्याच्यात स्वतःला सामावून घेऊन वागणारे महात्मे असतात म्हणून त्यांच्या स्थितीचा बोध सामान्यांना सहज होणारा नसतो. अशा चरित्रामधून हा बोध होण्यास मदत होते. बोध हा एक-दिशीय विषय नसतो. समजून घेणाऱ्याला आपलीही पात्रता वाढवीत वाढवीत श्रीसद्गुरुमाहात्म्याचा बोध होत जातो. ही गोष्टही जीवन-चरित्र अभ्यासाने साधत जाते. या दृष्टीने संत चरित्राचे लेखक चिंतन-शील–श्रद्धाभक्तियुक्त अन्तःकरणाचे असले म्हणजे त्यांच्या लेखनामध्ये संतगुणदर्शनाची मार्मिकता उतरत असते. तसा अनुभव या चरित्रा-मधून येतो.

श्रीसद्गुरूंचे चरित्र हे न संपणारे–अखंड चालू असलेले चरित्र असल्याने ते पूर्ण असू शकत नाही. हा या चरित्राचा दोष नसून गुणच आहे. ‘ शतकोटिप्रविस्तरम् ’ ही संतचरित्राची मर्यादा आहे. ती मर्यादित मानव शक्ती–बुद्धीला आकळणेही अशक्य आहे. म्हणून श्रीज्ञानेश्वर माउलींनी म्हटले आहे,

एवढे जिये महिमेचे करणे
ते वाचाबळे वानावे कवणे
काय सूर्याचिया अंगा उटणे। लागतसे ॥१॥

तैसे श्रीगुरुचे महिमान । आकळते के असे साधन
हे जाणोनिया नमन । निवांतचि केले ॥२॥

श्रीसद्‌गुरु महाराजांनी हजारो भक्तांना संजीवनी दिली आहे. ही अमृत संजीवनी सर्वांना परमपदाला नेणारी आहे असे श्रीगुरुमहाराज खात्री देऊन वारंवार सांगत असत. आपल्या साधनेने चित्तस्थैर्याचा अभ्यास होत आहे. चित्ताचे स्थैर्य ब्रह्मचिंतनाने येत असते. म्हणजे सद्‌गुरूंनी दिलेली साधना ही ब्रह्मचिंतनाची साधना आहे. साधनेत साक्षीभावाचा जो अनुभव आहे तेच ब्रह्मचिंतन आहे. या अभ्यासाचे महत्त्व आचार्य सांगतात—

स्नातं तेन समस्ततीर्थं सलिले दत्ताच सर्वाऽवनिः ।
यज्ञानां च सहस्रमिष्टमखिला देवाश्च संपूजिताः ॥
संसाराच्च समुद्‌धृताः स्वपितरस्त्रैलोक्य पूज्योऽप्यसौ ।
यस्य ब्रह्मविचारणे क्षणमपि स्थैर्यं मनः प्राप्नुयात्‌ ॥

ज्याचे मन क्षणभर जरी ब्रह्मचिंतनात तन्मय झाले तरी त्याने सर्व तीर्थात स्नान केल्यासारखे होते. पृथ्वीचे दान केल्याचे पुण्य लागते. हजार यज्ञ केल्याचे फळ मिळते. सर्व देवांची पूजा केल्यासारखी होते. सर्व पितरांचा संसारातून उद्धार होतो. तो त्रैलोक्यामध्ये पूज्य होतो.

ज्यांच्या परमकृपेने असे दिव्य साधन मिळाले आहे त्या सद्‌गुरूंच्या जीवनगंगेत स्नान करण्याने आपणास तेच प्रेरणा देणारे आहेत. जीवनगंगेतून त्यांची भरपूर माहिती मिळणार आहे. माहितीमधूनच माहात्म्य समजून येते. त्या माहात्म्याच्या जाणिवेने प्रेरणा मिळत असतात. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी ‘सद्‌गुरुतीर्थ’ स्तोत्र रचले आहे. त्यातील एका श्लोकाने ही प्रस्तावना पूर्ण करीत आहे.

तत्पूर्वी जीवनगंगेचे लेखक, मुद्रक, साहाय्यक, वाचक या सर्वांना श्रीसद्‌गुरु सेवा करण्याची कृपा व्हावी आणि त्यांना त्यासाठी निरामय सक्षम स्वास्थ्याचे जीवन, समृद्धी, ऐश्वर्य प्राप्त व्हावे व जीवन कृतार्थ व्हावे ही ‘श्री’ चरणी प्रार्थना आहे.

तीर्थानां परमं तीर्थं तारकाणां च तारकम्‌ ।
सद्‌गुर्वाख्यं महातीर्थं भजामि परमार्थदम्‌ ॥

श्रीवासुदेव निवास, पुणे
मंगळवार २९।१२।८७

श्रीसद्‌गुरुकृपाश्रित
दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वर

## लेखकाचे मनोगत

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

## 'गंगा' स्नानापूर्वी

"ॐ नमोभगवते श्रीसद्‌गुरु वामन दत्तात्रेयाय। स्मरणमात्र संतुष्टाय।"

अ कार चरणयुगल। उकार उदर विशाल।
म कार महामण्डल। मस्तकाकारे॥
हे तीन्ही एकवटले। तेथ शब्दब्रह्मकवळले।
ते मियां श्रीगुरुकृपा नमिले। आदिबीज॥

श्रीसद्‌गुरु योगिराज वामनरावजी दत्तात्रेय गुळवणी महाराज यांच्या परमकृपेने त्यांच्याच जीवनचरित्ररूपी 'जीवनगंगे' मध्ये स्नान करण्याचा सुमंगल सुयोग येत आहे. हे स्नान कुंभमेळयाच्या पर्वणी-प्रमाणे सर्वंही वाचकांना घडणार आहे, हे या जीवनगंगेचे वैशिष्टय आहे. गंगाभागीरथीच्या स्नानाला भक्ताला गंगाकिनारी जावे लागते. परंतु ही जीवनगंगा भक्ताभक्तांकडे येऊन पावन करणारी आहे. हे संतांच्या परम औदार्याचे लक्षण आहे. श्रीसद्‌गुरूंच्या जीवनगंगेत स्नान करण्यापूर्वी आपण तिची प्रार्थना करू–

गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति।
नर्मदे सिंधु कावेरी जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु॥

नमामि गंगे तवपादपंकजं, सुरासुरैर्वन्दितदिव्यरूपम्।
भुक्तिंच मुक्तिंच ददासि नित्यं, भावानुसारेण सदा नराणाम्॥

गंगा गंगेति यो ब्रुयात् योजनानां शतैरपि।
मुच्यते सर्व पापेभ्यो विष्णु लोकं स गच्छति॥

गंगाद्वारे कुशावर्ते बिल्वके नीलपर्वते। स्नात्त्वा कनखले तार्थें
पुनर्जन्म न विद्यते॥

पापोऽहं पापकर्माऽहं पापात्मा पापसंभवः। त्राहि मां कृपया गंगे
सर्वपापहरा भव॥

श्रीसद्‌गुरूंच्या जीवनगंगेत अनेक संतसत्पुरुषांची छोटीमोठी चरित्रे, कथा, यांचा समावेश होत असल्याने जणू त्या पावन सरिताच या गंगाजलात समाविष्ट झाल्या आहेत.

जिच्या दिव्य रूपाला सारे सुरासुर वंदन करतात, जी प्रत्येकाच्या भावाप्रमाणे भुक्ती आणि मुक्ती ही सदैव देत असते, त्या गुरुगंगा चरणकमलांना मी वंदन करीत आहे. श्रीसद्‌गुरूंची जीवनगंगाही सर्ववंद्य असून भुक्ती-मुक्ती देणारी आहे. म्हणून आपण श्रीसद्‌गुरुचरणांना वंदन करू.

गंगेचे माहात्म्य असे आहे की, तिच्यापासून हजारो मैल दूर असलेल्या कोणीही केवळ ‘ गंगा ’ शब्द उच्चारला तरी तो सर्व पापापासून मुक्त होऊन विष्णुलोकाला जातो. तद्वत् श्रीसद्‌गुरूंच्या केवळ नामस्मरणाने जीव पापमुक्त होऊन उद्धरून जातो. गंगेच्या तीर्थक्षेत्री स्नान घडले तरी पुनर्जन्माचे कारण नष्ट होते. तसेच श्रीसद्‌गुरूंच्या सान्निध्याने पवित्र झालेल्या त्यांच्या सिद्धस्थानात जो कोणी जाऊन दर्शन घेऊन आणि त्या ठिकाणी काही अनुष्ठान, तप साधना, जप एकवेळ करून येईल तो मुक्त होईल.

हे सद्‌गुरो–गंगे ! मी पापी नव्हे तर प्रत्यक्ष पापच आहे. मी पापकर्म करणारा आहे. पापरूप आहे. माझी पापीकर्मे असल्याने मी पापोद्‌भव आहे. म्हणून तुला प्रार्थना आहे की, माझे रक्षण कर. हे सद्‌गुरोगंगे सर्वपापविनाशिनी हो !

शुद्ध जाणीवपूर्वक आपल्या पापांचे–दोषांचे प्रकटीकरण करणे ही मनाची अवस्था काय असते ते समर्थांच्या शब्दातच पाहू–

म्हणे मी पतित चाण्डाळ । म्हणे मी दुराचारी खळ ।
म्हणे मी पापी केवळ । या नाव मुमुक्षु ।।
म्हणे मी अभक्त दुर्जन । म्हणे मी हीनाहून हीन ।
म्हणे मी जन्मलो पाषाण । या नाव मुमुक्षु ।।
म्हणे मी अवगुण राशी । म्हणे मी व्यर्थ आलो जन्मासि ।
म्हणे मी भार झालो भूमिसी । या नाव मुमुक्षु ।।

गंगास्नानाला जाताना असे भाव–ही मनाची लीनता असली पाहिजे. श्रीगुरु महाराज म्हणत असत, ‘आम्ही पापी लोकासाठीच

आहोत. जे पापी नाही त्यांना आमची जरूर तरी काय आहे ?' सद्गुरूंचे जीवनकार्य गंगेप्रमाणे पापविनाश आणि उद्धार हेच आहे. आपण जर मुमुक्षु असू तर आपली मनोभूमिका वर वर्णिल्याप्रमाणे असली पाहिजे. मोक्षाचा मार्ग या मनोभूमिकेपासून सुरू होत असतो. ही शरणागती आहे. निरहंकारित्वाची सुरुवात आहे. अंतर्मुखतेची साक्ष आहे. ही जाणीव नसेल तर व्यर्थ आहे ते गंगास्नान आणि तो सद्गुरु सत्संग !

बाहेरी कर्मे क्षाळिला । भितरी ज्ञाने उजळला ।
इही दोही परी आला । शुचित्वा एका ।।
एऱ्हवी तरी पडुसुता । आत शुद्ध नसता ।
बोहरी कर्म तो तत्त्वता । विटंबु गा ।।
मृत जैसा शृंगारिला । गाढव तीर्थी न्हाणिला ।
कडु दुधिया माखिला । गुळे जैसा ।।

श्रीज्ञानेश्वर महाराजांनी वरील ओव्या देऊन साधकाला चांगलेच अंतर्मुख केले आहे. अशी संतांनी नित्य जागृति दिली आहे म्हणून साधकाला क्षणोक्षणी आपली पातळी सापडते. खरे म्हणजे आमची स्थिती अशी आहे की—

बहु कल्पना, बहु वासना । बहु तृष्णा बहु कामना
बहु ममता बहु भावना । या नाव बद्ध ।।
परमार्थ विषई अज्ञान । प्रपंचाचे उदंड ज्ञान ।
नेणे स्वये समाधान । या नाव बद्ध ।।

म्हणून प्रामाणिकपणे आपले दोष मान्य केले आणि स्नानापूर्वी गंगेला प्रार्थना केली तर गंगेला दया येईल, आपलेपणा उत्पन्न होईल आणि ती आपल्याला जवळ घेईल. आपल्याला शब्दज्ञान पुष्कळ असून उपयोग काय ?

मी सर्वव्यापक आहे । मी सर्वसत्ताधारी आहे ।
मी सदा सर्वकाळ आहे । चिदानंद रूप शिवोऽहम् ।। १ ।।
हे शब्द का ठाऊक नाही । का अर्थ याचा कळत नाही ।
परी प्रत्यक्षानुभव काही । येतो का चित्ताला ? ।। २ ।।
साधी उडी जमेना । द्राक्ष हाती येईना ।
जंबुक करतो वल्गना । सूर्यबिंब गिळण्याची ।। ३ ।।

चार शब्द लिहिले । किंवा सभेत सांगितले ।
म्हणजे का ज्ञान दिले । का आले किंवा झाले हो ।। ४ ।।

परमार्थ हा विषयच आत्मचिंतनाचा आहे. आत्मचिंतन होत नाही म्हणून अहंकार पोसत रहातो. परमार्थाची वाटचाल घडत नाही. आधी जीव अवस्था भ्रांतीचे मूळ, त्यातून ती भ्रान्ती जाण्याऐवशी, नवा भ्रम वाढून बसला. एका रोगात दुसरा रोग वाढावा आणि रोगमुक्त होण्यासाठी प्रयत्न होण्याऐवजी रोगाची जर्जरताच अधिक वाढावी असा प्रकार होतो.

देहापासी गेला देही । तो कैसेनि होईल विदेही ।
म्हणोनि ज्ञात्यावाचून नाही । ज्ञान मार्ग ।। १ ।।
याकारणे ज्ञाता पहावा । त्याचा अनुग्रह घ्यावा ।
सारासार विचारे जीवा । मोक्ष प्राप्त ।।
सद्‌गुरुवचन तोच वेदान्त । सद्‌गुरुवचन तोचि सिद्धान्त ।।

गंगास्नानापूर्वी अशी मनोभूमिका ठेवून—त्यासाठी प्रार्थना करून गंगास्नानाला जाऊ.

## जीवनगंगा—आद्यकलश—भूमिका

सर्वसामान्यपणे जीवन चरित्रे जन्मापासून लिहिण्यास प्रारंभ करतात. पण जीवनगंगेचा अंतिम कलश प्रथम वाचकांच्या हाती दिला. आता आद्यकलश वाचकांच्या हाती देण्याचा योग येत आहे. हे योगायोगाने घडले ते आपल्या मानवी बुद्धीच्या दृष्टीने. पण हे घडविले गेले ते ईश्वरी सत्तेने घडविले आहे. असा जेव्हा विचार सुरू होतो तेव्हा असे का घडविले गेले त्याचा खुलासा मिळतो—

मनुष्यजीवन कृतार्थ झाले, सार्थकी लागले हे त्या मनुष्याच्या अंतिम कालावरून ठरते. स्पष्ट होते. या कालावरून त्याचे मौलिकत्व सप्रमाण स्पष्ट झाले म्हणजे त्याच्या जीवनाचा जन्म व प्रारंभीपासूनचे जीवनाचे धागेदोरे अंतिम वास्तव व अंतिम सत्य प्रमाणांशी कसे सुसंगत आहे याचा उलगडा होत जाऊन मानवी मनापुढे आदर्श उभा रहातो.

असे न करता जन्माचे व प्रारंभिक कालाचे दिव्य अलौकिक वर्णनाने पुढील जीवन त्या तोलाचे न आढळले, तर मूल्यमापनामध्ये

विसंगती दिसू लागते. अशा जीवनचरित्राला व्यक्तिनिष्ठेचे व व्यक्ति-पूजेचे संकुचित्व आहे हा दोष लागतो. ही दक्षता ईश्वरसत्तेने घेतली म्हणून असे घडले. वर्तमानकालात जीवनगंगेचे अंतिम कलश, प्रथम व आद्यकलश नंतर असे प्रकाशित झाले तरी कालौघात चरित्र, सर्व खंडांतून पूर्णपणे प्रकाशित झाल्यावर जीवनचरित्र प्रारंभापासून क्रमशः आद्य–मध्य–अंत असेच असल्याचे सुसंगतपणे स्पष्टपणे वाचकांना उपलब्ध होणार आहे.

हा खंड लिहूनसुद्धा श्रीसद्‌गुरु महाराजांचे जीवन चरित्र पूर्ण होऊ शकत नाही. हा आद्यखंड इ. स. १८८६ पासून इ. स. १९४० पर्यंतचा म्हणजे त्यांच्या ५४ वयापर्यंतचा आहे. यापूर्वी प्रकाशित झालेला अंतिम खंड हा इ. स. १९६७ ते इ. स. १९७४ पर्यंतचा, म्हणजे त्यांच्या जीवनाच्या वय वर्षे ८० ते ८८ पर्यंतचा आहे. याचा अर्थ इ. स. १९४० ते इ. स. १९६७ पर्यंतचे वय वर्षे ५४ ते ८० पर्यंतचे जीवन चरित्र अद्याप प्रकाशित व्हावयाचे आहे. ते श्रीगुरुकृपेने पूर्ण होईल यात शंका नाही; परंतु केव्हा प्रकाशित होईल तेही त्यांच्याच इच्छेवर आहे. या दोन खंडांवरून असे वाटते की मधला २५ वर्षांचा चरित्र भाग एका खंडात होऊ शकेल. परंतु त्याची निश्चिती देता येत नाही. कारण ही २५ वर्षे लोकसंग्रह–शिष्यपरिवार-तीर्थयात्रा-षष्ट्यब्दी, अमृतमहोत्सव, श्रीवासुदेवनिवासनिर्मिती, अनेक सत्पुरुषांच्या भेटी, साधनेचे मार्गदर्शन, सहस्रचंद्रदर्शन शांती इ. आशयांच्या माहितीने समृद्ध आहे. या कालखंडाच्या माहितीच्या २० फाईल्स भरगच्च भरलेल्या आहेत. जशी श्रींची इच्छा असेल तसे होईल.

श्रीसद्‌गुरु महाराजांचे जीवन लोकोद्धाराच्या अभूतपूर्व कार्यामुळे विशाल–व्यापक नि अक्षरशः विराट असेच आहे. पत्रसंग्रह संकलनामुळे वास्तवतेची प्रचीति शब्दाशब्दांतून व्यक्त होत आहे. जेवढे संकलन संग्रही आहे त्या अनुरोधाने संबंधितांच्या मुलाखती घेऊन जर या कार्याची आखणी केली तर चरित्र प्रकाशनास फार मोठा कालविलंब होईल. म्हणून उपलब्ध माहितीच्या आधारे सुसंगत–वास्तव चरित्रलेखन अल्पावधीत व्हावे या दृष्टीने हा उपक्रम सुरू आहे. यामध्ये उणीवा राहणे अपरिहार्य आहे. खरे म्हणजे एकच प्रकारची उणीव जास्त

प्रकर्षाने राहील असे दिसते. ती म्हणजे सर्वांचा उल्लेख संदर्भासहित दाखविणे हे फार फार कठीण आहे. वास्तविक सद्गुरु महाराजांकडून प्रत्येकाला अमोलिक साधना मिळाल्यामुळे प्रत्येकाचे जवळ अनुभवांचे भांडार भरलेले आहे. ते चरित्रात सामाविण्याची मर्यादा या स्थूल ग्रंथाची असू शकत नाही. यामध्ये लेखकाच्या वा प्रकाशनाच्या दृष्टीत कुठलाही प्रपंच नाही. पण आपला उल्लेख वा संदर्भ नाही ही बाब संबंधित व्यक्ति श्रीसद्गुरुमहाराजांच्या जीवनगंगेचा मुक्त आनंद उप-भोगू शकत नाहीत. आपला उल्लेख नाही या चिंतनाने त्यांना चरित्र अवास्तव वाटते, रूक्ष वाटते. माझी सर्वांना प्रार्थना आहे की ही मनः-स्थिती बाजूला ठेवून चरित्र वाचून पहावे. आणि सर्वांनी आपल्या सद्गुरूंची महानता समजून घ्यावी.

जीवनगंगेचे विशेष लक्षात घेण्यासारखे आहेत. (१) गुरुभक्त-केसरी कै. बापूसाहेब कुबडे, सोलापूर यांनी श्रीगुरुमहाराजांचे 'सहज-योगी सद्गुरु' हे चरित्र लिहून महाराजांची फार मोठी माहिती संग्रहित करून ठेवली आहे. तसेच त्यांनी त्यांना आलेली श्रीमहाराजांची पत्रें, श्रीदत्तमहाराज,पंडितजी सातवळेकर,श्रीकुवलयानंद, श्रीधुंडिराजमहाराज कवीश्वर, श्रीधुंडामहाराज आदी अनेक मान्यवरांची या संदर्भातील पत्रे असा फार मोठा संग्रह दिलेला आहे. याशिवाय अनेक गुरुभक्तांनी आपल्याला आलेली महाराजांची पत्रे इकडे संकलनासाठी दिली. या सर्वांचा उल्लेख म्हणजे एक अहवालच तयार करावा लागेल. या पत्र-संग्रहामुळे सारे जीवन चरित्र, स्थल कालाच्या दृष्टीने निर्दोष होऊ शकले आहे. तसेच घटना प्रसंगांची वास्तवता प्रमाणित केली आहे.

(२) श्रीगुरुमहाराजांचे एक श्रद्धावान अनुगृहीत कै. स. कृ. जोशी, डोंबिवली हे उत्तम लेखक व साहित्यिक होते. त्यांनी श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे सुमारे महिनाभर श्रीगुरुमहाराजांचा सहवास त्यांचेकडून त्यांच्या चरित्राची माहिती घेण्यासाठी घेतला. महाराजांच्या मुखातून त्यांच्या जीवनातील घटना प्रसंग आपल्याला कै. बापूसाहेब जोशी यांच्या तळमळीच्या प्रयत्नामुळे उपलब्ध झाले. त्यांना चरित्र लिहि-ण्याची फार इच्छा होती. पण नियतीची योजना नव्हती. त्यांचा सर्व संग्रह त्यांच्या पत्नी, श्रीगुरुमहाराजांच्या एकनिष्ठ अनुगृहीत साधिका

कुसुमताई यांनी दिला.

या संग्रहात महाराजांच्या मुलाखतीच्या सात वह्या मिळाल्या. त्या वाचून लक्षात आले की बापूसाहेब महाराजांची मुलाखत घेत होते व ही लिहून घेण्याचे काम प्रा. श्री. अरुण महादेव नगरकर, इंजिनिअर करीत होते. रोज काही तास याप्रमाणे ३–४ आठवडे चालले होते. त्या वह्या लिहिणारे श्री. नगरकर हे मुलाखत ऐकणारे गुरुबंधू आहेत हे लक्षात घेऊन श्री. अरुण नगरकर यांना सर्व वह्या क्रमशः वाचून त्यातील संदर्भ व बारकावे जेवढे आठवतील तेवढे स्पष्ट करून सांगावेत अशी विनंती केली. त्यांनी अत्यंत संतोषानें हे मान्य केले. व श्रीवासुदेव निवासात येऊन रोज १/१॥ तास याप्रमाणे २/२॥ महिने या कामासाठी खर्च केले. या सात वह्यांत महाराजांच्या प्रारंभीचा ४०।५० वर्षांचा जीवनकाल आलेला आहे. यामुळे महाराजांची पहिली चाळीस वर्षे अधिक वास्तव माहितीने आपणासमोर आली. ही पहिली वर्षे या कालखंडात देताना पूर्वीच्या माहितीपेक्षा अधिक स्पष्ट देता आली आहे. हे नाविन्य या पुस्तकात आढळेल. यातील घटना पूर्ण सत्य आहेत.

(३) जीवनगंगेचा हा कालखंड लिहिण्यापूर्वी नुकतेच 'श्रीदत्तवाक्सुधा' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यामध्ये प. पू. श्रीदत्तमहाराजांचे अल्प चरित्र आले आहे. हे चरित्र लिहिताना श्रीदत्तमहाराजांच्या पूर्वीच्या पिढ्यांपासूनचा इतिहास अल्प प्रमाणात अभ्यासिला गेला व त्यातील महाराजांचे संदर्भ जीवनगंगेच्या आद्य कलशामध्ये समाविष्ट करता आले. यामुळे वास्तव माहिती सुसंगतपणे चरित्रामध्ये येऊ शकली.

(४) महाराजांची इ. स. १९१० मधील हावनूर येथील सद्गुरु भेट हा प्रसंग या चरित्रातील अपूर्व भाग झाला आहे. कारण यासंबंधी बापूसाहेब जोशी यांनी भरपूर प्रश्न विचारून महाराजांच्या मुखातून माहिती घेतली ती त्या वह्यांतून उपलब्ध झाली. 'सहजयोगी सद्गुरु' मधील माहिती व ही मिळालेली माहिती डोळ्यासमोर ठेवून त्या त्या स्थानांचा नकाशा तयार केला. पंचांगावरून दिवस नक्की केले. आणि कर्नाटकातील स्थानाची माहिती असलेले, या विशेष माहितीत रुचि घेणारे गुरुबंधू श्री. ज. म. कुलकर्णी, भांडूप यांचेकडून महाराजांचा हावनूर प्रवासाचा नकाशा उत्तम तयार करविला. प्रत्येक स्थानाचे

अंतर त्यांनी प्रयत्नाने मिळविले आणि उत्तम माहितीसह हा सर्व प्रसंग प्रभावी उतरला गेला आहे.

(५) संदर्भासाठी वापरलेली पुस्तके वा साहित्य याची माहिती स्वतंत्रच द्यावी लागेल. परंतु सद्गुरुनिष्ठ, श्रेष्ठ गुरुबंधू श्रीरामकवी यांनी लिहिलेल्या ' वामनत्रिपदी 'चा उपयोग उल्लेखनीय झाला. गुरु-भक्तकेसरी बापूसाहेब यांचा उल्लेख स्वतंत्रपणे सुरवातीलाच केला आहे. याशिवाय श्रीगुरुमहाराजांचे भाचे श्रीपाद जोशी यांनी ' उलगाउलग ' नावाने लिहिलेल्या आत्मचरित्रात आपल्या आजोळचा, मामांचा, विशेषत: महाराजांचा उल्लेख प्रसंगासहित केला आहे. ते संदर्भ जीवनगंगेत घेतले आहेत. तसेच महाराजांचे पुतणे श्री. माधवराव गोविंदराव गुळवणी यांनी वंशवेल– कुळाची माहिती, इ. भरपूर माहिती दिली, त्याचाही समावेश केला आहे. ब्रह्मश्री आत्मारामशास्त्री जेरे यांनी लिहिलेल्या ' नारायण स्वामी चरित्राचा ' उपयोग नागेशभटजींच्या चरित्रभागात संदर्भासाठी झाला.

(६) वर विस्ताराने व कृतज्ञतेने उल्लेख केला आहेच, परंतु कृतज्ञता सर्वांच्याबद्दल व्यक्त करीत आहे. ज्यांचे सहाय्य श्रीमहाराजांच्या चरित्राला झाले आहे, त्यांच्या सेवेचा मोबदला देणारे महाराज समर्थ आहेत. आम्ही शब्दाने कृतज्ञता व्यक्त करून मोकळे होतो व महा-राजांना प्रार्थना करतो की सेवेचा मोबदला देणारे आपण आहात. आम्ही नुसते मिरवणारे– आमचा आम्हाला उपयोग करून घेता येत नाही तर इतरांना आमच्यापासून काय लाभ होणार ? तर प्रभो ! आपण समर्थ आहात, आपण कोणाचीही सेवा फुकट घेत नाही. आपण भक्तवत्सल व भक्तिप्रिय अहात म्हणून वर उल्लेख केलेले, उल्लेख न केलेले, ज्ञात-अज्ञात जे कोणी ' जीवनगंगे 'च्या काठी आले असतील किंवा येतील त्या सर्वांना पावन करा, कृतार्थ करा. हीच चरणांजवळ प्रार्थना आहे.

(७) या ग्रंथाचे मुद्रक, ठाणे येथील, श्री प्रिंटर्सचे श्री. शं. द. ऊर्फ बापूराव घाटपांडे यांचे सहाय्य विशेष होत आहे. त्यांनी मनावर घेतले म्हणून दत्तजयंतीला डिसेंबरात 'श्रीदत्तवाक्सुधा ' पुस्तक मुद्रित करून दिले आणि एक महिन्यात जानेवारीमध्ये हे पुस्तक मुद्रित करून देत आहेत. याशिवाय आणि एक महिन्याने तिसरे पुस्तक मुद्रितासाठी

स्वीकारले आहे. यामधून त्यांचे कौशल्य व कर्तृत्व सिद्ध होत असले तरी त्यांचा 'श्रीवासुदेव निवास' व 'महाराज' यांचेशी जो जिव्हाळा आहे तेच खरे कारण त्यांनी हे कार्य मनावर घेण्यामागे आहे. त्यांनाही महाराजांचा कृपालाभ होऊन जीवनाला स्थैर्य व समृद्धी लाभो अशी 'श्री' चरणी प्रार्थना आहे.

(८) प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आशीर्वाद पाठीशी आहेत म्हणून कुवत नसताना हातून कार्य घडवून घेत आहेत. त्यांनी अशीच अखंड कृपादृष्टी ठेवावी व जीविताच्या शेवटच्या क्षणापर्यंत योग्य असेल ती सेवा घेत रहावी ही प्रार्थना आहे. अशी सेवा घ्या की ज्यामुळे आपणास आमचे स्मरण होईल. "सेवा बरवी घ्या हातून" तरी सर्वेश्वराच्या चरणी प्रार्थना आहे की वंदनीय श्रीदत्तमहाराजांना निरामय जीवन आणि निरुपाधिक शांती लाभून आम्हास त्यांचे अखंड मार्गदर्शन लाभो.

॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त ॥

* * *

# अनुक्रमणिका


| क्रम | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | प्रारंभ – अलौकिक भाग्याचा भूतकाळ | १ ते ५ |
| २ | मातापित्यांचे शास्त्रपूत तपोमय जीवन | ६ ते ८ |
| ३ | प्रतिपौर्णिमेची वाडीवारी आणि पादुका प्रसाद | ९ ते ११ |
| ४ | श्रीगुरुकृपा काय नोहे | १२ ते १४ |
| ५ | गुळवणी कुलाची परंपरा | १५ ते १८ |
| ६ | कुडुत्री मधील बालपणाचे दिवस – कोल्हापूर | १९ ते २३ |
| ७ | श्रीसद्‌गुरु टेंबेस्वामींची पहिली भेट | २४ ते २७ |
| ८ | मुंबईतील आठवणी | २८ ते ३० |
| ९ | वामनरावांना प्लेगने गाठले – ती आबांचे निर्वाण – पवनी | ३१ ते ३५ |
| १० | सद्‌गुरूंच्या शोधात – (हावनूर प्रवास) | ३६ ते ४७ |
| ११ | हे असे लक्षात ठेव (हावनूर भेटीतील प्रसंग) | ४८ ते ५६ |
| १२ | पुनः सद्‌गुरु सत्संग (गरुडेश्वर भेट) | ५७ ते ६८ |
| १३ | वामनराव आणि जेष्ठ श्रेष्ठ गुरुबंधू–(श्री दीक्षित स्वामी श्री योगानंद ऊर्फ गांडाबाबा – श्री सीताराममहाराज – श्री गोविंदमहाराज) | ६९ ते ७४ |
| १४ | १९१३ ते १९१७ – कोल्हापुरातील कालक्रमण – | ७५ ते ८३ |
| १५ | बार्शीत ड्रॉइंग मास्तरची नोकरी – वैद्य मास्तरांचा परिचय | ८३ ते ८६ |
| १६ | काशीचे योगानंद बार्शीत – पुष्करला ब्रह्मानंदांकडे | ८६ ते ९७ |
| १७ | विश्वसूत्रधाराच्या नाटयमय हालचाली | ९८ ते १०० |
| १८ | वामनरावांना स्वामींची दीक्षा | १०१ ते १०४ |
| १९ | स्वामी चिन्मयानंद बार्शीत प्रथम | १०५ ते १०७ |
| २० | वामनरावांना दीक्षागुरुत्व | १०८ ते ११२ |
| २१ | बार्शीतील विविध घटना | ११३ ते ११९ |
| २२ | बार्शीतील अन्नोदक संपले | १२० ते १२६ |
| २३ | पुण्यात आगमन | १२७ ते १३१ |
| २४ | पुण्यातील प्रारंभकाळ | १३२ ते १४१ |
| २५ | मुमुक्षु साधकाने कसे रहावे | १४२ ते १५० |
| २६ | श्रीसद्‌गुरु सान्निध्याचा प्रभाव | १५१ ते १५३ |
| २७ | नू. म. वि. शाळेतील छोटे प्रसंग | १५४ ते १६० |

| क्रम | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| २८ | श्रीदत्तमहाराजांच्या ओहर यात्रेत महाराज | १६१ ते १६२ |
| २९ | पन्नास वर्षे सद्‌गुरु सान्निध्य व सेवासंधी लाभलेले भाग्यवंत नाना भालेराव | १६३ ते १६९ |
| ३० | १९३१–३२ मधील घटना | १७० ते १७१ |
| ३१ | मातृवियोग | १७२ ते १७६ |
| ३२ | देवतेच्या आदेशाने महाराजांकडे | १७७ ते १८१ |
| ३३ | कल्याण योगांकाने प्रसिद्धीस आणले | १८२ ते १८५ |
| ३४ | १९३५–३६ मधील घटना | १८६ ते १८७ |
| ३५ | पंडितजी सातवळेकर यांना दीक्षा | १८८ ते १९० |
| ३६ | शक्तिपात साधना दिव्य | १९१ ते १९६ |
| ३७ | २० नारायण पेठेत व्यक्त झालेले व्यक्तिमत्त्व | १९७ ते २०३ |
| ३८ | शक्तिपात साधनेची महती वाढू लागली | २०४ ते २१५ |
| ३९ | गंगास्नानोत्तर श्रीसद्‌गुरु वंदन | २१६ ते २१७ |


❋ ❋ ❋

॥ श्री गणेशदत्त गुरुभ्यो नमः ॥

# श्रीसद्‌गुरू, योगिराज
# श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज यांचे जीवन चरित्र

# *जीवन गंगा-आद्यकलश*

**श्रीवैष्णवेशगाणेश सौर्य शाक्त्यादि रूप धृक् ।**
**दत्तात्रेयोऽ स्त्वजोनन्तः सदा मे हृदि सद्‌गुरूः ॥**

श्रीसद्‌गुरू, योगिराज, श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज यांच्या जीवन गंगेची तीर्थयात्रा निर्विघ्नपणे पार पडावी म्हणून सद्‌गुरुरूपाने नटलेल्या उमापुत्र श्रीगणेशाला सर्वभाव समर्पण करून वंदन करीत आहे. जीवन्मुक्त महापुरुषांचे जीवन चरित्र गंगेप्रमाणे पापविनाशी असून चित्तस्थैर्य संपादक असते, म्हणून धीप्रेरक सद्‌गुरूंनीच ही बुद्धी दिली आहे. या कार्याची सर्व सिद्धीही त्यांचेच हाती असल्याने निमित्त केलेल्या बालकाला पित्याचे बोट धरून वाटचाल करताना परम आनंद होत आहे.

जीवन गंगेची तीर्थयात्रा गंगोत्री पासून प्रारंभ करताना गंगोद्भवाचा हिमाच्छादित परिसर चित्ताल्हादक तर आहेच पण त्याही पेक्षा अलौकिक दिव्य विराट स्वरूपाचा साक्षात्कारही देत असतो. विश्व श्रेष्ठ गंगा माता ज्या स्थानात निर्माण होते ते स्थानही दिव्य संवेदनाक्षम सिद्ध स्थान आहे. विश्वाच्या दिव्य परंपरेचे मूळ पीठ जे शिवशंकर त्याचे स्थान म्हणून हिमालयाला शिवाचे सदन

म्हटले जाते. महादेवापासून सर्व देव, तपी, योगी, मुनि, ऋषि यांच्या निवासाने ही भूमि विश्ववंद्य ठरली आहे. या अलौकिक स्थानात भगिरथाने आपल्या महत् तपस्येने गंगेला पाचारून भागिरथी केले. शिवाने मस्तकी धरून पापविनाशी केले असा गंगोद्भवाचा इतिहास अलौकिक आहे. म्हणून गंगेचे भाग्यही अलौकिक ठरले आहे.

## श्रीगुरुमहाराजांच्या अलौकिक भाग्याचा दिव्यभूतकाळ

महाराष्ट्राच्या दक्षिणकडे कोकण आणि घाटाच्या सीमेवर कोल्हापूर जिल्हा आहे. यातील राधानगरी तालुका हा डोंगरदऱ्यांनी भरलेला आहे. कोल्हापूर किंवा निपाणीमार्गाने राधानगरीला जाताना, १/२ मैल अलिकडे एक तिठा लागतो. त्याला गैबीचा तिठा म्हणतात. निपाणी मुरगुडकडून येणारा आणि कोल्हापूरकडून येणारा असे दोन रस्ते इथं मिळतात, आणि मग तो संयुक्त रस्ता राधानगरीकडे जातो. अशा तीन रस्त्यांचा हा तिठा तयार झाला आहे. या तिठ्यावर गैबी म्हणजे पारमार्थिक स्थान आहे. ही गहिनीनाथांची टेकडी म्हणून पूर्वीपासून लोक सांगत आले आहेत. गहिनीनाथ म्हणजे निवृत्ती नाथांचे गुरू. असा पारमार्थिक निधीचा हा परिसर आहे. येथून डोंगर उताराने पायी जावे लागते. पायथ्याशी अर्ध्या तासात जाता येते. या ठिकाणी 'कुडुत्री' गाव आहे. हे गाव डोंगराच्या खलाटीत वसलेले आहे. चहुबाजूंनी डोंगरांनी वेढलेले, दोन तीन गल्यांचे गाव. छोट्या वाडी एवढे, ५०/६० घरांची वस्ती, पाटलाचे घर, तेवढे दगडी, बाकी सगळी घरं मातीची. श्रीमंतीचा थाट गावाला बाह्य स्वरूपातकुठेच नाही. पण दारिद्र्यही कुठं आढळत नाही. साधं, सरळ, निसर्गरम्य सौंदर्यानं नटलेलं ! एके काळी हा परिसर म्हणजे काजू-फणस-आंबा-केळी-बांबूची (वेळूची) बेटे या वृक्षराजींनी रेलचेल केलेला होता. डोंगर कुशीत असल्याने पाऊसही भरपूर व भात शेती मोठी होती. अलिकडे मात्र भाताची जागा उसाने घेतली आहे.

या गावात ब्राह्मणाचं असं एकच घर गुळवणींचे होते. कुडुत्रीला दत्तंभट गुळवणी इ. स. १८६४ नंतर आले. तत्पूर्वी गुळवणी कुटुंब कौलव येथे रहात होते. दत्तंभटजींचे आजोबा नागेशभटजी. ही घराण्यातील फार मोठा पारमार्थिक अधिकार असलेली बिभूती. सदाचार संपन्न, पारमार्थिक बैठक असलेले, वैदिक वृत्तीने राहणारे नागेशभटजी होते. यांना श्रीनारायणस्वामींच्या अनुग्रहाचा लाभ झाला होता. या नागेशभटजींच्या जीवनामध्ये विशेष घटना अशी घडली की—

श्रीनारायणस्वामी कोल्हापुरात जगज्जननी महालक्ष्मी आणि श्रीदत्त-महाराज यांना आपल्या प्रेमळ भजनांनी नित्य संतुष्ट करीत राहिले असता, त्यांना एकाच वेळी देवद्वयांनी आज्ञा केली 'उद्या आपण दुर्गमान डोंगरावर जावे.' त्याप्रमाणे ते निघाले. दुर्गमान पर्वत कोल्हापूरच्या नैऋत्य दिशेला २६/२७ मैलावर आहे. विविध विपुल वृक्षराजींनी हा परिसर रमणीय झाला आहे. या घनदाट जंगलात विविध श्वापदेही विपुल असल्याने तेथे मनुष्यवस्तीही नाही. डोंगरावर विजयादेवीचे मंदिर आहे. रोज पुजारी पूजा करून परत येत असतो. विजयादेवीचे मंदिर झोपडीवजा आहे. या पर्वताच्या दरीत भैरी देवाचे लिंग आहे. तेथे स्वच्छ पाण्याचा झरा अखंड वहातो. पंचगंगेतील 'तुळसी' नदी ती हीच आहे.

अशा दुर्गम ठिकाणी जाण्यासाठी श्रीनारायणस्वामी शिष्य मंडळींसह कोल्हापूरहून निघाले. ते १५/१६ मैलावर असलेल्या 'कौलव' गावी आले. येथे पूर्वानुग्रही शिष्य श्रीनागेशभटजी यांचे घरात अकस्मात् दुपारी १२ वाजता आले व 'नारायण' असा भगवन्नामाचा उच्चार उच्च स्वरांत केला. स्वर ओळखीचा जाणून नागेशभटजी बाहेर येऊन पहातात तो प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ती-श्रीगुरुमहाराज त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. स्वेच्छेने श्रीगुरु-महाराज आपल्या घरी आले ही अनेक जन्मांची संपादन केलेली तपश्चर्या फलद्रुप झाल्याची साक्ष आहे. नागेशभटजी आनंदाने नाचू लागले. प्रेमाश्रूंनी श्रीचरणांना वंदन केले. प्रेमाने, आदराने, घरात आणून आसनावर बसविले. पाद्यपूजा-भिक्षा केली. सर्व शिष्य मंडळींसह आनंदाने भोजनप्रसाद घेतला.

नागेशभटजींचे जीवन महापुरुषसंश्रयाने कृतार्थ झाले. धन्य झाले. ते परंपरागत वैदिक वृत्तीने आपला प्रपंच चालवित असत. त्यांना पुत्रसंतान नसल्याने उदासीन असत. पण नारायणस्वामींची भेट होऊन त्यांच्या कृपाशीर्वादाने झालेल्या पुत्राचे नाव नागेशभटजींनी 'नारायण' हेच ठेवले. या कृपाशीर्वादाचे वेळी नारायणस्वामींनी एक लहानशी अट घातली होती. 'वंशपरंपरेने स्वकीय घराण्यातील कोणीतरी एक मुलगा कोल्हापुरी सेवेसाठी द्यावा.' ही प्रथा श्रीवामनरावजींच्या बंधूपर्यंत सर्वांनी चालविली.

नागेशभटजींना या भेटीत कृपाशीर्वाद लाभला, तेव्हां त्यांनी कृतज्ञतेने वंदन करीत म्हटले "महाराज ! मी आज धन्य झालो, माझे जीवित सफल झाले. माझा फाटका प्रपंच धड झाला. निरंतर कृपा असावी." श्रींनीही प्रसन्न होऊन

त्यांना पूर्ण आशीर्वाद दिला आणि त्या रात्री त्यांच्या घरी राहून दुसरे दिवशी आह्निक करून नागेशभटजींसह पुढे निघाले. दुपारी १२ वाजता 'तारळे' गावी आले. तेथे रामदीक्षित गुळवणी नांवाच्या आपल्या पूर्वाश्रमातील श्वशुरांच्या घरांत त्यांचे प्रार्थनेवरून शिष्यांसहित स्वामीमहाराजांनी भिक्षा घेतली व लगेच दुर्गमान पर्वतावर जाण्यासाठी निघाले.

निघतांना स्वामीमहाराज म्हणाले, "दोन चार बिब्बे व एकदोन सुया बरोबर घ्या." हे ऐकताच एकाने त्या वस्तू घरातून आणून नागेशभटजींच्या जवळ दिल्या. त्या दुर्गम स्थानाकडे ग्रामस्थांपैकी कोणी आले नाहीं. शिष्यमंडळी आणि स्वामी एवढेच निघाले. स्वामींनी इंधन गोळा करून ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे भरपूर सरपण तेथे शिष्यांनी गोळा करून ठेवले. जवळच्या झऱ्यावर सायं–संध्या–वंदनादि झाले आणि देवीसमोर भजनाला सुरुवात झाली. शेकोटी पेटवून उजेडही झाला आणि थंडीचे निवारणही झाले. भजनाचा आवाज ऐकून एक वाघ एका पायाने लंगडत लंगडत स्वामी-महाराजांच्या दर्शनासाठी व आपली पीडा निवारण्यासाठी मंदिराजवळ आला. त्याने आर्तस्वराने आपली पीडा व्यक्त केली. तो देवीच्या दरवाज्याजवळ मस्तक टेकून पडून राहिला. तो भला मोठा वाघ पाहून व त्याचा आवाज ऐकून सर्व शिष्यांची गाळणच उडाली. सर्व थरथर कापू लागले. तेव्हा स्वामीमहाराज म्हणाले "भिऊ नका." वाघाकडे पाहून म्हणाले 'तूं त्या जागेवरून हालू नकोस.' अशा स्थितीत भजन आटोपते घेतले.

स्वामीमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे वाघ तेथून हालला नाही. लोकांना पुन्हां सांगितले 'तो काही करणार नाही घाबरू नका.' मग त्या वाघाला जवळ बोलावले. तोही बिचारा जवळ आला. त्याचा लंगडा पाय स्वामींनी हातात घेतला. 'बाबा कशाने हे दुःख झाले ?' असे म्हणून त्यांनी शिष्यांना दिवा जवळ घ्यायला सांगितला. मग सुई मागवून घेऊन त्या दिव्याच्या प्रकाशात त्याच्या पायाचा फोड फोडून त्यातून पू पीळून काढला. त्याबरोबर आतील काटाही बाहेर आला. मग स्वामींनी आपल्या वस्त्राने त्याच्या पायातील पू-रक्त- इ. घाण पुसून काढली. त्यावर बिबे भाजून चांगले २/४ चरके दिले. त्या वाघाला आराम वाटला. रात्रभर सर्वजण वाघाच्या संगतीत झोपले. असे नारायणस्वामीमहाराजांचे 'सर्वभूतसमत्व' येथे प्रकट झाले.

या स्वामींच्या जीवनात अनेक अलौकिक घटना घडल्या आहेत. वाडीमध्ये

श्रीनृसिंहसरस्वतिस्वामीमहाराजांनी प्रैषोच्चारपूर्वक महावाक्योपदेश, दंड, कमंडलू व काषाय वस्त्रादि देऊन नारायणसरस्वती असे नाव प्रसिद्ध केले. ही घटना स्नानाला पात्रात उतरले तेव्हां पाण्यात पाय ओढले जाऊन दिव्य प्रकाशातलि मंदिरात प्रवेश करून घडली व सर्व विधी संपल्यावर ज्या जागेवरून ते पाण्यात बुडले तेथेंच पुन: दण्डकमण्डलूकाषायवस्त्रादिरूपात आणून सोडले. वाडी-ग्रामस्थांची ही शंका स्वत: दत्तप्रभूंनी दृष्टांत देऊन दूर केली.

सदेह ब्रह्मलोक गमनाला जाणारे दिव्य महात्मे नारायणस्वामी आहेत. त्यांना नेण्यासाठी किंकिणीचा शब्द करीत पुष्पक विमान आले. तो आवाज गोपाळस्वामीनी कृष्णा प्रवाहात स्नान करीत असतांना ऐकला. तसे स्नान सोडून ते धावत नारायणस्वामींच्या मठात येऊन त्यांनी श्रीचरणी मस्तक ठेवून वंदन केले. त्यावर स्वामी म्हणाले, 'आमचे लौकिक कार्य झाले आता आम्ही येतो' असे म्हणून विमानात बसून डोळयादेखत निघून गेल्याचे गोपाळस्वामींनी प्रत्यक्ष पाहिले आहे. दिव्य दर्शने दिव्य दृष्टीशिवाय घडू शकत नसतात म्हणून हे दिव्य दर्शन सर्वांनाच काय पण गोपाळस्वामींशिवाय कोणालाही घडले नाही. या घटनेने व्याकूळ झालेल्या अवस्थेत गोपाळस्वामींनी केलेले पद त्या दिवसापासून पालखीच्या शेवटी नित्य म्हटले जात आहे. "सांगावे कवणा ठाया जावे!" खरं म्हणजे श्रीनारायणस्वामींचे मूळ चरित्रच वाचावे असे आहे. ही घटना चैत्र व॥ ३० शके १८२७ (इ. १८०५) ची आहे.

असे हे दिव्य महात्मे नागेशभटजींच्या जीवनाचे सुवर्ण मंगल करून गेले. गुळवणी कुलाचे कुलगुरू म्हणून नारायणस्वामींचे नाव आहे. कुळात महा-पुरुष जन्माला येण्याची दैवी प्रक्रिया पिढ्यान् पिढ्या चालते तेव्हा महापुरुषांचा अवतार होतो.

नागेशभटजींना नारायणस्वामींच्या कृपेने झालेला 'नारायण' हा सात्विक सदाचार संपन्न असाच होता. यांना पुढे चार मुले व तीन मुली झाल्या. नारायण भटांचे ज्येष्ठ पुत्र दत्तात्रेय हे वामनरावांचे पितृछत्र. गुळवणी कुलाचे हे वैशिष्ट्य दिसते की, ईश्वराला अत्यंत प्रिय असे शास्त्राधारे वागणे, शास्त्रोक्त कर्मे निष्ठेने आणि दक्षतेने करणे हीच त्यांची तपस्या.

दत्तात्रेय ऊर्फ दत्तंभटजी हे थोरले असल्याने प्राथमिक शिक्षण, वैदिक शिक्षण बालपणी पिताजी व पितामह यांचेकडून मिळाले व घरची सर्व जबाबदारी ही त्याने आनंदाने स्वीकारली. दत्तंभटजींचा विवाह ही लौकरच

वयाचे २० व्या वर्षी झाला. पत्नीचे नाव 'उमा' असे होते. पुढे या पत्नीपासून सात अपत्यें झाली. परंतु सर्व अपत्ये अल्पवयीच निधन पावली आणि पत्नी उमाबाई सुद्धा या दु:खाच्या धक्क्याने निधन पावल्या. हा दैवाचा खेळ. वे. दत्तंभटजींच्या वयाच्या अवघ्या पस्तीसच्या आतच संपला.

थोड्या कालांतराने वे. दत्तंभटजींचा दुसरा विवाह कोल्हापूर प्रांतातील हिरवडे गावचे मारुतीपंत कुलकर्णी यांच्या एकुलत्या एक कन्येशी झाला. या पत्नीचे नावही 'उमा' च ठेवले. प्रथम पत्नीचे एखादे अपत्य जरी जगले असते तरी दत्तंभटजीने दुसरा विवाह केला नसता, पण ईश्वरी संकेतच असा होता, म्हणून तसे घडले नाहीं. दुसऱ्या विवाहामध्ये दोघांचे वयात २० वर्षांचे अंतर होते. दत्तंभट पस्तीशीचे होते तर उमाचे वय पंधरा होते.

दत्तंभटजीने यानंतर स्थानांतर करण्याचे ठरविले आणि कौलव जवळच्या कुडुत्री गावी त्यांनी आपलं बिऱ्हाड आणलं.

## माता-पित्याचे शास्त्रपूत तपोमय जीवन

खरे पारमार्थिक जीवन मंद नंदादीपाप्रमाणे असते. शांत, अविचल, म्हटले तर दाहक पण प्रक्षुब्ध नाही. प्रकाश आहे पण प्रखरता नाही, अशी वृत्ती पारमार्थिक निधीची खाण असते. दत्तंभट आणि सौ. उमाबाई यांच्या पारमार्थिक जीवनाला कुडुत्रीमध्ये परिपक्वता येऊ लागली. उदरनिर्वाहाकडे त्यांचे अगदी जरूरीपुरतेच लक्ष असे. इतर वेळी ते भगवद्भक्तीत रंगून जात असत. कुडुत्री गाव ही निसर्गरम्य स्थितीत असंगवृत्तीने राहिले आहे. गावालाही इतरेजनाचा संपर्क नाही. छोटे गाव असल्याने व त्यातही केवळ एकमेव गुळवणी कुटुंब एवढेच ब्रह्मणाचे घर असल्याने आणि जगत् व्यापार वर्ज्याची दृष्टी असल्याने या उभयतांना ईश्वरोपासना याशिवाय अन्य विषय नव्हता. दत्तंभट आपल्या कुलपरंपरेप्रमाणे वैदिकवृत्तीनेच उदरनिर्वाह करीत होते.

कुडुत्रीला आल्यानंतर इ. स १८६६ मध्ये प्रथम पुत्राचा जन्म झाला त्याचे नाव शंकर ठेवले. हा मुलगा सात्त्विक, पूर्वजांच्या पावलावर पाऊल टाकून ईश्वरभक्तीत रमणारा, आचारनिष्ठ असा निघाला. बालपणातच वडिलांकडून शिक्षण घेतले—वैदिक शिक्षणही घेतले आणि लहानपणापासून वडिलांच्या बरोबर वैदिकवृत्ति करू लागला. जबाबदारीची जाणीव चांगलीच असल्याने मातापित्यांना संतोष होईल असेच त्याचे वर्तन असे. लहानपणापासूनच याला सर्वजण 'शंकरशास्त्री' म्हणू लागले. आपल्या थोरल्या मुलाची कुवत पाहून

दत्तंभटजीने स्वतःला अधिकच मोकळे करून घेतले आणि ईशोपासनेत ते अधिक काळ खर्च करू लागले. दत्तंभटजीना आबा म्हणत असत.

## दत्तंभटजी उर्फ आबांचा नित्य दिनक्रम

ती. आबांच्या जीवनात परमार्थ परमोच्च होता. त्यांनी परमार्थ केला आणि उमाने संसार केला. पतिपरायण राहून संसार करणारी साध्वी 'उमा' होती. आबांनी आयुष्यभर सकाळ संध्याकाळ अग्निसाधना केली. घरात अग्निकुंड होते. आबांच्या पश्चात ती अग्निसेवा थोरला मुलगा शंकरशास्त्री यांनी संन्यास ग्रहण करेपर्यंत केली. अग्निसेवा ही तेजाची सेवा आहे. ती आबांनी केली म्हणून भारताला तेजस्वी सुपुत्र लाभला. या अग्नि सेवेशिवाय आबांच्या नित्यक्रमात देवाला महान्यासपूर्वक रुद्र–एकादशिनी व पंचसूक्त पवमानानीयुक्त अशी साभिषेक पूजा नित्याची असे. त्याचप्रमाणे श्रीगुरुचरित्र पारायणही नित्य असे. सूर्योदयापासून १२ वाजेपर्यंत हे आह्निक चाले. त्यानंतर गावापासून अर्ध्यामैलावर असलेल्य भोगावती नदीवर जाऊन ब्रह्मयज्ञ करीत असत. सर्व ऋतूत हे कार्य हीं अखंड चाले. त्यानंतर घरी आल्यावर नैवेद्य–वैश्वदेव इ. सर्व काही यथासांग आणि शांत चित्ताने चालत असे. त्यानंतर भोजन होत असे. परान्न कायमचे वर्ज्य केले होते. दुपारी विष्णुसहस्रनामाचे पाठ करीत असत. हे एक दिव्यस्तोत्र आहे. सायंकाळी संध्या, अग्निसेवा, रात्री प. प. श्रीनारायणस्वामी या कुलगुरूंचे सांप्रदायिक भजन करीत असत. या दिनक्रमात प्रपंचाला सवड नव्हती. मनुष्य देह परमार्थासाठी दिला आहे. प्रपंच हा होणारा असतो. परमार्थ करायचा असतो. तसे आबांचे होते.

## सौ. उमामाता

नांवाप्रमाणे 'उमा' ही जगज्जननी होती. नंदादीपाच्या संथ नि प्रसन्न ज्योतिप्रमाणे 'उमा' मातेचे जीवन होते. ऐकायला नवल वाटेल पण या मातेला सारेजण 'उमा' म्हणूनच हाक मारीत असत. मुलं-नातवंड-गावचे लोक-सारे नातेवाईक तिला 'उमा' म्हणत. आई, आजी, मावशी, आत्या वगैरे शब्दांनी तिला कुणा संबोधलेच नाही. ती सर्वांची नुसती उमाच होती.

उमाच रूप लोभसवाणं होतं. ठेंगणीठुसकी, केतकीच्या पानासारखी गोरी, चाफेकळीसारखं नाक, नाजुक जीवणी, प्रसन्न बोलके डोळे. तिला रागावलेले कुणी पाहिलं नाही की अनुभवलं नाही. तिच्याकडे पाहिलं की मनात आपोआप आदराची आणि प्रेमाची भावना निर्माण व्हायची, बोलणे कमी, तेही हलक्या आवाजात. फार मधुर बोलणे. सगळ्यांची आदब ठेवून, कुणालाही दुखवू नये

अशी खबरदारी घेऊन ती बोलत असे आणि वागत असे. संपूर्ण सात्त्विक भावांनी भरलेली ही व्यक्ति होती. 'उमा' मातेचे व्यक्तिमत्त्व पारलौकिक होते. सर्वांनाच तिच्याबद्दल आदरयुक्त भक्ति असे. चरित्रनायकाच्या अंतर्बाह्य गुणांचीही ही खाण होती. या मातेच्या रुपासारखे रूप आणि गुणांची संपत्ती चरित्रनायकाला प्राप्त झाली होती.

ती. आबांच्या परमार्थाचा सौरभ उमामातेच्या सद्गुणांनी विश्वव्यापी झाला. 'भवानिशंकरौवंदे वाग्र्थेव संपृक्तौ' या उक्तिंची प्रचिती दत्तंभट आणि उमा यांच्या जीवनात आलेली आहे. कुलदेवता तुळजाभवानी होती पण ते स्थान फार दूर म्हणून कोल्हापूरच्या जगदंबेची उपासना गुळवणी कुलाकडून अधिक घडत असे. त्याचप्रमाणे हे घराणे निःस्सीम दत्तोपासकच आहे. कुलगुरू नारायण-स्वामींचीही हीच दोन उपास्य दैवते होती. अन्य सर्व देवतासुद्धा यांच्या विविध नामरुपांनी नटल्या आहेत अशा श्रद्धेचे हे घराणे होते.

## प्रति पौर्णिमेची वाडीवारी आणि पादुका प्रसाद

ती. आबा आणि सौ. उमा दर पौर्णिमेला कुडुत्रीहून वाडीला श्रीनृसिंह-सरस्वतीस्वामीमहाराजांच्या मनोहर पादुकांच्या पूजनास आणि दर्शनास येत असत. तसं अंतर जवळ नाही. कारण त्याकाळात वाहनांची सोय नव्हती. बैलगाडी करून जायचं म्हटलं तर दोन बैल आणि एक गाडीवान या तिघांचा खर्च पडं. त्यापेक्षा घोडं सोयीचे असे. खर्चही कमी आणि सुटसुटीत प्रवास. म्हणून या तीस मैलांचा दर पौर्णिमेला प्रवास घोड्यावरून असे. ५/६ तासांचा प्रवास असे. प्रपंच करायला या दोघांना सुचतच नव्हता. दोघांचे अन्तःकरण ईश्वरप्रेमाने भरून गेलेले होते. दर पौर्णिमेला यायचे म्हणजे यायचेच हा निर्धार असे. हा निर्धार आणि ही कृतिच पराभक्तिचे रहस्य स्पष्ट करते.

या उभयतांची अशी इच्छा होती की, आपणास श्रीनृसिंहसरस्वतिस्वामी-महाराजांनी कृपाप्रसाद म्हणून पादुका द्याव्यात. ही इच्छा नित्य त्यांच्या मनी असे. रोकडी प्रचीति घेण्याच्या तीव्रतम इच्छेने अशी अखंड सेवा चालू होती. प्रपंच वाढत होता. थोरला मुलगा शंकरशास्त्री 'जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच' या न्यायाने सर्व जबाबदारी सांभाळीत होता. त्यानंतर बापू—नरहरी आणि गोविंद या पुत्राचे जन्म झाले. कुडुत्रीमध्ये आल्यानंतर वाडीवारी सुरू करून वीस बावीस वर्षांचा काळ लोटला होता. सेवेच्या परिपक्वतेची वेळ जवळ येत होती पण तसे समजत नव्हतं. उलट एवढ्या सेवेने सुद्धा ईश्वरकृपा होत

नाही असे पाहून मन अधिकाधिक कासावीस होत होतं. तळमळ शिगेला पोचत होती. अशा स्थितीत असतांना उमामाता गरोदर राहिल्या. वाडीवारी चालू होती.

या कालावधीतील एक घटना आहे. कुडुत्रीमध्ये मुक्काम होता. उमा-मातेला देवाच्या कृपाप्रसादाचा ध्यास स्वस्थ बसू देईना. त्यांनी उपोषण सुरू केलं. घरातील स्वैंपाकपाणी करावं, घरातील अनिवार्य कामं करावीत आणि दिवस-भर देवापुढें जप करीत रहावं. रात्री देवासमोर तिथच झोपावं. मधून मधून देवाला प्रार्थना करताना नेत्रातून अश्रूधारा वाहू लागाव्यात. ४/५ दिवसानंतर शरीर काम करू देईना. मग आपले स्नानादि करून, घरातील काम शंकरशास्त्रींवर सोपवून त्या देवापुढेच बसून राहू लागल्या. देवकार्यात अडथळा आणणारे किंवा नको म्हणणारे कोणी नव्हते. उममाता शांत, सहनशील असल्या तरी करारी होत्या. त्यांच्याजवळ निश्चयाचे बळ होते.

सातव्या दिवशी दुपारी १२ ची वेळ होती. उपवासाने ग्लानी आली होती. त्या देवापुढे डोळे मिटून बसल्या होत्या. तेवढ्यात त्यांच्या मांडीवर काहीतरी पडल्याचा आवाज झाला. त्यांनी डोळे उघडून पाहिले. ती कागदाची पुडी होती. त्या पुडीत काय आहे पाहिले तो त्यात चांदीच्या पादुका अष्टगंधांनी माखलेल्या दिसल्या. ती पुडी कुणी टाकली म्हणून मान वळवून पाहिले. एक संन्यासी लगबगीने परत जाताना दिसले. त्या पाठमोऱ्या आकृतीवरून त्या संन्यासी स्वामींची भव्यता व दिव्यता जाणवली. परंतु हाक मारायच्या आत ते स्वामी अदृश्य झाले. पादुकांचा प्रसाद मिळाल्याच्या आनंदात त्यांनी शंकरशास्त्रींना हाक मारली. आईची हाक ऐकून तेही लगेच आले. तोच आई चांदीच्या पादुकांची पुडी मुलाच्या हातात देत म्हणाली 'पादुकाप्रसाद' मिळाला. शंकरशास्त्रीही आनंदाश्चर्याने कोणी दिल्या हे विचारून ते स्वामी कुठे गेले हे पहाण्यासाठी धावत गेले. पण ते कुठेच दिसले नाहीत. आबा घरचे आन्हिक उरकून ब्रह्मयज्ञा-साठी भोगावती तीरावर गेले होते. ते परत आल्यावर त्यांना ही हकीगत समजली. तोपर्यंत आईने पादुकांची अत्यंत भावभक्तीने पूजा केली. देवाला नैवेद्य झाला. त्या दिवशी उमामातेचे उपोषण सुटले.

ही शुभघटना या काळात घडली याला विशेष महत्त्व आहे. या काळात आणखी एक घटना घडली. ती. आबांना एक साक्षात्कारी अनुभव आला. ते वाडीला नेहमीप्रमाणे आले. ही दत्तजन्माची पौर्णिमा होती. मार्गशीर्ष शु॥ १५.

वाडीत दत्तभक्तांची दाट गर्दी होती. यावेळी स्नान करून देवाला पाणी घालायला ती. आबा आले. गरम पाण्याची लोटी घेतली, देवाजवळ जाऊन श्रीपादुकांवर पाणी घातले आणि पादुकांना स्पर्श करून वंदन करीत असताना कानावर ध्वनी आला, "मी तुमचेवर प्रसन्न आहे." मस्तक वर करून पाहिले तर फक्त पादुकांच दिसल्या. तेव्हा त्यांची खात्री झाली की, श्रीदत्तप्रभूनरसिंहसरस्वतींनीच आपणास हा कृपाआशीर्वाद दिला आहे. कृतकृत्यतेने साश्रुपूर्ण नेत्रांनी त्यांनी साष्टांग नमस्कार घातला आणि प्रदक्षिणादि इतर उपासनेस लागले. आपली ही अनुभूति पत्नीला सांगितली. त्यांचा आनंद तर गगनात मावेनासा झाला.

'प्रसाद चिन्हानि पुरः फलानि' या न्यायाने भाग्योदयालाही सूर्योदयापूर्वीची शुभलक्षणे असतात. परिणामावरून कार्याचे स्वरूप नंतर ध्यानी घ्यावे लागते. पुष्कळदां परिणाम व कार्य यांचे अतूट संबंधही स्पष्ट करून घ्यावे लागतात. शब्द आणि अर्थ यांच्यात अंतर नसले तरी समजण्यास मात्र वेळ लागतो. चरित्र नायकासारख्या महापुरुषाच्या जन्मापूर्वीच्या या दिव्य घटना नंतर दिव्यत्त्वाची जाणीव देतात. पादुका आणि चरित्र-नायक यांचे ऋणानुबंध अलौकिक होते हे सिद्ध करून भविष्यकाळाने कालौघावर वज्रलेप केला आहे.

उमामातेच्या पोटातील अर्भकावर हे संस्कार होत होते का त्या दिव्य गर्भाचा परिणाम म्हणून हे घडत होते ते त्या सर्वज्ञ परमेश्वरालाच माहित असणार.

शके १८०८ (इ. स. १८८६) चा मार्गशीर्ष महिना होता. नुकतीच दत्तजयंती झालेली होती. 'मासानां मार्गशीर्षोऽहम्' असा हा भगवंताचा महिना. या मासांतील वद्य त्रयोदशीला, गुरुवारी रात्री आठ वाजून एकोणीस मिनिटांनी सुपुत्र जन्मास आला, शुभलक्षणी पुत्राला पाहून मातेला परम आनंद झाला. या सुपुत्राच्या जन्माची लक्षणे श्रीगुरुचरित्रातील पुढील ओव्यांमधून स्पष्ट दिसतात.

याचा अनुग्रह होईल ज्यांसी । तो विश्ववंद्य होईल विश्वासी । याचे वाक्य प्रमाणेसी । चिंतामणी याचे चरण ॥१॥ अष्टसिद्धी याचे द्वारी । वोळंगत राहतील निरंतरी । नवनिधि याचे घरी । राहतील ऐक द्विजोत्तमा ॥२॥ न होती यासी गृहणी सूत । पूज्य होईल त्रिभुवनात । याचे दर्शमात्रे पतित । पुनीत होती परियेसी ॥३॥ होईल अवतारी पुरुष । माना निश्चये विश्वास । संदेह न धरावा यास । म्हणोनि करिती नमस्कार ॥४॥ (गु. च. अध्याय ११ ओव्या १७-२०)


पूजनीय दत्तंभट आणि भगवती उमामाता कुडुत्री या गावात आल्या-

पासून साऱ्या त्रिपुटी ईश्वरार्पण करीत उपासना करणाऱ्या या महद्भक्ताला आणि महासाध्वीला 'दत्तप्रभूंनी आत्मदान' केल्याची ही लीला येथे घडली आहे. ईश्वरी लीला अतर्क्य नि अनाकलनीय असल्या तरी त्या स्वसंवेद्य असतात. म्हणून कालांतराने प्रकट होत असतात. असा उल्लेख करण्याची बुद्धी ही धीप्रेरकाचीच आहे. असो, विधीवत् सर्व संस्कार झाले आणि ईश प्रेरणेने या मुलाचे नाव 'वामन' ठेवले.

कोणी म्हणतात हा श्रीपाद श्रीवल्लभांचा अवतार आहे.
कोणी म्हणतात हा श्रीनृसिंहसरस्वतींचा अवतार आहे.
कोणी म्हणतात हा प्रत्यक्ष दत्तप्रभूंचा अवतार आहे.
कोणी रामकृष्णांचाही अवतार म्हणतात.
आणि या अवतारात नाव हे आहे "श्रीवामन !"

ही गोष्ट त्यांच्या जिवित कार्यावरून निश्चित होणारी असल्याने येथे चर्चा न करता केवळ उल्लेख केला आहे. हा श्रद्धेचा विषय आहे, श्रद्धा ही अनुभूति आणि प्रचीति यामधून पोसत असते. म्हणून हा श्रद्धेचा प्रांत असल्याने येथे चिकित्सा योग्य नाही.

**जन्माची ग्रहनक्षत्रे**–२३ डिसेंबर १८८६ मार्गशीर्ष व॥ १३ शके १८०८ गुरुवार, रात्रौ ८-१९ कुडुत्री, राधानगरी तालुका, कोल्हापूर संस्थान. वशिष्ठ गोत्र.



**चंद्र ज्येष्ठा प्रथम चरण**- वृश्चिक राशी, अयनांश २२।१२।४८ कर्क लग्न १७/४२; रवि-मूळ; मंगळ-उत्तराषाढा; बुध-ज्येष्ठा; गुरु-स्वाती; शुक्र-पूर्वाषाढा; शनि-पुनर्वसु (वक्री); राहू-मघा; केतू-शततारका; हर्षल-हस्त; नेपच्यून-कृत्तिका.

**श्रीगुरु कृपा काय नोहे ।**

असंग वृत्तीने राहाणारे गुळवणी घराणे असल्याने त्यांच्या वृत्तीमध्ये संग्रहाला स्थान नसे. यांच्यापैकी कोणीही श्रीमंती-ऐश्वर्य या लौकिकाकडे कधी वळलेले दिसत नाही. परंपरेने ईश्वरोपासना हे जिवित कार्य आणि 'गुरुकृपा' हे फळ एवढेच प्रत्येकाचे हृदयात ठसलेले होते. कधी लौकिकाकडे वळले नाहीत आणि अलौकिकाला सोडले नाही.

**सर्व समृद्धीची प्राप्ति । ईश्वराची अवकृपा ती ।**
**धनादिकांची आपत्ति । ईश्वर कृपा ती जाणावी-दत्तमाहात्म्य.**

**जे स्वधिकाराचे नि नांवे । जे वाटिया आले स्वभावे ।**
**ते आचरे विधी गौरवे । शृंगारोनि ॥ ज्ञा० १८।२००**

जे जसे वाट्याला आले ते प्रिय मानून राहणारी ही मंडळी होती म्हणून या कुलात देवांचा वास होता व गुरुकृपेचा वर्षाव होत होता.

वामनानंतर तीन मुली झाल्या. त्यातली मोठी तानी मधली गोदावरी आणि सर्वात धाकटी (शेंडेफळ) सखू. या सखूच्या गरोदरपणातील अलौकिक घटना आपण पाहू-

उमामातेच्या या गरोदरपणाचे वेळी वामनचे वय ६/७ होते. इ. स. १८९३ चे वर्षे. उमामातेला भयंकर व्याधी निर्माण झाली. पोटात रोगाची गाठ आली. पोट फारच फुगत गेले. खेडेगावी औषधे झाली. खेडगावचे मुख्य औषध बिब्वा ! पोटात घेतले, पोटावर बिब्वे घातले ! असले उपाय ते. याचा काही उपयोग झाला नाही. दुखणं तर असह्य झालं. कोल्हापूरला डॉ. आपटे यांना दाखविले, त्यांनी असाध्य रोग म्हणून सांगितले. ऑपरेशनचा उपयोग नाही सांगितले. तरी मिरजेच्या हॉस्पिटलमध्ये दाखविण्यास नेले. त्यावर त्या डॉक्टराने सांगितले आमच्या शास्त्रात त्यावर उपाय नाही. लौकिक उपाय नाही, डॉक्टरांनी 'कॅन्सर' सांगितले. 'गुल्म' हे आयुर्वेदातील नाव. मग दैवी उपाय करण्याचा उमामातेने निर्धार केला. ती म्हणाली वाडीला ठेवा. शंकरशास्त्री बरोबर द्या, देवाच्या दारात काही झालं तरी चांगलंच ! आबांनी सुद्धा मानले. मनात श्रीगुरुचरित्रातील ओवी आठवली

**ज्याचे घरी पतिव्रता। दैवे आगळा तो तत्त्वता। करावे सुकृत जन्मशता। तरीच लाभे तैसी सती ॥१॥**

शंकरशास्त्रींना आणि पत्नीला श्रीक्षेत्रनृसिंहवाडीला पोचते केले व घरी कुडुत्रीला निघून गेले. पुढील कथाभाग (श्रीगुरु महाराज) श्रीवामनरावांनी जसा सांगितला तसा तो त्यांच्याच शब्दात आपण पाहू–

"नारायणस्वामींच्या देवळाला लागून दक्षिणभागी जी अन्नपूर्णेची कोठी आहे ना, तिथं आई रहात होती. शंकरशास्त्री रोज एक याप्रमाणे श्रीगुरुचरित्र पारायण करीत असत. आई त्याही स्थितीत स्वैंपाक करीत होती. देवांचं दर्शन व जप तर सारखं चालू होतं.

एके दिवशी (तो दिवस आणि प्रसंगाची सत्यता पुढे पत्रावरून समजेल.) आई तशा स्थितीत स्वैंपाक करीत असताना तिला दिसलं की एक स्वामी आणि शंकरशास्त्री येत आहेत. तिच्या मनात विचार आला की, "आधी सांगितल नाही" काही नाही, कशाला आणलं कुणास ठाऊक या स्वामींना. इथं मला एकट्याचा स्वैंपाक होत नाहीं, अन् इथं.... "इतक्यांत स्वामी जवळ आले व म्हणाले "तीर्थ घे" स्वामी पूर्वेच्या दरवाजाने आत आले अन् तीर्थ देऊन उत्तरेच्या दरवाजाने नारायणस्वामींच्या देवळात शिरले. एवढे तिला आठवते. तीर्थ घेतलं आणि तिथंच पडली. ते गुल्म का काय होतं ते फुटलं अन सगळीकडे रक्ताचं थारोळं झालं. त्यांतच ती पडली होती. तिला शुद्धच नव्हती. लुगडं-शरीर सगळं रक्तानं माखलं होतं.

शंकरशास्त्री ब्रह्मयज्ञ आटोपून दुपारी ३ चे सुमारास आले. त्यांनी ते दृश्य पाहिलं. त्यांना वाटलं आई मेली. शेजारच्या दुर्गा मावशींना बोलावलं. त्या आल्या. मग सगळी माणसं आली. आई संध्याकाळी शुद्धीवर आली. तिनं झाला प्रकार शंकरशास्त्रींना सांगितला. सर्वांना आश्चर्य वाटले. दुर्गामावशीने आईला नदीवर नेले. आंघोळ घातली. धुवून काढली. मग त्या दोघी देवाचे दर्शन करून घरी आल्या. तेवढ्यात शंकरशीस्त्रींनी ते रक्ताचे थारोळे— धुवून टाकून स्वच्छ केले. त्यावेळी–त्याच दिवशी शंकरशास्त्रींनी घरी कुडुत्रीला आबांना पत्र पाठविले. ते माझ्या पोथीत आहे. पुढे आई गुरुद्वादशी अखेर वाडीस राहिली. गुरुद्वादशीचा प्रसाद घेतला आणि मग घरी आली. त्यावेळी मी व बाकीचे बहीणभाऊ कुडुत्रीला होतो. बिब्याच्या औषधाचा परिणाम गर्भावर झाला. सखुबाईच्या अंगावर कातडी सोललेली वगैरे खुणा-व्रण आहेत."

पत्र—

श्रीदत्त प्रसन्न

तीर्थरूप राजमान्य राजेश्री दत्तंभटजी अबा गुळवणी, मुक्काम कुडुत्री. वडिलांचे सेवेसी—

अपत्य शंकराने दोनी कर जोडून, त्रिकाल चरणावर मस्तक ठेवून सिर-साष्टांग नमस्कार. विज्ञापना ऐसीजे. श्रींचे व आपले कृपेकरून सुखरूप असो. विशेष-श्रीदत्तमहाराजांचे उपकार कधी फेडावे. अश्विन शु. ३ रोज शनिवारी मी प्रातःकाळी स्नान करून गुरुचरित्र वाचीत नित्याप्रमाणे बसलो. तीर्थ. सौभाग्यवती मातुश्रीने नित्यवत् दर्शन करून, मुलीला जेवायला घालून, स्नान करून, देवास प्रदक्षिणा करून, बिम्हाडी येऊन स्वयंपाकास आरंभ करून भात वगैरे सर्व जिन्नस, करून भाकरी करणार इतुक्यात मीही पुस्तक संपवून मातुश्रीस विचारून देवाकडे दर्शनास गेलो व दुर्गाबाई स्नानास गेली. इतक्यात आमच्या भाग्योदयाने महाराजांनी जी आम्हा दुर्भाग्यावरती जी कृपादृष्टी केली तज्जन्यानंदाने त्यातील काही वर्तमान आपल्यास कळवितो. पाच वाजण्याच्या सुमारास घरी कोणी नाही असे पाहून महाराजांनी वृद्ध यतींचा वेष घेऊन हाती दंड घेऊन व एका हाती काष्ठपात्र घेऊन आले आणि ती. सौ. मातुश्रीस बाई इकडे ये आणि हे तीर्थ घे असे म्हणताच तिने खरकटा हात धुवून पुढे आली. नंतर महाराजांनी मातुश्रीचे हाती दोन पळ्या तीर्थ घातले. त्यावेळेस विचारले "महाराज हे दुःख बरे होईल?" त्यावेळेस त्यांनी सांगितले की "रोगाची गाठ आहे ती जाईल फुटून". असे बोलून करूणासागर यतिवेषी महाराज आतलि दाराने नारायणस्वामींच्या मंडपात गेले. इतुके स्मरण मातुश्रीस आहे. पुढे काय झाले याचे स्मरण तिला नाही. असा प्रकार झाला. इतुक्यात मी ब्रह्मयज्ञ करून घरी येतो तर मातुश्री भूमीला पडली आहे व जवळ कोणी नाही, तोंडातून पाणी तांबडे व घट्ट दोन तीन तांबे पुढे उलटीने साठले होते व मातुश्री बेशुद्ध पडली होती. त्यावेळेस ते रोगाचे पाणी व मातुश्रींची ती अवस्था पाहून जो प्रसंग आला तो पत्री लिहीत नाही. काय लिहू? त्यावेळेस ओरीतील माणसे बाहेर गेली होती. नंतर दत्तंभट मिश्रकोट यांनी गुरुनाथभटजीस बोलावून आणले. नंतर सर्व मंडळी जमली. त्यानंतर एक प्रहराने मातुश्रीस शुद्धी आली. नंतर तिने सर्व वर्तमान आम्हास सांगितले. तितके वर्तमान आपणास कळविले

आहे. पुढील वर्तमान भेटीअंती कळेल. आपण इकडील काळजी करू नये व मी पत्र घातल्याशिवाय इकडे येऊ नये. कळावे आपुल्यास विशेष काय लिहावे.

ही विज्ञापना.

**शंकर दत्तात्रय गुळवणी**

(अश्विन शु. ३ शके १८१५ शनिवार, रोहिणी, अमृत सिद्धी योग, २८ ऑक्टोबर १८९३. संकष्टी चतुर्थी.)

ईश्वरी कृपा काय असते याचे हे वर्तमान काळातील सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट उदाहरण आहे. या उदाहरणावरून अशी श्रद्धा ठेवण्यास काहीच हरकत नाही की, ज्या ज्या ग्रंथातून ईश्वरीकृपेच्या अलौकिक घटना आल्या असतील त्याही निःसंशय इतक्याच खऱ्या आहेत. अकारण संशय हेच आपल्या मनाचे मालीन्य असते. या घटनेने आपला संशय दूर होऊन आपली ईश्वरनिष्ठा बलवत्त व्हावी हीच श्रीचरणी प्रार्थना आहे.

या घटनेवरून ती. दत्तंभट आणि ती. सौ. उमामाता यांच्यावर श्रीदत्त-कृपा पूर्ण आहे हे जसे स्पष्ट होते तसेच त्यांच्या श्रेष्ठतम अधिकाराचीही खात्री पटते. संतांचे लौकिक जीवन सामान्य असते परंतु त्यांचा अलौकिक अधिकार तसाच असामान्य असतो. गुरुकृपेला अशा दुर्धर प्रसंगांची निवृत्ती करणे ही एक लीला असते. म्हणून तर सद्गुरू कर्तुम् अकर्तुम अन्यथा कर्तृम् असतात.

## गुळवणी–कुल परंपरा

१) **शंकरशास्त्री–** थोरले. जन्म इ. स. १८६६. बाबा म्हणून ओळखले जात. आचारनिष्ठ, कडक, ईश्वरनिष्ठ, पहाटे उठत आणि नित्य कर्माला आरंभ करीत. यथासांग कर्म करण्याची वृत्ती होती. आन्हिक उरकून भिक्षुकीला जात. सकाळ संध्याकाळ नित्य कर्मात अग्नि साधनाही असे. पोषाख साधा असे. पंचा-बाराबंदी-फेटा व अंगावर उपरणे. कधी धोतर नेसले नाही की अंगात शर्ट घातला नाही. अत्यंत विरक्त वृत्ती. दुपारी पोथी वाचन. आई यांना 'बाळा' म्हणून हाक मारीत असे. मातृ-पितृ भक्त होते. रोज उभयतांच्या पायावर डोके ठेवून नमस्कार करीत. मग झोपत. सकाळी उठल्यावरही हा नित्याचा नेम होताच. त्यांना एकच मुलगा नारायण उर्फ शंभू. पत्नी निवर्तल्या-नंतर १९४३ मध्ये संन्यास घेतला. संन्यास घेतल्यावर बहुतेक मुक्काम वाडीलाच असे. श्रीनारायणस्वामींच्या चरित्राची टिपणे करून ठेवली होती. पुराण

सांगताना त्याचा उपयोग होत असे. यांना काव्याची प्रतिभा चांगलीच होती. श्रीटेंबेस्वामींचा अनुग्रह घेतला होता. परंतु वामनराव, गोदावरी व आई (उमा) यांनाही स्वामींचा अनुग्रह होण्यास पुढाकार घेतला. मुलगा शंभू याने विवाह न केल्याने यांचा वंश येथे संपला. बाबांचे आचरण वेदप्रणित होते. १९५३ मध्ये वाडी येथे निर्वाण झाले. यांची सेवा गोदावरीने विशेष केली आहे.

**पत्नी पार्वती**– ही पतिपरायण होती. अग्निसाधनेच्या वेळी बाबांचे बरोबर अग्निकुंडाजवळ बसे. सोवळे ओवळे कडक असे. घरातील सर्व जबाबदारी इच्याकडे होती. सर्वांशी मिळून मिसळून वागे. नातवंडांचे लाड करीत असे. एकच मुलगा होता. मुलगी नव्हती म्हणून उदासही होती. म्हणून तात्यांच्या लीलाचे लाड करी. १९३७ मध्ये वारली.

२) **बापूभट**– यांची दोन लग्ने झाली परंतु संतानही नाही आणि बायकाही लवकरच निवर्तल्या. नातवंडांना धार्मिक पाठांतर शिकवीत. शेवटी ते आजारीही होते. इ. स. १९३४ मध्ये वारले.

**संभू (नारायण)**– बाबांचा एकूलता एक मुलगा. सर्व वैदिक यथासांग येत होते. चित्रे उत्तम काढीत असे. कुडुत्रीला असला की भिक्षुकी करी. एके ठिकाणी रहात नसे. चंचल वृत्ती होती. लग्न झाले नाही. बाबांच्या वाट्याची शेते बाबा गेल्यावर विकून तो पैसा वामनरावांनी संभूच्या नावे पोष्टात ठेवला. त्याला वामनराव वेळोवेळी मदत करीत. त्याच्या आजारपणातही वामनरावांनी हस्ते परहस्ते खूप मदत केली. तो १९६२ मध्ये वारला. त्याचे उत्तरकार्यही वामनरावांनी यथासांग करवून घेतले व त्याचे पैसे त्यांच्या कारणी खर्च केले.

३) **नरहरपंत**– हे तात्या म्हणून ओळखले जात होते. हेही भिक्षुकी करीत. स्वभाव शांत होता. सर्व भावंडात उंचेपुरे, धिप्पाड, देखणे, तरतरीत होते. भिक्षुकीकडे ओढा नव्हता. आनंदी व उत्साही असत. बोलण्यात विनोदाची लकब असे. धोतर, बिनकॉलरचा सदरा व फेटा हा त्यांचा पोषाख. भावंडात सुदैवी होते. मुलामुलींची लग्ने चांगली झाली. नातवंडांना खेळविले. मुलांना चांगल्या नोकऱ्या. मुली चांगल्या घरी या दृष्टीने तात्या समाधानी होते. वामनरावांचे अध्यात्मिक, ऐश्वर्य-लौकिक त्यांनी फार पाहिला. वामनरावांना सुद्धा याचे मोठे समाधान वाटत असे. उत्सवाला येत. श्राद्धपक्षाला येत. आश्रमाच्या वास्तुशांतीला आले. आश्रमात राहिले. समाधान झाले. १९६६ मध्ये ते वारले.

**पत्नी सावित्री**– यांना दम्याचा विकार असल्याने बरेच दिवस अंथरुणावर

असत. पण तात्यांनी त्यांची खूपच काळजी घेतली. त्यांच्या आजारात तात्या स्वत: चहा करून देत. स्वैंपाक करीत. मुलाबाळांकडे लक्ष देत. प्रकृती बरी असली म्हणजे सर्व कामे करीत असे. त्या १९४० च्या सुमारास वारल्या.

**४) गोविंदराव उर्फ अप्पा**–यांचीही प्रकृती उंच व थोराड होती. त्यांचे ७ वी (व्ह. फा.) पर्यंत शिक्षण झाले. कोल्हापूरला मामलेदार कचेरीत काही दिवस नोकरी केली. नंतर कोल्हापूरला महाद्वार रोडवर एक किराणामालाचे दुकान टाकले होते. चांगले चालेले होते. पण रस्तारूंदीत दुकान गेले. दुसऱ्या गल्लीत दुकान सुरू केले पण चालले नाही. ते सोडून पुन: २/४ नोकऱ्या केल्या कुठे यशच येईना. ते पुण्याला आले. वामनरावांच्या मदतीने १ वर्ष लॉजिंग-बोर्डींग चालविले. पण तेथेही तोटाच झाला. एक कोळशाची वखार घातली तीही चालली नाही. शेवटी ते कुडुत्रीला परत गेले. शेतीत लक्ष घालून राहिले. त्यांचा स्वभाव सरळ–बालबोध वळणाचा होता. व्यवहार चतुरपणा नव्हता. त्यामुळे लोकांनी यांचा फायदा घेतला. राहणी टापटीपीची होती. कपडे नेटके व स्वच्छ असत. चेहरा वामनरावांच्या सारखा होता. सर्व भिक्षुकी येत होती. पण भिक्षुकी केली नाही. तरुणपणात नोकरी व महाद्वार रोडवरचे दुकान यामुळे संपन्नता होती. पण उतारवयात गरीबीमुळे फार कष्ट काढावे लागले. वामनराव त्यांना आर्थिक मदत करीत. आपले कपडे–शर्ट, कोट, धोतर, टोपी त्यांना पाठवीत असत. अप्पांना पुढे पोटदुखीचा विकार जडला. त्यामुळे ते एकभुक्त असत. इ. स. १९४१ साली, वयाच्या ५७ व्या वर्षी अचानक-मामुली अपघाताने ते गेले. त्यांना मुलांचे सुख पहायला मिळाले नाही.

**पत्नी रुक्मिणी**–यांचे माहेर पंढरपूरचे. पण लग्नानंतर कुडुत्रीसारख्या खेड्यात पहिले दिवस जड गेले. पुढे संवयीने त्या खेड्यात रमल्या. एकूण १२ मुले झाली पण त्यापैकी तीनच अपत्ये वाचली. वसंत-माधव आणि पद्मा. हे मुलांचे दु:ख तिला फार झाले. ती बेचैनच असे. त्यातून आप्पाच्या धंद्याचे आणि नोकरीचे कुठे जमेना. यामुळेही तिला धक्काच बसला. तरुणपणात संपन्नतेचे काही दिवस पाहिले. मुलाची मुंज कोल्हापुरात थाटात झालेली तिनं पाहिली. पण नंतर फक्त गतकाळाची आठवण व असे कसे झाले याची चिंता–यामध्येच १९३६ मध्ये वारली. त्यावेळी माधव अवघा १५ वर्षांचा होता.

**५) वामनराव**– संपूर्ण चरित्र पुढे येणार असल्याने येथे उल्लेख नाही.

**६) तानुबाई**– आईप्रमाणे गोरी होती. स्वभावाने सुद्धा आईसारखी शांत

होती. ही तारळ्याला बडकत्ते यांचेकडे दिली होती. सध्या कोल्हापूर येथे असलेले जगन्नाथ हे तानुबाईंचे सुपुत्र. वामनरावांचे सख्खे भाचे. तानुबाईला ३ मुले व ३ मुली आहेत. मुलं-नातवंडं कुडुत्रीहून तारळ्याला चवथीसाठी शाळेत जात असत.

**७) गोदावरी**–विवाह लहानपणीच झाला. सांगवड्याला दिली. पण विवाहा-नंतर थोड्याच दिवसात पति निधनाने बालविधवा झाली. त्यानंतर ती कुडुत्रीला आईकडे येऊन राहिली व नंतर पुण्याला वामनरावांचेकडे राहिली. गोदावरीने कुडुत्रीला असताना गोविंदरावांच्या मुलांचा मातेच्या ममतेने सांभाळ केला. गोदा-वरीचे आचरण वामनरावांच्यासारखे काटेकोर, कडक व व्रतस्थ असे. त्या स्वतः आसने, प्राणायाम करीत, जप जाप्य तर असेच. पत्रनीला श्रीटेंबेस्वामींचा अनुग्रह झाला. परमार्थात चांगला अधिकार प्राप्त केला होता. (बाबा) शंकरशास्त्रींनी संन्यास घेतल्यावर त्यांच्या सेवेसाठी गोदावरी बराच काळ वाडीत रहात असे. बाबांच्या सेवेसाठी तिने आयुष्य वेचले. वामनरावांना गोदावरी ही मातृतुल्य वाटत होती. बाबा वाडीला १९५३ च्या सुरवातीला गेले आणि लगेच ३/४ महिन्यात गोदावरी ह्या वाडीलाच देवाघरी गेल्या. तेव्हां वामनराव जवळ होते. ही दुःखद वार्ता पत्राने कळविताना एका पत्रात वामनराव लिहितात– "आई गेली तेव्हां गोदावरी होती म्हणून एकटं एकटं वाटलं नाही. परंतु आता मात्र आपल्याला आपलं असं कोणी नाही असं वाटू लागले आहे. आईच्यानंतर तीच होती माझ्याजवळ अन् आईच्या जागी पण तीच होती."

**८) सखुबाई**– ही सर्व भावंडात भाग्यशाली होती. वामनरावांचे सर्व वैभव आणि ऐश्वर्य तिला पाहायला मिळालं. सर्व तीर्थयात्रा झाल्या. ही मुरगुडला रघुनाथ श्रीपाद जोशी यांना दिली. ही मंडळी चांगली आहेत. दर शनिवारी वाडीला येणारी माणसं होती. मुलाची मुंज वाडीला झाली आहे. श्रीपाद आणि गोपाळ हे दोन मुलगे. या मुलांनी नशीब काढले. श्रीपाद हे उत्तम साहित्यिक असून त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'उलगा उलग' हे त्यांनी आपले आत्मचरित्र लिहिले असून त्यामध्ये (वामनरावांचा) दादामामांचा मोठ्या आदरानं उल्लेख केला आहे. या संदर्भात काही चांगल्या आठवणीही दिल्या आहेत. 'कस्तुरीचे कण' यामध्ये तर दादामामांच्या वर 'महाराज' म्हणून एक स्वतंत्र प्रकरणच दिले आहे. गोपाळ हा दुसरा मुलगा डॉक्टर आहे. दोन्ही मुलांचे पुण्यात बंगले आहेत. वामनरावांचे नंतर २/३ वर्षांनी सखुबाई निवर्तल्या. त्यांना सर्वजण सखु आत्या म्हणून ओळखत होते.

## कुडुत्रीमधील बालपणाचे दिवस

गुळवणींच घर म्हणजें भरलेलं गोकुळ होतं. मुलं, माणसं, गुरंढोरं यांची रेलचेल होती. गावातली माणसं, पंचक्रोशीतील माणसं-मुहूर्त-एकादशी-पौर्णिमा-सत्यनारायण-देवाधर्माचं लग्नकार्याचं-संकट-बाधेच-सारं सारं काही विचारायला याच घरात येत होती. गावाला आणि आसपासच्या लोकांना गुळवणींच घर म्हणजे आधार होता. केवढ्या भावनीक श्रीमंतीन हे घर भरल होती! त्याकाळात ५ मुले आणि ३ मुली. त्यांची नातवंड एकत्र जमली की घर कसे बहर आल्या-सारखे भरून जाई. या सर्वांची गंगोत्री अधिष्ठानाची उद्गम देवता 'उमा' होती. साऱ्यांना उमाच हवी हवी वाटत असे. नातवंडांनी आजीच्या अंगाखांद्यावर खेळून ब्रह्मानंद लुटला आहे. आजी म्हणजे शांततेचा सागर आणि प्रेमाचे आकाश होती. या प्रेमाकाशात भावनेचे ढग जमले की प्रेमाश्रूंचा वर्षाव होत असे. शांत सागराला आनंदाच्या लाटा फुटत होत्या. आजी खाऊ देते, गोष्टी सांगते, प्रेम देते, आनंद देते, कधी कधी रागवत नाही. म्हणून मुलंबाळं आजीच्या भोवती भोवती असत. अशा प्रेमळ व्यक्तीचा शब्द न् शब्द मनापासून पाळला जातो. आजीला काम आहे. आजी देवाचं करती असं दिसलं की सगळी मुलं दूर जात. उमामातेचा हा स्वभाव तिची अलौकिक शक्ती म्हणूनच होता. सहज आणि समर्थ !

या 'उमा'ला माहेरचं कुणीही नव्हतं. एकुलती एक मुलगी ही. ना भाऊ ना बहिण, आईवडीलही फार काळ राहिले नाहीत. उमाच्या मुलांना मामा नव्हता, मामाचा गावही असून नसल्यासारखाच, कारण तिथं कुणीच नाही. या मुलांनी आपले हे आजोबा—आजी कधी पाहिलेच नाहीत. शंकरशास्त्री किंवा नरसूतात्या यांना आठवत असतील तेवढेच. पण वामनरावांनी तर आजोबांना पाहिले सुद्धा नाही. या व्यावहारिक परिस्थितीने ही उमा गुळवणी कुळात एकरस-एकरूप होऊन गेली होती. या कुळात परमार्थ साधणारे म्हणजे १—ती. दत्तंभट, २—ती. उमामाता, ३—शंकरशास्त्री, ४—वामनराव, ५—गोदावरी. एका कुळात एकावेळी एवढी मंडळी परमार्थाचे अधिकारी असणं ही गोष्ट सामान्यतः कुठेही न आढळणारीच आहे.

सखुच्या जन्मानंतर वर्षांनी वयाच्या आठव्या वर्षी वामनची मुंज झाली. इ. स. १८९४. घरातच वैदिकी असल्याने मुंजीनंतर हे शिक्षण सुरू झाले. संध्या-पूजा—वैश्वदेव—पुरुषसूक्त—श्रीसूक्त—इ० धार्मिक पाठांतर घरीच करून घेतले, वामन शाळेत जाऊ लागला. खेड्यातलि शाळा, काळही जुना. कुडुत्रीला शाळा

नव्हती. ४ थ्या इयत्तेपर्यंत तारळ्याला जावे लागले. घरी धुळीच्या पाटीवर अभ्यास करायचा. शाळेत 'स्लेट' पाटी असायची.

या बालपणात खेळताना वामन भांड्यावर पडला. त्या भांड्याच्या काठावर तोंड असे आपटले की, जीभेचा छोटा तुकडाच निघाला. त्यावेळी तशी जीभ तुटली म्हणून उच्चार तितके स्पष्ट येत नसत. पुढे लोकांनी अर्थ लावला की, खेचरीसाठी जीभ कापली आणि उच्चारामध्ये फरक पडला. तसं नव्हतं. लहानपणी भांड्यावर पडून जीभ तुटली म्हणून उच्चार अस्पष्ट येऊ लागले. जीभ तुटलेली पाहून कुणी सांगितलं केळफुलाचा चीक लावा, लावला. कुणी सांगितलं सूंठ लावा, लावली. अशीच खेडेगांवी औषधे झाली आणि जखम भरून आली. दोष राहिला.

आणखी असाच दुसरा प्रसंग घडला. वामनची मुंज होऊन जेमतेम वर्ष झालं असेल. बहिणीचं लग्न होतं. घोड्यावरून वरात निघाली. वामन घोड्यामागून चालला होता आणि अचानक त्या घोड्याने लाथ मारली, ती वामनच्या हनुवटीवर बसली तर बसलीच पण त्या लाथेच्या फटक्याने छोटा वामन १५ फुटावर जाऊन पडला. किरकोळ मार खूप बसला. पण घोड्याच्या टाचेने हनुवटीच्या हाडाला भोक पडले. त्यालाही औषध-डॉक्टर काही नाही. खेडेगावी उपायांनी झालं बरं. त्या काळात प्रतिकार शक्तीच्या जोरावर हे बरं व्हायचं सगळं. त्या काळात डॉक्टर अन् खेड्यात कुठले.

कुडुत्रीचं घर चांगलं ऐसपैस होते. घराला पुढे आंगण होतं. आंगणातून आलं की सोपा. सोप्यातून आत आलं की माजघर. त्याच्या पाठीमागे मागचा सोपा मग मागच्या बाजूची पडवी. आणि मागचे आंगण. आंगणात आड आणि मागच्या आंगणाच्या पलिकडे मागील परस होतं. असे कोकणी पद्धतीचं घर होतं. गावात कल्लेश्वराचे (गावचे लोक त्याला कल्लोबा म्हणतात) शंकराचे देऊळ आणि मारुतीचे देऊळ. एवढी दोन देवळे आहेत. गुळवणींची थोडी शेती होती. खंडाने दिलेली होती. काही शेती घरी पण ठेवली होती. या शेतीची कामे घरची माणसं करीत असत. मामांनी पावसात डोक्यावर इरलं घेऊन भातलावणी करतांना भाच्याने पाहिलं आहे.

घरात गाई म्हशी असायच्या. शेतात फक्त भात आणि पावटे व्हायचे. श्रीमंती कधीच नव्हती. पण दारिद्र्य नव्हते. जेवणाची कधी कमतरता नसायची. त्यावेळी कुणी पाहुणा आला तर सगळ्यांना बरं वाटायचं. खेड्यात भाजी म्हणजे

केळफुलांची आणि कच्या फणसाची. बाकी वांगी वगैरे लावायची माणसं. आणि परसात काय वेल लावले असतील त्या भाज्या असायच्या अधून मधून. त्यावेळी जिकडे तिकडे भाताची शेत. आता झालाय सगळीकडे ऊंस!

सामान्य लोकांचा देवावर विश्वास किती असायचा हे या काळातील एका छोट्या आठवणीवरून कळून येईल. या काळात कुडुत्रीला प्लेग झाला. तिथं गावातला एकजण गावाबाहेर उघड्यावर झोपायचा. गाव म्हणजे डोंगर दऱ्यात वसलेलं. त्याला आबा म्हणाले "गण्या! सापबिप चावेल! उघड्यावर झोपू नकोस!" त्यावर गण्या म्हणाला "देवाच्या आज्ञेशिवाय सापबिप चावतो काय? अन् राजवाड्यात झोपलं म्हणून चावणार नाही काय?" आबा या उत्तराने निरुत्तर झाले. पण गण्या-सारख्या सामान्य माणसाची श्रद्धा पाहून त्याचा अभिमानही वाटला. अशी श्रद्धा ठेवणारी माणसं निर्भय होती. निष्काळजी होती. सापाबद्दल आपली काही ठरलेली कल्पना आहे म्हणून भीति आहे. मृत्यू ठरलेला आहे. कोणीही चुकवू शकत नाही.

तारळ्याला वामन आणि गोविंद शाळेत जात असत. चवथी पर्यंत शिक्षण तारळ्याला झाले. तारळ्याला बहीण तानीबाई बडकत्ते यांचेकडे दिली होती. तिथं जाणं राहणं होत असे. यानंतर पुढील शिक्षणासाठी कोल्हापूरला जावं लागलं.

लहानपणापासूनच वामन मध्ये समजूतदारपणा व प्रौढत्व होते. खेळाडू किंवा खोडकर वृत्ती नसे. बालखोड्या करून कोणाला त्रास दिल्याचे कुणी पाहिले नाही. "बालपणीच प्रौढता" होती. इतर गुणांचा विचार पुढे येईल.

## कोल्हापुरात

पहिल्या चार इयत्ता तारळ्याला झाल्या आणि ५ वीला-राजाराम हायस्कूलात वामनने प्रवेश घेतला. सरकारनं नेमलेली क्रमिक पुस्तकं असायची. कोल्हापूरला ताराबाई पंडित नावाची आत्या रहात होती. तिची वामनकडे फार ओढ असे. ही बालविधवा होऊन कुडुत्रीला येऊन राहिली होती. तेव्हापासून वामनचा लळा होता. कोल्हापुरात वामन सुरवातीचे काही दिवस आत्याकडे रहात असे. याकाळात नरसूतात्या काही दिवस आणि शंकरशास्त्री काही दिवस असे नारायणस्वामींच्या मठात सेवेला येऊन रहात होते. वामन रोज अंबाबाईकडे आणि नारायस्वामींच्या मठात दर्शनाला जाऊन येत असे.

शालेय अभ्यासक्रमात त्यावेळी 'परवचा' असायचा. अगदी औटकी पर्यंतचे पाढे पाठ असावे लागत. भूगोल असायचा. त्या स्टेटचे असायचे सगळे.

व्हिटोरिया राणीचा जाहीरनामा तोंडपाठ झाला होता. इतिहास—गणित—शास्त्र हे सगळे विषय इंग्रजीतून असायचे.

कोल्हापुरात या काळात वे. शा. सं. आत्मारामशास्त्री पित्रे यांच्या संस्कृत पाठशाळेतही वामन जाऊ लागला. रूपावली, समासचक्र, अमरकोश, रघुवंशातील आठवा सर्ग, अजविलाप, मालविकाग्निमित्र. नाटकातील काही अंक, पंचतंत्र, असा अभ्यास झाला. वामनचे पाठांतर एकाच आवृत्तीमध्ये होत असे. त्यामुळे अभ्यास म्हणजे पुनरावृत्ति हा प्रकार नसे. एकदा विषय आणि आशय कानावरून गेला की आंत तो पक्काच होत असे.

त्यावेळी प्रत्येक पेटाविभागाला (हल्ली तालुका विभाग) १/१ स्कॉलरशीप होती. पेट्यात पहिला येणाऱ्यालाती दिली जाई. राधानगरी तालुका म्हणजे त्यावेळी 'भूधरगडपेटा' म्हणत. इयत्ता ४थी च्या परीक्षेत पहिला आल्याने वामनलाही स्कॉलरशिप मिळू लागली. कोल्हापूरला ५ वीत आल्यापासून ९ वी पर्यंत दरमहा रु. ३/— स्कॉलरशिपचे मिळू लागले. त्यामुळे शिक्षणाला फी वगैरे काही नाही. तसेच इयत्ता ७, ८ व ९ च्या वार्षिक परीक्षेत १ ला नंबर आल्याने प्रत्येक वर्षी दरमहा रु. ५/— याप्रमाणे तीन वर्षे राजाराम हायस्कूलचीहि स्कॉलरशिप मिळत होती. या स्कॉलरशिपबरोबर प्रत्येक विषयातील प्राविण्याबद्दल काही पुस्तके बक्षीस मिळत असत. शाळेनेसुद्धा पुस्तके विद्यार्थ्यांच्या इच्छेप्रमाणे देण्याचे ठरविले असल्याने शालेय क्रमिक पुस्तकांचाही असा खर्च बाहेरून होत असे. हे सर्व चित्र वामनच्या बुद्धिचे स्पष्ट दर्शन घडविणारे आहे. परंतु पुढे कधीही हा विशेष म्हणून त्यांनी बोलून दाखविला नाही. प्रत्यक्ष प्रमाण असल्यावर बोलून तरी दाखविण्याची काय गरज असते.

१९०० ते १९०६/१९०७ चा हा काळ. पूर्वीची समाजरचना आज दिसत नाही. त्यावेळी शाळेत शारीरिक शिक्षण नव्हते. शाळा तपासायला 'दिपोटी' (इन्स्पेक्टर) यायचे त्या दिवशी नवे कपडे घालून शाळेत जायचे. पँटी वगैरे त्यावेळी नव्हत्या. पंचे, धोतरे उशीरा नेसावयाला मिळायची. त्या काळात लंगोटी घालून शाळेत जात. वर अंगरखा आणि डोक्याला टापसे (फेटा किंवा रुमाल). आता हे चित्र कल्पनेने जरी डोळ्यासमोर आणले तरी बावळटपणा वाटणार तो. पण त्यावेळी तसे कोणालाही वाटत नसे.

संस्कृत गाईड लिहिणारे आपटे कोल्हापूरला त्या काळात होते. फार विद्वान होते ते. सगळी पुस्तके तोंडपाठ असत त्यांची. पुढे ते जगद्‌गुरू झाले.

शाळा सुटल्यावर वामन मित्रांबरोबर त्यांचेकडे जात असे. तैल बुद्धीला तैलबुद्धीचे आकर्षण असते. या काळात वामन पोहायला शिकला. व्यायामाची आवड असल्याने व्यायाम शाळेत जाऊन व्यायाम करणे आवडत असे. आरोग्यासाठी व्यायाम असे. वामन खेळात रमला नाही.

चित्रकलेची उपजत आवड आणि सहज चित्रिकरण हे वामनचे आणखी विशेष वैशिष्टय होते. चित्रकलेची आवड हा सामान्य भाग आहे. त्यात सहज उत्कृष्ट चित्रिकरणाची देणगी हे वैशिष्टय आहे. ९ वी १० मध्ये वामनच्या चित्रकलेने शाळेतील सर्वांना प्रभावित केले होते. १९०६ साली चित्रकलेची 'फर्स्ट ग्रेड' आणि दुसऱ्या वर्षी 'सेकंड ग्रेड' या दोन्ही परीक्षेत वामनला 'उत्तम' श्रेणी मिळाली. त्यामुळे शिक्षकांनी थर्ड ग्रेडला गुळवणीनें मुंबईला जावे असे आग्रहाने सुचविले. तसा शाळेतर्फे मुंबईच्या J. J. School of Art मध्ये चौकशी करून गुळवणीचा प्रवेश घेतला. नुकतीच शाळेने १० वीची (त्यावेळच्या मॅट्रीकची) पूर्व परीक्षा घेतली होती. निकाल लागायचा होता. परंतु मुंबईचा आर्ट कॉलेजचा प्रवेश मिळाल्याने तिकडे जावे लागले व केवळ दैवात नाही म्हणून मॅट्रीकच्या परीक्षेला बसण्याचा योग हुकला. दैवाचा कौल दिसल्यावर पुनः प्रयत्नाची सुद्धा इच्छा न होणे यातच असामान्यत्व आहे. पण वरवरच्या दृष्टीला ते विपरीत दिसत असते. ही नियतीची लीला आहे. वामनमध्ये काय कमी होते-कोणती आपत्ती होती म्हणून मॅट्रीक होणं घडले नाही. याला 'ईश्वरेच्छा' हेच उत्तर आहे. परंतु ही ईशेच्छा तत्काल ध्यानी घेऊन त्याचेशी समरस होण्याची वामनची वृत्ति असामान्य आहे. काय वामन प्रयत्नवादी नव्हता ? आळशी होता ? मंदबुद्धीचा होता ? आर्थिक आपत्तीचा प्रश्न निर्माण झाला होता ? शारीरिक आजार आला होता ? काय होते ? पुनः एकच प्रयत्न घडला असता तरी 'मॅट्रीक' होणं वामनला अवघड नव्हतं. तो महत्वाकांक्षी नव्हता हे म्हणता येतच नाही. कारण त्याची स्कॉलरशिप त्याच्या महत्वाकांक्षेची पावती होती. तरीसुद्धा वामनची ही कृती त्याच्या असामान्यत्वाचीच ग्वाही दिल्याशिवय रहात नाही.

प्राचीन काळी विद्वानांना विद्वत्तेचि प्रशस्तीपत्रके, प्रमाणपत्रे नव्हती. त्यांचे ज्ञान आणि आचरण हेच प्रमाण होते. म्हणून समाज या विद्वानांना-ऋषिमुनींना-तपस्व्यांना गुरुतुल्य मानीत आणि त्यांच्या इच्छे-आज्ञेप्रमाणे वागत. हे आपल्या गुणांनी नियतीला दाखवायचे असल्यास मी प्रमाणपत्रांनी हा नियतीचा हेतू दुर्लक्षित का करु ? ही जाणीव वामनला असली पाहिजे.

'गुणाः सर्वत्र पूज्यन्ते' हा सृष्टीचा न्याय आहे. गुणवत्ता खरे प्रमाणपत्र आहे म्हणून पात्रता असूनही प्रमाणपत्राशिवाय शिक्षण पुरे झाले. या दृष्टीने वर्तमान काळात सर्व जग प्रमाणपत्राच्या आधारे माणसाची निवड करते. आपल्याला या दृष्टीने आपल्या आवतीभोवती असे दिसते की, उत्तम प्रमाणपत्र असलेली माणसे त्यांच्या कामात अपात्र आहेत. यातही आणखी महत्त्वाचा भाग लक्षात घेण्यासारखा आहे की, प्रमाणपत्रांच्या आधारे मिळविलेली विद्वत्ता अहंकार पोसते. अधीच अहंकाराला विद्वत्ताशारदेचे फार मोठे प्रेमाकर्षण असते. हे ज्ञानेश्वर सुद्धा सांगतात. "नवल इये अहंकाराची गोठी । विशेष न लगे अज्ञाना पाठी ।" ज्ञानियाच्या झोंबे कंठी । नाना संकटी नाचवी ॥ याहीपेक्षा आणखी एक अतिशय महत्त्वाचा बोध या प्रसंगातून घेता येतो. तो असा की, वामनचे जीवन प्रथम-पासून परमार्थ मार्गी असल्याने, लौकिक जीवनाकडे खेचून नेणाऱ्या राजमार्गा-पासून नियतीही मागे खेचित होती आणि वामनही हे ओळखूनच नियतीचे लाल कंदीलांना सहजपणे मान देत होता. परमार्थ हाच जीवनोद्देश असल्याने लौकिक जीवनाच्या विविध दालनाच्या उंबरठ्यावर तो जाणीवपूर्वक थांबत होता. यामुळे सामान्य जीवन जगणाऱ्यांना वामन त्यांच्यापैकीच एक सामान्य भासत होता.

## श्रीसद्गुरुटेंबेस्वामींची पहिली भेट

स्कूल ऑफ आर्टमध्ये कोल्हापूराहून वामन, गुर्जर आणि नागावकर असे तीन विद्यार्थी गेले होते. प्रत्येकाची व्यवस्था स्वतंत्र असे. कॉलेजमध्ये भेटत. अंगच्या कलेला शास्त्रीय ज्ञानाची बैठक मिळू लागली आणि वामन कलागुणात संपन्न होत चालला. पहिले काही दिवस, वामन दादरला एका परिचित व्यक्तीकडे राहून खानावळीत भोजन घेऊन बोरीबंदरला असलेल्या आर्ट कॉलेजला जात असे. या काळात कोल्हापूर मुंबई प्रवासात पुण्यातही थोडा फार मुक्काम होत असे. एकदा पुण्याच्या मुक्कामात वामनने मित्राबरोबर 'शारदा' नाटक व त्यात केशवराव भोसल्यांची भूमिका पाहिली होती. मुंबईलाही एक ऐतिहासिक नाटक पाहिलं होतं. बालगंधर्व रंगमंचावर आलेले नव्हते. त्याकाळात खानावळीतून सोवळ्याचे जेवण मिळत असे. सर्व नियम पाळून सोवळ्यात स्वयंपाक करणारे आचारी होते. भांडी घासून आल्यानंतर बालदीभर पाणी टाकून मग ती स्वयंपाकात वापरायला घेत असत. पुण्यातील ब्राह्मण ओवळ्यात जेवतात हेही याच काळात समजले.

५/६ महिने झाल्यावर दिवाळीच्या सुट्टीला वामन कुडुत्रीला जाऊन कोल्हापूरला आला. घरी पत्रव्यहार असे. गुरुद्वादशीजवळ आली होती. शंकरशास्त्री श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांच्या भेटीसाठी वाडीला येऊन राहिले

होते. या भेटीत शंकरशास्त्रींनी वामनबद्दल स्वामींच्याजवळ विषय काढला होता. "वामनची चित्रकला चांगली आहे. नुकताच मुंबईच्या आर्ट कॉलेजमध्ये पुढील शिक्षणास गेला आहे. सध्या कोल्हापूरला सुट्टीवर आला आहे. त्याला आपल्या दर्शनाची इच्छा आहे. पत्र टाकू का ?" यावर स्वामींनी सांगितले की, "पत्र पाठव पण त्याला लिही की येताना श्रीदत्ताची प्रतिमा काढून त्यामध्ये गळ्यात श्लोकबद्ध हार घातल्याचे दाखव आणि ते चित्र येतांना बरोबर घेऊन ये. तो हारासाठी श्लोक ही पुढीलप्रमाणे पत्राने लिहून कळव."

प्रत्यक्ष भेटीपूर्वीच स्वामी आपले काम करून घेऊन येण्यास सांगतात यामध्ये परस्परांचे पूर्वऋणानुबंध असल्याचे स्पष्ट दिसते. सद्‌गुरू स्वतः सांगून सेवा करून घेतात तेव्हां परस्परांच्या संबंधाची जवळीक असते म्हणून असे घडत असते. त्याचबरोबर सेवा करणारा शिष्यसुद्धा तितक्याच तत्परतेने सद्‌गुरूंच्या पूर्ण संतोषाएवढी आज्ञापालनाची जबाबदारी पार पाडीत असतो. आपल्याला सद्‌गुरूंनी काम सांगितले यामध्ये हा शिष्य कृतकृत्य होऊन आनंदाच्या हर्षाने बेभान होऊन म्हणतो— गुरु प्रेमाचिये वृष्टी । मी पृथ्वी होईन तळवटी । ऐसि या मनोरथांचिया सृष्टी । अनंता रची ॥१॥ म्हणे गुरुचे भवन । आपण मी होईन । आणि दास होऊनि करीन । दास्य तेथिचे ॥२॥ श्रीपादुका मी होईन । तया मीच लेववीन । छत्र मी आणि करीन । बारीपण ॥३॥ सिंहासन होईन आपण । वरि श्रीगुरु करिती आरोहण । होईन पुरे पण । वोळगेचे ॥४॥ इये शरीराची माती । मेळवीन तिये क्षिती । जेथ श्रीचरण उभे ठाती । आराध्याचे ॥५॥

महापुरुषांच्या जीवनातील क्षण न्‌ क्षण सत्‌ आणि आनंदाचा चैतन्य स्फुल्लिंग असतो. दोघांचा लौकिक दृष्टीने परिचय नसताना हे आकर्षण पूर्व परिचयाचे अलौकिकत्त्व दाखवीत असते. पण हे पाहणारा डोळस लागतो. अजून वामनने गुरुचा अनुग्रह घेतला नाही किंवा सद्‌गुरू स्वामींनी व्यवहारदृष्टीने अनुग्रह दिला नाही. तरी अनंतजन्मांच्या ऋणानुबंधांचे धागे जुळलेले दिसतात.

कोल्हापुरात वामनला बाबांचे पत्र मिळाले. त्याने प्राण डोळ्यात आणून पुनः पुनः ते पत्र वाचले आणि त्या क्षणापासूनच श्रीसद्‌गुरूंनी सांगितलेल्या कामगिरीस प्रारंभ केला. बाह्यजगताची संपूर्ण विस्मृती झाली आणि अंतर्मुख झालेल्या अंतर्दृष्टीला हृदयाकाशात उभ्या एकमुखी दत्तात्रेयांचे दर्शन झाले. त्याच तत्परतेने आणि एकाग्रतेने चित्र रेखाटून रंगीत केले. उत्तम कलाकाराचे रहस्य असे आहे की, जेव्हा आपण काढलेल्या चित्राकडे तो पाहतो तेव्हा त्याला

स्वतःलाच पूर्णतेचा आनंद लाभतो ते चित्र उत्तम झालेले असते. वामनची ही स्थिती या चित्राने झाली आणि आता त्यावर हारबद्ध श्लोकाचे काम करण्यास प्रारंभ केला.

फुलाच्या चार पाकळ्या आणि मधला परागाचा गोल ही सुटसुटीत फुलाची आकृती. या प्रत्येक पाकळीत एक एक अक्षर आणि परागाच्या गोलात एक वेगळेच स्वतंत्र अक्षर अशा फुलांचा अक्षरयुक्त हार. ही अक्षरे ठराविक पद्धतीच्या क्रमाने वाचीत गेल्यास श्लोक तयार होतो. पाकळीतील अक्षर आणि नंतर पराग गोलातील अक्षर वाचून झाल्यावर क्रमवार दुसऱ्या पाकळीतील अक्षर आणि पुनः पराग गोलातील अक्षर याप्रमाणे क्रमाने प्रथम पाकळी व पराग अशी अक्षरे एका पुढे एक आली म्हणजे श्लोक होतो.

ही रचना लक्षात आली म्हणजे शब्दरचना समजते आणि अर्थ बोधास मदत होते. पण ज्याने हा श्लोक तयार केला त्याच्या प्रतिभेचा अंदाज आकळणारा नाही. हा श्लोक स्वतः स्वामींनी केला असून, तो 'श्रीगुरु चरित्र–त्रिशतिकाव्य' या ग्रंथात १०२ क्रमांकाचा श्लोक आहे. हारबद्ध श्लोक कसा वाचावा हे येथवर सांगितले. आपण इथे मात्र तो मूळचा श्लोक नेहमीप्रमाणे सरळच पाहू–

**वन्देऽहं देव देवं धृति मति गति दं साङ्गयोग प्रगम्यं ।**
**पारावाराभरागाध रिक रि हरि माह्लादकं दत्तदक्षम् ॥**
**ज्ञेयज्ञं यज्व यज्ञं सुरवर परदं पारदं रम्य रम्यम् ।**
**पातारं तार तारं खल बल दलनं श्रीवरं वक्र वक्रम् ॥ १०२॥**

आपण वरील श्लोक वाचला, म्हणजे अक्षरे वाचली. पण ते शब्द आहेत. त्यांना अर्थ आहे. या श्लोकात ईश्वरी शक्ती कोणते कोणते कार्य करते त्याचे वर्णन असून त्या शक्तिसंपन्न परमेश्वराला वंदन केले आहे. श्लोकाचा अर्थ–

सूर्यादि देवांना प्रकाश देणाऱ्या, चक्षुरादि इंद्रियांचा देव असणाऱ्या, धैर्य, बुद्धि, ज्ञान, देणाऱ्या, अष्टांगयोगाने समजण्यास योग्य असलेल्या, समुद्रा प्रमाणे दुष्पार व अगाध असलेल्या, रागादिक शत्रूरूपी हत्तींचा सिंहाप्रमाणे घात करणाऱ्या, भक्तांना आल्हादक अशा, दानदक्ष अशा, 'ज्ञेय' अशा स्वरूपाला जाणणाऱ्या, विधीने याग करणाऱ्यांच्या यज्ञरूपात असलेल्या, इंद्रादिदेवांना परम पद देणाऱ्या अति रम्य अशा, स्वभक्त रक्षक असलेल्या, यतींना प्रणवाने रक्षण करणाऱ्या, दुर्जनांचे बल खंडण करणाऱ्या, त्या लक्ष्मी-पतीला अथवा मोक्ष लक्ष्मी

विलासाला, कुटिल लोकांना कुटिल असा असलेल्या, —अशा भगवंताला मी नमस्कार करतो.

हा परमेश्वराला केलेला नमस्कारच आहे. पण त्याचे माहात्म्य जाणून केलेला नमस्कार आहे. म्हणून हा नमस्कार श्रेष्ठ आहे. असो. यामुळे एका हारबद्ध श्लोकाची माहिती, इतिहास, रचना आणि अर्थ इ. आपल्या समोर आल्या. याप्रमाणे श्रीदत्तात्रयांचे चित्र व त्यामध्ये वरील श्लोक हारामध्ये गुंफून वामनराव वाडीला आले. वाडी वामनरावांना नवी नव्हती. पण नव्या संदर्भात, प्रत्यक्ष श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांच्या सिद्धस्थानात, नव्या भूमिकेत ही भेट झाली. लोकोद्धाराच्या कार्यासाठी एकाच देवाने दोन रुपे घेऊन गुरुशिष्यरुपात येथे भेट घेतली.

**म्हणोनि शिष्यु आणि गुरुनाथु । या दोहों शब्दांचा अर्थु**
**श्रीगुरुचि परी होतु । दोहों ठायी ॥६१॥ अमृतानुभव. प्र.२**

१९०७ च्या गुरुद्वादशीचे दिवशी गुरुशिष्यांची भेट झाली. काढून आणलेले श्रीदत्तात्रेयांचे चित्र स्वामींपुढे ठेवले. स्वामींनी चित्र न्याहळ्ले. फार फार संतोष झाला त्यांना. आणि त्यांनी या शिष्यवामनावर आपादमस्तक कूर्म दृष्टींनी प्रेमाचा अलोट वर्षाव केला. या चित्राच्या सेवेला उत्तर म्हणून वामनच्या हालात सतत बांधण्यासाठी एक यंत्र करून-पेटीत घालून-दोरा बांधून ती पेटी स्वहस्ते बांधली. कोणतीही बाधा होऊ नये म्हणून हे कवच करून दिले. यंत्र काढलेले होते. सर्व बाधेत मुख्य बाधा मायेची. या मायेची बाधा आधी होते आणि मग इतर बाधांची मालिका सुरु होते. म्हणून त्या मायेचा बंदोबस्त या यंत्राने कायमचा करून टाकला. या यंत्रामुळे-म्हणजे सद्गुरुकृपाशक्तिमुळे-संपूर्ण आयुष्यात वामनराव कोणत्याही मायेत सापडले नाहीत. वाडीची ही आठवण, हा प्रसंग आणि ही स्मृती म्हणून गुरुद्वादशीला वाडीला जाण्याचा संकल्प सुद्धा याच क्षणी येथे झाला. असे अपूर्व मोलाचे दिव्य या भेटीत प्रथम प्राप्त झाले. स्वामीसहवास-प्रसाद या गोष्टी उत्तम प्राप्त झाल्या. शंकरशास्त्रींना हे सर्व पाहून परम आनंद झाला. त्यांनाही वामनरावांची प्रथमपासून वेगळीच जाणीव होती. प्रत्येक ठिकाणी दिव्य घटनांचे साक्षी शंकरशास्त्री होते.

ही पेटी श्रीइच्छेने चांदीची होती. त्यावर सोन्याचे पाणी दिले व तशीच साखळी पण केली. स्वामी त्यावेळी म्हणाले होते की विटाळ झाला की, गुग्गुळाचा

धूप दाखवावा. बरेच दिवस हे पाळले. परंतु पुढे सगळा कारभारच विराट झाला आणि रोजच विटाळ होऊ लागला. तेव्हां ते अशक्य झाले.

यानंतर वामनराव पुन: मुंबईला गेले.

## मुंबईतील आठवणी

दादर ते बोरीबंदर हा रोजचा प्रवास टाळण्यासाठी वामनरावांनी गिरगाव-मध्ये मुगभाट विभागात माधवराव प्रेमजीच्या चाळीत एक पार्टनर घेऊन खोली मिळवली. खाणावळीची सोय ही जवळच झाली. सोवळ्यात जेवण असे. १३ रु. द. म. पडत. दुपारी एक वेळ भोजन होते. पार्टनर समर्थ भक्त असल्याने नित्य दासबोध वाचीत असत. या वृत्तीमुळे पार्टनर चांगला मिळाल्याचे समाधान वामनरावांना होते.

या खाणावळीत योगी विनायकबुवा फाटक हे काही दिवस जेवायला येत असत. हे जवळच गिरगावात नानासाहेब देशमुखांच्या चाळीत योगासनाचे वर्ग घेत असत. विनायकबुवा फाटक रामदासांसारखे उंच, गोरे पान, उत्तम शरीरयष्टी असलेले होते. भगवी वस्त्रे घालीत. त्यामुळे त्यांची पटकन् कोणावरही छाप पडत असे. त्यांच्या योगासनाच्या वर्गाला वामनराव गेले होते. योगासनावर बोलणेही होत होते. वामनरावांच्यासारख्या सात्त्विक आणि परमार्थात रूचि असून योगासनांचे ज्ञान असलेला इसम जर आपला शिष्य झाला तर फार चांगले या हेतूने विनायकबुवा वामनरावांना अनुग्रह घेण्याविषयी सुचवू लागले. पण हा विषय वामनरावांना प्रतिकूल वाटू लागला. योगासनांच्याबाबतीत इतर कोणा-कडून मार्गदर्शन घेण्याचा प्रसंग वामनरावांच्यावर पूर्वी कधी आला नाही आणि पुढेही त्यांनी कोणाच्या मार्गदर्शनाखाली आपला योगासनांचा अभ्यास केला नाही. कुठेही कटुत्व न आणता वामनरावांनी विनायकबुवांचा वर्ग बंद केला आणि विषय हातावेगळा करून टाकला.

संध्याकाळी सायंसंध्येसाठी आणि उपासनेसाठी वामनराव ठाकुरद्वारमधील दत्तमंदिरात येत असत. येथील एका खोलीचे भाडे रु. ४ होते. परंतु पार्टनरमुळे वामनरावांना २/– रु. मध्ये राहण्याची सोय झाली. पण पुढे टीचर्स ग्रेडच्या अभ्यासासाठी वामनराव सरदार गृहात भोजन आणि निवास एकाच ठिकाणी सोय झाली म्हणून रहाण्यास आले. भोजन आणि निवास यासाठी रु. २२/– मासिक खर्च येत असे. सोवळ्यात जेवणे ही भूषण वाटणारी गोष्ट असे. सरदार-

गृहात लोकमान्य टिळकांची खास खोली राखून ठेवलेली असे. कोल्हापूरच्या राजे साहेबांचीही स्वतंत्र जागा नेहमी राखून ठेवलेली असे.

या काळात गिरगावात मुक्काम असताना शेजारच्या चाळीत कडेगावचे नारायणमहाराज आल्याचे समजले. तेव्हां वामनराव त्यांच्या दर्शनास गेले होते. लोकांची गर्दी होती. त्या गर्दीत वामनरावांनी पुढे जाऊन नारायणमहाराजांना नमस्कार केला आणि त्याचवेळी नारायणमहाराजांनी वामनरावांना नमस्कार केला. त्यांनी नमस्कार केलेला पाहून सर्वजण आश्चर्य करू लागले. नारायणमहाराजांनी वामनरावांच्यामधील दिव्यत्त्व आपल्या दिव्य दृष्टीने पाहिले असेल. त्यांनी नमस्कार केला तो लौकिक कारणासाठी शक्य नव्हता. पंडीत, विद्वान, वैदिक, अधिकारी इ. पैकी वामनरावांच्या जवळ काहीच नव्हते आणि तरीही हा नमस्कार झाला. म्हणून असा अर्थ यातून ध्वनित होतो.

## अमेरिकेत जाण्याच्या संदर्भातील प्रसंग

आपली सामान्यपणाची भूमिका उत्तम वठवण्यासाठी असामान्य माणूस फार सावध असतो. किंबहुना कुशल नट जी वाट्याला येईल ती ती भूमिका उत्तम करू शकतो. रंगमचावरील नाटके छोटी असल्याने त्या नटाला नाटकाच्या आधी व नंतर प्रेक्षक पाहू शकतात व हा अमुक अमुक नट म्हणून ओळखू शकतात, परंतु आयुष्याच्या व्यासपीठावर मनुष्याचे नाट्य जन्मानंतर सुरू होते आणि मृत्यूला संपत असते. यामुळे नटाचा परिचय नटाहून वेगळा होऊ शकत नाही. याच अडचणीमुळे महापुरुषांचे जीवन मानवाच्या जाणीवेच्या कवेत महापुरुषांच्या जीवन समाप्तीनंतर येऊ लागते.

वामनरावांचा व्यावहारिक परिचय म्हणजे भिक्षुक घराणे. नॉनमॅट्रिक, आर्टची आवड, फोटोग्रॉफीची आवड, कोणत्याही क्षेत्रात पूर्णत्व नाही. अमेरिकेत जाण्याची संधी न मिळालेली व्यक्ती, साधा ड्रॉइंग टीचर म्हणून नोकरी, नोकरी-तही कुठे बढती नाही दोन छोट्या खोल्यात आयुष्य काढलेले, शरीरयष्टीही ठेंगणी, सामान्यच, ती सुद्धा कृशच ! विवाह नाही— संसार नाही.—वडिलोपार्जीत श्रीमंती नाही—असे हे व्यावहारिक जीवन. ही लौकिक जीवनाची चौकट पाहिली तर काय कल्पना होणार ? यापेक्षा कितीतरी उत्तम ऐश्वर्याच्या, समृद्धीच्या, जीवन चौकटी लाभलेली माणसे अवती भोवती पाहतो.

वामनरावांना अनेकांनी ओळखले नाही ते त्यांच्या या सामान्यत्त्वामुळेच ओळखले नाही. ते कोणत्याही परीक्षेस बसले असते तर चांगल्याच गुणांनी उत्तीर्ण

झाले असते पण एकदाही त्यांनी ही संधी नियतीच्या हाती दिली नाही. त्यांच्या अमेरिकेस जाण्याबाबतही घडलेली माहिती त्यांच्याच मुखातून आलेली पाहू—

"अमेरिकेला कशाला जायचं वगैरे काही कल्पना नव्हती. डोक्यात आमच्या वर्गातला मुलगा गुर्जर अगदी 'ढ' विद्यार्थी जातोय म्हणून डोक्यात विचार आला. गुर्जरची फार इच्छा. त्यांची परिस्थिती आमच्यापेक्षा चांगली. प्रथम आम्ही दोघांनी अमेरिकेत असलेल्या आपल्या भारतीय व्यक्तीला डॉ. खानखोजे यांना पत्र पाठविले, "आमची अमेरिकेत शिक्षणासाठी येण्याची इच्छा आहे. या संदर्भात आम्हास संपूर्ण मार्गदर्शन करावे. "डॉ. खानखोजे यांचे उत्तर आले. "येथे येण्याचे भाडे व अमेरिकेत आल्यावर सुरवातीला काही दिवस खर्चासाठी रु. २००/- अधिक वर हवेत. अशा तयारीने आलात तर येथे काही जमेल."

या पत्रामुळे अनंत गुर्जर तर भारावूनच गेला. पैसे गोळा करण्यासाठी आम्ही प्रयत्नास लागलो. हिंदु एज्युकेशन फंड या संस्थेचा एक ट्रस्ट असल्याचे समजले. त्याचे तीन ट्रस्टी म्हणजे चित्रशाळेचे मालक श्री. वासुकाका जोशी, डॉ. नानासाहेब देशमुख व श्री. आप्पासाहेब पटवर्धन हे होते. त्यांचेकडे मदत मागायला गेलो. गुर्जर व मी. माझी दाढी वाढलेली. डोक्याला गुंडाळलेले, ते म्हणाले "पैसा घेतलेले लोक परत करत नाहीत. म्हणून आम्ही मदत द्यायचं बंद केलं आहे." हा पहिला नकार ऐकताच मी अमेरिकेचा विचारच सोडून दिला. पण गुर्जरने मात्र खटपट केली. त्याला त्याच्या वडिलांनी एक हजार रुपये त्या काळात दिले. नियतीला त्याला तिकडे पाठवायचे होते. त्याचे अन्नोदक तिकडे होते. गुर्जर शिरोळचे राहणारे. त्याला ड्राईंगची आवड होती. त्याने आपल्याला स्कॉलरशिप मिळावी म्हणून तो विजापूरकरांना भेटायला गेला, तेव्हा ते म्हणाले "तुला काय सर्टिफिकेट देऊ ? तुझी प्रगति तर ही अशी ! तुझी प्रकृती तेवढी चांगली आहे. तेवढं सर्टिफिकेट देतो." हे मी सगळं पहात होतो. माझं मन एकदा निघालं ते निघालं ! वर्गातल्या एका सामान्य मुलाला वाटलं तसं मला वाटलं होतं एवढंच ! तो वडिलांच्या आधारावर गेला. त्याचं अमेरिकेत तरी काय झालं ? थोडे दिवस शिकायचं, थोडे दिवस शेतावर काम करायचं. असं करावं लागलं त्याला. सगळ्या युनिव्हर्सिट्या पालथ्या घातल्या तेव्हां कुठे एकदाचा Ph. D. झाला. पण पुढे काय ? केमिस्ट ड्रगिस्टचं दुकान टाकलं, तिथल्याच बाईशी लग्न केले. मूलबील काही नाही त्याला ! ते चांगलंच झालं ! हो तिथं प्रजाउत्पन्न करून करायचे काय ? पुढे अमेरिकेतील बेडेकर मसाल्याची

एजन्सी घेतली. बस्स ! झालं ! परदेशात गेला एवढा मोठेपणा राहिला. बाकी सगळं अस्सच ! आम्हाला देवानं इथं थांबवले हे देवाचे केवढे उपकार आहेत ! नाहीतर आमचे जीवनचित्र असंच कसं तरी झालं असतं !!"

## वामनरावांना 'प्लेग'ने गाठले

मुंबईमध्ये टीचर्स ग्रेड परीक्षा जवळ आली होती. पण त्याचवेळी वामनरावांना ताप सुरू झाला. या आजारात पुन: चहा घेतल्याचे सांगताना म्हणतात- "या पूर्वी कोल्हापुरात राजाराम हायस्कूलात असताना प्रथम चहा घेतला होता. पण त्या काळात चहाही सोवळ्यात करीत होते. हे सांगूनही पटणार नाही. त्यावेळी माणसांच्या धर्मशास्त्रावर श्रद्धा होत्या. कोणाच्याही मनात राग, द्वेष नव्हते धर्माचरण करणाऱ्याबद्दल आदर असायचा. आता लोकांचा सोवळ्यावरच राग आहे. शिवाशिवीमुळे हल्ली लोकांची डोकी दुखु लागली आहेत. सोवळ्यामुळे किंवा शिवाशिवी पाळल्याने काय तोटा झाला आहे कुणाचा ? पण फायदे किती बुडाले त्यामुळे, याचा कोणीही विचारच करीत नाही. पावित्र्यच राहिले नाही म्हणून झाले असे."

सरदार गृहात मुक्काम असताना ताप सुरु झाला. म्हणून वामनराव कुडुत्रीला आले. इ. स. १९०८ चे वर्ष होते. यासंबंधी त्यांनी सांगितलेली माहिती त्यांच्याच शब्दात वाचू–

"तापामुळे मुंबई सोडली. तापाने ऐन परीक्षेची वेळ गाठली. जीवापेक्षा परीक्षा मोठी आहे काय असा विचार केला अन् आलो. मग गावीच राहिलो दोन महिने. भाद्रपद महिना होता. गावात उंदीर पडायला लागले. पाऊस इतका भयंकर पडू लागला की बाहेर तोंड काढता येत नव्हतं. २००/२०० इंच पाऊस. गावात प्लेग सुरु झाला तरी गाव सोडून माणसं जाणार कुठं ? मला पुन: ताप सुरु झाला. अन् रोजच्या रोज येऊन वाढायला लागला. मला शंका आली की हा ताप वेगळा दिसतोय. अन् काय मांडी दुखू लागली. म्हणून मांडीला हात लावला तर चांगली मोठी गाठ हाताला लागली. मी म्हटल प्लेग झाला आपल्याला. पण करणार काय ? तेव्हां औषध वगैरे काही नव्हतीच. खेडेगावात औषध म्हणजे बिब्बा ! लावायचा गाठीवर ! सगळे सांगत होते बिब्बा घाला म्हणून. पण मी म्हटलं 'नको' बिब्बा लावू नका.

दुसऱ्या दिवशी सगळं गांव तशा पावसात बाहेर पडलं ! पण आमच्या घरात बंधूंची बायको बाळंतीण झाली. काय करणार तसेच राहिलो घरात.

अन् घरात रोज १०/१५ उंदीर मरून पडायचे. आधी उंदरांना प्लेग होतो. मग ते पाण्याकडे धावतात. तिथं पाण्याजवळच पडायचे मरून. आम्ही सर्व घरीच होतो. पण माझी ती स्थिती पाहून मग मला मारुतीच्या देवळात नेऊन झोपवलं. १० दिवसात मला शौचाला पण झाली नाही. पोटात अन्न नाही, होईल कुठून ? त्या तापाच्या ग्लानीत मला वाटायचे मी मुंबईतच आहे. माझ्या हातात गुरुमहाराजांनी दिलेलं यंत्र होतं. मला खात्री होती आपण मरत नाही म्हणून. तसं मी बाबा आणि आईला स्पष्ट बोलूनही दाखविले होते. १२ दिवसांनी काहीही औषध न घेताच बरा झालो.

या आजारातून उठलो की– देवाच्या कृपेने बरा झालो म्हणून श्रीगुरुचरित्राचा एक सप्ताह केला. मी देवाला नवस केला नाही. आजारात बरं वाटलं तर श्रीगुरुचरित्राचा सप्ताह करीन असा विचारही मनात आला नाही. हातातल्या यंत्रामुळे आतून खात्री वाटत होती. 'श्रीपरमेश्वर प्रीत्यर्थे' नंतरचा सप्ताह केला. सगळी कामे ईश्वर प्रीतीसाठीच करायची असे मनात पहिल्यापासून होते.

यानंतर अश्विन व॥ १२ ला वाडीला गेलो आणि वाडीत गेल्यावर लागोपाठ सात सप्ताह पुरे केले. त्यावेळी माधुकरी मागून सात सप्ताह केले.

## पवनी चातुर्मासात अनुग्रह

वामनरावांनी अश्विन वद्यात एक आणि पुढे सहा सप्ताह याप्रमाणे मार्गशीर्षापर्यंत सात सप्ताह पुरे केले. प्रकृतीही साधारणच होती. हा ७/८ महिन्यांचा काळ प्रकृतीकडे लक्ष देण्यासाठी घालविला. आसने–प्राणायाम–नित्योपासना यामध्ये हे दिवस गेले.

## ती. आबांचे निर्वाण

श्रावणात आबांची प्रकृती बिघडली आणि ते फक्त २/३ दिवसच आजारी होते. श्रावण शु. १० ला गुरुवारी सर्वजण घरी असतांना–कल्पना नसतांना–त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. यावेळी आबांचे वय ८० होते. तर उमामातेचे वय ६० होते.

## ती. उमामातेचे तत्पूर्वीचे स्वप्न

ती. आबांच्या आजारपणात ती. अुमामातेला पहाटे एक स्वप्न पडले होते. आबा कधीच आजारी पडले नव्हते. आता ऐंशी वय झालेले आणि अचानक आजारी पडून अंथरूण धरले म्हणून ती. उमामातेच्या मनांत शंकेची पाल चुकचुकली. तिने देवाजवळ प्रार्थना केली होती की, "देवा मला सौभाग्य मरण

यावे." म्हणून स्वप्नात श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज येऊन म्हणाले "तुझ्या प्रारब्धात २२ वर्षे वैधव्य योग आहे. तो या जन्मात भोगलास तर पुढे तू मुक्त होशील. नाहीतर पुढच्या जन्माततरी वैधव्य भोगावेच लागेल. काय इच्छा आहे ते सांग." यावर ती. उमामातेने म्हटले "आपल्या इच्छेच्या मी बाहेर नाही." हे स्वप्न ती उमामातेने ती. आबा गेल्यानंतर सांगितले.

## शंकरशास्त्री एकटेच पवनीकडे

वडिलांचे और्ध्वदेहिक उरकल्यावर शंकरशास्त्रींना श्रीसदगुरूटेंबेस्वामींच्या दर्शनाची तीव्र ओढ लागली. त्या वर्षीचा श्रीस्वामींचा चातुर्मास पवनीमध्ये होता. शंकरशास्त्रींनी स्वामींना पत्र पाठवून आपल्या दर्शनास येण्याची तीव्र इच्छा आहे असे कळविले. स्वामीमहाराजांनी उत्तर पाठविले की, "आपणच वाडीस येऊ तेव्हा दर्शन घडेल, तरी यावेळी इकडे येऊ नये." पण शंकरशास्त्रींना धीर न निघून ते पवनीस गेले. तेथे जाताच त्यांना ताप येऊ लागला. वैद्यांनी सांगितले हा ताप ४० दिवस जाणार नाही. तेव्हां घाबरून शंकरशास्त्री स्वामीमहाराजांकडे आले व आज्ञा मोडल्याबद्दल क्षमा मागून त्यांनी कृपा करण्याची प्रार्थना केली. तेव्हां स्वामीमहाराजांनी "घाबरू नकोस" असे सांगून तीर्थ व अंगारा दिला. तीर्थ व अंगारा लावताच ताप उतरेल असेही सांगितले. त्याप्रमाणे करताच रात्री घाम येऊन ताप उतरला. पुढे चातुर्मास संपेपर्यंत शंकरशास्त्री तेथे राहिले.

शंकरशास्त्रींनी स्वामीमहाराजांची संमती घेऊन कुडुत्रीला पत्र टाकले व आई, बहीण (गोदावरी) आणि बंधू वामनराव यांना पवनीला बोलावून घेतले. यामुळे वामनरावांना या चातुर्मासात सद्‌गुरूंचा सहवास चांगला लाभला.

पवनीच्या चातुर्मासात आजेगावहून शंकरकाका आजेगांवकर, त्यांच्या मातुश्री, भगिनी काशीताई आणि बंधू दत्तोपंत हे आले होते. गुळवणी आणि आजेगावकर परिवारांचा येथे प्रथम संबंध आला आणि पुढे आयुष्यभर हे दोन परिवार एका परिवाराप्रमाणे राहिले. या चातुर्मासात श्रीसद्‌गुरू स्वामीमहाराजांचे पूर्वाश्रमीचे बंधू श्रीसीताराममहाराज, श्रीगांडामहाराज, श्रीगोविंदराव पंडित इ. स्वामीभक्त उपस्थित असल्याने या सर्वांचा परिचय वामनराव आणि शंकरराव यांना झाला.

हे पवनी ठिकाण नागपूरच्या पलिकडे भंडारा जिल्ह्यातील गाव आहे. गांव अगदी जुनं आहे. या गावाचं पूर्वीचं नांव 'पद्मावती पुरी' असे आहे. वेनगंगा नदीच्या तीरावर आहे. हा चातुर्मास फारच मोठ्या प्रमाणावर झाला.

रोज १०/१५ हजार पाने भोजनाची होत असत. दिवसभर पंक्तीवर पंक्ती चालायच्या. तेथे रोज सर्वांची जेवणाची सोय असे. पण स्वामीमहाराज मात्र नेहमीप्रमाणे स्वत: माधुकरी मागून आणून आपली क्षुधानिवृत्ति करीत.

या गावात १०८ गणपतीची व १०८ मारुतीची मंदिरे आहेत. विठ्ठल मंदिर, मुरलीधर मंदिर इ. मंदिरेही अनेक आहेत. सकाळी स्नानाला जाताना स्वामींच्या बरोबर बरीच मंडळी असायची. त्यांत वामनराव आणि शंकरराव सर्वांसह असायचे. सकाळी स्नान आणि आन्हिक झालं म्हणजे स्वामींचे भाष्य वगैरे होत असे. नंतर बाजार, भोजनव्यवस्था ! रोजचा कारखाना चालायचा ! कुणाला मंत्र, कुणाला अंगारा, कुणाला काही, कुणाला काही असं सकाळी ११ पासून रात्री ११ पर्यंत चालायचे. कुणी आलं तर रात्री ११ पर्यंत जेवायला वाढायाचे नंतर ज्याचं त्यानं पहायच. पंजाबचे नागराज आले होते चातुर्मासात.

भाद्रपद शु. १४–अनंत१४–मंगळवार, दिनांक २८ सप्टेंबर १९०९ रोजी सकाळी-गुळवणी परिवारातील तिघे आणि आजेगाव परिवारातील चौघे यांना–मंत्रदीक्षा झाली. शंकरशास्त्रींना यापूर्वीच दीक्षा झालेली होती.

भाद्रपद शु. १५–चातुर्मास समाप्तीच्या दिवशी रात्री ११/१२ वाजेपर्यंत दानाचा मुसळधार पाऊस चालला होता. धोतर, उपरणी, शाली, वस्त्रे, लुगडी, दक्षिणा इतकी वाटली की, त्याचा हिशेब करणं अवघड होते. पोतीभरून पैसे आणावेत व वाटावेत असे चालले होते. पहाणारे सगळे आश्चर्यचकित होऊन गेले. दुसरे दिवशी सकाळी एक बाई आली तर तिला स्वामीमहाराज म्हणाले "काल आली असतीस तर दिलं असतं. आज कुठून आणू ?" लोकात महत्व वाढावे म्हणून ते लोकाभिरूचिप्रमाणे कधीही वागत नसत. लोकेपणाच नव्हती त्यांची स्वामी म्हणजे चालते बोलते शास्त्र होते. त्यांची शास्त्रावर निष्ठा होती म्हणून आचारावर कटाक्ष होता.

**निवृत्ती स्त्रियेसी विवाह केला । स्वात्मराजी अभिषेक झाला ।**
**आता काही मला । नावडे हे निश्चित ।**

## वामनराव आणि विवाह

द. मा. २९।९६

इ. स. १९०९ साली वामनरावांचे वय २३/२४ होते. वडील गेल्यानंतर वामनरावांच्या विवाहाचा विषय प्रामुख्याने आई आणि शंकरशास्त्री यांच्या मनात आला. यादृष्टीने दोघांनी आपापली इच्छा म्हणून वामनरावांना लग्नासंबंधी

विचारले. परंतु वामनरावांनी दोघांनाही समजावून सांगितले. 'माझी इच्छा नाही. कुंडलीतही भार्यायोग सुखकारक नाहीं.' दोघेही विचारी असल्याने, वामनरावांची वृत्ती माहीत असल्याने आग्रह करू शकले नाहींत. किंवा 'लग्न कर' असा शब्दही आईने मुखातून काढला नाही. वामनराव मातृभक्त होते. शंकरशास्त्रींप्रमाणे रोज सकाळी उठल्यावर आणि झोपेपूर्वी मातृपितृचरणकमलावर मस्तक ठेवून नमस्कार करणारे होते. मातृआज्ञेचे धर्मसंकट जाणल्या मातेने घातले नाही. वामनरावांचा जन्म लोकोद्धारासाठी आहे. प्रत्यक्ष देवाने प्रचीती देऊन हे बालक आपल्या उदरी घातले आहे. त्याची इच्छा ही ईश्वराची इच्छा आहे. म्हणून विवाहाचा विषय फार घसाला लागलाच नाही. पूर्वीच्या अवतारात मातेला त्या दिव्य बालकाकडून प्रपंचासाठी मुले मागून घ्यावी लागली होती. देवानं या अवतारात आधी ती व्यवस्था केली आणि नंतर स्वतः जन्म घेतला.

तरी शंकरशास्त्रींनी पवनीच्या चातुर्मासात एकदा प्रसंग पाहून श्रीसद्गुरू स्वामींच्याजवळ वामनच्या विवाहाचा प्रश्न काढला होता. त्यावेळी स्वामींनी सांगितले "व्हायचा असेल तर होईल."

हे उत्तर स्वामीमहाराजांचे आहे या दृष्टीने विचार करता असे जाणवते की– ज्या स्वामीमहाराजांनी लोकांची अडचण, संकटं दूर व्हावी, इच्छित कामना पूर्ण व्हावी यासाठी, 'प्रश्नावली' सारखी व्यवस्था केली. सर्वदा लोकांची कामे आपल्या सामर्थ्याने यशस्वी केली. त्या स्वामींना 'वामनचे लग्न होईल' 'हे निःसंदिग्धपणे सांगता आले असते. लग्न न होणाऱ्यांची लग्ने स्वामीकृपेने झाली. त्यांना वामनचा प्रश्न अवघड नव्हता, परंतू वामनच्या आत्मीय मंडळींना कटु-सत्य सांगणे त्यांना प्रिय वाटले नाही. किंबहुना 'वामन' चे लग्न होणार नाही, तोच करणार नाही. याची पूर्ण जाणीव असल्याने, स्वामींनी 'व्हायचं असेल तर होईल' असे उत्तर देऊन त्याची काळजी तुम्ही तरी का करता हे सुचविले आहे.

वामनरावांचे संपूर्ण जीवन पहाता श्रीपादश्रीवल्लभांच्या विवाहासंबंधी श्रीगुरुचरित्रात आलेल्या ओव्या वाचूनच ठरविता येईल.

"विचार करिती पुत्रासवे । बा रे लग्न तुवा करावे । श्रीपाद म्हणे ऐका भावे । माझी वांच्छा सांगेन ॥५२॥ कराल विवाह माझा तुम्ही ! सांगो एका विचार आम्ही । वैराग्य स्त्री संगे असेन मी । काम्य आमुचे तियेजवळी ॥५३॥ त्या स्त्रीयेवांचून आणिक नारी । समस्त जाण मातेसरी । जरी आणाल ते सुंदरी ।

वरीन म्हणे तये वळी ॥५४॥ आपण तापसी ब्रह्मचारी । योगस्त्रियेवाचोनी नारी॥ बोल धरा निर्धारी । श्रीवल्लभ नाम माझे ॥५५॥ (अध्याय ५ वा)

## सद्गुरूंच्या शोधात

पवनीचा चातुर्मास झाल्यावर श्रीसद्गुरू कृपाप्रसादाने संतुष्ट झालेली गुळवणी आणि आजेगावकर कुलातील भाग्यवान मंडळी आपापल्या गावी गेली. कुडुत्रीहून वामनराव नोकरीच्या शोधार्थ बाहेर पडले. प्रथम ते कोल्हापूरला आले. तेथून गुरुद्वादशीला वाडीला आले. कोणत्याही अवस्थेत आणि परिस्थितीमध्ये वामनरावांचे पहाटे उठणे, विधिवत् सर्व कर्माचरण करणे, स्नान संध्या, गायत्री जप, श्रीगुरुचरित्र वाचन, सद्गुरूंनी दिलेल्या मंत्राचे नित्य अनुष्ठान इ. नित्य क्रमात कधी काटछाट नाही. हे संभाळून करता येणारी नोकरी त्यांना हवी होती. त्यामुळे मिळेल ती नोकरी स्वीकारणे अशातला प्रकार नव्हता. सामान्य माणूस नोकरी मिळविण्यामध्ये असे ठरवून नोकरी पहात नसतो. स्वतःच्या प्रयत्नाने लौकिकातील गोष्टी मिळविण्याची धडपड केली एवढे चार लोकांच्या नजरेसमोर आले की, ती व्यक्ती चारचौघांना आपल्यातली वाटू लागते. असे प्रयत्न करून यश किंवा अपयश हाती आले तरी नियतीची इच्छा म्हणून सांगायला मोकळे होता येते.

असे सर्वांचेच असते पण अलौकिक महापुरुषांमध्ये आणि सामान्य मनुष्यात मोठा फरक हा असतो की, नियतीने दिलेल्या यशापयशाने सामान्य मनुष्य हुरळून जातो किंवा होरपळून निघतो. त्याच्यावर परिस्थितीच्या अनुकूल-प्रतिकूल परिणामाने सुखदुःखाचे विकार निर्माण होतात. तसे महापुरुषांचे नसते.

वामनरावांचा कोल्हापुरचा स्नेही रहाळकर मुंबईस रहात होता. तो कोल्हापुरात आला तेव्हां वामनरावांची भेट झाली. त्याने नोकरीसाठी मुंबईला येण्याचा आग्रह केला. मी खटपट करीन, माझ्याकडे रहा, इ. सर्व आस्थेने सांगितले. म्हणून वाडीची गुरुद्वादशी झाल्यावर वामनराव मुंबईला गेले. पण उतरले मात्र त्यांच्या परिचित शास्त्रीबुवांचे घरी. म्हणजे स्नानसंध्या, नित्यकर्म, सोवळे ओवळे सहज सुलभतेने सांभाळले जाई. नोकरीच्या शोधासाठी रहाळकरांचेकडे जात असत. ४/५ महिने झाले तरी नोकरीचे जमेना. तेव्हां वामनरावांनी मनाशी विचार केला रिकामे आहोत तर हे रिकामपण देवाकारणी लावावे. नोकरी जिथं आणि जेव्हां मिळायची असेल ती मिळेल. उगाच दिवस का फुकट घालवायचे.

पण हा विचार चांगला असला तरी व्यवहाराच्या दृष्टीने शास्त्रीबोवांना

सुद्धा आवडणारा नव्हता. "खटपट केल्याशिवाय का नोकरी मिळणार आहे ? अन् कंटाळून कसे चालेल ? मिळेल ती नोकरी करण्याची तयारी ठेवली की नोकरी न मिळायला काय झाले ?" असे शास्त्रीबुवांचे विचार होते. हे वामनराव ओळखून होते म्हणून आपली गाणगापूरची योजना कोणालाही कळ्वू न देण्यासाठी त्यांनी आपले सामान घेऊन रहाळकर स्नेहाकडे नेऊन ठेवले आणि आपल्या गरजेपुरत्या वस्तू बरोबर घेऊन ते निघाले.

वामनरावांनी वाडीला देवापाशी सात सप्ताह केले तसे गाणगापूरलाही संगमावर सात सप्ताह करण्याचे मनाने घेतले. बरोबर संध्येसाठी ताम्हण, पळी, भांडे, लोटी, श्रीगुरुचरित्राची पोथी. फक्त दोन धोतरे, छत्री आणि घोंगडी, एवढेच सामान बरोबर घेतले. मुंबईलाही फार सामान नव्हतेच. संग्रहवृत्ति स्वभावतःच नसल्याने जास्त सामानाची गरज नसायची. मुंबईचे सामान अंथरूण पांघरूणासह एका छोट्या ट्रंकेत ठेवून ती ट्रंक रहाळकरांकडे ठेवली होती. मुंबई मनमाड गाडीने निघाले. चैत्र शु० ११ ला ते दौंड स्टेशनवर आले. सकाळचे १० वाजले होते. दौंडला भीमानदी आहे. नदीवर जाऊन स्नान संध्या करावी असे मनात आले. पण उन्हाळा भयंकर !

दौंड स्टेशनवर लोक त्यांना म्हणाले "नदी लांब आहे. उन्हाळा कडक आहे. वाळूवर पाय ठेवता येणार नाही. आणि बिन चपलाचे तुम्ही नदीवर जाऊन येऊ शकणार नाही." तेव्हा वामनरावांनी नदीचा नाद सोडला आणि नळाच्या पाण्याने स्टेशनवरच आंघोळ केली. पण नळाचं पाणी सुद्धा आधणासारखं कढत होतं ! विसरण घालायला तिथं गार पाणी कुठलं असणार ? त्या कढत अधणाच्या पाण्याने तशीच आंघोळ केली. सार शरीर भाजून लाल झालं ! आंघोळ झालीच पाहिजे, म्हणून केली. सगळाच उन्हाळा म्हणून काकड्या घेतल्या. त्या पण गरम वाळलेल्या होत्या. थोडे दाणे घेतले आणि तोच फराळ करून एकादशी घडली. तेव्हांपासून एकादशी सुरु झाली.

पुढे वामनराव तसेच गाडी बदलून गाणगापूर रोड स्टेशनवर आले. तिथं 'कारंटाईन' होतं. कारंटाईन म्हणजे साथीचे रोग पसरू नयेत म्हणून दुषित जंतू निर्मूलन करणारी छावणी. येणाऱ्या यात्रेकरूला त्या छावणीत ठेवून घ्यायचे त्याचे सर्व कपडे अंथरूण पांघरून सर्व वस्त्रे काढून घ्यायची. ती त्या छावणीतून धुवून निर्जंतुक करून मिळायची. तोपर्यंत छावणीतून तात्पुरते कपडे वापरायला मिळायचे. बाकी कशाची सोय नाही. खाणे पिणे ज्याचे त्याने पहावे. सगळा

मोगलाई कारखाना ! सगळीकडे स्वयंसेवक आणि पोलीसांचा पहारा ! लोकांच्या रांगाच्या रांगा लागलेल्या. कुठूनही सुटका होण्याचे लक्षण नाही. अशा त्या प्रकारातून ईश्वरकृपेने सहज बिनबोभाट सुटका झाली. अगदी सहज रांगेतून बाहेर झाले आणि निसटले. कुणीही आडवले सुद्धा नाही. "बाल न बाँका कर सकै । जब जग बैरी होय" हे ईश्वरीकृपेने होतं तर ही सुटका तरी दुसरं कोण करतं ? त्या रात्री वामनरावांनी चैतन्य देवांच्या धर्मशाळेत मुक्काम केला. तेथे ताक कण्यांचा योग आला. उन्हाळ्यामुळे त्यांना 'उन्हाळी' लागली. लघवीचा त्रास होऊ लागला. प्रवासी उपाय म्हणून त्यांनी ओली लंगोटी घातली आणि तो त्रास कमी झाला.

दुसरे दिवशी वामनराव बैलगाडीने गाणगापूरला आले. तेथील पद्धतीप्रमाणे पुजारी मंडळी यजमान शोधण्यासाठी नांवांच्या वह्या चोपड्या घेऊन गावाबाहेरच उभी होती. श्री. लक्ष्मणभटजी पुजारी यांच्या चोपडीत दत्तंभटजींचे नांव निघाले. १९१० ची ही गोष्ट आहे. वामनरावही प्रथमच गाणगापूरला गेले होते. हे लक्ष्मणभटजी म्हणजे जगन्नाथशास्त्रींचे पुजारी, घराण्याचे उपाध्ये म्हणून पुढे आयुष्यभर सर्व धार्मिक कार्यात हे जगन्नाथशास्त्रींचे असायचे. १९१० साली जगन्नाथशास्त्रींचा जन्मही झालेला नव्हता.

वामनरावांनी लक्ष्मणभटजींना लगेच सांगितले की, "मला माधुकरी मागून सात सप्ताह पारायणे करावयाची आहेत, म्हणून आलो आहे. लक्ष्मणभटजींनी जागा दिली, सगळी सोय केली. रोज स्नान, संध्या, जप, आन्हिक आणि सप्ताह वाचनासाठी पहाटेच संगमाकडे वामनराव जात व १२ पर्यंत सर्व उरकून गावात भिक्षेला येत असत. दुपार व संध्याकाळ आरतीपर्यंत गावात थांबत व रात्री गावातच झोपून पहाटे संगमावर जात असत. दौंडला चैत्र शु. ११ होती. गाणगपुरात येऊन सप्ताह पारायणाला सुरुवात चैत्र शु. १५ ला केली. असे सप्ताह झाले २४ एप्रिल १९१० ला सप्ताह सुरू केला.

श्रीसद्‌गुरू भेटीसाठी केलेल्या पायी अविस्मरणीय प्रवासाची क्रमवार अंतर दाखवून–शक्य तेथे काल सांगून–स्थानांची माहिती– पायी प्रवास अंतर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सोमवार दि. ६ | गाणगापूर सोडले. | |
| | जून १९१०– | गाणगापूर रेल्वे स्टेशन पर्यंत | २० कि. मी. |
| २ | | गाणगापूर रोड रेल्वे स्टेशन ते दुधनी | २३ कि. मी. |
| ३ | | दुधनी ते हुटगी जंक्शन | ४८ ,, |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | | हुटगी जंक्शन ते आहेरवाडी | ७ कि. मी. |
| ५ | | आहेरवाडी ते बिजापूर | ८७ ,, |
| ६ | | बिजापूर ते सीतीमनी | ७२ ,, |
| ७ | | सीतीमनी ते धारवाड (रेल्वेने) | — |
| | | १९९ कि. मी. | |
| ८ | | धारवाड ते मदिहाळ दत्तमंदिर | ४ ,, |
| ९ | | मदिहाळ ते धारवाड | ४ ,, |
| १० | | धारवाड ते गदग | ८० ,, |
| ११ | | गदग ते हरिहर (रेल्वेने) | — |
| | | १८८ कि. मी. | |
| १२ | | हरिहर ते प्राणनाथगुडी (कुडली मठ) | ६५ ,, |
| १३ | | प्राणनाथगुडी (कुडलीमठ) ते हरिहर | ६५ ,, |
| १४ | | हरिहर ते हुबळी | १२९ ,, |
| १५ | अण्णेगिरीला | हुबळी ते अण्णेगिरीवरून गदग | ५९ ,, |
| १६ | गुरुपौर्णिमेस | गदग ते मल्लापूर ३१ रेल्वेने | — |
| १७ | | बागलकोट ६३ ,, | |
| १८ | | बागलकोट ते हावेरी २२७ रेल्वेने | |
| १९ | | हावेरी ते अगडी | ६ ,, |
| २० | ३ ऑगस्ट आषाढ व॥ १३ बुधवार | अगडी ते हवनूर | २९ ,, |

एकूण असे ७०८ कि. मी. रल्वेने पायी प्रवास ६९८ कि.मी.

एकूण प्रवास १४०६ कि. मी.

**हावनूरला मुक्काम**— ३ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट, आषाढ व॥ १३ ते श्रावण शु ८ शनिवार, असा ११ दिवस होता.

**प्रवासाचा काळ**— सोमवार दि. ६ जून १९१० ते बुधवार दि. ३ ऑगस्ट १९१०, जून २५ दिवस, जुलै चे ३१ दिवस, ऑगस्टचे ३ दिवस या प्रमाणे हा अविस्मरणीय प्रवास ५९ दिवसांचा झाला आहे.

१ ला सप्ताह ३० एप्रिल १९१० शनिवारी झाला. २ रा सप्ताह ७ मे

शनिवारी झाला. ३ रा सप्ताह १४ मे, ४ था सप्ताह २१ मे, ५ वा सप्ताह २८ मे आणि ६ वा सप्ताह ४ जून शनिवारी संपला. त्याच दिवशी रमल ज्योतिषाची भेट झाली. हे रमल ज्योतिषी अगदी खरं भविष्य सांगणारे असतात. वामनरावांना ज्योतिषाचा नाद होता. त्यामुळे त्या रमल ज्योतिषाला त्यांनी प्रश्न केला "गुरूंची भेट केव्हां होईल?" तो म्हणाला "झाली तर या ६ महिन्यात नाहीतर पुढे कधीही होणार नाही" हे उत्तर ऐकूण वामनरावांना धक्काच बसला. सद्‌गुरूंच्या भेटीची एकदम तळमळच सुरू झाली.

५ जून ला रविवारी सकाळी ८ ते सायंकाळी ६ पर्यंत १० तासात सातवे पारायण संपविले. शेवटच्या सप्ताहासाठी सात दिवस का घालवा? पारायण एका दिवसात संपेल व सात पारायणे तर होतील असा विचार त्यांनी केला. सोमवारी लक्ष्मणभटजींना सांगितलं "ही छत्री घ्या आणि आपणास जसे जमेल त्याप्रमाणे सात सप्ताहांची सांगता करावी, मी निघालो" ६ जून सोमवारी वामनराव आपल्या सद्‌गुरूंच्या शोधार्थ निघाले आणि ३ ऑगस्टला ते हावनूरला पोहोचले व तेथे या दिवशी सद्‌गुरुंची भेट झाली. या भेटीसाठी वामनराव एक महिना २८ दिवस, जवळजवळ दोन महिने पायी भटकत होते. हा सर्वच प्रसंग जसा उपलब्ध झाला तसा त्याची सर्व प्रकारे खात्री करुन पुढे देत आहोत. प्रथम या निर्णयामागची वृत्ती पाहू—

वामनराव मुंबईला गेले ते नोकरी शोधण्यासाठी. ती मिळत नाही म्हणून रिकाम्या काळाचा सदुपयोग म्हणून गाणगापुरात सात पारायणे केली. बरं, देवाजवळ नोकरी मागण्यासाठी जरी ही पारायणे झाली असती तरी काम झाले असते. पण देवाजवळ लौकिकातले कधी काही मागायचेच नाही हे पहिल्या-पासून शेवटपर्यंत ठरलेले. सर्व कर्म-अनुष्ठाने "परमेश्वर प्रीत्यर्थं" हे ठामपणे ठरलेले. वामनरावांची ही अन्तःकरणाची जी पक्की बैठक होती हीच अलौकिक होती.

वामनरावांना सद्‌गुरूंची भेट यापूर्वी दोनदा झालेली आहे. दोन्ही वेळी सद्‌गुरूंनी त्यांना अमोल कृपेचा ठेवा दिलेला आहे. तरी त्यांच्या भेटीची, दर्शनाची ही ओढ त्यांच्या प्रगाढ श्रद्धा-निष्ठेची वास्तवता दाखविते. "तुका म्हणे तुज भेटल्या वाचोन । न राहे त्याहून होईन वेडा ॥" अशी खऱ्या भक्ताची ही तळमळ असते. भक्ताला देवाशिवाय काहीही सुचतच नसते. तो देव आणि सद्‌गुरु यात भेदच मानीत नसतो.

बरं ! रमल ज्योतिषाने सांगितले त्याप्रमाणे सहा महिन्यांचा कालावधी होता. सद्‌गुरुस्वामी नेमके कोठे आहेत याचा काहीही ठावठिकाणा नव्हता. जवळ पैसा नाही, पत्ता नाही. अशा स्थितीत कोणता व्यवहारी दृष्टीचा मनुष्य प्रवासाला निघेल. पण वामनराव निघाले ! ते ईश्वरावर निष्ठा ठेवून निघाले. ईश्वर सर्वांचा मार्गदर्शक आहे. आपल्यालाही त्याच्या कृपेने मार्गदर्शन होईल. वामनरावांना एवढा अंदाज होता की, सद्‌गुरुस्वामी दक्षिणेकडे कुठेतरी चातुर्मास करणार आहेत. दक्षिण भारत म्हटले तरी काही लहानसहान भूप्रदेश नाही. बर ! संन्याशांची आवड 'अरति जन संसदि' एकांत प्रियतेची, प्रसिद्धी पराङ्‌मुखतेची. अशा प्रतिकूल स्थितीत वामनराव निघाले. सद्‌गुरूंच्या भेटीशिवाय त्यांचे मन कुठेच लागत नव्हते-रमत नव्हते. आचार्यांच्या शब्दासारखी वामनरावांची स्थिती झाली होती.

**अरण्ये न वा स्वस्य गेहे न कार्ये न देहे मनो वर्तते मे त्वनर्घ्ये ।**
**मनश्चेन्न लग्नं हरेरङ्घ्रि पद्मे ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ॥**

### खडतर प्रवास–

वामनरावांनी गाणगापूरचा निरोप घेतला. जणू देवानेच बुद्धी दिली. 'अरे मी इथं कुठंय ? जा तुझ्या गुरुला भेट. तिथं मी आहे.' असे अनुभव येतात आणि ते खरेही असतात. वामनराव रेल्वे लाईनने निघाले.

वामनराव रेल्वेच्याकडेने निघाले. सोलापूरच्या दिशेने गाणगापूरपासून दुसरे स्टेशन 'दुधनी' लागले. इथे थोडे थांबले पण पाण्याची काहीच सोय नाही आणि वेळही सकाळची होती. म्हणून दुपारपर्यंत पुढच्या मुक्कामापर्यंत जाण्याचे ठरवून पुढे निघाले. या भागातल्या उन्हाळ्याची कल्पना दौंड स्टेशनवर आली होती. त्यामुळे चालण्याचा वेग वाढविला. मग 'हुटगी' गाव लागलं. हे जंक्शन स्टेशन आहे. सोलापूरपासून १२ मैलावर आहे. येथून कर्नाटकात शिरता येते. वामनरावांना एक पडकी विहिर दिसली. गेले विहिरीजवळ. पाणी अगदी हिरवं गार. उपसाच नाही पाण्याला. आता स्नान-संध्या तर केलीच पाहिजे. भुकेला अन्न नसले आणि तहानेला पाणी नसले तरी स्नान संध्येला चालेल हे ! असा विचार करून विहिरीत उतरले. हातानी हळू हळू पाण्यावरचा तवंग काही बाहेर काढला, काही दूर ढकलला आणि लोट्याने आंघोळ केली. आपल्या उडीने आहे हे पाणी ढवळले तर आणखीन पंचाईत व्हायची म्हणून लोट्याने आंघोळ केली. पांघरल्या धोतराला भिजवून अंग पुसले. दुसरे धोतर त्याच पाण्यात पिळून घेतले.

लोट्यात पाणी घेऊन संध्यापण केली. सावलीला बसून श्रीगुरुचरित्र वाचले. देवाचं म्हणत राहिले. जप झाला. उन्हाचा फार जोर होता. म्हणून २/३ तास थांबले. थोडे उन कलते झाल्यावर धोतर भिजवून घेऊन अंगावर घेतले आणि पुढे निघाले. जमीन तापलेलीच होती. तसेच चालत निघाले.

वामनराव एकटेच रस्त्याने चालत होते. दिवस कडक उन्हाळ्याचे. पावसाळा तोंडावर आलेला. रस्ता धुळ-फुफाट्याने भरलेला, वाटेत पाणी मिळणे कठीण. पायात काही नाही. सारा प्रवास अनवाणी. बरोबर सामानही काही नाही. पैसा नाही. नेमके कोणत्या गावी सद्गुरू भेटतील याचा ठावठिकाणा नाही. पोटात अन्न नाही. बरोबर फक्त दोन धोतरे. एक नेसलेले आणि एक पांघरलेले. ती धोतर सुद्धा धुळीनं माखून मळलेली. दाढी अर्धवट वाढलेली. लांबलचक ऋषीमुनींसारखी असती तरी शोभून दिसली असती. डोक्यावर अच्छादन नाही. वरून कडक उन्हाचा ताप आणि खालून जमिनीचे चटके. असा हा प्रवास चालू होता.

पण वामनरावांचं लक्ष यातील कोणत्याही तापाकडे किंवा त्रासाकडे नव्हते. सद्गुरूंच्या नामस्मरणाच्या आनंदाने ते चालले होते. ते सद्गुरूंचे नाव त्यांना सर्वकाही सहन करण्याची शक्ती देत होतं. त्यांचं आचार्यांवर फार प्रेम होतं. आचार्यांची स्तोत्रे म्हणत ते चालत होते—

**भजेऽहं भजेऽहं सदा वासुदेवं । त्वदन्यं न मन्ये न मन्ये न मन्ये ॥**

हे सद्गुरो वासुदेवा ! मी तुम्हाला केवळ तुम्हालाच भजत आहे. तुमच्याशिवाय मी कोणालाही जाणीत नाही व मानीतही नाही. हे त्रिवार सांगतो. या ओळी पुनः पुनः म्हणत चालत होते.

हळूहळू वातावरणातील ताप कमी होऊ लागला, रात्र झाली. एका निवाऱ्याच्या जागी विश्रांतीसाठी बसले. तो एकदम झोपच लागली. कशी का होइना स्थूल शरीराला विश्रांती आणि शांतता मिळाली. मध्येच जेव्हा जाग आली तेव्हा आकाशाकडे पाहून ठरविले की, मध्यरात्र उलटून गेली असावी. उत्तररात्रीचा काळ असावा. गाणगापूर वैशाख व॥ १४ ला सोडले. आता दुसरा दिवस उजाडणार. ती आमावास्या होती. आकाशातील ग्रहनक्षत्रांचा प्रकाश होता. पण इथं थांबून काय उपयोग ? पुढे गेलेच पाहिजे. आता विश्रांतीपण मिळाली आहे. 'चला' असा शरीराला आदेश वामनरावांनी दिला आणि त्यांचा प्रवास पुनः सुरू झाला.

सकाळी 'आहेरवाडी' लागली. पाण्याची एक चांगली विहीर पण दिसली. मग फार समाधान झाले वामनरावांना. त्यांना ही ईश्वरी कृपाच वाटली. त्यांनी तिथं २/३ तास काढले. स्नान-संध्यादि सर्वकाही शांतचित्ताने झाले. पाणीही भरपूर पिवून घेतले आणि आहेरवाडी गावात शिरले. पोटात अन्न नव्हते. खिशात पैसा नव्हता. कसंही करून या क्षुधारूपी कुत्रीला दोन घास घातल्याशिवाय ती गप्प बसणार नाही. आपल्याला देवाचं नांवही ती घेऊ देणार नाही. असा विचार मनात आला.

**सुधा है कुकरी करत भजन में भंग ।**
**वाको टुकडा डारीके करत भजन निसंग ॥ —संत कबीर**

आहेरवाडीत दुपारी जेवणाच्या वेळेस वामनराव होते. पण त्यांना जेवायला कोण बोलावणार? तेच एका ब्राह्मणाच्या घराच्या दरवाजात अतिथी म्हणून उभे राहिले. साक्षात दत्तप्रभू अतिथी म्हणून दारात उभे होते वामनरावांनी "श्री गुरुदेव दत्त" म्हणून ललकारी दिली. आतून एक ब्राह्मण गृहस्थ बाहेर आले. वामनरावांनी त्यांना हात जोडून नमस्कार केला आणि नम्रतेने विचारले, "जेवायला एक अतिथी आला तर चालेल का?" त्या ब्राह्मणाला ही व्यक्ती ओळखता आली नाही तरी त्याचे पुण्य फार मोठं होतं म्हणून ब्राह्मणाच्या मुखातून 'होय' शब्द आले. वामनरावांनी त्या घरात जेवण घेतले. तृप्त झालेल्या वामनरावांनी त्या ब्राह्मणाचे काय कल्याण केले असेल हे इतिहासालासुद्धा कळले नाही. पण ज्या दत्तप्रभूंनी घेवड्याच्या भाजीची भिक्षा घेऊन त्या ब्राह्मणाला द्रव्याचा हंडा दिला ते या ब्राह्मणाला न देता कसे आले असतील?

आहेरवाडीत दिवसभर विश्रांती घेऊन वामनराव संध्याकाळचे विजापूरकडे निघाले. दुसरे दिवशी सकाळी विजापूरहून सीतिमनीला आले. सीतिमनीला कृष्णा घटप्रभा संगम आहे. तिथं सर्व आन्हिक उरकलं. सीतिमनीचा स्टेशनमास्तर वामनरावांना सज्जन दिसला. म्हणून त्याच्याशीं बोलण्याकरता ते त्याच्याकडे जाऊ लागले. पण स्टेशनमास्तरला वाटले हा कोणी भिकारी दिसतो म्हणून त्यांनी खिशातून एक गिन्नी काढून त्या वामनरावांकडे भिरकावली. हा प्रकार वामनरावांच्या लक्षात आला. त्यांनी त्या गिन्नीला स्पर्शही केला नाही. उलट स्टेशनमास्तराच्या जवळ येऊन नमस्कार करून, इंग्रजीमध्ये काही चौकशी केली. तेव्हा त्या स्टेशनमास्तरला कल्पना आली. मग त्या स्टेशनमास्तराने आग्रह करून त्यांना आपल्या घरी जेवायला नेले. त्या स्टेशनमास्तरकडे लग्न

होत म्हणून बरीच मंडळी गोळा झाली होती. त्या मंडळींमध्ये वामनरावांनी श्रीवासुदेवानंदसरस्वतीटेंब्येस्वामीमहाराजांचा विषय काढला व सध्या ते इकडे कुठे आहेत ही चौकशी केली. तेथे असे समजले की, मदिहाळ येथे श्रीकैवल्याश्रम-स्वामी ऊर्फ बोठेस्वामी हे श्रीटेंबेस्वामींसह आपला शिष्य बाजेंद्रप्पा यांचेकडे आले आहेत.

काहीही कल्पना नसताना एवढी माहिती मिळाल्याने वामनरावांना उत्साह आला. ते सीतिमनींहून गदगला आले. गदगला आल्यावर जवळचे घोंगडे दोन रुपयाला विकले आणि गदगहून धारवाडला रेल्वेने आले. धारवाडजवळ मदिहाळ म्हणून गाव आहे. तेथे दत्तमंदिर आहे. येथे कैवल्याश्रम स्वामी (बोठे-स्वामी) हे मोठे सत्पुरुष श्रीचिदंबर दीक्षित महाराजांच्या संप्रदायातले रहात होते. त्यांचे एक परमशिष्य श्रीबाजेंद्रप्पा हेही येथेच होते. वामनरावांनी श्रीकैवल्याश्रमस्वामींचे दर्शन घेतले. आपल्या सद्‌गुरुटेंबेस्वामींची चौकशी केली. त्यांना येथे पुढील माहिती मिळाली.

श्रीटेंबेस्वामी वाडीहून अचानक निघाले आणि टाकळी बेळगांवहून मलप्रभा तीरावरील गुर्लहोसूर येथे श्रीकैवल्याश्रम स्वामींच्याकडे आले. गुर्लहोसूर हे स्थान श्रीचिंदबर दिक्षितांचे म्हणून प्रसिद्ध आहे. तेथे श्री कैवल्याश्रमस्वामी होते. येथे सात दिवस राहून श्रीटेंबेस्वामी गुर्लहोसूरहून धारवाडजवळच्या मदिहाळ दत्तमंदिरात आले. तेथे ३ दिवस मुक्काम झाला.

या दिवसात वाडीहून श्रीटेंबेस्वामींना शोधत शोधत श्रीधुंडीराजशास्त्री कवीश्वर मदिहाळच्या दत्तमंदीरात आले होते. त्यांना स्वामींची भेट झाल्याने परम आनंद झाला. पण श्रीधुंडिराजशास्त्री यांच्या मनात आले की, आपण पाक सिद्धी करून स्वामींना भिक्षा घालावी. हा शास्त्रीबोवांच्या मनातील हेतू ओळखून स्वामी आणखी एक दिवस राहिले आणि श्रीधुंडिराजशास्त्री यांचे हातून भिक्षा घेऊन संतुष्ट होऊन कृपाशीर्वादही दिला. शास्त्रीबोवांना कृतार्थता वाटली आणि नंतर येयून शास्त्रीबोवा महाराष्ट्रात गेले व स्वामी दक्षिणेकडे कुठे गेले ते समजले नाही. बहुतेक तुंगभद्रा तिराकडे गेले असावेत.

सद्‌गुरू स्वामींची माहिती मिळते, ते याच भागात यात्रा करीत आहेत पण भेटीचा योग अजून येत नाही म्हणून मन जरा खट्टूही होत आहे. पण पुनः प्रयत्नाला उत्साहही येत आहे. असे वामनरावांचे चालले होते. तेथून ते परत गद-गला आले. गदगला वामनरावांचा एक स्नेही 'मुर्की भावी' हा अचानक भेटला.

तो पोलीस इन्स्पेक्टर-फौजदार होता. हा कोल्हापूरला शिकायला होता. वामनरावांचा वर्गमित्र. तो कर्नाटकातील राहणारा. शिक्षण पुरे झाल्यावर फौजदार झाला. पण त्याने रस्त्यात वामनरावांना पाहून स्वत: ओळख दिली. माणूस मोठा झाला की, ओळख देणं कठीण असतं. पण मुर्की भावीचं मनही मोठं होतं. वामनरावांची दाढी वाढलेली, मळकट धोतर, शरीर श्रमानं खंगलेलं तरी सुद्धा प्रेमानं घरी नेलं. ठेवून घेतलं. वामनरावांनी त्याच्या प्रेमाची कृतज्ञता शेवटपर्यंत ठेवली होती. या भावीला पुढे सरकारी नोकरीत त्रास झाला. ड्यूटीवर असतांना छत्री उघडली म्हणून शिक्षा झाली. त्याचेवर सक्त नजर ठेवली. त्याला डिपार्टमेंटल ऑफिसमध्ये नेलं. आतल्या खोलीत-पेटीत पेटी होती त्या पेटीत आणखी एक पेटी होती. ती काढली. त्याच्या अधिकाऱ्यानं आणि त्यातून एक फाईल काढून त्यातील एक फोटो दाखविला. तो त्याच्या क्रांतीकारक काकांचा होता. या प्रकाराने भावी समजून गेला की सरकार संशयाने पहात आहे. त्याने तात्काळ राजीनामा दिला. पुढे तो अंतर्गळाने आजारी झाला. तेव्हा मिरजेच्या हॉस्पिटलध्ये त्याला आणले होते. मिरजेला त्याचे शुक्रवारी ऑपेरशन होते हे कळल्यावर वामनराव त्याला भेटायला मुद्दाम मिरजेच्या हॉस्पिटलमध्ये गुरुवारी गेले होते, पण समजले तो कालच वारला. त्याला आंतल्या आत म्हणे सहा गांठी झाल्या होत्या. लग्न झाले होते. २५ वर्षांचा होता.

वरील सर्व हकीगत स्वत: वामनरावांनी सांगितली असल्याने कृतज्ञतेने हा उल्लेख केला. आता पूर्व सूत्र लक्षात घेऊन पुढील प्रवास माहितीचा विचार करू.

मुर्की भावीने वामनरावांना कुठे जायचे हे विचारले. ते म्हणाले तुंगभद्रेच्या काठी स्वामींचा तपास लागेल. या गदगच्या मुक्कामात वामनरावांना 'मुक्तिनाथ' नावाचा एक तरुण तेलंगी ब्राह्मण भेटला. तोही स्वामींच्या शोधातच फिरत होता. गदगमध्ये मुर्कीबरोबर हिंडताना मराठी बोलल्याचा भास झाला. तेवढ्या-वरून ओळख झाली आणि वामनरावांना एक सहप्रवासी मिळाला. त्याचेजवळ पैसे होते. तरी तो वामनरावांच्या बरोबर निघाला. मुर्की भावीने वामनरावांना हरिहरच्या प्रवासाची गार्डला सांगून व्यवस्था केली व वरखर्चासाठी तीन रुपयेही दिले. तो काळ आठवला म्हणजे ही मदत लहान नव्हती.

मुक्तिनाथ आणि वामनराव हरिहरला आले. तेथे तुंगभद्रेचे स्नान केले, जलपान केले आणि तेथून दोघांनी तुंगभद्रेच्या काठाने सद्‌गुरु शोधार्थ पायी प्रवास सुरू केला. वाटेत 'प्राणनाथ गुडी' म्हणून एक हनुमंताचे मंदिर लागले.

त्या छोट्या गावाचं नावही तेच होतं. दोघांनी तुंगभद्रेत स्नान केले आणि काही आह्निक नदी तीरावर केलं आणि पोथीवाचन वगैरे या हनुमंताच्या मंदिरात केलं.

मुक्तीनाथाला कानडी येत होतं मराठी पण येत होतं. तो सांगत होता की, मैसूर राज्यात १०।१० मैलावर अन्नछत्रे आहेत. आपली खायची व्यवस्था मी करतो. अन्नछत्रात वैष्णवांनी केलेला स्वयंपाक असतो. सर्व सोवळ्यात असते. इकडे सोवळे सर्वत्र पाळतात. त्यांचं शिजविलेलं अन्न नको असेल तर ठराविक कोरडा शिधाही अन्नछत्रात मिळतो. एकूण या प्रवासात मुक्तीनाथाची भेट हा एक मोठा योगायोग म्हटला पाहिजे.

'प्राणनाथ गुड्डी' च्या मारुती मंदिरात मुक्तीनाथ पोथी वाचीत असत वाऱ्याने पाने उडू लागली म्हणून त्याने देवाजवळची छोटी मारुतीची पितळी मूर्ती आपल्या पोथीवर ठेवली व निघतांना ती जागेवर परत ठेवण्याचे विसरला. पुढे दोघेही तुंगभद्रेच्या काठा-काठाने पुढील मुक्कामावर आल्यावर त्या मूर्तीची आठवण झाली. मग दोघे परत गेले. मूर्ती जागेवर ठेवली व परतले आणि कूडलीला आले.

कूडली हे ठिकाण तुंगा आणि भद्रा यांच्या संगमावर आहे. येथे एका तीरावर शंकराचार्यांचा मठ आहे; तर दुसऱ्या तीरावर वैष्णवांचा-मध्वाचार्यांचा मठ आहे. या मध्वाचार्यांच्या मठाची ७० हजार एकर जमीन आहे. कूडलीमध्ये एक अतिसुंदर तलाव आहे. या तलावात महादेवाचे मंदिर आहे. वामनरावांची इच्छा होती इथंच रहावं. पण मुक्तिनाथ तयार नव्हता. त्याचेजवळ १०० रु. होते. नोटा नव्हे—नगदी रुपये होते. त्याने त्यासाठी कसा करून त्यात ते रुपये ठेवून कमरेला बांधून ठेवले होते. त्याला पैशामुळे भीति वाटत होती. उघड्यावर एकट्या दुकट्याने झोपणे त्याला धोक्याचे वाटले. तेथे संध्यादि उरकून गावात मारुतीच्या देवळात रात्र काढली. दुसरे दिवशी आचार्यांच्या मठात राहिले आणि कूडलीहून ते परत हरिहरला आले. स्वामींचा इथे काहीच तपास लागला नाही. तुंगा आणि भद्रा यांच्या संगमापर्यंत शोध घेतला. तेव्हा वामनरावांना वाटले तुंगभद्रेच्या पुढच्या काही ठिकाणी शोध घेतला पाहिजे. म्हणून ते दोघे हरिहरला परत आले. मग वामनराव त्या मुक्तिनाथाला म्हणाले "तुझ्याजवळ पैसे आहेत. तू रेल्वेने जा. माझ्याबरोबर उगाच कष्ट का घेतोस." असे म्हणून मुक्तिनाथाला पाठवून दिले.

हरिहरहून वामनराव हुबळीला आले. तिथं समजलं की गदगच्या पुढे २६ मैलावर आब्बेगिरीला स्वामीमहाराज आहेत. वामनराव पुन: गदगाला आले आता अगदी त्राण राहिले नव्हते. १॥ महिना अशा प्रकारे गेलेला. शेवटी

गदगहून तिकिट न काढताच गाडीत बसले आणि काही अडचण न येता आब्बेगिरीला उतरले. स्टेशनवर चौकशी करता समजले की, येथून एक मैलावर एका ब्राह्मणाच्या मळ्यात कोणीतरी स्वामी आले आहेत. वामनराव गेले त्या मळ्यात. तिथे दुसरेच स्वामी दिसले. तिथे गेल्यावर त्या स्वामींनी वामनरावांची आस्थेने चौकशी केली. त्यांना १५ दिवस ठेवून घेतले. गुरूच्या शोधासाठी वामनराव कोल्हापूरहून आलेले आहेत. या माहितीने स्वामींच्या मनात चांगलीच आत्मीयता निर्माण झाली. त्या स्वामींचे नांव गोविंदस्वामी असून ते चिम्मड संप्रदायाचे आहेत असे समजले. वामनरावांची गुरुपौर्णिमा आब्बेगिरीला गोविंदस्वामींच्या इथे झाली ते वामनरावांना म्हणाले, "तुम्ही फार दमून गेलात. रहा इथं. काही चौकशी करून पत्ता लागल्यावर जा." इतका चांगला सत्पुरुष पाहिल्यावर आणि १५ दिवसांच्या सहवासानंतर सद्गुरूंच्या भेटीच्या तळमळीने वामनराव गोविंदस्वामींना हात जोडून म्हणाले "महाराज ! आता मी नक्की कुठे जाऊ ते सांगा."

गोविंदस्वामी म्हणाले 'उत्तरकडे जा.'

गोविंदस्वामींनी वामनरावांना घोंगडीची कफनी दिली. आता पाऊस सुरू झाला होता. त्याचा चांगला उपयोग झाला. काही पैसे पण दिले. अशा चांगल्या सत्पुरुषाची भेट झाल्याने वामनरावांच्या निश्चयाला बळ तर आलेच परंतु आपली सद्गुरूंची भेट होणार असे खात्रीने वाटू लागले.

गोविंदस्वामींचा निरोप घेऊन वामनराव बाहेर पडले आणि मल्लापूर स्टेशनकडे निघाले. तेवढ्यात समोरून एक इसम एका पांढऱ्या शुभ्र बैलास दोरी बांधून घेऊन येत होता. हा शुभ शकून पाहून वामनरावांच्या मनाला फार समाधान झाले. तरी मनाने प्रार्थना चालू होती.

**सर्वभावे आलो तुजचिशरण । काया-वाचा-मने सहित देवा ।**
**आणिक दुसरे न ये माझ्या मना । राहिली वासना तुझिया पायी ।**
**तुझे आम्ही दास आमुचा तू ऋणी । चालत दुरोनी आलो मार्गे ।**
**तुका म्हणे आता घेतले धरणे । हिशेबाकारणे भेटी देई ॥**

वामनरावांनी गोविंदस्वामींच्या शब्दाप्रमाणे मल्लापूरहून उत्तरेकडे असलेल्या बागलकोटचे तिकिट काढले. वास्तविक हावेरी, हावनूर दक्षिणकडे आहे. पण स्वामी तिकडे आहेत हे माहितच नव्हते. सत्पुरुषाने 'उत्तरेकडे जा' सांगितले म्हणून वामनराव बागलकोटला परत माघारी आले. बागलकोटला पहाटे पोहचले. आता गावात जायचं म्हणून वामनराव बाहेर आले. टांग्याची चौकशी करू

लागले. एका टांग्यात एक सवारी बसली होती. त्याच टांगेवाल्याने वामनरावांना बोलावून घेतले. त्या माणसाजवळ वामनरावांनी स्वामींची चौकशी केली. तो गलगलीचा होता. त्याने सांगितले स्वामीमहाराज नक्की हारनूरला आहेत. बागलकोटला कारकूनाची नोकरी होती त्याची. याला स्वामी हावनूरला असल्याची बातमी मुंबईला आत्मारामपंत जोग यांच्या पेढीवर समजली. तो मुंबईहून बागलकोटला आला तो ही स्टेशनवर भेट झाली.

सत्पुरुषांचे शद्ब किती अर्थपूर्ण असतात हे या प्रसंगावरून चांगलेच समजले. वामनरावांना आनंद झाला. त्या कारकुनाने आग्रहाने वामनरावांना २-३ दिवस ठेवून घेतले. हावनूरला कस कसे जायचे ते सांगितले. हावेरी स्टेशनवर काही खायला मिळणार नाही म्हणून बरोबर लाडूही बांधून दिले. त्याप्रमाणे वामनराव हावेरीला आले. गाडी उशीरा आली. दुपारची जेवणाची वेळ होऊन गेली होती. खानावळीत चौकशी केली. तो खाणावळवाला म्हणाला स्नान करून सोवळ्यात भात करून घालतो. पण सहा आणे पडतील. त्या काळात सहा आणे फार महाग वाटले. पण वामनरावांनी त्या किंमतीत तेथे जेवण घेतले हावेरीहून पुढे हावनूरकडे पायी निघाले. हावेरीहून हावनूर २५ मैल आहे. गाडीची सोय नाही. हा प्रवास पायी सुरु झाला.

वाटेत 'अगडी' नावांचे गाव लागते. तेथे एक मोठे सत्पुरुष श्रीशेषाचल-स्वामी होते. केडगावच्या नारायणमहाराजांसारखा मोठा आश्रम होता. शेतीवाडी होती. शिकायला मुल होती. त्या वाटेवरच्या आश्रमात वामनराव गेले. त्या सत्पुरु-षाचे दर्शन घेतले. आश्रम पाहिला आणि २/२॥ तास तेथे थांबून हावनूरकडे निघाले. त्या सत्पुरुषाने वामनरावांच्याबरोबर फराळाचे लाडू वगैरे दिले.

आणि एवढ्या तपश्चर्येनंतर वामनराव हावनूरात आले. तुंगभद्रेकाठी असलेल्या त्रिपुरांतकेश्वराच्या मंदिरात गेले आणि हृदयाभिराम श्रीसद्गुरूंना अत्यंत आनंदाने साष्टांग नमस्कार घातला. प्रार्थना केली.

**त्वद्भक्तः त्वदधीनोऽहमस्मि तुभ्यं समर्पितम् ।**
**तनूं मनो धनं चापि कृपां कुरू ममोपरि ॥ — दत्तभावसुधारस स्तोत्र ३७**

**हे असे लक्षात ठेव !**

**ऐसा मिया आथिला होसी । तेथ माझियाचि स्वरूपा पावसी ।**
**हे अन्तःकरणीचे तुजपासी । बोलजित असे ।**

ज्ञानेश्वरी ९।५१९

वामनरावांच्या जीवनातील हावनूरची सद्गुरुभेट ही लौकिक आणि पारमार्थिक दृष्टीने परमोच्च, उत्तुंग जीवन साफल्याचं प्रत्यक्ष प्रमाण आहे. इतक्या अनंत संकटांशी सामोरे जात जात ते हावनूरला येऊन पोचले. स्वामींच्या भेटीने त्यांना इतका आनंद झाला होता की त्यांना काहीही सुचत नव्हते. तोंडातून शब्द बाहेर फुटत नव्हता, हृदयातील भाव इतके तीव्र झाले की छाती फुटण्याची वेळ आली होती. पण श्रीसद्गुरूंचे दर्शन घेतलेल्या डोळ्यांनी छाती-वरचे दडपण कमी करण्याचे सहाय्य केले. त्रिकालज्ञ सद्गुरूंनी सर्वकाही जाणले होते. म्हणून त्यांनी पहिला प्रश्न केला—"घरी कळवले का?" 'नाही' उत्तर मिळताच म्हणाले "आधी पत्र टाक." कोणालाही न कळवता हा आला हे लक्षात आले म्हणून हाच प्रश्न प्रथम केला. नंतर विचारले "भोजनाची व्यवस्था काय केली आहेस?"

वामनराव म्हणाले—"मी आपल्याबरोबर माधुकरी मागेन."

स्वामी म्हणाले—"पूर्वी कधी माधुकरी मागितली आहेस का?"

वामनराव म्हणाले—"मी आता गाणगापूरलाच मागितली आहे."

पुष्कळांचा असा समज आहे की, गुरूमहाराजांच्या सहवासात रहायचं म्हणजे रोज मिष्टान्नाचे भोजन, सर्व सोयी ताबडतोब तयार, लोकात मानमरातब वाहनांचे सौख्य इ. असते. केवळ अशी दृष्टी ठेवणाऱ्या शिष्याला याचाही ते अनुभव देत असतात आणि या मायेत किती रमतो हे पाहतात. पण सद्गुरूंना खरे समाधान त्या शिष्याकडून मिळते की जे बाह्य गोष्टींकडे लक्ष देत नाहीत, रमत नाही. जो सद्गुरूंच्या सहवासातून त्यांच्या कृतीचे, वाणीचे, वर्तनाचे, वृत्तीचे मधुकण मधुमक्षिकेप्रमाणे साठवीत असतो आणि तसे आचरणात आणण्याचे प्रयत्न करीत असतो. वामनरावांचेवर स्वामींचे अन्तःकरण कृपाप्रेमाने मेघवत् द्रवले याचे कारण वामनरावांचा आचार आणि वृत्ति हेच होते.

वामनराव हावनूरला आषाढ व ॥ १३ बुधवार दि. ३ ऑगस्ट १९१० ला आले. ते श्रावण शु. ८ शनिवार दि. १३ ऑगस्ट १९१० पर्यंत राहिले. आषाढ व ॥ १३ बुधवारी कर्केला चंद्र होता आणि गुरू कन्येला होता. गुरू ११वा आणि चंद्राच्या त्रिकोणात आला त्या दिवशी ही भेट झाली. ही दोघांची भेट एकांतात झाली. एकूण ११ दिवस अखंड सहवास घडला. सद्गुरूंच्या बरोबर स्नान, बरोबर माधुकरी मागायला जायचे, बरोबर भोजन करायचे, दोघेच बोलत बसायचे, दोघेच फिरून यायचे, दोघांचे झोपणे उठणेही बरोबरच असायचे.

या अकरा दिवसातील अनेक आठवणी वामनरावांनी सांगितल्या. त्या त्यांच्याच शब्दात वाचू—

१– पहिल्या दिवशीच्या बोलण्यात त्यांनी मला एक गोष्ट बजावून ठेवली की येथे चातुर्मास असल्याबद्दल कोणालाही पत्र पाठवायचे नाही."

२– हावनूर तुंगभद्रेच्या काठी आहे. नदीच्या जवळच त्रिपुरांतकेश्वराचे महादेवाचे मंदिर आहे. तेथे स्वामी राहिले होते. मी सुद्धा त्यांचे जवळच राहिलो. स्वामीमहाराजांनी त्रिपुरांतकेश्वर आणि तुंगभद्रा यांची स्तुति केलेली मला दाखविली. व्यास पुजेच्या दिवशी महाराजांनी यथाशास्त्र पूजा केल्याचे समजले. आम्ही भर पावसाळ्यात हावनूरला होतो. नदी नेहमी भरलेलीच असायची.

३– आही स्नानाला बरोबर जात होतो. त्यांच्याबरोबर रोज स्नान घडत होते. त्यांना मी स्नान घातले. त्यांचे अंगही चोळून काढले. त्यांनीही मला स्नान घातले, तिथं दुसरं कुणी नसल्याने त्यांच्या स्नानाचे तीर्थ घेता आलं. चरण तीर्थही निःसंकोचपणे मिळत होते. त्रिपुरांतकेश्वराचा गुरव फक्त एकदा सकाळी व एकदा सायंकाळी येऊन जात असे. एकांतात ( तो गुरव नसताना ) स्वामी-महाराजांच्या चरणावर पाणी घालण्याची संधी मिळाली की चरणतीर्थ घेत असे. पण ही संधी यापूर्वी किंवा नंतर कधीही मिळाली नाही. तिकडे गर्दी असायची, योगायोग.

४) स्वामींचे कपडे, छाट्या, लंगोट्या इ. रोज धुवून पीळून आणीत होतो. त्यांनी सुरवातीला एकदा सांगितले की संन्याशाची वस्त्रे फार बडवू नयेत आणि घट्ट पिळू नयेत. ते लक्षात ठेवून करीत होतो.

५) संपूर्ण गीतेचा पाठ त्यांनी मला दिला. मला त्यांनी गीता सांगितली ती प्रत्येक श्लोक ३/३ वेळा सांगितला. माझी इच्छा होती की, स्वामीमहाराजांनी मला स्वमुखाने गीतेचे पाठ सांगावेत. हे त्यांना मी बोलून दाखविले नव्हते. १८ अध्याय पूर्ण झाले.

६) रोज सकाळी १० पर्यंत गीतेवर टीका सांगायचे-प्रवचनाप्रमाणे. ते सांगणार व व्यंकटराव गोपाळी अन् मी ऐकणार. पण पद्धत मात्र प्रवचनाप्रमाणे. एक वैष्णव गजाआडून ऐकाचा. महादेवाच्या देवळात यायचा नाही. तो रोज महाराजांना प्रश्न विचारायचा. महाराज त्याचेकडे लक्षच देत नसत. एके दिवशी मलाच राहवलं नाहीं म्हणून मी महाराजांना म्हटलं, "महाराज तो काय

म्हणतोय ?" यावर महाराज म्हणाले "जो महादेवाच्या देवळात येत नाही त्याचं ऐकायची काय गरज आपल्याला."

७) तिथं नित्य पाठासाठी मी गावातील व्यंकटभट गोपाळींची गीता आणली होती. मी निघण्यापूर्वी महाराजांनी विचारले, "ती गीता परत केली का ?" मी म्हटले "त्यांनी ती मला दिलीय." दुसऱ्याची वस्तु ठेवून घेऊ नये हे सुचविले आणि माझ्या उत्तराने त्यांची प्रसन्नताही अनुभवली.

८) गेल्याबरोबर जी माझी चौकशी महाराजांनी केली त्यामध्ये सामान कुठे आहे असे विचारल्यावर सामानाची ट्रंकच "मी मुंबईला एका मित्राकडे ठेवून आलो आहे." असे सांगितले. तेव्हा म्हणाले ट्रंक हावेरी स्टेशनच्या पत्त्यावर मागवून घे. हावेरीचे स्टेशनमास्तर इकडे येणार आहेत. ४/५ दिवसांनी. रोज विचारायचे "पार्सल वगैरे काही आलं का ?" मी त्यांना रोज 'नाही' म्हणून सांगत असे. पण श्रावण शुद्ध अष्टमीला मी निघण्याच्या दिवशी म्हणाले "आज येईल" आणि निघण्यापूर्वीच हातात पार्सलची चिठ्ठी आली. जातांना हावेरी स्टेशनवर गेलो व ट्रंक मिळाली.

९) महाराज एकदा म्हणाले "तुंगभद्रेचे चित्र काढ. गावातून काय लागेल ते घेऊन ये." गावातील मास्तरांच्याकडून कागद–पेन्सिल रंग मिळवले. मग मी चित्र काढू लागलो. तेव्हा महाराज पहात बसायचे. आनंद वाटायचा त्यांना मग त्यांनी भिंतीवर खडूने एक श्लोक लिहिला व मला म्हणाले याचा श्लोकबद्ध हार त्या 'तुंगभद्रेला' घाल, त्याप्रमाणे केले. त्यांना फार समाधान झाले.

१०) एकदा स्वामीमहाराज म्हणाले "कुंडलिनी मरूदंडातून वर जाऊन उजव्या कानावरून, भ्रूमध्यातून मस्तकाला वेढा घालून ब्रह्मरंध्रात जाते.

११) स्वामीमहाराज भिक्षेमध्ये ताक घेत असत. भिक्षेत आलेल्या पदार्थांचा चांगला-वाईट असा काहीही विचार करत नसत. खाऊन टाकायचा. नंतरही कधी भिक्षेच्या पदार्थांचा उच्चारही करत नसत.

१२) येथील मुक्कामात महाराजांनी तुंगाष्टक श्रीचिदंबर दीक्षित महाराजांवर स्तुतीपर श्लोक आणि त्रिपुरांतकेश्वर स्तोत्र केले. स्तोत्राची सुरुवात "तारी मला तू त्रिपुरांतकेश्वरा" महाराजांनी हे तीन श्लोकी स्तोत्र देवालयाच्या चौकटीवर लिहून ठेवले आणि मी काढलेले चित्र हारबद्ध श्लोक घालून महादेवाच्या दरवाजावर लावले. तिथल्या कट्ट्यावर बसून ते बोलत व खाली बसून मी ऐकत असे.

१३) मी असेपर्यंत महाराज व मी असे दोघेच तेथे होतो. एखादा कुणी आला तर फक्त नमस्कार करून जात असे. गीता पाठाच्या टीकेच्या वेळी गोपाळी येऊन बसत.

१४) दुपारी स्वामीमहाराज 'सदाशिव ब्रह्मेंद्रांची ब्रह्मसूत्रवृत्ती' लिहून घेत असत.

१५) रात्री एकदा झोपण्याच्या वेळी दिवा नको म्हणून देवाजवळचा दिवा मी विजवायला गेलो. पण तेवढ्यात स्वामीमहाराज म्हणाले, 'देवाचा दिवा कधीही कमी करू नये. (विजवू नये.)

१६) एकदा स्वामीमहाराजांनी सदाशिव ब्रह्मेंद्रांच्या आठवणी सांगितल्या. अगदी अलौकिक सत्पुरुष होऊन गेले ते. टिपू सुलतानाच्या काळी. इतिहासात उल्लेख आहे. एकदा सदाशिव ब्रह्मेंद्र मुसलमानांच्या छावणीवरून चालले होते भान कशाचेच नव्हते. एका मुसलमान सरदाराने त्यांचा हात तलवारीने तोडला. पण सदाशिव ब्रह्मेंद्रांना त्याचे भानही झाले नाही, ते तसेच रस्त्याने पुढे चालत होते. मुसलमान सरदाराने ते पाहिले आणि तो चपापला. त्याने तुटलेला हात सदाशिव ब्रह्मेंद्रांजवळ नेऊन दिला व म्हणाला 'महाराज माफ कीजिए ! मैने यह आपका हाथ तलवारसे काट दिया है, यह लीजिए ।' सदाशिव ब्रह्मेंद्रांनी एका हाताने तो हात घेतला आणि खांद्याजवळ जिथे तुटला तेथे लावला आणि आश्चर्य असे की तो हात पूर्ववत तेथे एकजीव झाला.

सदाशिव ब्रह्मेंद्रांच्या तीन ठिकाणी समाध्या आहेत. एका ठिकाणी पुरलंती-समाधी झाली. पण पुढे काही दिवसांनी हिंडताना दिसले. तिनदां झालं असं. कावेरीच्या काठीच आहेत तीनही समाध्या. त्यांची ब्रह्मसूत्र वृत्ती सध्या महाराज लिहीत होते. म्हणून आठवणी येत होत्या.

१७) स्वामीमहाराज रात्री माझ्याबरोबर झोपत व एक डुलकी झाली की उठून बसत व समाधी लावून पहाटेपर्यंत त्यामध्ये निमग्न असत. हे गावातल्या एका माणसाने पाहिले होते. त्यांनी मला सांगितल्यावर मी ते स्वतः पाहिले.

१८) या दिवसात एक दिवस महाराजांनी मला आसने करून दाखविली प्राणायामही शिकविला. तसेच रोज सूर्योदयापूर्वी करण्याचा 'अजपा संकल्प' सांगितला आणि लिहून दिला.

१९) येथे–स्वामीमहाराजांनी नित्योपासनेत नेमके काय असावे हे सांगताना सांगितले की—

**स्वशाखोपनिषत् गीता विष्णुनाम सहस्रकम् ।**
**श्रीरुद्रं पौरुषं सौरं जपेन्मुच्येत् बन्धनात् ॥**

आम्ही ऋग्वेदी म्हणून 'ऐतरिय उपनिषद', गीता, विष्णुसहस्रनाम, श्रीसूक्त, रूद्र, पुरुषसूक्त, सौरसूक्त हे नित्य उपासनेत असले म्हणजे मनुष्य बन्धमुक्त होतो. गीतेनंतर त्यांनी विष्णुसहस्रनामाची ही संस्था दिली.

२०) एके दिवशी ज्योतिषाचा विषय निघाला. त्यावेळी मी स्वामीमहाराजांना आपली कुंडली काढून दिली तेंव्हा पुढे सप्तग्रही येणार होती. म्हणून महाराजांनी मला एक वैदिक मंत्र लिहून दिला व म्हणाले 'सप्तग्रहीच्या आधी सहा महिन्यापासून पुढे सहा महिन्यापर्यंत या मंत्रचा रोज २८ वेळा जप करीत जा.'

२१) कुंडली पाहून महाराज मला म्हणाले 'अरे तुला तर आता अकरावा गुरु आहे. मग तुझा फायदा तर काहीच दिसत नाही.' तेंव्हा मी म्हणालो 'महाराज आपली भेट व दर्शन झाले यापेक्षा आणखी कोणता मोठा फायदा जगात आहे' हे ऐकून महाराज किंचित् पण अत्यंत प्रसन्नतेने हसले. ती प्रसन्नता फारच चांगली वाटली.

२२) स्वामीमहाराजांना वैष्णवांनी काही विचारले की ते त्या लोकांना शिवाचीच उपासना सांगत असत. एका बाईला घोरं होतं (फिट्स येत होत्या.) तिला घेऊन काही मंडळी आली. महाराजांनी सांगितले "हे पिशाच्च आहे." मग त्यांनी त्या बाईवर पाणी शिंपडलं ! लागलं की ते पिशाच्च बोलायला. मग त्या बाईला व त्या मंडळींना महाराजांनी सांगितले की "सोळा सोमवारचे व्रत कर म्हणजे ही पीडा जाईल." वैष्णवांच्या मनातला शिव-द्वेष जावा या उद्देशाने हे सांगत असत.

याप्रमाणे हे दहा दिवस गेले. या दहा दिवसात जगाची आठवण सुद्धा झाली नाही. स्वामी महाराजांनी सुद्धा प्रत्येक गोष्ट मोकळेपणाने सांगितली. असे महापुरुष उदारच असतात. पण घेणाऱ्याच्या इच्छेप्रमाणे आणि पात्रतेप्रमाणे देत असतात. देणाऱ्याची इच्छा पुष्कळ असली तरी मागणाऱ्याच्या इच्छेचा ते विचार करतात. मागणीला मर्यादा आतील कुवतीने पडत असते. इथे मात्र देणारे जेवढे देतील तेवढे सर्व पचविणारे तसे घेणारेही होते. म्हणजे ही भेट अत्यंत अलौकिक होण्यामध्ये प्रत्यक्ष गतीमानता आली ती गाणगापूरच्या सात सप्ताहापासून. मग प्रवासाची खडतर तपश्चर्या. या तपश्चर्येमागे तीव्र तळमळ, नितांत

श्रद्धा, अढळ निष्ठा इत्यादि गुणांचा कसही पूर्ण उतरलेला. त्यामुळे १० दिवस मिळालेला सहवास हाही अपूर्व असाच मिळाला. एवढे दिलेले पाहिले तरी काही मिळायचे शिल्लक राहिले आहे असे आपल्याला वाटत नाही. परंतु यावरही कळस चढला तो अकराव्या दिवशी. आता आपण ११ व्या दिवसाची माहिती पाहू–

श्रावण शु० अष्टमी, शनिवार, दिनांक १३ आगस्ट १९१० या दिवशीही चंद्र वृश्चिकेला आलेला आहे. म्हणजे चंद्रगुरु हे पूर्ण ११ वे झालेले आहेत. तो हा दिवस–

मुंबईहून सामानाची ट्रंक मागविली होती ती स्वामीमहाराजांच्या इच्छेने. ती आजपर्यंत न आल्याने वामनरावांना बरे वाटत होते. कारण सामान आले की जाण्याचे ते म्हणणार. वडिलांचे वर्षश्राद्ध श्रावण शु ॥ १० चे आहे हे त्यांच्या लक्षात असावे. कारण त्यांनीच वामनरावांना विचारले की वर्षश्राद्ध कधी आहे? त्यावर वामनरावांनी सांगितले श्रावण शु० दशमीला आहे. या प्रश्नोत्तरातच 'मला जावे लागेल' हे शल्य वामनरावांना टोचून गेले. म्हणून सामान आले नाही या अडचणी मागे लपायला मिळालं तर बरं असा वामनरावांचा हेतू होता. त्यांनी सांगितल्यावर गेलंच पाहिजे. तिथं नाही म्हणताच येणार नाही. आज शनिवारी मात्र सकाळीच म्हणाले. 'आज ट्रंक येईल' आणि तेवढ्यात वर्दी घेऊन स्टेशन-मास्तरचा माणूस आला. मग महाराज म्हणाले आज 'माधुकरीला लवकर जाऊ." यावेळेपासूनच वामनराव गंभीर झाले. ज्या सहवासाची कधी तृप्ती येणार नाही तो सहवास आता संपत आला.

**ही मात साधुसंगाची । कोण तुलना करील त्याची ।**
**नोहे क्षण सत्संगाची । आणि स्वर्ग सुखाची बरोबरी ॥**

दत्तमहात्म्य ३१/९७

वामनरावांना काहीही सुचेनासे झाले. ही अवस्था महाराजांच्या लक्षात आली. त्यांनीही आईच्या ममतेने प्रेमाचा वर्षाव करायला सुरवात केली. दोघांचे स्नान, आह्निक लवकर उरकले. कासवी दृष्टीच्या प्रेमळ धारांचा वर्षाव करु लागले. कृपा दृष्टीने महाराजांनी वामनरावांना न्हाऊ घातले. माधुकरी मागून दोघे आले. दोघेही बरोबरच भोजनास बसले. आज स्वामीमहाराजच म्हणाले "बस माझ्याबरोबर" असे म्हणून स्वतः आपल्या पानातले दोन घास वामनरावांच्या पानात घातले. म्हणाले "घे प्रसाद." वामनराव खाली मान घालून अश्रू आवरीत होते. सर्व

परमानंदच होता. पण आता तो परत जाण्याच्या दुर्दैवाने मुकणार होता. त्याचं दु:ख होतं. अशी भेट पुन: कधी होणार या विचाराने वामनराव अस्वस्थ झाले होते.

**कन्या सासुरासी जाये । मागे परतोनि पाहे ।**
**तैसे झाले माझ्या जीवा । केव्हां भेटसी केशवा ।**
**चुकलिया माये । बाळ हुरु हुरु पाहे ।**
**जीवना वेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥१॥**

आत्मारामशास्त्री (हावनूरमधील ब्राह्मण) कडून नारळ आणवला. दुकानं नाहीत तिथं. घरातून विकत आणायचा माल. मग निघण्याची वेळ आली. स्वामीमहाराज म्हणाले 'स्टेशनला पोहोचायला वेळ लागेल. पावसाचे दिवस. लवकर निघालेले बरे.'

स्वामीमहाराज आसनावर बसलेले. नेहमीच सिद्धासनात बसत. तसे बसले. जवळ नारळ, अंगारा व प्रसाद ठेवून वामनची वाट पहात बसले. वामनराव आले. साष्टांग नमस्कार घातला. स्वामीमहाराजांनी डोक्यावर हात ठेवून कृपाशीर्वाद दिला. प्रसाद, नारळ, अंगारा दिला. म्हणाले "संभाळून रहा. कल्याण आहे—नारायण" वामनराव हात जोडून पुढे उभे राहिले. डोळ्यात पाणी येत होते. तसेच म्हणाले "महाराज ! आता पुन: दर्शन ?" असे विचारताच महाराजांनी मानेला उर्ध्व झटका देऊन वर पाहून हावभावपूर्ण स्वरात म्हणाले, "हे असं लक्षात ठेव म्हणजे झालं."

या वाक्याबरोबर समोर उभ्या असलेल्या वामनरावांना स्वामीमहाराजांच्या शरीरातून निघालेली व्याघ्रांबरधारी श्रीदत्तप्रभूंची मूर्ति साक्षात् दिसू लागली. त्या मूर्तीचे चरण स्वामीमहाराजांच्या छातीपाशी होते. स्वामीमहाराजांचे शरिर पारदर्शक होऊन त्यामध्येच व्याघ्रांबर पांघरलेली श्रीदत्तप्रभूंची प्रसन्न हास्याची, कोमल गात्रांची मूर्ती वामनराव पहात होते. वामनरावांनी पुन: साष्टांग नमस्कार घातला आणि वर पाहिले तो तेथे श्रीदत्तप्रभूंची मूर्ती नसून परत पूर्ववत् श्रीसद्गुरू स्वामीमहाराज बसलेले आहेत व म्हणतात—"बरय आता जास्त वेळ नको करू"

एक अत्यंत अलौकिक आनंद, अपूर्व अनुभव घेऊन वामनराव निघाले. श्रीद्गुरुस्वामीमहाराजही थोडे अंतर बाहेर चालत आले व पुन: मागे पहात पहात वामनराव हावेरी स्टेशनकडे निघाले. आज सद्गुरूंनी परमकृपेचा केलेला परमलाभ घेऊन वामनराव निघाले होते. त्यांच्या मनाची खात्री झाली म्हणून मनातच म्हणाले—

**श्रीसद्गुरो जयजय त्वं नरोभासि मायया ।**
**त्वं त्रिमूर्त्यवतारस्ते महिमा श्रुत्यगोचरः ।**

सद्गुरो ! आम्ही बुद्धीची माणसे तुलाही आमच्यासारखा मनुष्य समजतो ही केवढी भ्रांती आहे ती आपण आज निःशेष केली आहेत.

**गुरुर्मध्ये स्थितं विश्वं विश्वमध्ये स्थितोगुरुः ।**
**गुरुर्विश्वं न चान्योऽस्ति तस्मैश्रीगुरवे नमः ॥**

"हे असे लक्षात ठेव" हे श्रीसद्गुरु स्वामींचे शब्द आणि त्यांनीच लिहिलेल्या द्विसाहस्त्री मध्ये अध्याय ५ मधील बत्तीसावा श्लोक, यामध्ये श्रीपाद श्रीवल्लभांनी मुमतिला श्रीदत्तप्रभूंचे दर्शन आपल्या देहात दिले व म्हणाले

**अदो रूपं त्वया दृष्टं नित्यं हृद्यधारय ।**
**माया सिंधुं द्रुतं तीर्त्वा मत्सायुज्य गमिष्यसि ॥**

"हे जे रूप तू पाहिलेस ते हृदयात ठेव म्हणजे या मायासागरातून शीघ्र तरून जाऊन मत्स्यरूप होशील, या उद्गारांचे आणि 'हे असे लक्षात ठेव' या उद्गारांचे आणि 'हे असे लक्षात घेतले पाहिजे.

या घटनेच्या संदर्भात, या घटनेवर अधिक प्रकाश टाकणारी थोडी माहिती येथेच लिहिणे उचित वाटते म्हणून लिहीत आहे.

दुसरी एक घटना– इ. स. १९६६ मध्ये सोलापूरच्या श्रीराम कवि यांनी लिहिलेल्या व श्री. मामा देशपांडे यांनी प्रकाशित केलेल्या 'श्रीगुरूवामन त्रिपदी' ग्रंथाच्या १ ल्या आवृत्तीमध्ये श्री. मामा देशपांडे आणि श्रीगुरुमहाराज (वामनराव) यांचा या व्याघ्रांबरधारी श्रीदत्तप्रभूंच्या चित्रासबंधी झालेला संवाद छापून आलेला आहे. तोही या घटनेच्या वास्तवतेवर स्पष्ट प्रकाश टाकणारा आहे.

श्री. मामा देशपांडे हा व्याघ्रांबरधारी श्रीदत्तप्रभूंचा फोटो आपणाजवळ कोठून आला ?

श्रीगुरुमहाराज........ सद्गुरू श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांचे मंगल दर्शन हावनूर येथे चातुर्मास असता झाले व ते पवित्र सान्निध्य काही दिवस लाभले. पुढे काही दिवसांनी घरी येण्यास निघालो असता श्रीचरणांना वंदन करून 'पुनः या चरणांचे दर्शन केव्हा होईल' असे विचारले असताना श्रीस्वामी-महाराजांनी स्वतःकडे बोट दाखवून मानेला एक झटका देऊन जे रूप दाखविले ते व्याघ्रांबरधारी श्री दत्तप्रभूंचे ! ते नित्य चित्तात ठेवण्याचा आदेश दिला.

"जे पाहिले व चित्तात ठेवले तेच चित्रित केले आणि नित्य वाचनाच्या पोथीत ठेवून दिले."

असा हा प्रत्यक्ष संवाद आहे आणि श्रीगुरु वामन त्रिपदीचे प्रकाशनही श्रीगुरुमहाराजांच्या अध्यक्षतेखाली झाले आहे.

स्वामींचा निरोप घेऊन वामनराव हावेरी स्टेशनपर्यंत पायी चालत गेले. हे अंतरही २०/२२ मैलांचे आहे. स्टेशनवर ट्रंक मिळाली पण त्यात टोपी नव्हती. टोपीशिवाय प्रवास हा एवढाच झाला. नंतर रेल्वेने कोल्हापूर व पुढे कुडुत्री. याप्रमाणे १४ ऑगस्ट रविवारी, श्रावण शु ९ ला, वर्षश्राद्ध दिनाचे आदले रात्री वामनराव आपल्या घरी पोचले. श्रावण शु० १० दि. १५ ऑगस्ट सोमवारी वर्षश्राद्ध झाले.

## पुनः सद्‌गुरू सत्संग

वामनरावांना श्रीसद्‌गुरुस्वामीमहाराजांचा सहवास मिळताना अपूर्व गोष्टींचा सतत लाभ होत गेल्याने त्यांच्या अन्तःकरणाला स्वामींची विलक्षण ओढ लागली. ते नोकरीचे प्रयत्न थांबले. शिक्षण तर आधीच थांबले. विवाहाचा प्रश्न तर निकालातच निघाला. त्यामुळे ते अगदी मोकळेच असत. नित्य अनुष्ठान, ईश्वरोपासना, योगासने, प्राणायाम याच गोष्टींनी दिनक्रम भरलेला असे.

इकडे हावनूरचा चातुर्मास झाल्यावर श्रीस्वामीमहाराज जवळच तुंगभद्रा तीरावर गळगनाथ येथे एका भक्ताकडे गेले. त्याचा आग्रह झाला आणि स्वामींना त्याचेवर कृपा करण्याची इच्छाही झाली म्हणून त्यांनी त्याचेकडे भिक्षाही घेतली. स्थानांतरही झाले आणि ते परत हावनूरला आले. कारण भाद्रपद वा॥ ९, दि. २७ सप्टेंबरला गुरु पालट होऊन तुळेत आला. तुळेत गुरु आला म्हणजे गंगा तुंगभद्रेला भेटायला येते. म्हणून या पर्वकालात स्वामीमहाराजांनी तेथे स्नान करून सुवासिनींना हळदीकुंकू, खण व ब्राह्मणांना वस्त्रदान आणि मुलांना खाऊ वाटला.

नंतर ते हावनूरहून अगडी, नंतर राणीबिन्नूर नजीक कुपेल्लूर येथे नवरात्रास आले. नंतर शिमोग्याहून श्रृंगेरीस आले. नंतर हरिहर—नंतर नृसिंहवनात १५ दिवस मुक्काम करून बनवासीला आले. तेथून संक्रांतीला गोकर्णास आले. तेथे सव्वा मणाचा तिळगूळ वाटला. पुनः गुर्लहोसूरला आले. तेथे काही दिवस मुक्काम करून पुढे गलगलीला दोन महिने काढले.

इ. स. १९११ मधील चातुर्मास कुरुगड्डीस झाला. तेव्हां शंकरकाका

आजेगावकर व त्यांच्या भगिनी गं. काशीताई तेथे स्वामी सेवा व सहवासासाठी आले होते. हा चातुर्मास झाल्यावर स्वामीसंचार करीत हिंगोली गावी आले. तेथे शंकरशास्त्री अगोदर गेले आणि त्यांनी वामनरावांना पत्र पाठवून बोलावून घेतले. बंधूंच्या पत्राप्रमाणे वामनराव कोल्हापूरहून मनमाडला आले. तेथे मुंबईचे स्नेही रहाळकर यांची भेट झाली. तेथून पूर्णेस आले. पूर्णा-हिंगोली या नवीन झालेल्या रेल्वेमार्गाने, गार्डाच्या परवानगीने मालडब्यात बसून हिंगोलीला आले. तेथे मोकाशी मास्तरांच्या बंधूंकडे एकादशीचा फराळ करून पिंपरीस आले.

स्वामीमहाराज पिंपरीला होते. एका लिंबाच्या झाडाखाली बसले होते व भोवतालच्या शिष्यपरिवारासह भजन करीत होते. वामनरावांनी महाराजांच्या जवळ जाऊन साष्टांग नमस्कार करताच महाराज म्हणाले "बंधूंची भेट झाली का ?" वामनराव म्हणाले "घेतो. आत्ताच आलो." या मुक्कामात महाराजांनी ब्राह्मणांचा सत्कार केला. त्यामध्ये गांडाबुवांनी वामनरावांना एक नागपुरी रेशमी उपरणे दिले.

दुसरे दिवशी स्वामीमहाराजांनी इतर सर्वांचा निरोप घेतला आणि गोदावरी स्नानास निघाले. बरोबर गांडाबुवा, शंकरशास्त्री, वामनराव, दत्तोपंत आजेगांवकर व गांडाबुवांचे शिष्य नथुराम अशी पांचच मंडळी घेतली.

स्वामीमहाराज नंतर औंढ्या नागनाथला आले. बरोबर ही पांच मंडळी होती. म्हणजे वामनरावांनी काही काळ स्वामीमहाराजांच्या प्रवासात सहभागी होण्याचाही लाभ घेतला. औंढ्या नागनाथला आल्यावर वामनरावांना इच्छा झाली की, आपण स्वामीमहाराजांना आसने करून दाखवावीत. तसे ते त्यांना म्हणाले. पण स्वामी म्हणाले "जागा कुठंय ?" औंढ्या नागनाथजवळ एक खोली होती. तिथं स्वामी म्हणाले "दाखव करून." मग वामनरावांनी स्वामींना अगदी सगळी आसने करून दाखविली. कंदपीडासन-पूर्ण मत्स्येंद्रासन अशी अवघड आसनेही करून दाखविली. आसने पाहून स्वामी प्रसन्न झाले व म्हणाले "सिद्धासन व पश्चिमोत्तान ही आसने वाढवावीत."

येथे औंढ्या नागनाथला वामनराव व शंकरशास्त्री या दोघांना महाराजांच्या मुखातून 'ऐतरेय' व 'मांडुक्य' ही दोन उपनिषदे ऐकावयास मिळाली.

औंढ्या नागनाथला बारा शिवेचा मारुती आहे. तिथं प्रवाशांना रहा म्हणत नाहीत. 'जेवा आणि चला पुढे' असे तेथील लोक सर्व प्रवाशांना सांगत

असतात. यांचा मुक्काम दुसरीकडे असल्याने हा प्रश्न आला नाही. जे त्या मारुतीच्या देवळात उतरतात त्यांचेसाठी तो आहे.

## औदुंबरला श्रीदत्तमाला मंत्राचे अनुष्ठान

श्रीसद्‌गुरू स्वामीमहाराजांचा शके १८३४ इ. स. १९१२ चा चातुर्मास मध्य प्रदेशातील नर्मदाकाठी चिखलद्याला झाला. यावेळीसुद्धा वामनरावांनी स्वामींना पत्र पाठवून "मी येऊ का?" असे विचारले होते. परंतु स्वामींनी कळविले की, "चिखलद्याची वाट त्रासदायक आहे म्हणून इकडे येऊ नये. तिकडेच औदुंबरला श्रीदत्तमाला मंत्राचे पुरश्चरण करावे." स्वामी आज्ञेप्रमाणे वामनराव चिखलद्याला न जाता औदुंबरला या अनुष्ठानासाठी गेले. बरोबर मातोश्रींना घेतले.

श्रीदत्तमाला मंत्र हा एक सिद्ध, प्रभावी परंतु मोठा मंत्र आहे. याच्या पुरश्चरणाची संख्या बारा हजार असते. साधारणतः एका माळेला एक तास लागतो. वामनराव रोज तीन माळा म्हणजे सुमारे तीन तास या अनुष्ठानासाठी बसत. याशिवाय नित्याचे सर्व कर्महो यथासांग होत असे. गायत्रीचा रोजचा जप बाराशेचा याच पूर्वी सुरू झाला होता. हावनूरला स्वामीमहाराजांनी सांगितलेल्या पंचसूक्त रूद्रादिंचा समावेश नित्यक्रमात झाला होता. श्रीगुरुचरित्र नित्य वाचनात असे. ब्रह्मयज्ञ तर्पण, वैश्वदेव इ. कशातही उणीव नसे. कुल-परंपराच शास्त्रनिष्ठेची होती.

हे पुरश्चरण वामनरावांनी चाळीस दिवसांत पूर्ण केले. हे पुरश्चरण पूर्ण होण्यापूर्वी एक विशेष घटना घडली. ईश्वर सर्वसाक्षी असतो याची प्रचीति या घटनेतून येते. नित्याप्रमाणे वामनराव नदीवर गेले, स्नान संध्या, नित्य कर्म व जप संपविला होता. त्याचवेळी ईस्लामपूरचे श्री. गाडगीळ तेथे आले. त्यांचा व वामनरावांचा पूर्व परिचय नव्हता. श्री. गाडगीळांना पहाटे दृष्टांत झाला की, "एक सुवासिनी स्वप्नात आली व म्हणाली औदुंबरला, वामनरावांना जाऊन सांग की तुमचा जप तीन हजार कमी झाला आहे. तो पुरा करावा, नदीवर भेट होईल." या दृष्टांताप्रमाणे श्री. गाडगीळ सकाळी इस्लामपूरहून निघाले आणि औदुंबरला आले. नदीवर वामनरावांना पाहून गाडगीळांना वाटले यांना विचारावे. त्याप्रमाणे त्यांनी विचारले "वामनराव आपणच का?" तेव्हां लगेच 'होय' उत्तर आल्यावर गाडीळांनाच आश्चर्य वाटले. स्वप्नात सांगितलेल्या नावाची व्यक्ति नदीवरच भेटली. वामनराव म्हणाले "आपण कोणाकडून आलात?" त्यावर गाडगीळ म्हणाले—

"मला पहाटे एक दृष्टांत झाला आहे. एक सुवासिनी स्वप्नात आली व म्हणाली, 'औदुंबरला, वामनरावांना जाऊन सांग की तुमचा जप तीन हजारांनी कमी झाला आहे, तो पुरा करावा'; वामनरावांना या दृष्टांताचे आश्चर्य वाटले की नाव बरोबर, जप चालू आहे हे बरोबर पण तो कमी झाला आहे ही काय भानगड आहे. त्यांचे विचार चक्र सुरू झाले. गाडगीळांचा निरोप घेतला आणि घरी मुक्कामावर आले. पहिल्या दिवसापासून चाळीस दिवस मोजले. रोज ३०० म्हणजे तीन माळा जप होत आला याची खात्री झाली. मग जप कमी कसा ? हे कोडे काही उलगडेना. आईलाही हे सर्व सांगितले. या चिंतनात असताना कुडुत्रीहून तात्यांचे पत्र आले.

"आपले कौलवचे काका ईश्वर चरणी लीन झाले. आपल्या अनुष्ठानात व्यत्यय नको म्हणून दहा दिवसानंतर कळवीत आहे." हे पत्र वाचताच ती. मातोश्रींना आणि वामनरावांना तीन हजार जप कमी झाल्याचे कारण स्पष्ट झाले. आपला या दहा दिवसांच्या अशौच काळातील जप ईश्वराला मान्य नाही म्हणून ही अशी घटना घडली. त्याचबरोबर आपले पुरश्चरण अर्धवट, अपूर्ण राहू नये म्हणून जप पूर्ण करण्यासही सांगितले. ईश्वरकृपा पाहून दोघांनाही कृतार्थता वाटली. मग पुढे दहा दिवस थांबून जपसंख्या पूर्ण केली. जपाची सांगताही केली आणि वामनराव वाडीहून-कोल्हापूरला आले आणि नंतर कुडुत्रीला गेले.

यानंतरच्या कालावधीत हावनूरला झालेल्या व्याघ्रांबरधारी श्रीदत्तप्रभूंचे दर्शन अन्तःकरणात ठसले होते. ते चित्रांकित करण्याचे काम झाले. मूळच्या उपजत गुणाला जे जे स्कूल ऑफ आर्टमध्ये जाऊन ती कला शास्त्राच्या कोंदणामुळे अधिकच प्रभावी झाली होती. त्याचा या चित्रातून चांगलाच प्रत्यय येतो. हे चित्र छोटे, पोथीत ठेवता येईल या आकाराचे काढले. नित्य पुजेलाही ते योग्य ठरले.

१९१२ मध्ये पुढील काही महिने वामनरावांचा मुक्काम कोल्हापुरात होता. योगायोगाने राजाराम हायस्कूल मध्येच त्यांना ड्रॉईंगमास्तरची नोकरी मिळाली. त्याचे असे झाले की, लाहोर येथील आर्यसमाजाच्या हायस्कूलमध्ये पं. श्री. दा. सातवळेकर हे ड्रॉईंग मास्तर म्हणून काम करीत होते. त्यांच्यावर एक 'पंजाब बॉम्ब केस'चा राजकीय खटला झाला. पंडितजींना अटक करण्यासाठी लाहोरला पोलीस पथक निघाले. पंडितजी हेच आहेत ही ओळख सांगण्यासाठी

कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमधील ड्रॉईंगमास्तर श्री. देव यांना सरकारतर्फे पोलीसांबरोबर लाहोरला नेले. त्यामुळे देव ड्रॉईंगमास्तरच्या रिकाम्या जागी तात्पुरते (हंगामी) ड्रॉईंगमास्तर म्हणून वामनरावांना नोकरी मिळाली.

येथे असताना वामनरावांची आसने वगैरे चालू होती. त्याचबरोबर व्यायाम म्हणून जोर, बैठका, सिंगलबार, डबलबार, मलखांब इ० चालू होते. एकदा जोर काढताना, 'पाल्पीटेशन' सुरू झाले. तेंव्हा घरी न जाता बाहेरच्या बाहेर डॉक्टरांचेकडे जाऊन औषध वगैरे घेतले. थोड्याच दिवसात ते बरे झाले. या अनुभवाने जोर बैठका बंद केल्या. हंगामी नोकरी सुटली आणि वामनराव गरुडेश्वरला गेले.

## गरुडेश्वरमधील सद्गुरू सहवास

**गरुडेश्वरं गुरुक्षेत्रं श्रीदत्त गुरुणासह ।**
**भक्तैर्नाम्ना नादयन् सानंदं भूमंडलं कलौ ॥**

श्रीसद्गुरूस्वामींचा इ. स. १९१२ मधील चातुर्मास चिखलद्याला झाला आणि स्वामीमहाराज मधल्या अरण्याच्या वाटेने गरुडेश्वरला निघाले. त्या अरण्यात स्वामीमहाराजांना अश्वत्थामा भेटले. त्यानेच अगदी जवळच्या वाटेने स्वामीमहाराजांना गरुडेश्वरला पोचते केले. अश्वत्थामा मात्र तेथेच अदृश्य झाला. गरुडेश्वर नर्मदा तीरावर आहे. येथे स्वामीमहाराजांना नर्मदामातेने दृष्टांत देऊन सांगितले की, "दत्तप्रभू आपण विविध अवतारात गंगादि भगिनींवर खूप कृपा केली आहे. तेथे आपण नित्यवास केला आहे. आपल्या या वासुदेव यति अवतारात तरी माझ्यावर कृपा करावी. या यतिराजांचा मत्समीप अखंड निवास व्हावा." ही नर्मदामातेची तक्रार नाहिसी करण्यासाठी श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराज गरुडेश्वरला येऊन राहिले. चैत्र व॥ षष्ठीला स्वामीमहाराज चातुर्मासापूर्वी चार महिने आधी आले.

वामनरावांना चिखलद्याच्या चातुर्मासात इकडे येऊ नये म्हणून कळविले होते. औदुंबरला श्रीदत्तमाला मंत्राचे अनुष्ठान पूर्ण करून, त्यांनी पुन: श्रीसद्गुरूंना पत्र पाठविले. स्वामींनी कळविले "मी गरुडेश्वरी आलो आहे. येथे येण्यास हरकत नाही." म्हणून वैशाखामध्येच वामनराव गरुडेश्वरला आले. येथे भक्तमंडळींची येजा मोठ्या प्रमाणावर होती. येथील त्या सर्वांची भोजनाची एकवेळची सोय असे. स्वामीमहाराज गरुडेश्वरला आले तेंव्हा तेथे राहण्याची सोय काही नव्हती. ते नारवेश्वराच्या मंदिरांत अनुष्ठान करीत व रात्री बाहेर

एका दगडावर झोपत. एक रात्री अचानक मोठा पाऊस आला. पण स्वामीमहाराज त्या पावसात गाढ झोपले होते. इतकेच नव्हे तर शरीराखालून खळखळ पाणीही वहात होते. देह तादात्म्य सुटल्याचे हे लक्षण आहे. भिक्षेची सोयही हळूहळू होत गेली. लोक तेथे येऊ लागले तसतशा सोयी होऊ लागल्या. लोकांना बसण्या झोपण्यासाठी लहानसा मंडप घातला. काही दिवस स्वामीमहाराज या मंडपात रहात असत. पुढे लोकांनी स्वामीमहाराजांसाठी एक झोपडी बांधली. मग तेथे राहणे सुरू झाले. भक्त मंडळींची येजा वाढली. तेव्हां ५/५० मंडळी बसतील एवढी पत्र्याची शेड बांधली.

जमणारी मंडळी मानापमान सोडून एकचित्ताने पडेल ते काम करीत होती. कोणी पाणी आणावे, कोणी लाकडे आणावीत, कोणी स्वयंपाक करावा, कोणी पळसाची पाने आणून पत्रावळी कराव्यात. हे करून स्वामींचे दर्शन, प्रवचन, आरती, आपली नित्योपासना या गोष्टी दिनक्रमात असत. जमलेल्या भक्त बंधूंचा परिचय करून घेणे त्यातून स्वामीमहाराजांच्या आठवणी ऐकायला मिळणे यामध्ये दिवस कसा निघून जाई ते कळायचे सुद्धा नाही. वामनरावांना श्रीसद्‌गुरूस्वामींचा सहवास इ. स. १९०७ ला वाडीपासून मिळू लागला. सहवासाचा कालावधी थोडा असला तरी सहवासाला अंतरंग स्पर्श अत्यंत निकटचा होता. म्हणून दोघेही भरपूर अंतर ठेवून रहात असत. त्यामुळे वामनराव हे स्वामींच्या पट्ट शिष्यातील एक आहेत एवढीसुद्धा कल्पना त्यावेळी कोणालाही आली नाही.

**गुरुसेवा कथं कार्या कथं वा गुरु शिष्यता ।**
**दर्शिता ऽ ऽ दर्शभूता सायां कृत्वा लभते परम् ॥**

आपल्या गुरूंची सेवा कशी करावयाची असते, कसे निःसीम प्रेम ठेवावे, कसा आदर बाळगावा लागतो, गुरु व शिष्य कसे वागतात, गुरु व शिष्य यांचे प्रेम व नाते कसे असते याचा आदर्श वामनरावांनी आपल्या आचरणाने लोकांना दाखवून दिला आहे. केवळ श्रीगुरुकृपेने परम लाभ कसा होतो, ते लोकांच्या नजरेस आणून दिले आहे. असा आदर्श आपल्या पुढे ठेवून जर आपण गुरुसेवा केली तर खात्रीने परमपद प्राप्ती होईल यात संशय नाही.

श्रीस्वामीमहाराज सकाळी ४।। ला उठत असत. उठल्याबरोबर 'श्रीगुरुदेवदत्त' म्हणत. ते शब्द कानी पडताच भक्तमंडळीही भराभर उठत. त्यांना दात घासण्यासाठी अंब्याचा पाला व हात धुण्यासाठी माती देण्याचे काम

वामनराव करीत. ते स्नानाला गेले म्हणजे त्यांची जागा शेणाने सारवून घेण्यात ही वामनराव असायचे. त्यांची पर्णकुटी ते झाडून साफ करून ठेवीत असत.

गरुडेश्वरला नारदेश्वराचे मंदिर आहे. तिथून अगदी अवघड जागेवरून उतरून स्नानाला स्वामी जात असत. त्यामुळे त्यांच्याभोवती स्नान करणाऱ्या भक्तमंडळींची कधी गर्दी होत नसे. तरी स्वामींच्या अनुज्ञेने १/२ वेळा त्या अवघड जागेवरून त्यांच्याबरोबर वामनराव स्नानाला गेले होते. पण रोज मात्र सध्या जिथे घाट बांधला आहे, तिथे वामनराव आणि इतर भक्तमंडळी स्नानाला जात असत. त्यावेळीं तिथं घाट नव्हता. दगडधोंडेच असायचे.

स्नानानंतर नारदेश्वराच्या मंदिरात स्वामी उपनिषदे शिकवीत असत. ब्रह्मसूत्रवृत्ती, देशोपनिषदे, श्वेताश्वतर, कैवल्य, मौक्तिक आदि उपनिषदे सांगितली. त्यावेळीं तेथे पवमान स्वाहाकार चाले. तेथे वामनरावांनी वे. परशुराम भटजींकडून पवमानाची संथा घेतली.

गरुडेश्वर हे ठिकाण तसे आडबाजूला आहे. नावेतून नर्मदा पार करून जावे लागे. पावसाळ्यात नदीचा महापूर आणि धड रस्ताही नसायचा. उन्हाळ्यात कडक उन्हाळ्याने पायी जाणे कठीण असायचे. तरीसुद्धा सारखी माणसांची गर्दी असायची. त्या परिसरात जिकडे तिकडे सारखी माणसं असायची. सगळ्यांची भोजनाची व्यवस्था असायची. स्वामी मात्र भिक्षा मागीत असत.

तिथे स्वामींचे जेवण झाल्यावर सुरवातीला काही दिवस बायका त्यांच्या हातावर पाणी घालीत असत. पण पुढे त्यांच्या त्यांच्यात भांडणे होऊ लागली. तेव्हा एके दिवशी स्वामी म्हणाले "छगन ! वामनला बोलाव." वामनराव पुढे गेले तेव्हां स्वामी म्हणाले "आजपासून तू पाणी घालीत जा." अनायासे, कल्पना नसतांना सद्गुरूंच्या इच्छेने सेवा मिळाली म्हणून वामनरावांना आनंद झाला. बायकांची भांडणेही थांबली. मग बायकांनी पाणी आणून वामनरावांच्या हातात देण्याची सेवा बिनतक्रार सुरू केली. एका जागेवर उभे राहून हातात आलेली पाण्याची लोटी स्वामींच्या हातावर घालण्याची सेवा वामनराव करू लागले.

दुपारी भोजन झाल्यावर थोडी विश्रांती घेऊन स्वामीमहाराज पत्रांना उत्तरे देण्याचे काम सुरू करीत. काही पत्रांची उत्तरे स्वतः लिहीत आणि कांहींची उत्तरे वामनरावांना समोर बसवून सांगत. वामनराव त्याप्रमाणे उत्तरे लिहीत असत. हाही एक सेवा करण्याचा उत्तम सुयोग वामनरावांच्या परम-भाग्याने तेथे आला होता.

या नित्यक्रमात खंड नसे. पण एके दिवशी दुपारी वामनरावांना झोप लागली. ते दुपारी मंदिराच्या बाजूला सावली पाहून थोडा वेळ विश्रांती घेत असत. पहाटेपासून काहीना काही तरी चाललेले असायचे. तरी ते नेहमी दक्ष असत. पण एकदां त्यांना झोप लागली. त्या झोपेत अशावेळी एक स्वप्न पडले की, रोजची पत्र लिहिण्याची वेळ झालेली. एक पांढरा शुभ्र नंदी, गळ्यात घुंगुरमाळा घातलेला, धिप्पाड, पुष्ट, ऐटबाज, मोठ्या शिंगांचा. तो नंदी जोरात धावत धावत वामनरावांच्याकडे येऊ लागला. त्याच्या घुंगुरमाळांचा खळखळ आवाज कानावर पडला आणि डोळ्याला त्याचे रूद्रस्वरूप दिसले आणि वामनराव एकदम जागे झाले. त्यांना लगेच पत्र लिहायला जायची आठवण झाली. आज आपल्याला देवानेच जाग आणवून दिली या विचारात ते स्वामींच्या पर्णकुटीत गेले. आज आपल्याला उशीर झाला असे त्यांना वाटत होते. पण उशीर झाला नव्हता. अगदी वेळेवर ते स्वामींच्याकडे गेले होते. ही वेळ नंदीच्या स्वप्नाने आपल्याला संभाळता आली ही देवाची कृपा समजून त्यांनी स्वामी महाराजांना कृतज्ञतापूर्वक साष्टांग नमस्कार घातला. मग त्याचे नित्याप्रमाणे पत्र-लेखन सुरू झाले.

या झोपेच्या आठवणीपासून वामनराव दुपारचे उभ्याने झोप घेऊ लागले. पहाटेपासून रात्री १ पर्यंत काहीना काही सेवा चालायची. शरीराला झोपही अनिवार्य होत असे. म्हणून ते खांबाला टेकून उभे रहायचे व उभ्या उभ्या झोप घ्यायचे. अशी झोप सावध असायची. झोपेने गुरुसेवेत अडथळा आणू नये आणि शरीराने सेवा नाकारू नये यासाठी हा उपाय वामनरावांनी काढला.

स्वामीमहाराजांना रोज भरपूर पत्रे येऊ लागली. एका एका दिवशी, त्या काळात, १००/१०० पत्रे येत असत. एवढ्या पत्रांचे वाचन आणि उत्तरे देणे यामध्ये सगळा वेळ जाऊ लागला. ते लिहीत, वामनरावांना सांगत. तरी काम वेळेत उरकेनाच. फारच झालं तेव्हा एकदा स्वामीमहाराज म्हणाले, "उद्यापासून लिहा 'मालक पत्र घेत नाही'.

त्यावेळी गरुडेश्वराला स्वामींच्या सहवासात राहण्यासाठी एक दाक्षिणात्य ब्रह्मानंदतीर्थस्वामी आले होते. हे मोठे अधिकारी होते. हे ब्रह्मानंदस्वामी महाराजांशी बरोबरीनं बोलत असत. पण अत्यंत आदर ठेवून बोलत. साध बोलतानाही हात जोडून बोलत असत. या ब्रह्मानंदस्वामींनी महाराजांना विचारले "महाराज पत्रोत्तर देणं बंद का केले ?" त्यावर महाराज म्हणाले 'अहो ! किती

पत्र ? रोज १०/१२ आली तर उत्तर देणार. पण इथं रोज १००/१०० पत्रे येतात. सगळा वेळ त्यातच जातो." यावर ब्रह्मानंदस्वामी म्हणाले "बरं स्वामी-महाराज १० पत्रे आलीं तर उत्तर देणार ना ?" महाराज "हो" म्हणाले.

स्वामीमहाराजांचा पत्रव्यवहार वामनराव पहात होते. आलेली पत्रे ताब्यात घेणे, महाराजांना वाचून दाखविणे आणि महाराजांच्या सांगण्याप्रमाणे उत्तरे लिहून पोष्टात टाकणे हे काम असे. ब्रह्मानंदांनी वामनरावांना एकांतात एक सल्ला दिला. "आलेल्या पत्रातून रोज दहा पत्रे निवडून देत जा" त्याप्रमाणे वामनराव रोज दहा पत्रे महाराजांना देऊ लागले. बाकीची आलेली पत्रे ठेवून देत. कमी पडली की रोज दहा करून घेण्यासाठी त्यातून घ्यायची. याप्रमाणे सुरू झाले. एकदा महाराज म्हणाले "रोज नेमकी दहाच पत्रे कशी येतात रे ?" ब्रह्मानंदस्वामी रोज जवळच बसलेले असायचे. महाराजांनी हा प्रश्न करताच ब्रह्मानंदस्वामी म्हणाले, "महाराज आपली अमोघ वाणी !" यावर महाराज नुसते हंसले. तेव्हां ब्रह्मानंदस्वामी पुढे म्हणाले, "महाराज ! गरीब लोक दीन असतात. आपण उत्तरं द्यावीत." झालं ! पुनः पहिला कारखाना सुरू झाला "ऐसी कळवळ्याची जाती । लाभाविण करी प्रीति"

पत्रोत्तराच्या कार्यक्रमानंतर स्वामीमहाराज रोज कोणत्याही विषयावर प्रवचन देत असत. स्वामीमहाराजांच्या दर्शनास रोज शेकडो मंडळी येत होती. येथे रोज ३००/४०० पान भोजनाचे होत असे. तेथे नित्य श्रीनित्यमंगल उत्सव चालू असे.

त्यावेळी गरुडेश्वरी श्रीमहाराजांच्या जवळ कोणतीच देवमूर्ति-प्रतिमा नव्हती. येणाऱ्या लोकांना दर्शनासाठी, आपल्या या परमानंद सोहळ्यात एखादी मूर्ति-प्रतिमा अधिष्ठान देवता म्हणून हवी होती. म्हणून स्वामीमहाराज वामन-रावांना म्हणाले, तुझ्या पोथीत अललेल्या फोटोस फ्रेम कर." वामनरावांनी आपल्या पोथीमध्ये ठेवलेला व्याघ्रांबरधारी दत्ताचा फोटो घेतला आणि त्याला एक पत्र्याची फ्रेम करून आणली. लाकडी फ्रेमला तेथे वाळवी लागली असती. कारण तेथे वाळवीचा उपद्रव फार. मग फ्रेम केलेला तो व्याघ्रांबरधारी फोटो स्वामीमहाराजांना नेऊन दिला.

लगेच स्वामीमहाराजांनी तो फोटो बाहेर चौरंगावर ठेवला. त्याची स्वतः षोडषोपचारे पूजा केली. त्या दिवसापासून त्या फोटोची रोज पूजाअर्चा होऊ लागली. रोज रात्री भजनानंतर सव्वा मणाचा गुळाच्या शिऱ्याचा प्रसाद होऊ

लागला. हा फोटो स्वामीमहाराजांनी आपणास द्यावा असे अनेकांना वाटत होते. परंतु वामनराव गरुडेश्वरहून निघाले तेव्हा स्वामीमहाराजांनी चौरंगावरील हा फोटो उचलून वामनरावांच्या हातात दिला. या फोटोचा इतिहास वामनराव व व स्वामी यांच्याशिवाय कोणालाच माहित नव्हता. वामनरावांना फार धन्यता वाटली. पुढे हा फोटो वामनरावांच्या देवांबरोबर श्रीवासुदेव निवासात आला व सध्याही तो तेथेच आहे.

संध्याकाळच्या प्रवचनानंतर स्वामीमहाराजांच्यासह सर्वांचे संध्यावंदन होत असे. मग रात्री भजन सुरू होई. रात्री बारापर्यंत भजन चालत असे. रोज रात्री एकपर्यंत जागरण होत असे. रात्री स्वयंपाक नसल्याने रोज प्रसाद म्हणून हरबरे किंवा मुगाची उसळ होत असे. पण १। मणाचा गुळातील शिरा, उत्तम तुपातला रोज होत असे. प्रत्येकाला ओंजळ भरून मिळायचा. शिरा तुपाने थबथबलेला असायचा. तेवढ्यात पोट तर भरायचेच पण भरपूरही होत असे. वामनराव पहाटेपासून ह्या वेळेपर्यंत श्रीसेवेत रमलेले असायचे.

**'न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः ।'**

**'इच्छान्ति देवाः सुन्वन्तं न स्वप्नाय स्पृहयन्ति ।'**

देवाचे जे सख्य असते ते नेहमी प्रयत्नशील माणसाशीच असते. यज्ञ-कर्त्या-पुरुषार्थी माणसालाच देव मानतात. आळशी माणसाला देव मानीत नाहीत. हे वर्णन पाहिले म्हणजे वामनरावांचे आणि ईश्वराचे वा गुरुचे जे सख्य निर्माण झाले त्याचे उत्तर येथे मिळते.

वामनरावांचा मुक्काम गरुडेश्वरला वैशाखापासून अश्विनापर्यंत पाच महिने होता. या मुक्कामात स्वामीमहाराजांनी वामनरावांना 'धौती' सांगितली. धौती ही योगातील षट्शुद्धी प्रकारात येते. तीन बोटे रूंद व एकवीस फूट लांब अशी तलम कापडाची पट्टी खाऊन परत बाहेर काढावयाची. याने कफादि रोग नाहीसे होतात. छाती नेहमी स्वच्छ नि मोकळी रहाते. हा धौती प्रकार वामनराव येथे शिकले.

या वर्षीची वामनरावांची श्रीगुरुपौर्णिमा श्रीसद्गुरुस्वामीमहाराजांच्या सान्निध्यात झाली. त्या दिवशी त्यांना श्रीगुरुपूजन करण्याचा लाभ झाला. त्याच-प्रमाणे भाद्रपद शु. १४ अनंतचतुर्दशी हा त्यांच्या अनुग्रहाचा दिवस. तोही त्यांना लाभ यावेळी झाला.

भाद्रपदामध्ये स्त्रियांना पूजा करण्यासाठी हरतालिका करण्यास स्वतः

स्वामीमहाराजांनी वामनरावांना सांगितले होते. वामनरावांच्या कलागुणांची अभिरुचि आणि कलेतील नैपुण्य गुणग्राही स्वामीमहाराज ओळखीत होते. वामनरावांची मूर्तिकला सुद्धा अभिजात होती. म्हणूनतर स्वामींनी ही हरितालिकेंची कामगिरी वामनरावांचेवर सोपविली.

स्वामीमहाराजांनी बायकांकडून कधीही पूजा स्वीकारली नाही. पण यावर्षी मात्र सौभाग्यवती स्त्रियांनी स्वामीमहाराजांची पूजा केली. सगळ्या स्त्रिया स्वामींच्या भोवती बसल्या. ब्राह्मणांनी पूजा सांगितली आणि त्या पूजेचा स्वीकार स्वामींनी केला. हे मनोहर, भावपूर्ण दृष्य पाहाण्यास वामनराव तेथे उपस्थित होते. ही स्त्रियांनी केलेली स्वामींची पूजा पहिली आणि शेवटचीच होती.

एकदा स्वामींच्या पर्णकुटीत साप निघाला. चांगला मोठा नाग होता तो. कोठून आला ते कळले नाही. पण श्रीगुरूचरित्राची पोथी आणि श्रीदत्तप्रभूंचा फोटो होता तिथं बीळ होतं. त्यामध्ये शिरला. तेंव्हा स्वामीमहाराजांनी हातात वाळू घेतली आणि मंत्रून त्या बिळाच्या तोंडाशी ठेवली. स्वामींच्या मंत्र सामर्थ्याची, सिद्ध स्थितीची खात्री असल्याने कोणाच्याही मनात शंका, भीति राहिली नाही. मग रात्री सर्वजण तिथं निवांत झोपले. सद्गुरूंचे सामर्थ्य होते यात शंका नाही, परंतु भक्तांची श्रद्धाही सद्गुरूंच्यावर दृढ होती. म्हणून कोणाला शंका किंवा भीति राहिली नाही.

वामनरावांना या काळात थंडी वाजून ताप येऊ लागला. हे स्वामींच्या ताबडतोब लक्षात आले. त्यांनी वामनरावांना सांगितले 'स्नान बंद ठेव.' आणि "धौति आणि मयुरासन कर" स्वामी आज्ञेप्रमाणे वामनराव करू लागले. महिनाभर या तापामुळे वामनरावांना स्नान घडले नाही. स्वामींचे लक्ष असायचे, नेहमी प्रकृतीची चौकशी करीत. म्हणत 'सांगितले ते चालू ठेव, होईल कमी' अशा-स्थितीत दसरा आला. दसऱ्याच्या दिवशी, स्वामीमहाराज स्नान करून आले तेंव्हा वामनराव म्हणाले "महाराज ! आज स्नान करतो" त्यावेळी स्वामी-महाराजांनी आपल्या कमंडलूमधील पाणी स्वहस्ते वामनरावांच्या अंगावर शिंपडले व म्हणाले "झालं ना आता स्नान" अर्थात् वामनरावांना परम संतोष झाला. स्नानादि कर्माचा आग्रह नव्हता पण दोषनिवृत्तीसाठी स्नानाची प्रार्थना केली होती. म्हणून सद्गुरूंचे जल सिंचन आणि शब्द यामुळे अंतर्बाह्य शुचित्व आलेले अनुभविले म्हणून तात्काळ वामनरावांना समाधान झाले. हेतू पुरस्सर सदिच्छा

होती, पण अविवेकी दुराग्रह नव्हता. असे जाणतेपण वामनरावांच्या हृदयीं होते. म्हणून गुरुकृपेचा अलौकिक लाभ त्यांना मिळत होता.

यावेळी स्वामीमहाराजांच्या फोटोला श्लोकबद्ध हार घालून नेण्याचा योग वामनरावांना आला होता. प. श्रीनृसिंहसरस्वती दीक्षितस्वामी महाराज यांनी हारामध्ये गुंफता येईल असा श्लोक तयार केला आणि वामनरावांच्या स्वाधीन केला. म्हणाले आपल्या गुरुमहाराजांच्यासाठी हा श्लोक हारासाठी केला आहे. "आपणासारिखे करिती तात्काळ नाही काळ वेळ तया लागी" याचे प्रमाण म्हणजे श्री दीक्षितस्वामी आहेत. स्वामीमहाराजांची काव्य रचना पाहून तशी रचना तर केलीच पण अर्थाच्या दृष्टीनेही असे वाटते की हाही श्लोक स्वामी महाराजांनीच केला आहे. पण हा खाली दिलेला श्लोक श्री दीक्षितस्वामींचाच आहे.

**मे शं के शं सु शं भुं भुवन वन वहं मारहं रत्न रत्नं ।**
**वंदे श्री देव देवं सुगुण गुरु गुरुं श्रीकरं कञ्ज कञ्जं ॥**
**मामज्ञं मत्तमर्भं भवदव सुवहं वासना सर्व सङ्घे ।**
**मातः पातः सुतस्ते वहरहसिहरे दे शिके शिष्य शिष्यं ॥**

याचा अर्थ–

"श्री विष्णु ब्रह्मदेव व शंकर अशा त्रिमूर्तिस्वरुपा, चतुर्दश भुवने व वेद धारण करणाऱ्या मदनालाही लाजविणाऱ्या, जितेंद्रिय रत्नांमध्ये श्रेष्ठ व तेजस्वी असे, ज्ञानी व गुणसंपन्न गुरुंचेही गुरु असणाऱ्या, भक्तांना सर्व प्रकारचे ऐश्वर्य प्रदान करणाऱ्या, हातात दण्डकमंडलू धारण करणाऱ्या, कमलाप्रमाणे प्रसन्न मुखकमल असलेल्या, हे देवाधिदेवा, गुरुमाऊली, मी आपल्याला वंदन करतो."

सर्व वासनांच्या समूहात सापडलेला मी संसाररुपी अग्नित व्यापून त्रस्त झालो आहे, 'अहं' व 'मम' या भावनांनी मी उन्मत्त झालो आहे. देवा मी अज्ञानी बालक आहे, तेव्हां हे सद्गुरो ! या आपल्या शिष्यानु शिष्याचा यापुढे अध:पात न व्हावा यासाठी आपण ज्ञान देऊन माझा उद्धार करावा.

वामनरावांनी गरुडेश्वरात स्वामीमहाराजांना हा श्लोक श्रीदीक्षितस्वामी महाराजांनी केलेला आहे, असे सांगून त्यांच्या पुढे तो फोटो ठेवला. स्वामींनी श्लोक पाहिला आणि म्हणाले 'ही वस्तु ज्याची त्याला परत करा. असे म्हणून स्वहस्ते तो फोटो वामनरावांच्या हातात दिला. वास्तविक तो प्रसाद दिला होता पण त्यासंबंधी बोलणे योग्य नसल्याने तो विषय बोलण्यात आणलाच नाही.

"ती वस्तू ज्याची त्याला परत द्या" यालाही अर्थाची मार्मिकता आहे. "हम

भक्तन के भक्त हमारे यह व्रत टरत ना टारे" भक्त त्या चित्रामध्ये गुरुच प्रत्यक्ष आहेत असे मानून त्याची पूजा करतात. म्हणून ते चित्र नव्हे ती वस्तूच आहे आणि वस्तू भक्ताधीन असल्यामुळे असे वाक्य स्वामींच्या मुखातून आले.

अश्विनामध्ये वामनरावांनी निघण्याचा विषय काढला तेंव्हा स्वामीमहाराज म्हणाले, "राहा इथंच, आईला बोलावून घे." पण वामनरावांना वाटले "आई कशी येणार ?" लांबचा प्रवास, काही माहित नाही, कुणाच्या सोबती शिवाय कसं जमायचं ? पुन: पैशाचा प्रश्न होताच. प्रारब्धात नव्हतं म्हणून असा विचार आला. वामनराव म्हणाले. जेवढं प्रारब्धात आले तेवढेच घडायचे.

पुढे वामनराव निघून आले. वाडी-कोल्हापूर मध्ये २/३ महिने काढून नंतर कुडुत्रीला गेले. तेथे असताना आषाढात केसरीमध्ये अचानक बातमी आल्याने समजले की "श्रीसद्गुरु प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांचे नर्मदातीरी गरुडेश्वर येथे महाप्रयाण". (२३-६-१९१४ रात्री ११ वाजता) वामनरावांच्या, त्यांच्या मातोश्रींच्या, भगिनी गोदावरीच्या आणि शंकरशास्त्रींच्या हृदयावर वज्राघातच झाला. अंतर फार लांबचे असल्याने जाणेही शक्य नव्हते. जाऊन अंत्यदर्शन होणे शक्य नव्हते. गुरू स्मरण करीत तिथंच राहणं भाग होतं. ही

## वामनराव आणि ज्येष्ठ श्रेष्ठ गुरुबंधू

भगवान आणि भगवद्भक्त या दोघांची चरित्रें मनाची शुद्धी व शांती यांना सारखीच उपयुक्त आहेत. 'यावज्जीवं त्रय: सेव्यां: वेदान्तो गुरुरीश्वर:' ही भूमिकाच खऱ्या सेवकाची शेवटपर्यंत असते. कारण 'वासुदेव: सर्वम् सकल मिदमहंच' ही वृत्ती त्या महात्म्यांची असते. असे असूनही 'पायीची वहाण पायीच बरी' याच वृत्तीचा परिपोष व्यवहात त्यांचेकडून होत राहातो. अशी वस्तुस्थिती आहे. म्हणून वामनराव आणि काही ज्येष्ठ श्रेष्ठ असे त्यांचे गुरूबंधू यांचे उल्लेख वामनरावाच्या मुखातून अनेकदा ऐकावयास मिळत. या जीवनगंगेत याही तप:पूत महात्म्यांचा कृतज्ञतापूर्वक चरित्र नायकाशी आलेला ऋणानुबंध व स्मरण येथे थोडक्यात पाहू—

### १–प. प. श्रीमन्नृसिंहसरस्वती दीक्षितमहाराज

जन्म चैत्र शु. १-इ. स. १८६६ वामनरावांच्या थोरल्या बंधूंच्या वयाचे-श्रीसद्गुरुवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांचे अनन्य निष्ठभक्त, यांनी सन्यासही आपल्या गुरुंकडून घेतलेला. गुरुमहाराज यांना नेहमी वाडीस राहण्यास सांगत आपण लिहिलेले सर्व दत्तवाङ्मय यांचेकडे पाठवीत. गुरुसेवेचा सर्वोत्तम आदेश

म्हणजे श्रीदीक्षितस्वामी महाराज. यांचे संबंधी वामनराव सांगतात–"वाडीमध्ये स्वारीची पूजा करतांना मी दीक्षितस्वामींना पाहिलं आहे. स्वारीची रात्रीची पूजा साक्षात देव आहेत असे समजून ते करीत असत.

गरुडेश्वरला श्रीसद्गुरुस्वामीमहाराजांची प्रकृती ठीक नसल्याचे वृत्त वाडीला श्रीदीक्षितस्वामींना समजले. तेंव्हापासून महिनाभर श्रीदीक्षितस्वामी गुरु पादुकांवर औषधोपचार करीत होते. स्वतः सहाणेवर मात्रा उगाळत ते मधातून पादुकांवर घालीत. काढा करून पादुकांवर घालीत. गुरुमहाराजांना बरे वाटावे म्हणून प्रार्थना करीत. त्यांची त्यावेळी व्याकूळ स्थिती होत असे. नैवेद्य सुद्धां गुरुमहाराजांच्या पथ्याचा दाखवीत असत. नैवेद्यात ताकाची वाटी ठेवीत. निर्गुण ब्रह्माचा अनुभव घेतलेले असूनही सगुणउपासनेतही त्यांची पराकाष्ठा या भावभक्तीतून दिसत असे. औरवाडचे एक स्वामीभक्त हे सर्व पाहात होते. ते गरुडेश्वरला स्वामींच्या दर्शनास गेले. तेथे त्यांनी स्वामींना सांगितले "श्रीदीक्षित-स्वामी गेल्या महिनाभर अगदी व्याकूळ झाले आहेत. रोज पादुकांवर औषधादि समर्पण करतात. इ." हे ऐकल्यावर श्रीसद्‌रुगुस्वामींचेही हृदय भरून आले. ते म्हणाले "त्यांच्यामुळेच माझा काळ एक महिन्यांनी पुढे ढकलला गेला आहे. होणारं अटळ आहे. तरी आता औषधे बंद करावीत म्हणून माझा निरोप सांगा."

हा निरोप त्या स्वामी भक्ताने परत आल्यावर सांगितला. ही सुद्धा गुरु आज्ञा म्हणून दीक्षितस्वामींनी पाळली. पण त्या वेळेपासून ते उदास नी गंभीर झाले.

राजूरला (गोदावरीकाठी) गुरुमहाराजांचा मुक्काम होता. तेथे सीताराम-महाराजांचा यज्ञ होता. त्यासाठी ते आलेले होते. आचार्य दाजीमहाराज टाकळीकर होते. शंकरकाका आजेगांवकर पण तेथे होते. गुरुमहाराज जिथं जातील तिथं माणसांची गर्दी ठरलेली. पैशाचा तर पाऊस पडायचा. घमेलीच्या घमेली भरून पैसे पोत्यात टाकीत होते. मोजण्याची मर्यादा केंव्हांच ओलांडली होती. साऱ्या ऐश्वर्य समृद्धींनी या यज्ञात गर्दी केली होती. हे चित्ताकर्षक दृश्य पाहायला दीक्षित-स्वामी नव्हते. गुरुमहाराजांची त्यांना आज्ञा होती की वाडीतच राहायचं.

पण काही भक्त मंडळींना दीक्षितस्वामींनी हे ऐश्वर्य पहावे असे वाटत होते. म्हणून त्यांना माहित होतं तरी परस्पर दीक्षितस्वामींना गुरुमहाराजांनी बोलावलं आहे म्हणून खोटं पत्र पाठविले. दीक्षितस्वामींना खोट्या पत्राची कल्पना आली नाही. ते राजूरला निघाले. दिक्षितस्वामी राजूरपासून १०/१२ मैलावर आले

आहेत हे भक्तमंडळींना समजताच ती मंडळी गुरुमहाराजांकडे जाऊन म्हणाली "दीक्षितस्वामी येत आहेत." तेव्हा गुरुमहाराज म्हणाले "तो यायचा नाही."

दीक्षितस्वामी राजूरला आले नि महाराजांच्या दर्शनास गेले. तर, त्यांना पहाताच गुरुमहाराजांनी खाली पाहिलं. तो क्षण आयुष्यभर दीक्षितस्वामींच्या अन्तःकरणाला लागून राहिला. आपण गुरुंच अन्तःकरण दुखावलं. ही आठवण त्यांच्या तोंडून मी ऐकली आहे. हे सांगतांना त्यांची झालेली अन्तःकरणाची कासाविस मी पाहिली आहे. मुद्दाम किंवा चुकूनसुद्धां असे न घडणारे घडले होते. दुसऱ्याच्या पत्रावर विश्वास ठेवून हे वर्तन घडले असले तरी स्वामींचा शब्द पाळला नाही याची ती हुरहूर होती. अशी श्रद्धा त्यांची गुरूंवर होती. ते कधीही गुरुमहाराजांच्या पुढे हात जोडून उभे असत. इतकी मर्यादा आयुष्यभर सांभाळली. या पत्र प्रसंगात सीतारामहाराज गुरु-महाराजांपुढे हात जोडून गेले व क्षमा मागून म्हणाले "मीच पत्र पाठवून बोलावून घेतले. चूक माझी झाली. दीक्षितस्वामींची नाही. क्षमा असावी" गुरु-महाराज सुद्धा याबद्दल काही बोलले नाहीत. ४-८ दिवस यज्ञसमाप्तीनंतरही दीक्षितस्वामी, गुरुमहाराजांच्या इच्छेने राहिले. पण दीक्षितस्वामींना पाहाताच गुरुमहाराजांनी खाली पाह्यलं ही घटनाच अन्तःकरणाला वेदना देऊन गेली. शिष्यानं गुरूंच अन्तःकरण ओळखलं.

दीक्षितस्वामी म्हणजे भव्य पुरुष. वयाच्या ६० ला सुद्धा चेहऱ्यावर सुरकुती नव्हती. कधी थकलेले नसायचे. नेहमी आनंदी. त्यांचा भागवताचा एकादश स्कंद मी ऐकला आहे. वाडीच्या अनुष्ठानात दीक्षितस्वामींनी मला संकल्प सांगितला आहे. हुशंगाबादेला खर्रा घाटावर सीतारामहाराजांनी आश्रम बांधला. तेथे माझी व दीक्षितस्वामींची भेट झाली आहे.

श्रीदत्तात्रेयांचा सिद्धासनातील जो फोटो आहे त्याचे पहिले चित्र मी दीक्षितस्वामींच्या सांगण्यावरून काढले. ते पहिले चित्र दीक्षितस्वामींनी पूजेत ठेवले होते. त्याचे नंतर फोटो निघाले. त्या फोटोवरून तर औखाडच्या आश्रमातील श्रीदत्तात्रेयांची सिद्धासनातील मूर्ति काळ्या दगडात कोरून तयार केली आहे. ते मूळचे चित्र नंतर कोल्हापूरच्या कडेकरांकडे गेले. याचे लहान मोठे फोटो स्वतः दीक्षितस्वामींनी अनेकांना प्रसाद म्हणून वाटले आहेत.

दीक्षितस्वामींच्या आज्ञेवरून श्रीदत्तात्रेय षोडष अवतारांपैकी, सिद्धराज,

अभिवरद, कालाग्निशमन, मायामुक्त अवधूत, आदिगुरू ही सहा चित्रे आणि श्रीलक्ष्मीनृसिंहाचे चित्र अशी सात चित्रे तायर करून दिली.

दीक्षितस्वामींनी औरवाड उर्फ अमरापूर येथे 'श्रीवासुदेवानंद सरस्वती पीठ' नावांची एक संस्था स्थापन केली. त्या संस्थेच्या विश्वस्तांमध्ये पं. श्री दत्तमहाराज कवीश्वर, श्री. भिर्डीकर, श्री. कडेकर, श्री. गणपतराव सातारकर, श्री. अण्णासाहेब कुलकर्णी आदींची सेवा रुजू आहे. 'गुरुशिष्य पंचायतन' हे फोटो. चित्रही वामनरावांनी रंगीत छापून प्रसिद्ध केले.

श्री. दीक्षितस्वामींचे महानिर्वाण आयोध्या येथे अश्विन व॥ ७ इ. स. १९२७ मध्ये झाले.

**२- प. प. श्रीयोगानंद उर्फ गांडाबुवा-**

गुजराथमध्ये सुरत जिल्ह्यात, सचीन तालुक्यातील तलंगपूर हे जन्मस्थान. दत्तजयंती मार्गशीर्ष शु. १५ इ. स. १८६८ मध्ये जन्म. वामनरावांच्याहून १८ वर्षांनी मोठे. स्वभावतःच विरक्त वृत्ती होती. विवाह झाला होता. नोकरी व्यवसायाचा प्रयत्न केला. पण त्यात रमले नाहीत. गुरूंच्या शोधार्थ फार फिरले. नर्मदाप्रदक्षिणाही केली. सिनोरला सद्गुरू वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांची भेट झाली. आई-वडील, पत्नी, भाऊ बहिणी या कुंटुबीय मंडळींना गांडाबुवांचा पत्ता लागला. सर्वांना बरे वाटले. सिनोरहून गांडाबुवा पडछाये प्रमाणे आपल्या सद्गुरूंबरोबर होते, उत्तम योगाभ्यासी होते, खेचरी मुद्रा लावीत असत. आयुर्वेदीय औषधांची, झाडपाल्याची माहिती खूप होती सद्गुरू वासुदेवानंद-सरस्वतीस्वामींच्या बरोबर भरपूर पायी प्रवास केला. वामनरावांचा व यांचा संबंध अनेक वेळा आला. दोघांना परस्परांबद्दल प्रेम व आदर होता. पवनीचा चातुर्मास, पिंपरीऔंढ्या नागनाथाच्या प्रवासात, गरुडेश्वरी भेटी झाल्या. एकदा वामनराव व शंकरशास्त्री गरुडेश्वरला गेले होते. तेथून परत येताना भडोचला नर्मदातिरावर गांडाबुवांच्या आश्रमात थांबून त्यांची भेट घेऊन आले. श्रीयोगानंदस्वामी ऊर्फ गांडामहाराज यांनी १३६ अध्यायांचे 'श्रीगुरुमूर्ति चरित्र' म्हणून श्रीवासुदेवानंद-सरस्वतीस्वामीमहाराजांचे उत्तम चरित्र लिहिले आहे.

यांची समाधी क्षेत्र गुंज, जि. परभणी (मराठवाडा) येथे आहे. फाल्गुन व॥ १२ शके १८५० इ. स. १९२८ हा निर्वाण दिन.

**श्री. सीताराममहाराज टेंब्ये-**

यांचा जन्म इ. स. १८५७ चा आहे. हे श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामी-

महाराजांचे पूर्वाश्रमीचे बंधू. पुढे हे स्वामींचे शिष्य होऊन त्यांचेबरोबर पायी प्रवास केला. सीताराममहाराजांचा आणि वामनरावांचा सहवास गुरुमहाराजांच्या भेटीच्यावेळी होत असे. तसेच सीताराममहाराज आजेगावला शंकरकाकांचेकडे ही येऊन गेले. पवनीच्या चातुर्मासात परिचय वाढला. पुढे वाडीलाही भेट झाली. यांचा आचार कडक असे, योगाभ्यासी होते. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामी-महाराजांची अंतर्ज्ञातदृष्टी दाखविणारा सीताराममहाराजांच्या संदर्भातील प्रसंग—

## स्वामी अंतर्ज्ञानी होते

श्रीटेंबेस्वामीमहाराजांच्या मातोश्री वारल्या. ते त्यांना अंतर्ज्ञानाने समजले होते. परंतु लोकव्यवहाराच्या दृष्टीने ते गप्प राहिले. पुढे थोड्याच दिवसात त्यांचे पूर्वाश्रमीचे बंधू सीतारामबुवा स्वामींच्या भेटीस आले. स्वामींचे प्रवचन चालू होते. म्हणून सीताराममहाराज दूर पारावर बसून राहिले. हे स्वामींनी पाहिले. लोकांना हे त्यांचे बंधू वगैरे काही माहीत नव्हते. स्वामींनी शिष्य मंडळींना सांगितले "तो ब्रह्मचारी पारावर बसला आहे त्याला विचारा, तुझी आई आहे काय ?" मंडळींनी तिकडे जाऊन विचारून 'नाही' असा निरोप आणला. तेव्ह स्वामी गुपचूप जाऊन स्नान करून आले. संन्याशाने माता गेल्यावर स्नान करावे अशी शास्त्राज्ञा आहे. इतरांचे वेळीं स्नान वगैरे काही करावयाचे नाही. तेव्हा मंडळींना सर्व उलगडा झाला.

श्रीसीताराममहाराजांचे चरित्रही एक दिव्य चरित्र आहे. श्रीसंत निळोबा-रायांना संत तुकाराम महाराजांचे जसे सदेह दर्शन झाले तशीच घटना सीताराम-महाराजांच्याही जीवनात घडली आहे.

राजूरच्या यज्ञात श्रीवासुदेवनंदसरस्वतीस्वामीमहाराज सीतारामपंतांना म्हणाले होते "तुला मी पुनः भेट देऊन तुझी इच्छा पुरवीन" आणि त्यानंतर गरुडेश्वरहून त्यांना पत्र आले की, 'आषाढ शु॥ प्रतिपदेला गरुडेश्वरी श्रीवासुदेवानंदसरस्वतीसद्गुरुमहाराज समाधिस्थ झाले" ते पत्र हाच सीताराम-महाराजांचेवर वज्राघात झाला. नेत्रातून दुःखाश्रूंचे पूर वाहिले. पराकाष्ठेचे दुःख होत असतानाच गंगेवर जाऊन स्नान करून आले. त्यांच्या मुखातून शब्दही निघेना, त्यांनी राजूर सोडले, रामटेकला आले. तेथून बारलिंग क्षेत्री आले. येथे तापी नदीकाठच्या जंगलात फिरत राहिले. ते सद्गुरूंचे चरित्र आठवू लागले. "गुरुरायाने माझे पोटच्या पोराप्रमाणे सर्व अभिष्ट केले. माझे हट्ट पुरविले. कौतुक केले. मला ऋद्धिसिद्धी दिल्या. माझ्याकडून सेवा सुद्धा करून घेतली नाही.

उपदेशामृताचा वर्षाव केला. मला आनंदात निमग्न केले. त्यांचा मी उतराई कसा होऊ ? या उपकाराची फेड कशानेही होणार नाही. राजुरात मला म्हणाले होते "पुन: दर्शन देईन" पण आता तेही शक्य नाही. माझा अधिकार नाही म्हणून का मला दु:ख समुद्रात लोटून दिले." असा एकसारखा शोक करीत ते हिंडत होते. बरोबर कोणी नाही. जेवण-झोपेचे स्मरण देखील नाही. सारखे वासुदेव ! वासुदेव ! म्हणून टाहो फोडू लागले. त्या स्थितीत त्यांना मूर्च्छा आली.

तेव्हां स्वत: श्रीवासुदेवानंसरस्वतीस्वामीमहाराज सदेह तेथे आले आणि सीतारामाच्या शरीरावरून हात फिरवीत म्हणाले "सीतारामा ! ऊठ मी आलो आहे. माझ्याकडे डोळे उघडून पहा." या वाक्याने आणि स्पर्शाने सीताराम-महाराजांनी डोळे उघडून पाहिले. सीतारामाचा डोळ्यावरही विश्वास बसत नाही असे गुरुमहाराजांच्या ध्यानात येताच त्यांनी सीतारामाला कडकडून मिठी मारली व म्हणाले "आता शुद्धीवर आहेस ना ?" यावेळी झालेला दोघांचा परमानंद कोण वर्णन करू शकेल ? अशा अधिकाराचे सीताराममहाराज होते.

पुढे चारच वर्षांनी इ. १९१८ च्या फाल्गुन शु० अष्टमीला श्रीक्षेत्र बढनेरी, जि० अमरावती येथे सीताराममहाराजांचे निर्वाण झाले.

**श्रीगोविंदमहाराज पंडित-**

हे सिप्रीचे राहणारे. मोठे योगाभ्यासी शिष्य. पवनीला चातुर्मासात हे गुरुमहाराजांच्या सानिध्यात होते. तेथे त्यांचा नि वामनरावांचा प्रथम परिचय झाला' पुढे गरुडेश्वरला दोघांची भेट झाली. त्यानंतर कोल्हापूरच्या दिवाणांकडे गोविंद-महाराज आल्याचे समजले. तेव्हां तेथे त्यांना भेटायला वामनराव गेले होते. होशंगाबादला तर वामनराव गोविंदमहाराज यांचेकडे प्राणायामाच्या अभ्यासा-साठीच गेले होते. त्यानंतर गोविंदमहाराज हे मंडळींसह पुण्यास आले होते तेव्हांची भेट शेवटची. गोविंदमहाराज हे हठयोगाभिमानी होते.

शक्तिपात संप्रदायातील श्रीयोगानंदमहाराज हे ऋषिकेशचे राहणारे. इ. स. १९१३ मध्ये ते गुरु शोधत शोधत गरुडेश्वरला प. प. श्रीवासुदेवानंद-सरस्वतीस्वामीमहाराजांकडे आले होते. तेव्हा स्वामी त्यांना म्हणाले होते की, दोन महिने येथे राहिलात तर काम होईल. पण श्रीयोगानंद थांबले नाहीत. ते तेथून बंगालमध्ये मदारीपूरला प. प. श्रीनारायणतीर्थस्वामीमहाराज, या शक्तिपात संप्रदायाचे प्रवर्तक यांचेकडे गेले. तेथे त्यांना शक्तिपात दीक्षा मिळाली व त्यांचे काम झाले. या योगानंदांचा पुढे वामनरावांशी संबंध व परिचय वाढला. पत्र-

व्यवहारही झाला. त्यापैकी एका पत्रात श्रीयोगानंदमहाराजांनी इ. स. १९१३ ला आपण गरुडेश्वरला आल्याचे लिहून झालेले बोलणेही कळविले आणि स्वतः प्रत्यक्ष पाहिलेला एक आश्चर्यकारक अनुभवही त्या पत्रात लिहीला. तो असा "श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांकडे लोकांची गर्दी फार असे. ते नमस्कार करणाऱ्या प्रत्येकाला आपल्याजवळच्या कमंडलूमधील तीर्थ देत होते. अक्षरशः हजारो लोकांना त्यांनी तीर्थ दिले असेल. सकाळपासून हे चालू असायचे. या काळात ते जागेवरून उठले नाहीत की कमंडलू पुनः तीर्थाने भरून आणला नाही. पण त्या कमंडलूमधील तीर्थ संपत नव्हते. मी हे जवळ बसून पहात होतो."

वामनरावांच्या जीवनातही श्रीसद्गुरूस्वामीमहाराजांचा लौकिक अस्तित्व दृष्टीआड झाल्याने जीवनाची अंतर्मुखता प्रखर झाली. लौकिक व्यवहार सुद्धा या प्रखर अंतर्मुखतेच्या दृष्टीने होऊ लागले.

**इ. स. १९१३ ते १९१७ - कोल्हापुरातील कालक्रमण**

वामनरावांचा आणि कोल्हापूरचा संबंध इ. स. १९०० पासून आला. प्रथम विद्यार्थी म्हणून, नतंर थोडा काळ नोकरी म्हणून, परंतु कुडुत्री ते वाडी यामध्येच कोल्हापूर आल्यामुळे वामनरावांना कोल्हापूर कधी टाळता आलेच नाही. कोल्हापूर म्हणजे 'गेट वे ऑफ वाडी' होतं. जीवा शिवाची भेट शक्तीच्या महाद्वारातून होत असते याचे हे प्रात्यक्षिक होते. कुडुत्रीचा जीव, म्हणजे ज्या जीवाने त्रयी ओलांडली असा जीव, महालक्ष्मीच्या महाद्वारातूनच 'गुरुसाक्षात् परब्रह्म' ची अनुभूती नरसिंहवाटिकेत घेत होता.

कोल्हापूरानं वामनरावांची कला आणि विद्या वाढविली. आणि थोडा लक्ष्मीचाही खेळ इथं दृष्टीस पडला. इथं सरस्वतीचं जमलं होत पण लक्ष्मीच नाही. लक्ष्मी म्हणाली 'मी तुझ्यावर प्रसन्न झाले पण तुझ्या कार्यात अडथळे येतील. तुझे कार्य सुरू झाले की तुला काही कमी पडू देणार नाही.' वामनरावांचे उत्तर होते की 'तू आई आहेस. माझे हित-अहित तुला समजते. मी काही मागत नाही. तुला हवे तसे कर. तू माझ्या हिताचेच करणार आहेस.' कोल्हापुरातील आठवणी आणि माहिती वामनरावांनी खूप खूप सांगितली आहे. ती आपण त्यांच्याच शब्दात वाचू —

१) कोल्हापूरात नारायणस्वामींचं देऊळ होते. देवीच्या देवळात. देवीचे कारंजे होते ना तिथपर्यंत—अगदी कडेपर्यंत होते. मोठे उत्सव होत होते तिथे. त्यांची पूजा आमच्या कुटुंबियांपैकी कोणीतरी तिथं करायला असायचे. थोरले

बंधू शंकरशास्त्री तिथं पूजेला राहिले होते. नरहरीतात्या तिथं पूजेला राहिले होते. कोल्हापुरात मी होतो तेव्हां मी ही पूजा करीत होतो. दर्शनाला तर रोज. जात होतो अंबाबाईचे दर्शन आणि नारायणस्वामींचे दर्शन घेऊन थोडे हिंडून फिरून घरी येत असे. आता ती जागा गव्हर्मेंटने काही शिल्लक ठेवली नाही. नाही देवाची इच्छा. आमच्यापैकीही तिथं कोणी राहिलं नाही.

२) आम्ही कोल्हापुरात पंगूंच्या बोळात राहात होतो. याच बोळात गोपाळराव नागावकर रहात होते. यालाही चित्रकलेची आवड होती. वर्गमित्रच आम्ही. पंडितराव गडहिंग्लजकरांचे ते मामा. पंडितरावांचे वडील वामनराव स्नेही होते आमचे. गोविंदराव गोखले हे आमचे व्यायामप्रेमी स्नेही. हे गोखले म्हणजे मिरजेच्या रानडे वकीलांचे जावई. मिरजेचा केशव हा गोविंदरावांचा मुलगा. या गोविंदरावांच्या मुळे तर मिरजेच्या डॉक्टर प्राणींचा स्नेह निर्माण झाला.

३) कोल्हापुरात या काळात आमची फोटोग्राफी चालत असे. दिवसा फोटो घ्यायचे आणि रात्रीच्या निसर्गदत्त डार्करूममध्ये त्या निगेटिव्हज् करून फोटो तयार करायचे. स्टुडिओ कशाला लागतोय ? कोल्हापुरातच एकाकडून १५०/– रु. ला कॅमेरा मिळाला होता. त्यावेळी फक्त दोन प्रकारचे फोटो असायचे, एक कार्डसाईजचा, हा फोटो १ रु. ला विकायचो आणि दुसरा फुल साईजचा हा ४ रु. ला विकायचो. फायदा फार होता फोटोग्राफीत. पूर्वी ४ रु. मध्ये १ रु. खर्च आणि ३ रु. फायदा असायचा. डेव्हलपिंग, प्रिंटींग सगळं त्यानेच तर शिकवलं.

गोभक्त चौंडेमहाराजांची या काळात इथं भेट झाली. आमची फोटोग्राफी त्यांना फार आवडली होती. १०० प्रतींची मागणी केली होती त्यांनी. दिल्या शंभर प्रती काढून. दीक्षितस्वामींनी सुद्धा दत्ताची चित्रे आणि फोटो खूप घेतले आपल्याकडून. पेंटींगची कामेही करीत होतो. नाटकाचे बॅकग्राऊंड सीनचे पडदे काढून दिले.

सांगलीचे ड्रॉईंग मास्तर श्री. विनायकराव लिमये यांचे कोल्हापूरला पुस्तक विक्रीचे दुकान होते. तेथे त्यांनी दीडशे रुपयांना एक कॅमेरा दिला. सर्व माहिती सुद्धा त्यांनीच दिली आणि मग फोटोग्राफीच्या कामाला सुरवात केली. कामही पुष्कळ मिळू लागले. कोल्हापूरापासून १० ते १२ मैलावर 'कोगनुळी' या गावी घोपाटे नावाचे एक स्नेही रहात होते. त्यांच्याकडे फोटोग्राफीसाठी एक महिनाभर जाऊन राहिलो होतो.

कुडुत्रीपासून तीन मैलावर राधानगरी प्राजेक्टचे काम चालू होते. त्या

कामाच्या पहाणीला एकदा शाहुमहाराज आणि लॉर्ड विलिंग्डन गव्हर्नर यायचे होते. प्रॉजेक्टच्या इंजिनिअरने आम्हाला तिथं फोटो काढायला बोलावलं. शाहूमहाराज आणि गव्हर्नर यांचा फोटो काढला. गव्हर्नरांना तो फोटो खूप आवडला होता. तो फोटो प्रसिद्धही झाला होता.

४) कोल्हापुरात पहाटे व्यायामासाठी जात होतो. बरोबर गोविंदराव गोखले, गोपाळराव नागावकर, गोपाळराव पळसुले ही स्नेही मंडळी असायची. डबलबार, सिंगलबार, जोर, बैठका, आसने इ. चालायचे.

५) या व्यायामप्रेमी स्नेह्यांची ओढ हठयोगाकडे होती. पलुसचे श्रीधोंडीबाबामहाराज म्हणून मोठे योगाभ्यासी होते. गोपाळराव पळसुले आणि धोंडीबाबा यांचा संबंध अधिक होता. पळसुले यांची भावजय धोंडिबाबाची शिष्या होती. आमच्या गोदावरीला इथे कोल्हापुरातच हठयोगाचे धडे दिले व तिचा अभ्यासही झाला. गोदावरी पहाटे उठून आसने आणि प्राणायाम करीत होती.

६) गोपाळराव नागावकरांच्यामुळे वामनराव गडहिंग्लजकरांना पुढे बार्शीला बोलावून घेऊन स्वामीश्रीलोकनाथतीर्थमहाराजांकडून दीक्षा होण्याचा योग आला. पुढे स्वामी कोल्हापुराला वामनरावांकडे आले होते.

७) सातारा जिल्ह्यात विटे गावी गोपाळराव नागावकरांचा मळा होता. त्या मळ्यातही बरेच वेळा बरेच दिवस रहाण्यासाठी जात होतो. तिथं इकडच्या भागातलीही स्नेही मंडळी एकत्र येत. सर्व सारख्या आवडीचे होतो. वेळ सत्कारणी लागायचा, व्यायाम–आसने–प्राणायाम, पारमार्थिक गोष्टी, गुरुचरित्राची पारायणे निसर्गात हिंडून येणे असा दिवस भरगच्च कार्यक्रमाचा असायचा.

८) इ. स. १९१६ मध्ये प्लेग सुरू झाला. कोल्हापूर शहरात सर्वत्र हाहाकार उडाला. गाव बाहेर पडले. लोक शेतातून, माळावरून झोपड्या-तंबूराहुट्या बांधून राहू लागले. त्यावेळी आम्ही टेंबलाईच्या माळावर गेलो. झोपडी बांधली. आमची आई, गोदावरी, गोविंदराव व मी एवढे होतो. आमच्या शेजारी गोविंदराव गोखले, गोपाळराव नागावकर, वामनराव गडहिंग्जकर ही मंडळीही झोपड्या बांधून आमच्या सारखेच राहिले. आपत्तीतही आम्ही मंडळी फार जवळ आलो. आमचे सर्वांचे एकच मोठे जिवाभावाचे कुटुंब होऊन गेले. नैसर्गिक आपत्तीमुळे आम्ही सर्वजण आयुष्याचे स्नेही झालो. निसर्गाने न बोलता केवळ कृतीने माणुसकीचे धडे शिकविले. आम्ही जिथं जाऊ तिथं आमची स्नान-संध्या-जपजाप्य-पोथीवाचन हे नित्याचे नियमित व्हायचेच.

**शाहूमहाराजांच्या आठवणी-**

१) शाहूमहाराज फार आस्तिक होते. त्यांची वाडीतील दत्तस्थानावर गाढ श्रद्धा होती. वरून ते जसे दाखवीत तसे ते आतून नव्हते. मी प्रत्यक्ष पाहिलेली घटना आहे. इथं ते वाडीला आल्यावर सगळ्या कपड्यानिशी अगदी शिरपेंच वगैरे सुद्धा नदीत बुडी मारीत आणि तस्स ओलेत्याने येऊन देवाला साष्टांग दंडवत नमस्कार घालायचे.

२) शाहूमहाराजांचे चुलते राजाराममहाराज इटलीत वारले. ते त्यांच्या मनाला फार लागले. त्यांना त्यांच्या संस्कारासाठी विलायतेत जायचे होते. मृतात्म्याला चांगली गती मिळावी म्हणून त्यांना ब्राह्मणांकडून काही अनुष्ठान विचारुन करून घ्यायचे होते.

त्या काळात ब्राह्मणांविरुद्ध चळवळ सुरु झालेली होती. धार्मिक कार्याला ब्राह्मण दलाल कशाला हवेत ? आम्ही शिकून आमची धार्मिक कामे करू शकतो. या विचारांनी कोल्हापूरात ब्राह्मणेतरांसाठी वेदपाठशाळा सुरू झाली. त्या वेद-पाठशाळेत मुलांना शिकवायला पं. श्री. दा. सातवळेकर जात होते. चांगली ८/१० वर्षे जात होते. पुढे पंडितजींच्या असे अनुभवास आले की, ब्राह्मणाची वाणी आणि निःस्पृहता प्रयत्न करून दुसऱ्यात आणणे सोपे नाही. पढ्यानपिढ्यांचे संस्कार झालेले आहेत ना ! पाठांतराला लागणारी चिकाटी दुसऱ्या मुलात आढळली नाही. ८।१० वर्षात एकही विद्यार्थी तयार होऊ शकला नाही. पंडितजींना आपण शिकविल्याचा उपयोग नाही हे कळून चुकले. आपणच अशा प्रयोगाने वेदविद्येला वैगुण्य आणतो. या विचारांनी पंडितजींनी पाठशाळेचे काम सोडून दिले.

पंडितजी सातवळेकरांनी प्रयत्न पुष्कळ प्रकारचे केले. आर्य समाजात गेले, थिऑसॉफीत गेले, ब्राह्मणेतरांना वेद शिकविण्याचा प्रयत्न केला. तळमळ होती. प्रामाणिक होते. पटलं नाही की सोडायला तयार होते. सर्वांची खात्री करून मग आपल्याकडे आले व शेवटपर्यंत टिकले. अगदी १०० व्या वर्षी आपल्याकडे येऊन कृतज्ञतेचे उद्‌गार काढले. एवढ्या मोठ्या माणसांनी म्हटले यातच सगळे आले.

राजाराममहाराजांकरता काही धार्मिक अनुष्ठान करण्याची शाहूमहाराजांची इच्छा होती. पण आपल्या वेदपाठशाळेतल्या लोकांकडून काही अनुष्ठान करून घ्यावे असे त्यांना वाटत नव्हते. त्या वेदपाठशाळेत खरे 'वैदिक' तयार होऊ शकत नाहीत याचा त्यांनाही अनुभव आला होता. तरी

कोल्हापूर सरकारने अशी वेगळी पाठशाळा चालविली असल्याने खऱ्या वैदिक ब्राह्मणांची उपेक्षा आणि अवमान झाला होता. परपंरेने संस्थानचा दरबारी धर्माधिकारी ब्राह्मण होता. पण या नव्या धोरणाने त्याचेकडे दुर्लक्ष झाले होते. त्याचा मासिक पगार दिला जाई पण धार्मिक कामात त्याला बोलावले जात नसे. त्यामुळे दरबारी धर्माधिकारी कधी दरबारात किंवा राजाकडे फिरकला नाही.

शाहूमहाराजांना खऱ्या वैदिक ब्राह्मणाकडून अनुष्ठान करून घ्यावयाचे होते, म्हणून त्यांनी धर्माधिकाऱ्याला बोलावणं पाठवलं. "आपण या नाहीतर मी आपल्याकडे येतो. "धर्माधिकारी त्या सेवकाला म्हणाला, "सरकारांना कशाला त्रास ? आजवर त्यांचं अन्न खाल्लंयं – – आलोच म्हणून सांग" असा निरोप दिला व धर्माधिकारी शाहूमहाराजांकडे आले.

शाहूमहाराजांनी सांगितलं असं असं झालंय. "आम्ही तिकडे विलायतेत जात आहोत. इकडे त्यांच्यासाठी, काही दोषपरिहारासाठी, तुमच्याकडून काही अनुष्ठान व्हावं म्हणून बोलावलं आहे." तेव्हां धर्माधिकारी म्हणाले, "तुमच्या सरकारी वेद पाठशाळेतील वेदोक्त करणारे आहेत ना, त्यांना सांगा की!" यावर शाहूमहाराज म्हणाले "मला काय माहित नाही की ते काय आहेत तें! मग आपल्याला कशाला बोलावलं असतं! धर्माधिकाऱ्याला शाहूमहाराजांचे स्वच्छ अंतःकरण दिसले. म्हणाले, "ठीक आहे." धर्माधिकाऱ्याने सप्तशतीचे पाठ करावेत म्हणून सल्ला दिला. शाहूमहाराजांनी कात्यायिनीच्या देवळात ब्राह्मणांचं सप्तशतीचं अनुष्ठान बसवलं. त्या ब्राह्मणांची सर्व सोय केली. त्यांची दक्षिणा-वस्त्रांदिनी उत्तम संभावना केली. त्यांना रोज इच्छा भोजन दिलं. त्या अनुष्ठान करणाऱ्या ब्राह्मणामध्ये माझे बंधू शंकरशास्त्री होते. म्हणून ही आतली बातमी व माहिती मला समजली. वर्णव्यवस्था ही धर्माची कायमची व्यवस्था आहे. ज्याने त्याने आपापले धर्म नीट सांभाळले तर सामाजिक घोटाळे होणार नाहीत. प्रत्येकाने म्हणजे ब्राह्मणांनी सुद्धा आपापल्या चुकीची दुरुस्ती केली तर बिघडलेली परिस्थिती सुधारणार, समाजाचा एकोपा राहाणार. शाहूमहाराजांची धार्मिक आस्था आणि श्रद्धा फार महत्त्वाची आहे. तिथं त्यांच खर अन्तःकरण आहे.

३) शाहूमहाराजांचे अशा आस्था–श्रद्धेचे आणखी एक उदाहरण पहा– कोल्हापुरात अस्पृश्यता निवारण चळवळ सुरु झाली. चळवळवाले एकदा शाहूमहाराजांकडे आले व म्हणाले "उद्या आम्ही देवीच्या हौदाला (जिथं कारंज होतं तिथं) शिवणार! शाहूमहाराज म्हणाले "शिवा!" नंतर शाहूमहाराजांनी

आपला खास विश्वासातला फौजदार बोलावला. त्याला खाजगीत सांगितलं "बाळ्या ! उद्या कोण हौदाला शिवायला येतील त्यांना बेशक बेड्या ठोक !"

दुसऱ्या दिवशी हे चळवळवाले आले अगदी आरोळ्या देत—घोषणा देत आले. तिथं तो फौजदार आपली पोलीस पार्टी बेड्या घेऊन उभा होता. त्यानं चळवळवाल्यांना दरडावलं "महाराज वगैरे मला माहित नाही. शहर माझ्या ताब्यात आहे. कोणीही पुढं आलं तर बेड्या ठोकीन !" झालं चळवळवाले चरकले, कुणीही पुढं आलं नाही.

शाहूमहाराजांची अंबाबाईवर श्रद्धा होती. चालत आलेला नियम मोडणं त्यांना पसंत नव्हतं. त्यांनी युक्तीने प्रश्न हाताळला. पाण्याला शिवल्याने शुद्ध भावनेला धक्का बसतो. आपल्याच धर्मातली माणसं धर्माचे नियम मोडतात. इतर धर्मियांना आपल्या धर्माचा विच्छेद आपल्याच हातून करायचा आहे. आपण ही कूट नीति ओळखून आपल्या श्रद्धेवर दृढ राहिले पाहिजे. यामध्ये तोटा इतरांचा नाही आपलाच आहे हे लक्षात आले पाहिजे. जगात कोणीही आपापली श्रद्धा सोडीत नाही अन् मग आपणच का सोडायची ?

४) लोकमान्य टिळकांना शाहूमहाराजांची आस्तिक वृत्ती माहीत होती आणि शाहूमहाराजही लोकमान्यांची उदार व निस्पृह वृत्ती ओळखून होते. ताई-महाराज खटल्याच्या वेळची गोष्ट आहे. या खटल्यात शाहुमहाराज लोकमान्यांच्या विरुद्ध बाजूचे होते. एकदा संस्थानच्या रेसिडेंटला या खटल्यातील काही महत्वाचे कागदपत्र हवे होते. पण ते लोकमान्यांच्याकडे होते. रेसिडेंटने हा विषय शाहुमहा-राजांच्या जवळ काढला. तेव्हा शाहूमहाराज म्हणाले "मी आणून देतो टिळकां-कडून. झालं संध्याकाळी कोल्हापूरहून निघाले शाहूमहाराज. मध्यरात्रीच्या सुमारास पुण्यात केसरी वाड्यावर आले. "बळवंतराव" म्हणून हाक मारली दिंडी दरवाजातून. लोकमान्यांनी विचारले कोण आहे ? अंधारातून पुढे येत शाहूमहाराज म्हणाले "मी शाहूमहाराज आलोय. "लोकमान्यांनी त्यांना आदराने आत घेतले. म्हणाले "इतक्या रात्रीचं का येणं केलं ?" शाहूमहाराजांनी सर्व काही मोकळेपणाने सांगितले. म्हणाले "ते कागद मागायला आलो आहे. ४ दिवसात तुमचे तुम्हाला परत होतील" लोकमान्यांनी तात्काळ कागद आणून त्यांच्या हवाली केले. नरसोपंत केळकर तिथं होते. ते लोकमान्यांना म्हणाले "अहो ! ते आपल्या विरुद्धचे !" त्यावर लोकमान्य म्हणाले "मला माहित आहे ते. काही होणार

नाही. शाहुमहाराजांना मी ओळखतो. सुरक्षित राहतील कागद." इतका विश्वास होता एकमेकांचा एकमेकांबद्दल.

वामनरावांचे व्यवहारातही निरीक्षण असे. या निरीक्षणामुळे व्यक्तींच्या वृत्तीचा अभ्यास होई. समाजात चांगल्या वृत्तीचे लोक आहेत म्हणून अजूनही इतक्याविरूद्ध परिस्थितीत आपली संस्कृती टिकून राहिली आहे. चांगली वृत्ती शुद्ध अंतःकरणावर अवलंबून असते. ते अन्तःकरण वाईटांच्या संगतीने लवकर अशुद्ध होते. अशुद्ध अन्तःकरणात दृष्प्रवृत्ती बळावतात आणि समाजात सर्वत्र कलह सुरू होतो. समाजाचे, देशाचे, राष्ट्राचे खरे कार्य हेच आहे की, व्यक्तींचे अन्तःकरण शुद्ध करीत रहायचे. साऱ्या संत सत्पुरूषांनी समाजाची ही नाडी ओळखली आणि हाच प्रभावी उपाय म्हणून स्वचारित्र्याने समाजामध्ये जीवन सर्वस्व वेचले. ज्ञानेश्वरमाऊली तर समाजातील ही दृष्प्रवृत्ती नाहीशी होण्यासाठी पसायदान मागते.–

**जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो ।**
**भूतां परस्परे पडो । मैत्र जीवाचे ॥**
**दुरितांचे तिमिर जावो । विश्वस्वधर्म सूर्ये पाहो ।**
**जो जे वांछील तो ते लाहो । प्राणीजात ॥**

## बार्शीत ड्रॉईंग मास्तरची नोकरी

वामनरावांची जीवनगंगा हिमालयाच्या परिसरातून वाहताना, सर्व देवतांच्या आणि सिद्धांच्या सान्निध्याने, पापविनाशी होऊन, लोकमांगल्यासाठी पृथ्वीतलावरील मानववस्तीत प्रवेश करून, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सर्वांचे कल्याण करू लागली. या गंगेच्या सान्निध्याने तृषार्त तृप्त होऊ लागले, श्रांतांना विश्रांती मिळू लागली. आर्त सुखी होऊ लागले. जिज्ञासू ज्ञानी होऊ लागले, लौकिक दृष्टीने मात्र ती नदी दिसत होती, जलप्रवाह वाटत होता.

इ. स. १९१७ साल सुरू होऊन ३/४ महिने झाले होते. वामनराव कोल्हापुरात होते. अद्याप कुठे नोकरीचे जमले नव्हते. फोटोग्राफीच्या व्यवसायामधून थोडीफार मिळकत होत होती. परंतु त्यात नियमीतपणा नव्हता. तेवढ्यात 'केसरी' वृत्तपत्रात जाहिरात आली. "बार्शीच्या शाळेत ड्रॉईंग मास्तर पाहिजे. गरजूंनी भेटावे." वामनरावांच्या वाचनात जाहिरात आली. शंकरशास्त्री तेथे कोल्हापुरातच होते. आई आणि गोदावरी पण होती.

वामनरावांनी हे वृत्त घरात सांगितले. सर्वांच्या मनात आले हवी तशी

नोकरी आली आहे. जाऊन यावे बार्शीला. शंकरशास्त्री म्हणाले "मी येतो बरोबर" शंकरशास्त्री थोरले बंधू असले तरी आज ते वडीलांप्रमाणे होते. सर्वांची इच्छा पाठीशी घेऊन बाबांच्या बरोबर वामनराव बार्शीला आले.

बार्शीला पोचले ती वेळ सकाळी ११ ची होती. कुठं जायचं, कोणाकडे जायचं, काही माहित नाही. वशिला कोणाचा नाही. ओळखीचं कोणी नाही. बार्शीत आल्यावर चौकशी करताना वैद्यमास्तरांचे नाव व पत्ता मिळाला. दोघे वैद्यमास्तरांच्या घरी गेले. वैद्यमास्तर घरी होते. शंकरशास्त्री आणि वामनराव या दोघा अपरिचित व्यक्तींना वैद्यमास्तर 'या' म्हणाले. वामराव म्हणाले, "आपली केसरी मधील जाहिरात वाचली. "मी ड्राईंगची टीचर्स ग्रेड परीक्षा झालो आहे." हे सांगताच वैद्यमास्तर म्हणाले "चला लायब्ररीत" सगळे लायब्ररीत गेले. लायब्ररीत बराच वेळ गेला.

वामनरावांचे स्नान-संध्या व्हायची होती. जेवणही व्हायचे होते पण त्यांच्या हिशेबी स्नान संध्येपेक्षा जेवण गौण होते. वैद्यमास्तरांच्या घरी गेले पण हा विषय निघालाच नाही. वैद्य मास्तरांच्या लक्षातच आले नाही आणि वामनरावांनी हा विषय काढला नाही. वैद्य मास्तरांची बहीण होती. घरात एक मुलगा पण होता. लायब्ररीत जास्त वेळ लागला तसे वामनराव वैद्य मास्तरांना म्हणाले "आंघोळीची सोय होईल का ?" तेंव्हा वैद्य मास्तरांच्या लक्षात आले. ही मंडळी लांबच्या प्रवासातून आलेली आहेत. यांचे सगळेच व्हायचे असेल. हे सगळं एका प्रश्नानं त्यांच्या लक्षात आले. वैद्य मास्तर म्हणाले "आधीच कां नाही सांगितले ? स्नानाला घरीच चला."

सरळ अन्तःकरणाला शंका नसते. उलट दोघांनाही चुटपुट लागते. आधी सांगितले-विचारलं असतं तर बरे झाले असते. लगेच वैद्यमास्तर त्या दोघांना घेऊन घरी आले. वर्तन-आचारावरुन व्यक्ती चांगली समजते. वामनराव आणि शंकरशास्त्री यांचे स्नान-संध्या-नित्यकर्म वैद्यमास्तरांनीं आज प्रथम पाहिले आणि अतिशय संतुष्ट झाले. कर्मात अन्तःकरण ओतले की भक्तियोग होतो. वामनरावांच्या कर्मामध्ये वैद्यमास्तरांना भक्तियोग दिसला. कारण ते पंढरीचे वारकरी होते. त्यांची उपासना ज्ञानेश्वरी होती. वामनरावांच्या कर्मांकडे पहाताना वैद्यमास्तरांच्या मनात ज्ञानेश्वरांच्या ओव्या घोळत होत्या –

**जीवु-परमात्मा दोन्ही । बैसोनि ऐक्यासनी ।**
**जयाचां ह्रदयभुवनी । विराजती ॥**

**ऐसा योग समृद्धि । होऊनी जो निरवधी ।**
**अर्पि मनो बुद्धि । माझां ठायी ॥**
**आंतु बाहेरि योगु । निर्वाळलेयाही चांगु ॥**
**तरी माझा अनुरागु । सप्रेम जया ॥**
**अर्जुना गा तो भक्तु । तोचि योगी तोचि मुक्तु ।**
**तो वल्लभा मी कांतु । ऐसा पढिये ॥**

ताजा स्वैंपाक झाला. दोघांचे भोजन झाले. वामनरावांना वैद्यमास्तरांची उदारता दिसली. संतवृत्ती दिसली. तेही वैद्यमास्तरांच्यावर संतुष्ट झाले. नोकरीसाठी आलेल्या वामनरावांची ही खरी मुलाखत झाली. वैद्यमास्तरांनी अधिकाऱ्यांना नव्या ड्राईंग मास्तरांची माहिती दिली. शिफारस करून नेमणुकही केली. प्रमाणपत्रे पाहिली नाहीत. काही नाही.

बार्शीत नोकरी लागली. आता नवी खोली पाहिली पाहिजे म्हणून वामनरावांनी वैद्यमास्तरांच्या जवळ विषय काढला. वैद्यमास्तर म्हणाले. "आमच्या इथं संकोच नाही ना वाटत! मग रहा की इथेच. जेवणही आमच्या इथेच होईल." वैद्यमास्तरांनी आग्रहाने वामनरावांना आपल्याच घरी ठेवून घेतले. 'समाना शीले व्यसनेषुसख्यं' दोघं परमार्थी. दोघांना परमार्थाचे व्यसन. दोघांचा स्नेह जमला. वामनरावांच्या नोकरीचे जमले. राहण्या-जेवणाचं जमलं. असं पाहून शंकरशास्त्री २।४ दिवस राहून कुडुत्रीला परत गेले.

वैद्यमास्तरांची पत्नी नव्हती. त्यांना एक मुलगा होता. जवळ बहीण होती. मुलाचे वय ४।५ वर्षांचे होते. वामनरावांचे आणि वैद्यमास्तरांचे विविध विषयावर बोलणे होऊ लागले. दोघांना वेळ पुरेना. दोघांना परस्परांच्या अंतर्बाह्य जीवनाचा परिचय झाला. तेव्हां एकदा वामरावांनी वैद्यमास्तरांना म्हटले "पुन: लग्न कां करीत नाही?" वैद्यमास्तरांनी लगेच उत्तर दिले "वामनराव! तुम्ही जर तसे रहाता तर आम्हाला राहयला काय हरकत आहे. म्हणजे वामनराव ज्या वृत्तीमुळे लग्न न करता राहू शकतात ती वृत्ती जर आम्ही ठेवली तर आम्हालाही लग्न न करता राहायला काय हरकत आहे. वैद्यमास्तरांनी पत्नी निवर्तल्यानंतर चिंतन मनन करून—लग्न न करण्याचा निर्णय पक्का केला असल्याने हे उत्तर ते चटकन देऊ शकले. हे ऐकून वामनरावानांही समाधान झाले.

**वैद्यमास्तरांचा जीवनपरिचय -**

इ. स. १९१२ मध्ये बार्शीच्या शाळा नं. १ वर हेडमास्तर म्हणून यशवंत नारायण वैद्य यांची नेमणूक झाली. हे कर्तबगार हेडमास्तर होते. उत्तम व्यवस्थापन

हाही त्यांचा विशेष होता. शाळेला जागा कमी पडते हे वरिष्ठांच्या नजरेस आणून, नवीन इमारत बांधण्याची परवानगी घेऊन स्वतःच्या देखरेखीखाली शाळेला नवी इमारत बांधून घेतली. नव्या इमारतीचा उद्‌घाटन समारंभ रँगलर परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली घडवून आणला. शैक्षणिक क्षेत्रातली कर्तबगारी हा वैद्यमास्तरांच्या गुणांचा एक पैलू आहे. परंतु त्यांच्या गुणरत्नांचे तेज परमार्थात खुलून आणि उठून दिसते. ते पंढरीचे वारकरी आणि माळकरी होते. आषाढी-कार्तिकीला पंढरीची वारी पायी करीत. ह. भ. प. दासगणूमहाराज आणि पू. श्री. केशवरावमहाराज देशमुख, गुरुवर्य रानडे, गुरुवर्य मामा दांडेकर इ. संतसत्पुरुषांचा सहवास तोही आत्मीयतेने लाभलेले वैद्यमास्तर आहेत. बार्शिला वामनराव आल्यापासून तर वैद्यमास्तरांचे जीवनपुष्प सतेज, प्रफुल्लित होऊन त्याचा गुणसौरभ आसमंतात पसरला आणि अन्ति हे पुष्पही श्रीचरणी अहोभाग्याने समर्पित झाले.

वैद्यमास्तर हे वामनरावांच्यापेक्षा वयाने थोडे मोठे होते. म्हणून वामनराव त्यांना आपले थोरले बंधूच मानीत असत. वामनरावांच्या खाजगी, घरगुती, धार्मिक-पारमार्थिक सर्व क्षेत्रात वैद्यमास्तर सावलीसारखे बरोबर असत. वामनराव प्रत्येक गोष्ट त्यांच्या सल्याने करीत. वामनरावांच्या जवळ निर्णयशक्ति कमी होती किंवा दूरदृष्टी कमी होती अशातला हा भाग नाही. तर आपला मनातील हेतू-निर्णय वा दृष्टीकोन यामध्ये पूर्ण एकमत असलेले वैद्यमास्तर होते. याची पक्की जाणीव वामनरावांना होती. म्हणून प्रत्येक गोष्ट वैद्यमास्तरांना मान देऊन करण्यात वामनरावांचेच मनाचे मोठेपण दिसते. वैद्यमास्तरांचा ज्ञानेश्वरीचा व्यासंगही उत्तम होता. ते ज्ञानेश्वरीवर उत्तम प्रवचन देत. वामनरावांचा ज्ञानेश्वरीचा अभ्यास वैद्य-मास्तरांच्या प्रवचनाच्या श्रवणाने झाला. बार्शीत ईश्वरनिष्ठांची मंदियाळी जी निर्माण झाली ती वैद्यमास्तर आणि वामनराव यांच्या संयोगाने झाली. वैद्यमास्तरांचे आचरण ऋषितुल्य होते. भक्तीबरोबर योगाचीही त्यांना आवड होती आणि योगातही त्यांची उत्तम गती होती.

वामनरावांचा वैद्यमास्तरांकडे मुक्काम असल्याने त्यांना आपल्या आईला व बहिणीला बार्शीला आणणे मनाला प्रशस्त वाटेना. त्यांनी वैद्यमास्तरांचा सल्ला घेतला. आई आणि बहीण येथे आणायची झाली तर काय सोयीचे होईल. वैद्यमास्तर निःस्पृह आणि निर्दोष सल्लागार होते. त्यांनीच स्वतंत्र खोली पाहून दिली. वैद्यमास्तरांच्या जवळच शेजारच्या ब्राह्मण गल्लीत देशपांडे यांच्या वाड्यात चारखणी जागा मिळवून दिली. मग वामनराव सुट्टीला गावी गेले. गुरूद्वा-

दर्शाची वाडीयात्रा झाली आणि येताना बरोबर आईला आणि गोदावरीला घेऊन आले. वैद्यमास्तरांनी त्यांची सर्व व्यवस्था लावून दिली.

बार्शीत स्वतंत्र खोली घेऊन वामनराव राहू लागल्यावर त्यांना लोकोपकारासाठी अधिक संधी मिळू लागली. ते गणपतीच्या सुबक मूर्ती करू लागले. हरतालिका करू लागले. चित्रकलेच्या क्षेत्रात पेंटिंग करू लागले. विविध देवतांची चित्रे, पोर्ट्रेटस्, नाटकातील पार्श्ववातावरणाचे पडदे तयार करून देऊ लागले, याचबरोबर फोटोग्राफीचेही काम त्यांचे चालू असे. मुलांना आसने शिकविण्याचाएक वर्ग सुरू केला. संध्याकाळी स्नेहीमंडळींबरोबर देवदर्शन व फिरणे सुरू झाले. रात्री तास दीडतास काही निवडक परमार्थमार्गी स्नेहांच्या बरोबर, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव-योगवासिष्ठ, जीवनमुक्ती विवेक इ. सारख्या ग्रंथांचे वाचन व त्यातील भावार्थांवर परस्परांचे चिंतन होऊ लागले. म्हणजे शाळा आणि वरील विविध स्वरूपांच्या कामांचा विचार केला तर वामनराव म्हणजे उद्योगप्रिय पुरुष होते हेच स्पष्ट होते. या सर्व व्यापात त्यांचे वैयक्तिक अनुष्ठान, नित्यकर्म यांतही कधी उणीव नसे. बार्शीमध्यें त्यांनी सोवळ्यात, स्वहस्ते 'द्विसाहस्री' गुरूचरित्र लिहून काढले व त्या हस्तलिखित पोथीवरून ते नित्याचे पारायण करीत असत. ही पोथी पुढे ते वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत वाचीत होते. नंतर ही बारीक अक्षराची पोथी त्यांना वाचता येईना तेव्हां त्यांनी. एकाकडून मोठ्या हस्ताक्षरात द्विसाहस्री लिहून घेतली व शेवटपर्यंत त्यावरून पारायण करीत होते.

वामनराव बाजारात गेल्याचे कोणी पाहिले नाही. लहानपणापासून बाजारहाट केलाच नाही. तरी बार्शीत एकदा ते बाजारात गेले होते. बार्शीला एकदा प्लेग झाला. बाजार मैलावर दूर गेला. तेव्हा आठ आण्याची ज्वारी दोन हातातून आणता येईना. रुपायाला १० शेर ज्वारी मिळायची तेव्हां. स्वस्ताई होती. तेवढाच बाजार केल्याचे त्यांना आठवते. बाकी किरकोळ बाजारहाट, भाजीपाला हे बापू कुबडे - भास्कर भागवत हे विद्यार्थी करीत असत.

बार्शीत योगासनांचा वर्ग सुरू झाला तो वैद्यमास्तरांच्यामुळे. त्यांनी शाळेतील एक खोली या योगासन वर्गास दिली. या वर्गात व्यंकू कुलकर्णी, जगन्नाथ दिवटे, सदाशिव भालकीकर, रघुनाथ वैद्य, बापू कुबडे, भास्कर भागवत इ. येत होते. या मुलांना काही काळानंतर वामनरावांनी तौली, उड्डियान, नेती, बस्ती, धौती, त्राटक इ. क्रियाही शिकविल्या. धौतीसाठी पहाटे मुलांना घेऊन जामगावाकडे एका विहिरीवर जात. तेथे आठ वार मलमल आणून त्याची अरुंद

पट्टी कापून प्रत्येकाला दिली. स्वतः धौती करून दाखवून मग प्रत्येकाला शिकविली. प्राणायाम ही प्रारंभिक सोपा पण महत्त्वाचा शिकविला.

या आसनवर्गाला मोठमोठी मंडळीही येऊ लागली. प्रल्हादशास्त्री जोशी येऊ लागले. यांची आसने उत्तम होत असत. प्रल्हादशास्त्रींचा कंदपीडासनातील फोटो स्वतः वामनरावांनी काढला आहे. वैद्यमास्तरांची आसने उत्तम असत. एकनाथ धर्माधिकारी यांचीही आसने उत्तम असत. पण वामनरावांच्या आसनांची सहजता, रेखीवपणा आणि निर्दोषता विशेष होती. वामनरावांचे कर्णपीडासन, कुक्कुटासन, सर्वांगासन, मयुरासन, पश्चिमोत्तानासन, सिद्धासन आणि पूर्ण मत्स्येंद्रासन यामधील फोटो काढलेले आहेत. ते पाहिल्यावर त्यांची योगासनातील स्थिती समजेल.

### काशीचे योगानंद बार्शीत–

या काळात कर्मधर्म संयोगाने काशी येथील एक योगानंद नावाचे मध्यमवयीन ब्रह्मचारी बार्शीस आले. भाऊसाहेब साने वकील यांचेकडे योगानंदांचा मुक्काम होता. त्यांची भगवंताच्या मंदिरात गीतेच्या ६ व्या अध्यायावर सात प्रवचने झाली वामनराव आणि त्यांची स्नेही मंडळी या प्रवचनाला जात असत. योगानंदांचा व वामनरांवाचा परिचय झाला. याच विषयावर बोलणे झाले. योगानंदांनी आठव्यादिवशी योगासने, नौली, प्राणायाम आदिक्रीयांचे प्रात्यक्षिक दाखविले. यामुळे योगासनांची रुचि उत्पन्न झालेली मुले योगानंदांकडे गेली व आपले मार्गदर्शन व्हावे असे म्हणू लागली. त्यावर योगानंद म्हणाले "तुमचे ड्रॉईंग-मास्तर गुळवणी हे चांगले योगी आहेत. त्यांचेकडे जात जा. ते तुम्हाला उत्तम मार्गदर्शन करतील." वामनरावांची योग आणि आसने यामधील तयारी योगानंदांनी मान्य तर केलीच पण त्यांचे उत्तम मार्गदर्शन मिळेल हेही सभेत जाहीरपणे सांगितले.

योगानंदांच्या वर्गाला वामनराव जात होते. ते काही नवीन मिळते का ते पाहण्यासाठी जात होते. योगानंदांचे शरीर त्यावेळी बारीक बांध्याचे होते. पण पुढे त्यांची प्रकृती चांगलीच भरली. योगानंदांनी त्यावेळी खेचरी मुद्रेबाबत सांगितले. त्यांनी खेचरीचा प्रयत्न केलेला नव्हता. खेचरी वगैरे वर नुसतं व्याख्यान देत होते. वामनरावांनी खेचरी केलेली होती. श्रीगांडाबुवांनी खेचरी केलेली होती. जिभेच्या खालची शीर तोडायची, म्हणजे जीभ लांब करता येते. तरी जीभ लांब करण्याचा रोज अभ्यास करावा लागतो. मूर्धा, दोन्ही कान आणि कंठ या चारही

ठिकाणी जीभ लागेपर्यंत लांब करण्याचा अभ्यास करावा लागतो. मग आत वळवून रसपान करावयाचे.

बार्शीमध्ये वामनरावांनी दादाशास्त्रींना श्रीगुरुचरित्राची पोथी आणून पारायण करून नित्य पारायणास दिली. तसेच श्रीटेंबेस्वामींनी दिलेली विभूती श्रीदादाशास्त्री व त्यांच्या पत्नी या उभयतांच्या जिभेवर चिमुटभर टाकली.

बार्शीत भगवंताचे मंदिर प्राचीन आहे. येथे कीर्तने, प्रवचने नेहमी होत असत. प्रल्हादशास्त्री, मुगुटकर वकील, सहस्रबुद्धे वकील, पुजारी मास्तर, नारायणराव पुरंदरे इ. स्नेही मंडळीपैकी कोणातरी बरोबर वामनराव कीर्तनाला, प्रवचनाला जात असत. श्रीमान राघोपंत काळे यांचेकडे पंढरपूरचे, वारकरी संप्रदायाचे एक मोठे कवी, आधुनिक महिपती ह. भ. प. दासगणूमहाराज येत असत. त्यांचा व शास्त्रीबोवांचा आणि वामनरावांचा ऋणानुबंध आत्मीयतेचा होता. वामनरावांचेवर दासगणूंचे फार प्रेम होते. वामनरावांनी दासगणूंनी रचलेली सर्व संतांची कीर्तने ऐकली. दासगणूमहाराजांची कीर्तने अत्यंत रसाळ व भक्ती-प्रेमाने ओथंबलेली असत. त्यांच्या कीर्तनात नेत्राश्रू न येणारा दुर्मिळ असे. दासगणूंनी दामुअण्णा आठवले या विद्यार्थ्याचे पुत्रवत् पालन केले. दामुअण्णांनी सुद्धा दासगणूंची सेवा पिता आणि सद्गुरू म्हणूनच शेवटपर्यंत केली. दासगणूंचे सर्व लेखनकार्य दामूअण्णांनी केले. आयुर्वेदाचार्य पं. अनंतराव आठवले हे दामुअण्णांचे-सुपुत्र. अनंतरावांची पुण्याई अनंतगुणित झाली ती वडिलांच्या आणि दासगणूंच्या कृपेनेच. म्हणून ती परंपरा अधिक तेजाने ते चालवीत आहेत. वामनरावांचा लोकसंग्रह वाढण्याचे महत्वाचे कारण हे आहे की, महापुरुषांचा सहवास व कृपा-प्रेम मिळाल्याने त्या त्या परिवारातील सर्वजण संबंधात येऊ लागले.

बार्शीमध्ये बावडेकरबुवा नावाचे एक वृद्ध वैदिक होते. हे श्रीटेंबेस्वामींचे अनुग्रहीत होते. बार्शीत दोनदा श्रीटेंबेस्वामी आले असता या बावडेकरबुवाचे-कडे उतरले होते. बावडेकरबुवा तोतरे बोलत असत. त्यामुळे त्यांचे संस्कृत वा वेदाध्ययन होऊ शकले नाही. त्यांची अक्कलकोटस्वामींची भेट झाली. त्यांच्या कृपेने पुढे ते वैदिकशास्त्री झाले. प्रवचनात त्यांचे उच्चार स्पष्ट येत असत. या बावडेकरबुवांना वामनराव श्रीटेंबेस्वामींचे अनुग्रहीत आहेत हे समजल्यापासून परस्परांच्या भेटीगाठी होऊ लागल्या.

वे. मू. आण्णाबुवा कारीकर हे उत्तम वैदिक, वामनरावांचे घरी येऊन काही दिवस पुराण सांगत असत. ते ऐकण्यासाठी बापुसाहेब कुबडे यांची आई, वामनरावांची आई व बहीण अन काही श्रोते येत असत.

श्रीमान् दामुअण्णा रायचूरकर हे एक मोठे कापड व्यापारी होते. ते प्रल्हादशास्त्री मुगुटकर यांचे स्नेही होते. यामुळे यांचा नि वामनरावांचाही स्नेह वाढला, दामुअण्णा श्री. बावडेकरबुवांचे शिष्य होते. त्यांनी आपल्या गुरूंची उत्तम सेवा केली व गुरूंच्या सहवासात यात्राही केल्या. दामुअण्णांनी घरची गाय वीत असतांना तिची पूजा करून प्रदक्षिणा घालून ती सवत्स धेनू प्रल्हादशास्त्रींना दान दिली.

बार्शीत वामनरावांचा ऋणानुबंध फार मोठा होता. त्यामुळे अनेक घराण्यांशी आत्मीयतेचे संबंध आले होते. नारायणराव काळे वामनरावांना यज्ञोपवीते तयार करून देत असत. वे. आबा मळेगावकर, एकनाथबुवा धर्माधिकारी, अग्निहोत्री काळे, ज्ञानेश्वरी प्रवचनकार माधवराव केसकर, नारायणराव वझे, तात्यासाहेब टिळक, चिंगुआबा दिवटे वकील, डॉ. बाबासाहेब सहस्रबुद्धे, नारायणराव भालकीकर, नानासाहेब बुडुख, भाऊसाहेब नखाते, पुरुषोत्तम मुगुटकर, धर्माधिकारी परिवार इ. अनेक वामनरावांच्या सहवासात आले. सर्वांच्या अन्तःकरणात वामनरावांच्या विषयी श्रद्धा आणि आत्मीयता असे.

बार्शीकरांनी अशा विविध गुणी आणि प्रतिष्ठित मंडळींचा 'उत्तरेश्वर क्लब' स्थापन केला. वामनरावांना बार्शीकर मंडळी 'मास्तर' म्हणत. जसे 'वैद्य मास्तर' तसे गुळवणी मास्तर' नावाने बार्शीत प्रसिद्ध. रोज सायंकाळी गावाबाहेर फिरायला जाऊन येणे आणि जाता येता देवांची दर्शने घेणे असा दुहेरी उद्देश यामध्ये असे. अशी ही मंडळी नित्य फिरायला निघाली म्हणजे बार्शीतील सर्वांना बार्शींच्या प्रतिष्ठेचे, अस्मितेचे, चैतन्याचे सांघिक दर्शन घडत असे.

सायंकाळच्या फिरण्यात निसर्गापासून प्रपंचापर्यंत विविध विषय निघत. पण सर्व विषयातून ज्ञान-विज्ञान-वेदांत-धर्मसूत्र-योग आदींच्या सूत्र संबंधाचे स्पष्टीकरण असे. वनस्पतींच्या विषय निघाला की त्याचे गुणधर्म, औषधी उपयोग इ. ची चर्चा होत असे. ज्ञानी, अभ्यासू- चिंतन, मननशील व्यक्तींच्या चर्चा वायफळ नसतात. प्रत्येकातून तात्पर्याचे ज्ञानकण प्रकट होत असतात. हा आनंद अशा पुरुषांच्या सहवासात सतत मिळत असतो.

## कालोगच्छति धीमताम्

सायंकाळच्या फिरण्यात इंगुदीची झाडे लागत. त्या झाडावर चढून बसण्यांत या मंडळींना मजा वाटत असे. सर्व तरुण होते तेव्हां. झाडावर

बसल्यावर वाऱ्याचा आनंद लुटीत गप्पागोष्टी करण्यात, हास्य विनोदात काळ जात असे. ही इंगुदीची झाडे म्हणजे हिंगण बिट्टयांची झाडे. या बिट्टयांचा फेस होतो. खेडेगावात याचा उपयोग शिकेकाईसारखा करतात. तसेच बाभळीचा डिंक अत्यंत पौष्टिक म्हणून ही मंडळी कच्चा डिंकही खात असत.

बार्शीमध्ये वामनरावांना व्यावहारिक आणि पारमार्थिक स्थैर्य चांगलेच लाभू लागले. त्यांचा परमार्थ प्रथमपासूनच पूर्ण व निर्दोष होता. पण ते साधकाची आणि भक्ताची भूमिका घेऊन वागत असत. परमार्थाचे एवढे भांडवल गाठी असताना त्यांनी याचा सुगावा कधीच कोणालाही लागू दिला नाही. व्रतस्थ भूमिकेने वागणारा एक सज्जन, सच्छील, धार्मिक वृत्तीचा ड्रॉईंग मास्तर अशीच कल्पना या बार्शीकरांची होती. प्रत्यक्ष अर्जुनाला परमात्मा श्रीकृष्णाच्या सहवासात राहून महायुद्धापर्यंत श्रीकृष्णाच्या विराट स्वरूपाची कल्पना आली नाही.

**सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं**
**हे कृष्ण हे यादव हे सखेति ।**
**अजानता महिमानं तवेदं**
**मया प्रमादात्प्रणयेन वापि ।।**

(अध्याय ११/४१)

## "योगी परं स्थानमुपैति चाद्यम्"

वामनरावांनी हात्नूरला गुरुमुखातून गीता ऐकली. तेव्हांपासून गीता त्यांच्या नित्य चिंतनमननाचा विषय झाला होता. श्रीमत्‌भगवत्‌गीता हे उपनिषदातील ब्रह्मविद्येचे योगशास्त्र आहे. परमपद प्राप्तीला कर्मशास्त्र अनिवार्य आहे. कारण कर्मानेच विशुद्धत्त्व येते. पण या विशुद्धस्थितीनंतरही परमपदप्राप्तीची वाटचाल आहेच. विशुद्धत्त्वाबरोबरच भावभक्तीचीही जोड हवीच. भावभक्तीची तळमळ नसेल तर हातून काहीही होणार नाही. भक्तीची शक्तीच साधकाची वाटचाल करीत पुढे नेत असते. भक्तीची तीव्रता कमी झाली की लगेच साधनेला मंदत्व येते. कर्म आणि भक्तीची जोडी जमली तरी उद्देश नसेल किंवा विपरीत उद्देश असेल तरी परमपद हाती येणार नाही. उद्देशाचे ज्ञानही या मार्गीच्या प्रवाशांना आवश्यक आहे.

याप्रमाणे ज्ञान–भक्ति –आणि कर्म असले तरी परमपद प्राप्ती होणे दुरापास्त आहे.

"वेदेषु यज्ञेषु तपःसुचैव" या भगवंताच्या उक्तीप्रमाणे आचरण करून पुण्यात्मा होता येईल. परंतु योगी हा या सर्वाला मागे टाकून परमपदावर आरुढ होतो.

"तस्मात सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन" असे योगेश्वर श्रीकृष्ण अर्जुनाला कळकळीने सांगतात.

**तपस्विभ्योऽधिको योगी**
**ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।**
**कर्मिभ्यश्चाधिको योगी**
**तस्माद्योगी भवार्जुन ॥**

योगी पुरुष हा तपस्वी पुरुषाहून श्रेष्ठ आहे. ज्ञानी पुरुषाहून श्रेष्ठ आहे आणि कर्मनिष्ठांपेक्षाही योगीच श्रेष्ठ आहे. म्हणून अर्जुना तू योगी हो !

वामनरावांना योगमार्गाची स्वभावतःच आवड होती. त्यामुळे आसन, बंध, मुद्रा, प्राणायाम इ. योग क्रियेत त्यांची उत्तम गती होती. योगीपुरुषाची लक्षणही त्यांचे ठायी होती. ते युक्त आहार, विहार सांभाळणारे होते. नियत मानस म्हणजे मनोनिग्रही होते. निस्पृह वृत्तीचे होते. तरी सुद्धा योगसिद्धीसाठी कुंडलिनी जागृतीची आवश्यकता असते हा महत्वाचा सिद्धांत त्यांना अनुभवायचा होता. कुंडलिनी जागृती हा विषय योगमार्गातील अभ्यासकांच्या डोळ्यासमोर स्पष्टपणे येतो. त्याची वर्णने ऐकून, वाचून परोपदेश करणारेही पुष्कळ असतात. वामनरावांना या शक्ति-जागरणाची अनुभूती घ्यायची होती.

बार्शीत या काळात म्हणजे इ. स. १९२२ जानेवारी मध्ये वामनरावांच्या वाचनात 'योगरसायन' नावाचे पुस्तक आले. हे योगरसायन अजमेर जवळच्या पुष्कर क्षेत्री राहणाऱ्या श्रीब्रह्मानंदांनी लिहिलेले आहे. हे ब्रह्मानंद म्हणजे मोठे योगी असून संस्कृत पंडित होते. यांची तीन पुस्तके फार उत्तम आहेत. १—योग रसायन २—ईश्वर दर्शन -३- ब्रह्मानंदगीता. ही पुस्तके अत्यंत सुलभ आहेत. त्यांच लेखनही फार चांगलं आहे.

ब्रह्मानंदांनी संन्यास घेतल्यावर ते फिरत फिरत बडोद्याला गेले. तेथे त्यांनी राजमहाल पॅलेस पाहिला. त्यांच्या मनात आले की, असे ऐश्वर्य पाहिजे. तेथून त अबूच्या पहाडावर गेले. २१ दिवस उपास केला. तेथे त्यांना ईश्वराचं दर्शन झालं. ईश्वरानेच त्यांना विचारलं "ऐश्वर्य पाहिजे का तीन जन्मात मुक्ती पाहिजे ?" ब्रह्मानंदांच्या हेतूत बदल झाला. त्यांनी मुक्ती मागितली. ईश्वरानं त्यांना दोन्ही दिलं. पुष्करचा त्यांचा आश्रम म्हणजे त्यांचे ऐश्वर्य आहे.

एवढी माहिती मिळाली म्हणून वामनरावांनी ब्रह्मानंदांना पत्र लिहिले. "योगाभ्यासाने कुंडलिनी जागृती व्हावी अशी इच्छा आहे. या दृष्टीने आपण मार्गदर्शन करावे अशी प्रार्थना आहे. "पत्र या पेक्षा विस्तृत होतं, पण आशय हा होता. त्यांचे उत्तर आले. "नुसतं पत्राने काम व्हायचे नाही. प्राणायामात काही खुबी आहे. इथं येऊन समजून घ्यावी लागेल." ब्रह्मानंदांचे अनुकूल पत्र आल्यानंतर वामनरावांनी पुष्करला जाण्याच्या बेत केला. पण भाड्याचे, तिथं राहण्याचे पैसे कुठे आहेत जवळ ? स्नेही मंडळीत हा पत्रव्यवहार माहित होता. वामनरावांनी मुगुटकर वकीलांकडून नव्वद रुपये घेतले आणि चैत्रात पुष्करला गेले.

वामनरावांना वाटलं आपण अकिंचन, ब्रह्मानंद श्रीमंत, त्यांच्या आश्रमात रहाणं कसं परवडणार. म्हणून पुष्करला गेल्यावर त्यांनी एका पंड्याला गाठले. पंड्यानं जागा दिली. तिथ भात वगैरे करून खाल्ला आणि मग ते ब्रह्मानंदाकडे दर्शनाला गेले. भेट झाली. बोलणे झाले. 'उद्या या' म्हणाले. मग वामनराव बाजारात गेले. ४/५ मडकी विकत आणली. तिथं स्वतंत्र जागा घेतली. आता जेवणाखाण्याची सोय. हातानं करून खाल्लं म्हणजे परमार्थाला आणि प्रपंचाला परवडणारं. एक मडकं भाताला, एक मडकं डाळीला, एक तुपाला, कणकीचे गोळे करून भातातच टाकायचे. असा आहार आणि अभ्यास प्राणायामाचा ! हे जमणार कसं ? दुसऱ्या दिवसापासून अभ्यास सुरू झाला. सकाळी तीन तास आणि संध्याकाळी तीन तास. श्वास घ्यायचा–कोंडायचा आणि सोडायचा. ठराविक वेळ घ्यायला–कोंडायला अन् सोडायला. अशी ही कवायत तीन/तीन तास चालू झाली.

पुष्कर तीर्थात आंघोळ. पाणी अगदी हिरवं गार. तेंच पाणी प्यायला अन् स्वैंपाकाला. चौपदरी फडक्यातून गाळून वापरायचं ! कणकीचे गोळे आणि असलं पाणी ! बांधलं सगळं ! ओकाऱ्या सुरू झाल्या. तिथं जवळ एक आंब्याचं झाड होतं त्याच्या कुंडात ओकायचं ! पुष्कर म्हणजे ब्रह्मदेवाचं स्थान. तीन बाजूंनी टेकड्या, फार मोठं सरोवर, सगळ्या बाजूंनी घाट बांधलेले, खूप मंदिरं, सरोवरात ५/५० सुसरी दिसतात. पण पाणी मात्र हिरवं गार !

ब्रह्मानंद विष्णूचे उपासक. त्यांच्या आश्रमात विष्णूची खूप चित्रं होती. स्वच्छता, टापटीप, नोकर चाकर, शिष्य मंडळी, विविध कार्यक्रम – ऐश्वर्यसंपन्न काम होतं सारं ! ब्रह्मानंद दिसायला फार सुरेख होते. पंजाबी होते. नाक अगदी सुंदर. त्यांचा आहार सर्वोत्तम होता. दिवसभरचे कार्यक्रमसुद्धा रेखीव. ते

डोक्याला सतत फेटा घालीत असत. त्याला इतिहास आहे. वामनरावांनी विचारले म्हणून त्यांनीच सांगितले – "माझा एक शिष्य होता. त्यानं डोक्यात सोटा मारला. टेंगुळ आलं. त्यासाठी हा फेटा आठवण आणि संरक्षण म्हणून बांधतो."

ब्रह्मानंदांना वामनरावांची प्राणायामातली गती आणि तयारी पाहून फारच समाधान झाले. त्यांनी सांगितलेलं वामनरावांना यायलाही लागलं होतं. पण वामनरावांची प्रकृती बिघडली. ते सरोवर परवडले नाही. यांच्याही गंगाजळीतले पाणी आटले. जवळचे ९० रु. संपले. ब्रह्मानंदांनी तर रहाण्याचा आग्रह चालवला पण करणार काय ? प्रकृती बिघडली आणि पैसा संपला. वामनरावांना तिथं राहणच अशक्य झाले.

पुष्करहून निघताना भाड्याला पैसा उरला नाही म्हणून वामनरावांनी आपली दोन तोळ्याची आंगठी ब्रह्मानंदांपुढे ठेवली व म्हणाले "ही ठेवून घ्या व मला भाड्यापुरते पैसे द्या." ब्रह्मानंद सत्पुरुष होते. म्हणाले "याची काय गरज आहे ? हवे ते पैसे देतो" मग वामनराव म्हणाले ३५/– रु. पुरेत. त्यावेळी सोनं वीस रुपये तोळा होतं.

अशी ही एक नियतीची लीला झाली. नाटकात मी हवे तसे काम करीन असं म्हणून चालत नाही. नाटकातल्या शब्दाप्रमाणे शब्द उच्चारले पाहिजेत, कृती भावपूर्ण समरसतेने केली पाहिजे. काही कृत्रिमता दिसून चालत नाही. रामराज्याभिषेक आणि वनवास किती अंतर होते ? एक पडदा पडण्यापुरताच ना ? पण तेवढ्यात खऱ्या रामाने सुद्धा राजवस्त्रे काढली आणि वल्कले नेसून वनाच्या प्रवासाला निघाला ! नाहीतर श्रीकृष्णाला गुरुची आवश्यकता काय होती ?

वामनरावांनी पुष्कर सोडले. वास्तविक प्रकृति बिघडलेली होती. तेथून निघायचं आणि थेट बार्शी गाठायची ! पण तसे झाले नाही. वामनराव अजमेरला आले. तेथील अब्दुल रहेमान चा प्रसिद्ध दर्गा पीर ख्वाजा पाहिला. या दर्ग्याचा इतिहास त्यांनी तेथे समजून घेतला. तो त्यांनी सांगितला म्हणून येथेही देत आहे. अशा बारीक गोष्टीं मधून बरेच काही समजून जात असते.

"त्या घराच्या तळघरात महादेव आहे आणि वर दर्गा ! चंदनाचे-अत्तराचे रोज पेले यायचे-एक महादेवाला आणि एक मशीदीत. याला थोडा इतिहास आहे. तेथे पूर्वी महादेवाचे देऊळ होतं. मंदिराचं आवार मोठं होतं. पण जागा पडीक होती. तिथं एक बाई रहात होती. तिचा मुलगा व ती त्या महादेवाची

पूजाअर्चा करायचे. त्यांना रोज आवाज यायचा "मी येऊं का ? मी येऊं का" ? एकदा त्या बाईचा मुलगा म्हणाला "या" तो मुसलमान फकीर होता. अवलिया होता. तो महादेवाला म्हणाला "मी येथे प्रगट व्हावं अन् तुम्ही गुप्त व्हावं" "महादेवाच्या पिंडीतून आवाज आला. 'बरं आहे. मला येथेच ठेव व वर तू प्रगट हो' त्यामुळे तो पीर ख्वाजा अबदूल रहेमान प्रसिद्ध झाला व अनुभवामुळे पूजाही दोघांची होऊ लागली.

असं अजमेर झालं. वामनराव दर्गा पाहून आले. महादेवानेच गुप्त होण्याचे मान्य केल्यामुळे वामनरावांना त्या महादेवाचे दर्शन झाले नाही. चैत्र महिना संपून वैशाखाची सुरुवात होती. अजमेरहून वामनराव गरुडेश्वरला आले. उन्हाळ्याचे दिवस. गरुडेश्वर म्हणजे सद्गुरूंचे स्मृतिस्थान. समाधीचं दर्शन घेतलं. स्नान करून समाधीला पाणी घातलं. त्यावेळी आजच्यासारखं काही नव्हतं. पण स्थान महात्म्य आहे ना ! नुसत्या आठवणीनं डोळ्यातून पाणी काढणारं ते स्थान आहे. स्वामींच्या सहवासातला क्षणनिक्षण डोळ्यापुढे उभा राहिला. व्याघ्रांबरी दत्ताची आठवण हावनूरपर्यंत नेत होती.

गरुडेश्वरला वामनरावांच्या चपला गेल्या. मंदिरात चपला जाण्याचा अनुभव अनेकांप्रमाणे वामनरावांना आला. बाहेर पाऊल टाकवत नव्हतं. असा उन्हाळा होता. नावेने पलिकडे जायचं म्हटलं तरी तिलकवाड्यापर्यंत पायी जाणे जरुन होते. तिथले लोक म्हणाले पायउतारापर्यंत अनवाणी जाणे शक्य होणार नाही. मग राहिले वामनराव दिवसभर तियेच. देवळाच्या मागच्या बाजूला पडून राहिले होते. भयंकर उकाडा होत होता. १९१३ मध्ये वामनराव गरुडेश्वरला चैत्र वैशाखातच गेले होते ना ! त्यावेळी सद्गुरूंच्या छायेत होते. उन्हाळा होता तरी तिकडे लक्षच नव्हते. आज ती सावली नव्हती. उन्हाचे आणि स्मृतीचे चटके होते. उन आणि स्मृती त्या स्थानातून हालू देत नव्हते.

उन कमी झालं, तरी जमीन तापलेलीच होती. चपला असत्या तरी उजेडी जाता आले असते. शेवटी रात्री ९ ला जमीन जरा चालण्याजोगी झाली. तेव्हा एक वाटाड्या बरोबर कंदील घेऊन आला तेव्हा कुठे गरुडेश्वरातून बाहेर पडता आलं. नाहीतर दुसऱ्या दिवशी तोच प्रकार होणार होता. रात्रीच्या प्रवासाशिवाय उपायच नव्हता.

मग वामनराव पुढे पुण्याहून बार्शीला गेले. थकल्या भागलेल्या प्रकृतीला

विश्रांती दिली. आईच्या हातचे अन्न मिळाल्याने पोटही ताळ्यावर आले. झाली हकीगत सर्वांना सांगण्यात आली.

**'योग' स्वस्थ बसू देईना ! आता होशंगाबाद !!**

योगाने सर्व दुःखाचा नाश होतो. योगाने प्राणजय साधतो. प्राणजयाने चित्त स्थिर होते. या स्थिर चित्ताच्या अवस्थेत योगी शुद्ध मनाने आत्म्याला पाहून आत्म्यातच संतुष्ट होतो. असे हे इंद्रियांना न अनुभवता येणारे शुद्ध बुद्धि, वृत्ति गम्य 'आत्यंतिक सुख' अनुभवणारा योगी परमात्म वस्तूपासून कधीही ढळत नाही. हे योगाचे दिव्यत्त्व अनुभवण्याची वामनरावांची इच्छा त्यांना स्वस्थ बसू देईना. पुष्करला ब्रह्मानंदांकडे सर्व काही जमून आले होते. पण प्रकृतीने साथ दिली नाही म्हणून संधी हुकली होती. या विषयासंबंधी आपल्याला नेमके कोण मार्गदर्शन करू शकेल या विचारात वामनराव होते.

वामनरावांना योगाची एवढी आवड निर्माण झाली ती श्रीटेंबेस्वामींच्या-मुळे. स्वतः स्वामी उत्तम योगी होते. आसन-प्राणायाम-मुद्रा त्यांना उत्तम अवगत होत्याच पण ते इतरांना त्यांच्या त्यांच्या पात्रतेप्रमाणे मार्गदर्शनही करीत होते. या मार्गदर्शनाचा लाभ झाल्यामुळे तर वामनरावांना योगाची आवड लागली. लोक काहीही योगातले न समजताच अर्थाचा अनर्थ करून बसतात. 'हठ' योगाला 'हट्ट' योग म्हणणारे आणि समजणारे पुष्कळ आहेत. 'हठ' चा मूळ खरा अर्थ असा आहे की 'हकारः उच्यते सूर्यः ठकारश्च चंद्र उच्यते. 'ह' म्हणजे सूर्य नाडी आणि 'ठ' म्हणजे चंद्र नाडी. सूर्य चंद्र नाडीचे ऐक्य साधणे म्हणजे 'हठ' योग आहे. यासाठी कष्ट घ्यावे लागतात. ३।३ तास प्राणायाम म्हणजे किती कष्ट असतील हे करणाऱ्याशिवाय कोणाला कळणार ? ईश्वरप्राप्ती-साठी कष्ट होणारच. वामनरावांची अशी धारणा असल्याने त्यांनी या विषयाचा नाद काही सोडला नाही. त्यांना गुरुबंधू श्रीगोविंदस्वामी पंडित यांचा योगातील अधिकार मोठा असल्याचे आठवले.

वामनरावांनी श्रीगोविंदमहाराज पंडितांचा पत्ता पत्रे पाठवून शोधून काढला. ते सध्या होशंगाबादला असल्याचे समजले व पत्ताही मिळाला. त्या पत्यावर वामनरावांनी पत्र पाठवून आपली प्राणायामाने कुंडलिनी जागृत करण्याची इच्छा कळविली व आपले मार्गदर्शन व्हावे म्हणूनही लिहिले. वामनरावांचा आणि श्रीगोविंदमहाराजांचा पूर्व परिचय होताच. दोघेही श्रीटेंबेस्वामींचे शिष्य, म्हणून गुरुबंधूच होते. श्रीगोविंदमहाराजांनी पत्र पाठवून होशंगाबादला येण्याविषयी लिहिले. त्याप्रमाणे वामनराव होशंगाबादेस गेले. बरोबर आईला घेतले.

इ. स. १९२२ च्या भाद्रपद शु. ४, श्रीगणेश चतुर्थी आणि श्रीपाद-श्रीवल्लभांची जयंती. अशा शुभदिनी वामनराव मातेसह होशंगाबादला पोहोचले. होशंगाबादला खरी घाटावर श्रीसीतारामहाराज (श्रीटेंबेस्वामींचे बंधू) यांनी श्रीदत्तमंदिर स्थापन केले होते. या मंदिराचे बांधकाम, जागा इ. सर्व निर्माण करण्यासाठी व व्यवस्थेसाठी ग्वाल्हेर संस्थानने श्री. हणमंतराव फाळके यांना कारभारी नेमले होते. वामनरावांनी श्री. हणमंतरावांना पत्र पाठवून राहण्याच्या व्यवस्थेची सोय केली होती. वामनराव खरी घाटावरील श्रीदत्त मंदिरात आले. त्यांची राहण्याची सोय हणमंतरावांच्या स्वतंत्र खोलीत झाली. ईश्वरी योजना असली म्हणजे मानवी इच्छा योजनाही सुसूत्रपणे, निर्विघ्नपणे पार पडतात तसे हे झाले.

मग वामनराव गोविंदमहाराजांच्या भेटीला गेले. सर्व बोलणे झाले. दुसऱ्या दिवसापासून प्राणायामाच्या अभ्यासाला सकाळ-संध्याकाळ प्रारंभ झाला. त्यावेळी वामनरावांनी आपले गुरुबंधू श्रीशंकरकाका आजेगावकर यांनाही पत्र पाठवून अशा अशा उद्देशाने प्राणायामाच्या अभ्यासासाठी होशंगाबादला जात आहोत असे कळविले होते. जमल्यास तिकडे येण्याचेही लिहिले होते. त्या-प्रमाणे हिंगोलीहून श्रीशंकरकाका आजेगावकर आणि श्रीबाबा महाजन म्हणून एक योगाभ्यासी गुरुबंधू होशंगाबादला आले. तेही वामनरावांच्याकडेच उतरले. तेवढ्यात बार्शीहून वैद्यमास्तरही पुष्करला जाऊन श्रीब्रह्मानंदांना भेटून होशंगाबादला वामनरावांचेकडे आले. म्हणजे परमार्थाची खरी आवड असली की, गुरूबंधू कशी आणि किती धडपड करीत असतात हेच यावरून दिसते. एकमेका साहाय्य करू । अवघे धरू सुपंथ । असे खरे गुरूबंधू असतात.

होशंगाबादला आईला मुद्दाम बरोबर घेतले होते. पुष्करला खाण्याचे जे हाल झाले आणि चांगली संधी गमवावी लागली तसे आता होऊ नये. आईच्या हातचे अन्न मिळून काहीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी आईला बरोबर घेतले होते. ते अगदी योग्य असे घडले, त्याचबरोबर जिवाभावाचे गुरुबंधूंही संगतीला लाभल्याने सर्व काही मनोनुकूल असे झाले.

गोविंदमहाराज पंडितांकडे यावेळी नागपूरचे सबजज्ज श्री. सदाशिवराव परांडे येऊन राहिलेले होते. त्यांची वरच्या हुद्यावर येथे बदली झाली होती. त्यांचा व श्रीगोविंदमहाराजांचा पूर्व स्नेह होता. म्हणून सुरवातीला सदाशिवराव गोविंदरावांचे-कडेच उतरले होते. यामुळे वामनरावांचा आणि सबजज्ज सदाशिवराव परांडे यांचा परिचय व सहवासाने स्नेह निर्माण झाला. पुढे सदाशिवरावांनी स्वतंत्र

जागा घेऊन आपले बिऱ्हाड केले. हे सदाशिवराव सुद्धा या परमार्थाचे चिकित्सक अभ्यासू होते. त्यांचे वाचन दांडगे होते. यामुळे वामनरावांना एक चांगले अभ्यासू सज्जन भेटले.

वामनरावांचा होशंगाबादेतील दिनक्रम सुरळीत सुरू झाला. नित्याचे आन्हिक, सकाळ संध्याकाळ प्राणायामाचा अभ्यास, योग्य आहार, योग्य विहार, अनुकूल वातवरण यामुळे सर्वांना मानसिक समाधान होत होते. ध्येयवादी मनुष्याला ध्येयानुकूलता लाभली की, प्रसन्नता येते. अन्य गोष्टींचा, विचारांचा मनाला स्पर्शच नसतो.

**नियतीच्या अतर्क्य हालचाली : श्रीचिन्मयानंदस्वामी येथे आले !**

अवघड उदाहरण सोडवतांना उत्तर गृहीत धरून मागे मागे जावे लागते. तेव्हां ते उदाहरण सुटते आणि आनंद होतो. वामनरावांच्या जीवनातील योग-सिद्धीची धडपड हा असा एक कूट प्रश्न वाटतो, की या पूर्ण साक्षात्कारी गुरु असलेल्या व्यक्तीला योगसिद्धीची समस्या का पडावी ? हे त्यांचे अपूर्णत्व नाही का ? याचे उत्तर नियतीनें आधीच दिलेले आहे पण प्रकट केलेले नाही. रामाला राज्याभिषेक प्रसंगी वनात जावे लागणार हे नियतीचे उत्तर होते. पण प्रगट ऐनवेळी झालेले आहे. ईश्वरी सूत्रधारा म्हणजे नियती असते.

वामनरावांच्या हातून फार मोठा लोकोद्धार व्हावयाचा होता. म्हणून नियतीची चक्रे त्या दिशेने फिरत होती. नियतीने वामनरावांना होशंगाबादेस आणून का ठेवले ? त्याचे उत्तर म्हणजे श्रीस्वामीचिन्मयानंदांच्या जीवनपटाचा थोडा मागोवा घेऊन ते होशंगाबादेपर्यंत कसे आले ते पाहिले म्हणजे लक्षात येईल.

श्रीस्वामीचिन्मयानंदसरस्वतीचे पूर्वाश्रमीचे नाव योगेशचंद्र चक्रवर्ती. हे राहणारे बंगालमधील डाक्क्याचे. डाक्क्याच्या ढाकेश्वरीचे वंशपरंपरेचे पूजारी. लहानपणापासून विरक्त. वयाच्या २० व्या वर्षी घर सोडले. कालीकृपेने विशेष परिश्रम न पडता सद्गुरूंची भेट बंगालमध्ये चितलकोट येथे झाली. योगेशाचे सद्गुरूही ब्रह्मचारी असून योगेशपेक्षा फक्त दोनच वर्षांनी मोठे होते. पण अधिकार फार मोठा होता. त्यावेळी त्याच्या सद्गुरूंचे नाव श्रीआत्मानंदब्रह्मचारी होते. त्यांनी योगेशला नैष्ठिक ब्रह्मचर्याची दीक्षा दिली आणि अलौकिक अशा शक्तिपात योगाची ही दीक्षा दिली. यामुळे प्रत्यक्ष विविध अनुभूतींना प्रारंभ झाला. मग दोघेजण तेथून बंगालमधील विनोटिया गावी आले. तेथे

श्रीआत्मानंदांचे गुरू श्रीनारायणदेवतीर्थ म्हणून होते, त्यांचेकडे हे दोघे आले तेथे वर्ष दोन वर्षे सद्‌गुरू आणि परमगुरू यांच्या सहवासात अपूर्व योग योगेशला मिळाला. भरपूर गुरुसेवेचा लाभ मिळाला. मिळालेले गुरु आणि त्यांनी दिलेला साधनमार्ग अलौकिक, दिव्य, श्रेष्ठतम आणि प्रतिक्षणी अनुभव देणारा मिळाला. योगेश कृतार्थ झाला.

पुढे तेथून श्रीआत्मानंद आणि योगेशचंद्र ढाक्याला आले. योगेशने घरची निरवानिरव केली. आईची परवानगी घेतली. वडील पूर्वीच निवर्तले होते. तेथे ढाक्यातच स्वामी श्रीत्रिपुरलिंग सरस्वतींचा मोठा मठ होता. तेथे श्रीआत्मानंद सद्‌गुरूंच्या सांगण्यारून योगेशने संन्यास घेतला. तेव्हा त्यांचे नांव श्रीचिन्मयानंद सरस्वती ठेवले. तेथून हे दोघे म्हणजे ब्रह्मचारी गुरु आणि संन्यासी शिष्य काशीला आले. तेथ श्रीआत्मानंद राहिले आणि स्वामीचिन्मयानंद हिमालयात गेले. हिमालयात स्वामींची अपूर्व साधना झाली. टिहरीच्या जंगलात स्वामी एकांत वासात वर्ष दीड वर्ष होते. तेथे त्यांना साधनेत आदेश झाला “दक्षिणेकडे चल.”

स्वामींचे वय तीसचे होते. बंगालीशिवाय दुसरी भाषा येत नव्हती. तरी मोडके तोडके हिंदी नुकतेच बोलू लागले होते. पहिल्यांदाच एकटे बाहेर पडले. ‘दक्षिणेकडे चल’ या आदेशाप्रमाणे निघाले. कुठे ते माहित नाही. फक्त ‘दक्षिणेकडे’ एवढेच शब्द कानावर पडत. त्या आदेशाप्रमाणे ते मिरतजवळ हथरसला येऊन राहिले. तेथेही तेच शब्द कानावर येत होते. मग ते हथरस स्टेशनवर आले जवळ पैसा नाही. दक्षिणेकडे म्हणजे कुठे ते माहित नाही. अशा स्थितीत स्टेशनवर एक श्रीमंत गृहस्थ त्यांचेजवळ आला आणि स्वामींची चौकशी करून त्याला वाटले म्हणून होशंगाबादचे तिकिट काढून स्वामींना दिले. त्या तिकिटाच्या आधाराने स्वामी होशंगाबादेस आले. मंगळवार घाटावर एका खोलीत राहिले. नित्य साधना करावी. भिक्षा मागून आणून पोटाचा प्रश्न मिटवावा आणि दिवसभर खोलीत आसनावर बसून रहावे. ईश्वरीयोजना काय आहे याचा काहीही अंदाज नव्हता. पण ईश्वराचे संकेत ठरलेले होते. असे स्वामीचिन्मयानंद सरस्वतीस होशंगाबादेत आणून ठेवले.

**माता कुंडलिनीने आदेश दिला । स्वामी आता दक्षिणेस चला ।**
**येथील कार्यभाग संपला । जगदोद्धारा लागावे ॥**
**हाचि मंत्र नित्य साधनेत । माँ कुंडलिनी सांगे कानात ।**
**सतत सारखा येई मनात । दक्षिणेस आता चलावे ॥**

**आईचे शब्द प्रमाण मानूनी । स्वामी निघाले टिहरी सोडूनी ।**
**काही न येई ध्यानी मनी । कोठे जातो आपण ॥**
**आई मनी हासत होती । तिला नेण्याची घाई होती ।**
**विश्वसूत्रधाराची गती । पळवितसे आईला ॥**
**स्वामी विचारी आईला । कोठे नेतेस या वेड्याला ।**
**सोडू नको मम हाताला । धरून नेई कोठेही ।**
**स्वामीस आणिले हुशंगाबादेस । येथून लागे दक्षिण देश ।**
**कर्मभूमि मुख्य वेस । प्रवेशद्वार दक्षिणेचे ॥**

(अवतरणिका)

आता यापुढील घटना ही नियतीच्या लीलेने कसकशा घडत गेल्या 'ते सुद्धा मंत्रमुग्ध करणारेच प्रसंग आहेत.

**विश्व सूत्रधाराच्या नाट्यमय हालचाली–**

**विश्वमंचकाचा सूत्रधार । आहे खरा जादूगार ।**
**सर्व हालचाली करणार । पडद्यामागे लपोनी ॥**

विश्वसूत्रधाराने बार्शीतील महापुरुषाला होशंगाबादेत आणून ठेवले आणि हिमालयातील महापुरुषाला सुद्धा होशंगाबादेत आणून ठेवले. ईश्वरी ऋणानुबंध काय करतील हे मानवी कल्पनेच्या कवेत येणारे नसते. आता या दोन महापुरुषांची भेट गुरू-शिष्य नात्याने घडवून आणण्याची लीला–नियतीने सुरू केली.

वामनरावांचा आणि सबजज्ज सदाशिवराव परांडे यांचा स्नेह येथे नव्यानेच निर्माण झाला. स्नेह हा समान गुणधर्माने निर्माण होत असतो. सदाशिवराव हे रोज पहात होते की, वामनराव कुंडलिनी जागृत करण्याच्या उद्देशाने प्राणायामाचा अभ्यास करीत आहेत. केवळ याच उद्देशाने ते रजा घेऊन येथे येऊन राहिले आहेत. म्हणून सदाशिवरावांनी कुंडलिनी जागृतीचा एक अलौकिक मार्ग आहे हे वामनरावांना प्रमाण देऊन समजावून सांगितले.

सदाशिवरावांच्या वाचनात 'कुलार्णवतंत्र' हा तंत्रमार्गावरील ग्रंथ आला होता. त्यांच्या संग्रही ते पुस्तक होते. त्यामध्ये स्पष्ट लिहिले आहे की, अधिकारी गुरु वेधदीक्षा देऊन तात्काळ कुंडलिनी जागृत करू शकतो. पण त्या अधिकाराचा गुरु मिळाला तरच हे शक्य आहे. वामनराव-शंकरराव इ० ही स्नेही मंडळी हे विचार ऐकून घेत होते. पण मनातून त्या मार्गाची खात्री वाटत नव्हती. म्हणून या विषयावर त्यांची चर्चाही चालत असे. शास्त्रात तसा उल्लेख स्पष्टपणे आढळत

नाही. जो आढळतो तो गूढ स्वरूपात अशी ही चर्चा होती. विषय तर नियतीने पुढे आणून ठेवला. जिज्ञासा जागृतीचे हे महत्त्वाचे कार्य सुरू झाले.

सदाशिवरावांना हा विषय पुस्तकातून समजला होता. पण वामनरावांच्या प्रयत्नामुळे ते या विषयातील अधिकारी व्यक्तीच्या शोधात राहण्याच्या प्रयत्नास लागले. त्यांनी नारायण प्रसाद नावाच्या एम्. ए. एल्एल. बी, वकीलास सांगून ठेवले. कोणी बंगाली साधू संन्यासी भेटला तर माझ्या कानी घाला. होशंगाबाद हे नर्मदाकिनारी असल्याने तेथे साधू संन्यासी कोणत्या ना कोणत्या निमित्ताने येत असतात. नारायणप्रसादांकडे एक तरूण बंगाली संन्यासी भिक्षेला आले होते. त्यांना वाटले म्हणून ही बातमी सदाशिवरावांच्या कानी घातली. सदाशिवरावांनी मंगळवार घाटावर जाऊन त्या तरूण बंगाली स्वामींची भेट घेऊन आपल्या घरी भिक्षेला बोलावले. त्यावेळी कुडंलिनी जागृत करणारी कोणी अधिकारी व्यक्ती आपल्या पाहण्यात आहे काय? असे सदाशिवरावांनी स्वामींना विचारले. हा नेमका व अचूक प्रश्न ऐकून स्वामींना ईश्वरी लीलेचे आश्चर्य वाटले. व स्वामींनी निःसंकोचपणे सांगितले "मी स्वत.च वेध दीक्षा देतो." सदाशिवरावही मंत्रमुग्ध झाले. मग सदाशिवरावांनी स्वामींची परीक्षा घेण्याचे ठरविले. खरे खोटे समजले पाहिजे. नारायणप्रसादानांच सदाशिवरावांनी तयार केले व स्वामी कृपेचा पहिला अनुभव नारायणप्रसादांना मिळाला. एकूण माहिती व अनुभव एकून सदाशिवरावांना स्वामी अधिकारी असल्याचे पटले. तरी आणखी चारदोन मंडळींना तयार करून स्वामींच्याकडून वेधदीक्षा ध्यायला लावली. स्वामींनीही इश्वरीयोजना समजून फार ओढेवेढे न घेता दीक्षा दिल्या.

**"स्वामी प्रार्थना आहे एक। वेधदीक्षा देणारा ठाऊक।**
**असेल तर पुरवावी भाक। मी आहे जिज्ञासू॥**
**स्वामींची तार लागली। आतून आईची आज्ञा झाली।**
**सांग संधी भली आली। वेध दीक्षा देतो म्हणूनी॥**
**स्वामींनी निःसंकोच उच्चार केला। मीच देतो वेध दीक्षेला।**
**जागृत करतो कुंडलिनीला। घ्या केव्हांही अनुभव॥**
**रावबहाद्दूर सर्द झाले। शब्द ऐकताच गरगरले।**
**स्वतःला चाचपून पाहिले। हे स्वप्न तर नाहींना॥**
**स्वामी मुक्ता नगरीचे जवाहिरे। पसरून बसले मोती हिरे।**
**जाणारे येणारे घेणारे। पारखी कोणी आहेत का?॥**

**पुण्यसंपदा गाठी नाही । श्रद्धेच्या तर गावी नाही ।**
**जो तो या वेड्याला पाहि । स्वतःला शाहणा समजोनी ॥**
**स्वामींनी पाणी जोखले । काही मोती फुकट वाटले ।**
**कुबेराचे भांडार भरले । होते झोळीत स्वामींच्या ॥**
**विश्वगतीला वेग आला । मुक्याला शब्द फुटू लागला ।**
**पांगळा चालू लागला । चिन्मयानंद वाणीने ॥**

सदाशिवरावांनी ही बातमी वामनरावांच्या कानावर घातली व केवळ कुतुहल म्हणून ही सर्व मंडळी सदाशिवरावांच्या बरोबर संध्याकाळी मंगळवार घाटावर आली. नमस्कार झाला. परिचय झाला. वामनरावांचे निरीक्षण सुरू झाले. रोज संध्याकाळी स्वामींच्याकडे येणे सुरू झाले. या निमित्ताने दीक्षा घेतलेल्या साधकांचा अभ्यास पाहता येऊ लागला. परिचय होऊन बोलणे सुरू झाले. होता होता वामनरावांच्या मनात स्वामी व त्यांची ही विद्या यासंबंधी आस्था निर्माण झाली. तरी मनाने हे स्वीकारण्याची तयारी झाली नव्हती.

स्वामी या मंडळींची आस्थेने चौकशी करीत. त्यांच्याबरोबर संध्याकाळी नर्मदाकाठी फिरून येत. या सहवासातून आणि बोलण्यातून वामनरावांना स्वामींच्या प्रखर वैराग्य, साधनेचे तेज, बोलण्यातील शास्त्रशुद्ध विचार इ. गोष्टींचा चांगलाच प्रभाव पडू लागला. आस्थेची जागा आदराने घेतली. तरी दीक्षा-अनुग्रह मागण्याची तयारी नव्हती. स्वामीसुद्धा दीक्षा घेण्याचा विषय काढीत नव्हते.

असे पंधरावीस दिवस चालले. पुढे बाबा महाजनांना गावी जाण्याचा योग आला. बाबा महाजनांना दीक्षा घेण्याची इच्छा झाली. जाण्याच्या आदले दिवशी बाबांनी स्वामींना दीक्षा देण्याची प्रार्थना केली. पण स्वामी म्हणाले पुढे पाहू. दुसरे दिवशी सकाळी गावी जाण्यापूर्वी स्वामींचे दर्शन घेऊन जावे म्हणून ते मंगळवार घाटावर आले. स्वामींचे दर्शन घेताना स्वामी बाबा महाजनांना म्हणाले- "आत्ताच दीक्षा देतो. बैस त्या आसनावर" आणि अचानकपणे बाबांना दीक्षा झाली.

बाबामहाजन हे मोठे योगाभ्यासी. उत्तम शरीराचे. त्यांना दीक्षा होताच जोरजोरात क्रिया सुरू झाल्या. ते घामाने भिजले. पण मनाला फार आनंद झाला. शरीर हलके हलके वाटू लागले. बाबांचे साधन झाल्यावर ते स्वामींना नमस्कार करून परत आले. वामनरावांना दीक्षा झाल्याचे सांगितले. वामनरावांनी खूप प्रश्न विचारले. पण बाबा म्हणाले "मी आता पुनः बसतो. तुम्हीच बघा काय काय होते ते." बाबामहाजन तेथेच वामनरावांच्या समोर बसले. त्यांच्या पुनः क्रिया

सुरू झाल्या. वामनरावांनी सर्व काही निरीक्षण केले. तेव्हां त्यांची खात्री झाली. बाबा गावी गेले. वैद्यमास्तरही पंढरीच्या वारीसाठी गेले.

**बाबा महाजन योगी भले । दीक्षेसाठी आर्त झाले ।**
**जाता जाता पावन केले । दीक्षा देऊनी स्वामींनी ॥**
**बाबांचे अनुभव पाहोनी । वामनराव मनी पक्के करोनी ।**
**प्रार्थना करुनी स्वामी चरणी । घरीच आपुल्या आणिले ॥**
**लोक नेती हिरे मोती । हे मात्र स्वामीच आणिती ।**
**रत्नांची ती काय क्षिती । रत्नभांडारी तो खरा ॥**
**माल मुलुक श्रीहरी देत । परी हरीजन हरीच देत ।**
**जबर फरक ध्यानी घेत । आणिले सद्‌गुरू स्वामींना ॥**

## वामनरावांना स्वामींची दीक्षा

बाबा महाजनांचा प्रत्यक्ष अनुभव पाहिल्यावर वामनरावांची खात्री झाली की वेध दीक्षेने कुंडलिनी जागृत होते. स्वामी अधिकारी पुरुष आहेत. पुढे काय व्हायचे असेल ते होईल. पण आज स्वामींना आपल्याकडे घेऊन यावे असे वामनरावांनी मनाशी ठरविले. तसे आईला पण सांगितले. त्या साध्वीला परम आनंद झाला. 'संत येती घरा तोचि दिवाळी दसरा'

नेहमीप्रमाणे ही सर्व मंडळी स्वामींच्याकडे गेली. तेथे स्वामी पडून होते. प्रकृती ठीक नव्हती. मग सगळे तेथेच बसले. वामनरावांनी स्वामींना घरी येण्याची प्रार्थना केली. स्वामींनी होकार दिला व संध्याकाळी स्वामींना घेऊन दत्तमंदिरातील आपल्या घरी आले. संध्याकाळी शक्तिमाता घरी आली. आईने नमस्कार केला. स्वामींना बसायला आसन दिले. संन्याशांचे आचार माहित असलेले, संन्याशांची सेवा केलेले आणि भावभक्तीचे हे घर होते. स्वामींना येथे प्रकृतीला विश्रांती मिळाली. मनाला प्रसन्नता मिळाली. स्वामी इकडे आल्यापासून दीक्षा घेतलेले साधक इकडे येऊ लागले. जिज्ञासू इकडे येऊ लागले. स्वामींचा सर्व व्यवहार, नित्यक्रम, आवडनिवड, स्वभाव सर्व काही जवळून पाहण्याचा योग वामनरावांना आणि इतरांना आला. नित्य आदर व श्रद्धा वाढू लागली.

वामनरावांचा दिनक्रम ठरलेला होता. प्राणायामाचा अभ्यास नेटाने चालला होता. रोजचे अनुष्ठान चालू होते. स्वामींचा सहवास मिळत होता. वामनरावांच्या

मनात कसलीच शंका नव्हती. गुरु हे तत्व असते. ते कोणत्याही देहमाध्यमातून व्यक्त होत असते. ईश्वरी योजना असतात. ईश्वरी कार्य सुद्धा देहमाध्यमातून होत असतात. देणाऱ्याने सर्व काही दिले तरी देणे अखंड चालूच असते. घेणाऱ्याने थांबू नये, नाकारू नये. वामनरावांची निःशंक वृत्ती अशा विचारांनी आलेली होती. ते आपल्या सद्गुरूंना या नव्या रुपात पहात होते.

एकदा या काळात पहाटे वामनरावांना स्वप्न पडले. श्रीसद्गुरू टेंबेस्वामी स्वप्नात आले. म्हणाले, "ही विद्या दत्त संप्रदायाची आहे. आम्ही एकच आहोत. तुझ्या हातून मोठे कार्य करून घ्यावयाचे आहे. ही विद्या घे." एवढे बोलून स्वामी अदृष्य झाले. स्वप्न संपले. वामनराव जागे झाले. स्वामी जवळच आसनावर ध्यानस्थ बसलेले पाहिले. देवाला, गुरूंना, स्वामींना नमस्कार केला व आपल्या नित्य-क्रमाला लागले.

वामनरावांनी स्वामींजवळ विषय काढला "मला अनुग्रह मिळेल काय ?" स्वामी म्हणाले प्राणायामाचे चालू आहे ते बंद करून दीक्षा देणे बरे नाही. वेळ आल्यावर अनुग्रह मिळाल्याशिवाय राहणार नाही. तूर्त चालले आहे ते चालू दे, पुढे पाहू." वामनराव आतून स्वस्थ होते तसे बाहेरूनही स्वस्थच होते. वेळ आल्यावर दीक्षा होणार ही खात्री होती.

पुढे ४/५ दिवसांनी वामनरावांना पहाटे पुनः स्वप्न पडले. या स्वप्नात स्वामीचिन्मयानंदसरस्वती आले होते. म्हणाले "तुम्हे अभी अनुग्रह देता हूँ बैठो आसनपर." वामनराव आसनावर बसले. स्वामी जवळ आले. मस्तकावर हाताने स्पर्श केला आणि वामनरावांना जोरजोरात क्रिया सुरू झाल्या. साधन संपले आणि वामनरावांचे स्वप्नही संपले. पूर्वीच्या व आजच्या स्वप्नांचा उल्लेख केला नाही. स्वप्न खरे असेल तर प्रत्यक्ष अनुभूती येईलच. आपण तरी घाई कशाला करावी आणि प्रत्यक्ष स्वामी समोर असताना स्वप्नाने दीक्षा का ? अशा विचारांनी वामनराव सुद्धा ईश्वरीसंकेत स्पष्ट करून घेण्यासाठी गप्पच राहिले.

सर्वजण त्याच दिवशी संध्याकाळी नेहमीप्रमाणे स्वामींसह फिरायला गेले. पण स्वामींना मध्येच लहर आली. म्हणे आता घरी परत जाऊ स्वामी इच्छेप्रमाणे सर्वजण परतले. जो तो आपापल्या घरी गेला. स्वामी, वामनराव

आणि शंकरकाका आजेगावकर आपल्या मुक्कामी आले. घरात आल्या-बरोबर स्वामी वामनरावांना म्हणाले "वामन आज तुम्हे दीक्षा होगी. बैठो आसनपर," वामनराव गडबडले. नमस्कार सुद्धा करायचा विसरले. आणि बसल्या जागेवरच क्रिया सुरू झाल्या. तरी स्वामींनी छाटी सावरली आणि वामनरावांच्या जवळ आले. त्यांच्या शरीरावर मोठे मोठे श्वास सोडले. त्यांच्या मस्तकाला स्पर्श केला. मूलाधारापासून पाठीच्या कण्यावर हात फिरवीत आज्ञाचक्राला आंगठ्याने स्पर्श करून सहस्रावर हात ठेवला. आणि पलंगावर जाऊन बसले. आई आणि शंकरराव हे सर्व अगदी स्वस्थ बसून पहात होते.

वामनरावांची जोरात घूर्णा म्हणजे चक्राकार मान फिरायला लागली. जोरात भस्मिका सुरू झाली. एकाएकी हा प्रकार सुरू झालेला पाहून आई आणि शंकरकाकांना आश्चर्य वाटले. क्रियांचा वेग अति तीव्र झाला. विक्राळ गर्जना करणाऱ्या मेघमालांना क्षणार्धात चिरून टाकणाऱ्या तळपत्या विद्युल्लतेने जणू आकाशच फाडून टाकावे असा प्रचंड शक्तिसंचार झाला. मुसळधार पर्जन्यवृष्टीच्या ओघवत्या वर्षावाने सारी पृथ्वी जलमय करून टाकावी, तसे झाले. पर्वतप्राय उसळणाऱ्या सागरी लाटांनी आकाश-पाताळ एक करून टाकले. साऱ्या ब्रह्मांडाला घुसळून काढणारी महान शक्ति आज स्वामीकृपेने, वामनरावांची जागृत झाली. हेच गुरूकृपेचे देणे असते. येथे इमारत फळाला येते.

वास्तविक अलिकडे सुरू केलेल्या प्राणायामाच्या अभ्यासाने वामनरावांची प्रकृति फार नाजूक झाली होती. शरीर फुलासारखे कोमल झाले होते. इतकी मोठी हालचाल करण्याची कुवत त्यांच्या शरीराची नव्हती. अशा स्थितीत शरीर घुसळले जात होते. पद्मासनाने पक्क्या झालेल्या आसनासहित त्यांचे शरीर, जागच्या जागी बेडकासारखी उसळी घेऊन, बसलेली स्थिती न मोडता, उडी घेऊन, आपटत होते अक्षरशः ही उसळी जमिनीपासून फूट दीड फूट उंचीची होत होती. भस्त्रिका नागाच्या फुत्काराप्रमाणे होत होती, सारे शरीर घामाने निथळून निघाले होते. शक्ति संचाराचे हे स्वरूप संत कबीराच्या दोह्यात फारच समर्पक आलेले आहे.

**गगन गरजी, बरसै अमी, बादल गहीर गभीर ।**
**बहु दिसी दमकै दामिनी भीजै दास कबीर ।।**

'आकाशात प्रचंड ढग गरजले. अमृताचा वर्षाव झाला. विजांच्या लखलखाटांनी दशदिशा प्रकाशित झाल्या आणि दास कबीर हे घामाने डबडबून ओले चिंब झाले आहेत."

ज्या कुंडलिनी शक्ति जागृतिसाठी एवढी धडपड आणि धावपळ केली ती केवळ एका निमिषार्धाच्या श्रीगुरुकृपा कटाक्षाने, जागृत होऊ शकते हा अभूतपूर्व अनुभव, वामनराव प्रत्यक्ष अनुभवीत होते. सद्गुरू कृपेचे सामर्थ्य अगाध नि आतर्क्य आहे हेच खरे !

**तिघेजण घरी आले । पलंगावर स्वामी बसले ।**
**वामनरावांना म्हणाले । घे दीक्षा आत्ताची ॥**

**वामनराव गडबडले । नमस्कार सुद्धा विसरले ।**
**होते तेथेच बसले । गुरूस्मरण करीत ॥**

**स्वामींनी छाटी सावरली । उभे राहिले करोनि साऊली ।**
**सहस्त्री ठेवून करकमली । सोडिलेश्वास जोरात ॥**

**कर्पास राशीस आग लागली । वामनमूर्ती उडू लगली ।**
**थड् थड् थड् कंप पावली । क्षण मात्र न लागता ॥**

**कुंडलिनीने मूलाधार सोडिले । मेरुदंड घुसळून काढिले ।**
**नागिणीने फुत्कार सोडिले । भस्त्रीका म्हणोनी योगीराज ॥**

**नागीण भरभर फणा हालवी । घूर्णा क्रिया तीच म्हणावी ।**
**मस्तक भूमीला टेकवी । योगमुद्रा ती होय ॥**

**झटपट आसने होऊ लागली । बंधमुद्रा मागे पडली ।**
**शक्ति आता उसळू लागली । फूट फूट उडे मेंढक ॥**

**क्रियांची कल्पना करवेना । काही करून आवरेना ।**
**खोली सारी पुरेना । गोंधळ घातला शक्तीने ॥**

**धुंदे कुंद चिन्मयानंद । पाहती पुत्रोत्सव आनंद ।**
**ऐसा एकचि पुत्र बेबंद । लोकनाथा आकळेना ॥**

**तासभरी साधन झाले । तेव्हा कुठे ते स्थिर झाले ।**
**नागिणीचे पिल्लू दडले । मूलाधारी जाऊन ॥**

**हळू हळू कंप सरला । लोचनी महापूर लोटला ।**
**कंठ सद्‌गदीत जाहला । वामनराव गुळवणींचा ॥**

**जागेवरून ताडकन् उठले । स्वामी चरण घट्ट पकडिले ।**
**गरम श्वास त्यावरी सोडिले । कृतज्ञता म्हणोनी ॥**

नाही दक्षिणा नाही फल । गुरुकृपेचे कैसे फल ।
रिक्त हस्ता लाभेल । म्हणोनी क्षमा मागितली ॥
स्वामींनी पाठ थोपटली । आपुली दीक्षा आठविली ।
सद्‌गुरु कृपा साठविली । मोकळी केली तेधवा ॥
जात आमुची श्रीगुरुची । सदा देत राहण्याची ।
काहीएक न घेण्याची । दत्त आमुचे गुरुदेव ॥
वामनराव गद्‌गदित झाले । दत्त दत्त म्हणत राहिले ।
रोमांच बाष्प अंगी दाटले । फाटला पडदा मायेचा ॥
बोलावे काय कळेना । द्यावे काय कळेना ।
करावे काय कळेना । मुक्याने गूळ चाखिला ॥

इ. स. १९०९ साली, पवनीला, अनंतचतुर्दशीचे दिवशी, श्रीवासुदेवानंद-सरस्वतीस्वामीमहाराजांचा अनुग्रह ज्या उमामातेच्या साक्षीने झाला त्याच माते समक्ष आज वामनरावांना शक्तिपात योगविद्येचा अनुग्रह झाला. वामनरावांचा आजचा आनंद शब्दातीत होता. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांच्या अभंगवाणीने तो आनंद व्यक्त होऊ शकेल—

आजि आनंद आनंद मनी भरला पूर्णानंद ॥१॥
वाचे बोलता तो न ये, बुद्धि बोध स्तब्ध राहे ॥२॥
चिन्मयानंद सद्‌गुरुरुपा पाहता हरल्या जन्मखेपा ॥३॥
तया माझा नमस्कार, जेणे हरलो आपपर ॥४॥
ते हे वासुदेव चरण, हृदयीं येता झालो धन्य ॥५॥

समोर पलंगावर स्वामी बसले होते. त्यांनी तेथूनच विचारले, “क्यों वामन हुओ कुंडलिनी जागृत ? बस्स ! धन्य हो ! तुम्हारा काम हो गया ! बहुत अच्छा साधन हुआ ।”

स्वामींच्या शब्दांनी वामनराव अधिकच संतुष्ट झाले. अनुग्रह होताना हार नाही, नारळ नाही, साधा नमस्कार सुद्धा नाही. काही जमलेच नाही. त्यावेळी वामनरावांच्या मनाला सुद्धा रुखरुख लागली. ते आसनावरून उठले आणि त्यांनी स्वामींच्या परमपावन चरण कमलावर मस्तक ठेवले. साष्टांग नमस्कार घातला. कृतज्ञतेने भारावलेल्या हृदयातून शब्द बाहेर येऊ शकत नव्हता. श्रीचरणावर बराच

काळ ठेवलेले मस्तक हृदयाचे सर्व भाव सांगत होते. स्वामींनी वामनरावांची पाठ थोपटली. मस्तक कुरवाळले आणि म्हणाले "उठो वामन ! तुम्हारा कल्याण हो गया !"

आज वामनराव अशा दिव्य धुंदित होते की ते शब्दही बोलू शकत नव्हते. स्वामी सुद्धा अशा दिव्य आनंदात होते की, त्यांच्या जवळच्याच या दिव्य साधन रत्नाची पारख नि मोल करणारा अपूर्व रत्नपारखी मिळाला होता. आता या विद्येचे खरे चीज होणार याची जाणीव होत होती. स्वामींना आज कर्तव्य संपन्न पुत्र प्राप्तीचा आनंद होत होता.

## स्वामींच्या बरोबर छोटी तीर्थयात्रा करून वामनराव बार्शीस परत.

लोकोद्धारासाठी महापुरुषांना ईश्वरी योजनेनुसार विशेष विद्याप्राप्त होत असतात. राम-कृष्णांना धनुर्विद्या-अस्त्रविद्या शिकाव्या लागल्या. कार्याच्या स्वरुपा-प्रमाणे त्या महापुरुषांचे जीवन घडत असते. हेतू आणि कार्य ठरले म्हणजे ईश्वरच निमित्त म्हणून नरदेहधारी होतो हा सिद्धांत आहे.

वर्तमानकाळात सर्वबाजूंनी मानवी मांगल्याची मूल्ये ढासळताना दिसतात. आजचा मनुष्य या मूल्यांकडे दुर्लक्ष आणि उपेक्षा करून भौतिक समृद्धीच्या मागे धावत सुटला आहे. अशा काळात देवा-धर्मावर विश्वास ठेवणे कोतेपणाचे समजले जाते. हा काळाचा प्रभाव आहे. नुसत्या तात्विक सिद्धांतांना अव्यवहार्य म्हणणारे अनेक आधुनिक पंडित आहेत. भावभक्तीला भोळी अंधश्रद्धा म्हणून, उपेक्षा करून, निष्क्रीय ठरवले आहे. कर्माला—सदाचाराला—वर्णाश्रमाला तर कालबाह्य ठरवून, जीवाचे स्वातंत्र्य हिरावून घेणारे साधन मानून, आजचे जग स्वैर-स्वातंत्र्याचे उपासक बनले आहे.

ही सामाजिक अवस्था मानवाला द्रुतगतीने अधःपतनाच्या खोल दरीत लोटीत असताना, वर्तमान युगात ही शक्तिपात विद्येची संजीवनी आपल्याला प्राप्त होत आहे. विश्वात्म्याच्या अनंतशक्तीचे दिव्य अनुभव देणारी ही विद्या आहे. भारतवर्षामध्ये महापुरुषांनी आपल्या अमोघ तपःशक्तीने आजही अनेक साधन-संप्रदाय अमृतावस्थेत ठेवलेले आहेत. या साधनेने असाध्य ठरलेल्या व्याधींचे उप-

शमन होते. विकारी चित्तातले मालिन्य कमी होऊन भावसंशुद्धि होते. अन्तः-शुद्धि हीच खरी राष्ट्रसंरक्षक व संवर्धक शक्ति आहे. ती शक्ति महापुरुषांच्या कृपाकटाक्षाने, विशेष साधनद्वारा पुण्यशाली जीवांना लाभते. मनाचे नित्य समाधान हाच खरा श्रेष्ठ योग आहे. 'परोहि योगः मनसः समाधि' असे भगवान श्रीकृष्ण सांगतात अशी ही राष्ट्र साधनरूप असणारी दिव्य व अमोघ योगविद्या भारताचा व तद्वारा विश्वाचाही अभ्यूदय साधण्यास अत्यंत उपकारक ठरणारी आहे यात संशयच नाही.

वामनरावांच्या जीवित कार्याचे हे स्वरूप ईश्वरनियोजित असल्याने त्यासाठी लागणारी ही दिव्य विद्या त्यांना प्राप्त झाली.

इ. स. १९२२ हे असे एकमेव वर्ष आहे की ज्यावर्षी वामनराव गुरुद्वारशीस वाडीस गेलेले नाहीत. अडचण होती, प्रकृती ठीक नव्हती, पैसा नव्हता अशातला कोणताही भाग नव्हता. इ. स. १९१३ मध्ये ते गरुडेश्वराला श्रीसद्गुरूटेंबेस्वामींच्या जवळ होते. तेव्हाही ते अश्विनात गुरुद्वादशीसाठी गरुडेश्वराहून, आपल्या सद्गुरूंच्या सान्निध्यात, सेवा तत्पर व सेवारत असतानासुद्धा वाडीला गेले होते. म्हणून यावर्षी वाडीला न जाण्यात निश्चितच असामान्यत्त्व होते. तेथेच होशंगाबादेत राहण्यामध्ये ते निश्चित–निःशंक आणि निःसंकोच होते.

**वाडीची वारी कधी न चुकली । एकोणीसशे सातात सुरू झाली ।**
**पंधरा वर्षांनी प्रथम राहिली । इच्छा केवळ श्रीगुरूंची ॥**

होशंगाबादचे एकूण सर्व कार्य संपले. यंदाची दिवाळीही तेथेच झाली. नंतर वामनराव बार्शीला जाताना जवळपासच्या तीर्थक्षेत्री जाऊन येणार होते. स्वामींनीसुद्धा त्यांच्याबरोबर येण्याचे मान्य केले. यामुळे वामनराव, त्यांची आई आणि शंकरराव स्वामीं सह तेथून निघाले.

सर्वजण प्रथम औरंगाबादेस आले. तेथून बैलगाडीने दौलताबादेस गेले. तेथे संत एकनाथांचे गुरू जनार्दनस्वामी यांच्या स्थानाचे दर्शन व माहिती घेतली. नंतर वेरूळ अजिंठा या कलाप्रसिद्ध स्थानांकडे ही मंडळी गेली. वामनरावांनी तेथील कलांचे रसग्रहण कलाकाराच्या दृष्टीकोनातून केले. यामुळे या

जगप्रसिद्ध कलेची मार्मिकता सर्वांच्या लक्षात आली. येथून सर्वजण 'घृष्णेश्वर' या ज्योतिर्लिंग स्थानी गेले. स्थानाची रम्यता पाहून स्वामी तेथे चांगलेच रमले. या शिव-स्थानात सर्वांनी पूजा अभिषेकादि केले आणि साधनाही केली. अशा सिद्ध स्थानात साधनेला उत्तम तीव्रता येते. हा सर्वांनी अनुभव घेतला. येथे सर्वांनी २/३ दिवस मुक्काम केला. येथून स्वामी. शंकरकाका आजेगावकर यांच्या हिंगोली गावी गेले. तेथेही सर्वांनी २/३ दिवस मुक्काम केला. शंकररावांनी मोठ्या श्रद्धाभक्तीने स्वामींचे आदरातिथ्य केले. तेथून हे चौघेजण बैलगाडी करून औंढ्या नागनाथला जाऊन आले. बैलगाडी शंकरकाकांची घरची होती. हिंगोलीला श्रीदत्तात्रयांचे नवीन मंदिर नुकतेच झाले होते. मार्गशीर्ष महिना होता. वामनरावांनी तेथे १०/१५ दिवस मुक्काम केला. त्यामुळे स्वामीही तेथेच राहिले. दत्तजयंती निमित्त श्रीगुरुचरित्राचे सप्ताह पारायण वामनरावांनी केले. दत्तजयंतीचा उत्सव उत्तम झाला. पारणेही यथासांग केले. ही सर्व मंडळी श्रद्धावान, आचारसंपन्न व शास्त्रनिष्ठा पाहून स्वामींना संतोष झाला. स्वामी तेथेच थांबले.

वामनराव आईला घेऊन बार्शीला आले. वामरावांना प्रवास आणि तीर्थयात्रा याची फार आवड आहे. श्रीदत्तप्रभूंचा हा गुण आहे. हिंगोलीहून वामनराव निघाले ते पूर्णा, पिंपळी, गंगाखेड, परळीवैजनाथ आणि आंबेजोगाई या स्थानी जाऊन बार्शीस आले.

इकडे स्वामी नंतर हिंगोलीहून अमरावतीस सदाशिवराव परांडे यांचेकडे गेले. त्यावेळी रावबहाद्दूर परांडे यांनी स्वामींना विचारले "स्वामीजी आपण आजपर्यंत जितक्या दीक्षा दिल्या आहेत. त्या सर्वांमध्ये वामनरावजींच्यावर जेवढा विशेष सुपरिणाम दिसतो तेवढा कोणावरही दिसत नाही, हे खरे आहे का ? असे का ? यावर स्वामींनी उत्तर दिले "होय ते खरे आहे. कारण पूर्वसंस्कार बलवत्तर असल्याने आचरण अत्यंत शुद्ध रहाते. आचरण शुद्ध असल्याने शुद्ध शरीर व स्वच्छ मन शक्तिसंचारास फार अनुकूल असते. त्यामुळे विशेष अनुभव आलेले दिसतात."

वामनरावांचे बार्शीतील जीवनात नवीन विद्येची भर पडली. मित्रमंडळींशी हा नवा विषय, नवी विद्या, शक्तिपात, वेद दीक्षा, महायोग साधना, स्वामी चिन्मयानंदांच्या आठवणी इ. प्रकारे वामनरावांच्या बोलण्यात येऊ लागला. सर्वांचे कुतूहल वाढू लागले.

## स्वामी चिन्मयानंद बार्शीत प्रथम

स्वामी हुशंगाबादेत व वामनराव बार्शीत असताना उभयतांचा पत्रव्यवहार होत होता. इ. स. १९२२ च्या अखेरीस वामनराव दीक्षा घेऊन बार्शीस आले. इ. स. १९२३ साल हे उभयतांच्या पत्र–संबंधाचे होते. स्वामींच्या प्रकृतीची काळजी वामनरावांनी एका पत्रात व्यक्त करून विश्रांती घेण्याची प्रार्थना केली होती. त्यावर स्वामींचे उत्तर आले –

" माझी कसलीही काळजी आपण करू नये. कारण मी चतुर्थाश्रमी संन्याशी आहे. जगणे आणि मरणे या दोन्ही गोष्टी आम्हा संन्याशांना सारख्याच आहेत. आम्ही संन्याशी दृश्य–स्थूल–प्रपंचापासून थेट महत् तत्त्वापर्यंतचा सारा प्रपंचच त्रिकालबाधित असल्याने, सर्वच काही मिथ्या मानतो; तर या शरीराची उत्पत्ती स्थिती आणि नाश याबद्दल आपत्ती कशी वाटणार ? मला कशाचीही इच्छा नाही. प्रारब्धाने या देहामुळे जे काही सुखदु:ख वाटयाला आले आहे ते बिनतक्रार भोगू शकणे हेच मी सर्वात मोठे साधन समजतो. मी आनंदात आहे. आपण संतोषाने साधनतत्पर रहावे. "

स्वामींच्या तेजस्वी विचारांनी वामनरावांना धन्यता वाटत असे. दोन्ही गुरूंच्या स्वभावांत फरक, पण दोघांच्याही विचारांची बैठक अग्नीसारखी प्रखर होती. या साम्यतेने धन्यता वाटत असे. एकाने स्थिती दिली, तर एकाने गती दिली. स्थितीने स्थिर केले तर गतीने लोकोद्धाराचे व्याप वाढविले. आधी स्थिर आणि मग गती हे महापुरुषत्व. ' आधी केले मग सांगितले ' – समर्थ.

वामनरावांनी स्वामींना बार्शीला येण्याची प्रार्थना, पत्रात केली. हुशंगाबादहून केव्हा निघायचे, बार्शीचे हवामान अनुकूल आहे. दौंडवर भास्कर भागवत म्हणून माझा विद्यार्थी उतरवून घेईल. भास्कर भागवतालाही वामनरावांनी स्वामींची माहिती कळविली – कमंडलूचे चित्र काढून दाखविले. ' योजकस्तत्र दुर्लभः । ' येथे मात्र योजकाने सर्व योजना सुलभ करून ठेवल्या. त्याप्रमाणे जानेवारी १९२४ मध्ये स्वामी दौंडवरून बार्शीला ठरल्याप्रमाणे आले.

मास्तरांचे गुरु येणार म्हणून बार्शीकरांना केवढे कुतूहल !

त्यातून तरुण संन्यासी, बंगालातील म्हणून बंगाली ! हिमालयातील म्हणून तपस्वी! कुंडालिनी जागृत करणारे मास्तरांचे गुरु येणार म्हणून सर्वजण त्यांच्या दर्शनाला अधीर झाले होते. स्वामी आल्याची वार्ता गावात पसरताच जो तो दर्शनाला येऊ लागला. वामनराव, प्रल्हाद शास्त्री, वैद्यमास्तर, गावातील इतर मंडळी स्वामींच्या स्वागतासाठी हार घेऊन स्टेशनवर गेली होती. भास्करबरोबर स्वामी डब्यातून खाली उतरले. वामनराव पटकन पुढे झाले. स्वामींच्या गळयात पुष्पमाला घातली, पायावर मस्तक ठेवून वंदन केले. वामनरावांची ही श्रद्धा पाहून सर्वांनी श्रद्धेने हार घातले, वंदन केले. वामनरावांचा लोकसंग्रह स्वामींच्या नजरेत भरला. सर्वजण आनंदाने घरी आले. तो घरीही दर्शनासाठी मंडळी येऊन थांबली होतीच.

> **स्वामी जसे आत आले । शिष्य श्रेष्ठत्व कळों आले ।**
> **सद्गुणांचे भांडार दिसले । वामनरावांच्या अंतरी ॥ १ ॥**
> **जो तो त्यांना मान देई । त्यांच्या शब्दाबाहेर नाही ।**
> **सद्गुण सुगंधाच्या जाई जुई । मोवती वामनरावांच्या ॥ २ ॥**
> **विचारशुद्ध आचारशुद्ध । क्रियाशुद्ध वर्तनशुद्ध ।**
> **आतबाहेर शुद्धच शुद्ध । स्फटिक कर्पुरा लाज वाटे ॥ ३ ॥**

स्वामी बार्शीत आल्याने त्यांना वामनरावांच्या गुणसंपदेची कल्पना आली. असा हा दिव्य शिष्य भेटला । गुरुस आदर वाटावा ॥ अशी स्वामींची स्थिती झाली. वामनरावांच्या आईंचा स्वामींना परिचय होता. हुशंगाबादेला त्या अन्नपूर्णेच्या हातच्या अन्नाचा स्वामींनी आस्वाद घेतला होता. आईंनी स्वामींना नमस्कार केला. भगिनी गोदावरीने नमस्कार केला. तेव्हा वामनरावांनी तिच्याबद्दल स्वामींना सांगितले.

स्वामींचे बार्शीतील हे पहिले वास्तव्य सुमारे २।२।। महिने होते. खरा शिष्य भेटला म्हणजे गुरूंना केवढा आनंद होतो ते स्वामींच्या येण्याने आणि मुक्कामाने स्पष्ट होते.

बार्शीमध्ये वामनरावांच्या स्नेहीमंडळींचा आणि स्वामींचा परिचय होऊ लागला. श्री. वैद्यमास्तर, श्री. प्रल्हादशास्त्री यांचा जवळून सहवास घडला. ही पारमार्थिक जीवनध्येयदृष्टीची मंडळी होती. समानशीलाची

आणि समान धर्माची वृत्ती स्नेह निर्माण करते. म्हणून वामनरावांचे हे स्नेही झाले. प्रल्हादशास्त्री वेदांती होते, तर वैद्यमास्तर वारकरी होते. परमार्थाच्या सिद्धान्तामध्ये एकवाक्यता असल्याने परस्परांत अभेद होता. वामनराव योगी आणि गुरुभक्त होते. त्यामुळे तर त्यांच्या आचार-वर्तनात सारे सिद्धांत कृतीने वावरत होते. म्हणून त्यांच्याबद्दल सर्वांना अतीव आदर होता. वामनरावांचे गुरु आले आहेत हा विषयच बार्शीकरांना भक्तीभावाने लववीत होता. मास्तर आपल्या गुरूंशी कसे वागतात, बोलतात, त्यांची सेवा कशी करतात हे पहात होते. शब्दापेक्षा कृतीचा प्रभाव फार मोठा असतो.

वामनराव, स्वामींची प्रसन्नता राखण्याकडे अत्यंत दक्ष असत. त्यांच्या सहवासात पहाटेची साधना करीत. सकाळी देशपांडे यांच्या आडावर स्वामींना स्नानाला घेऊन जात. स्वत: पाणी काढून देत. मनसोक्त पाणी मिळाल्याने स्वामी संतुष्ट होत. त्यांच्या छाटचा-लंगोटचा वामन-राव काटाकाळजीने धूत–वाळत टाकत. नेहमी त्यांच्याबरोबर रहात असत. आचारधर्मात तर कोठेही उणीव नसे. भोजन–भिक्षेच्या वेळेचे नियम सहजतेने पाळले जात. माता उमा स्वामींना हवे ते पदार्थ करून वाढीत असत. सायंकाळी स्नेही मंडळींबरोबर वामनराव स्वामींनाही फिरायला नेत असत. ही मंडळी स्वामींच्या भेटीसाठी वामनरावांच्या घरी येत असत. त्यावेळी विविध विषयांवर चर्चा होत असे.

'जीवन्मुक्तीविवेक' ग्रंथ स्वामींना हवा होता. वामनरावांनी तो मिळवून स्वहस्ते लिहून काढून स्वामींना दिला. त्या ग्रंथाचा अभ्यास वामनरावांचा, वैद्यमास्तरांचा आणि प्रल्हादशास्त्रींचा, स्वामींच्या मार्ग-दर्शनाखाली झाला. परमार्थ कसा करावा, परमार्थाची पात्रता कशाने येते याचा आचारधर्म म्हणजे जीवनमुक्तीविवेक हा ग्रंथ आहे. परमार्था-तील परम अवस्था त्यामध्ये स्पष्ट दाखविली आहे. मुमुक्षू या एकमेव ग्रंथाच्या अध्ययनाने चिंतनाने–मननाने परमस्थिती समजून घेऊ शकेल. हे सांगून स्वामी म्हणत "आपले शक्तिपात साधन ही परम स्थिती तीव्र गतीने देऊ शकते. प्रश्न साधकाच्या दृढ अभ्यासाचा आहे. नियमित–भरपूर–साधना केली पाहिजे."

या काळात स्वामींनी मुगुटकर वकील, नारायणराव पुरंदरे आणि

श्रीमती गोदावरीबाई (वामनरावांच्या भगिनी) यांना दीक्षा दिल्या. स्वामींच्या इच्छेप्रमाणे वामनरावांनी त्यांना पंढरपुरला नेले. श्रीपांडुरंगाचे दर्शन झाले. तेथे एकदा स्वामींच्या समोर बसले असता वामनरावांची साधना एकाएकी तीव्रतम झाली होती. स्वामींनी ती शांत केली. २।३ दिवसांनी सर्वजण बार्शीस आले.

बार्शीच्या या काळात बापू कुबडे विद्यार्थी होते. त्यांनी स्वामीं-जवळ दीक्षेची प्रार्थना केली तेव्हा स्वामी म्हणाले, " वामन, तुम इनको देख लो. " म्हणजे यावेळेपासूनच वामनरावांनी दीक्षा द्यावी अशी स्वामींची इच्छा दिसून येते.

वामनरावांचे कोल्हापुरचे स्नेही वे. शा. सं. वामनशास्त्री गड-हिंग्लजकर यांना दीक्षेसाठी बोलावून घेतले होते. त्यांनाही स्वामींनी दीक्षा दिली. पुढे फाल्गुनामध्ये स्वामी बार्शीहून उज्जयनीस गेले. तेथून उभयतांचा पत्रव्यवहार सतत चालू होता.

## वामनरावांना दीक्षागुरुत्व

बार्शीच्या प्रल्हादपंतांच्या पत्नी या भाविक-सात्त्विक होत्या. त्यांना दीक्षेची तीव्र ओढ लागली. त्यांनी वामनरावांकडून उज्जैनीला स्वामींना पत्र पाठविले. त्याचे उत्तर देताना स्वामींनी लिहिले की –

' शास्त्रीजी की अनुज्ञा लेकर उनकी स्त्रीको तोम दीक्षा देना । वामन । मैंने तुम्हे दीक्षा गुरुत्व दिया है । तुमही शुभ दिन सौ. गोपिका-बाईको दिक्षा दो ।

' प्रातःकालमें स्नानादिक कर्म के अनंतर इष्ट देवताको वंदन करके, माला, श्रीफल, दक्षिणा समर्पण करके उन्हें आसन पर बैठनेको कहो । पासमें एक आसनपर तुमभी साधन के लिए बैठो । जो होगा सो लिखना । '

स्वामींच्या अशा उत्तराची अपेक्षा वामनरावांची नव्हती. आप-ल्याला दीक्षागुरुत्व मिळावे असे त्यांच्या ध्यानी-मनी-स्वप्नीही नव्हते. पण अधिकारानुरूप कार्य घडत असते. लीनतेत गुरुत्व असते. वामन-रावांचा स्वभाव अतिविनम्र–लीन असल्याने स्वामींनी स्वतःहून त्यांना गुरुत्वाचे अधिकारी केले. बाकी आचार–व्यवहाराच्या विशुद्धपणाची

खात्री स्वामींना बार्शीतच आली होती. स्वामींचे पत्र वामनरावांनी पुनः पुनः वाचले. ईश्वराची इच्छा वेगळीच दिसते. शक्तिजागृतीसाठी विशुद्धसंकल्प लागतो, हे जाणवले. पण ही परंपरा आहे. या शक्तिपात विद्येची ही परंपरा एवढी प्रभावी आहे, की याचा अनुभव जसा शिष्याला येतो तसा गुरूलाही येतो. स्वामींच्या कृपेने आपण कुंडलिनी जागृतीचा अनुभव घेतला, अनेकांनी घेतलेला आपण पाहिला. सर्व काही आश्चर्य वाटण्यासारखे घडलेले आपण अनुभवले. आता नवीन अनुभव स्वामी देऊ इच्छितात. ईश्वराची इच्छा असेल तर तोही अनुभव घेतला पाहिजे, असे विचार वामनरावांच्या मनात येत होते. पत्राप्रमाणे सौ. गोपिकाबाईंना सांगितले. प्रल्हादशास्त्रींना सांगितले. दोघांनी त्यांची संमती घेतली, आणि दीक्षेचा दिवस ठरविला.

ज्या दिवशी पवनीच्या चातुर्मासात श्रीटेंबेस्वामींनी वामनरावांना मंत्रदीक्षा दिली, तो अनंत चतुर्दशीचा दिवस या दीक्षेसाठी निश्चित केला. १२ सप्टेंबर १९२४ हा तो दिवस होता. वामनरावांनी आपले स्नानादि आन्हिक उरकले. सौ. गोपिकाबाई स्नान करून पतिदेवांना नमस्कार करून वामनरावांच्या घरी आल्या. वामनरावांना–देवाला नमस्कार केला. देवाला हार घातला. श्रीफल दक्षिणा ठेवली.

वामनरावांनी त्यांना आसनावर डोळे मिटून बसावयास सांगितले. स्वतः आपल्या आसनावर जाऊन बसले. इकडे सौ. गोपिकाबाईंना कंप सुरू झाला. त्याही आसनावर जाऊन डोळे मिटून बसल्या. तेवढ्यात वामनरावांच्या क्रियांचा जोर वाढला. ते आपल्या आसनावरून उठले. तेथेच ताठ उभे राहिले. त्यांचा श्वासोच्छ्वास तीव्र गतीने सुरू झाला. बाहु स्फुरण पावू लागले आणि त्या भावस्थितीत वामनराव सौ. गोपिकाबाईंच्या जवळ जाऊन उभे राहिले. श्वासोच्छ्वासाचे फवारे बाहेर पडत होते. वामनरावांचा उजवा हात लांब झाला आणि त्यांनी तो सौ. गोपिकाबाईंच्या मस्तकावर ठेवला. अग्नीच्या सान्निध्याने अनुकूल वस्तू पेटते त्याप्रमाणे झाले. श्वासाच्या फवाऱ्याने–हस्तस्पर्शाने सौ. गोपिकाबाईंचा अन्तःस्थ शक्तिपुंज प्रज्वलित झाला. तात्काळ त्यांच्या क्रियांचा जोर वाढला. वामनराव आपल्या आसनावर येऊन बसले. त्यांच्या बाह्य क्रिया शांत झाल्या. अन्तस्थ अवस्था मात्र भावसंचारी

होती. सौ. गोपिकाबाईंच्या क्रिया तीव्रतेने होऊ लागल्या. चेहऱ्यावर दिव्य तेज आले. प्रसन्नतेची प्रखरता आली. तासाभराने त्या शांत झाल्या व त्यांचे डोळे उघडले गेले. सारी खोली शांत वाटत होती. चैतन्याने भारावलेली होती. तोंडातून शब्द बाहेर फुटत नव्हता. दिव्यानंदाच्या अनुभूतीने अंःतकरण भरून गेले होते. वामनरावच म्हणाले, ‘ स्वामींची कृपा झाली. छान झाले. ’

हा अधिकार ही क्षणात प्राप्त होणारी स्थिती नसते. त्यासाठी जन्मच्या जन्म ईश्वर-उपासना व्हावी लागते. पूर्वीची उपासना-पुण्याई दिसत नसते. आता दिसतो अधिकार. ईश्वरी सत्तेचे अधिकार आणि लौकिक व्यवहारातील अधिकार यांत महदंतर असते. लौकिक अधिकार पापकर्मानेही प्राप्त होऊ शकतात. ते कावळ्याच्या छत्रीसारखे, पाण्यावरील बुडबुड्यासारखे क्षणिक असतात. परमार्थातले अधिकार निखळ पुण्याईशिवाय प्राप्त होऊ शकत नाहीत. एकदा मिळाल्यावर ते अक्षय टिकतात. लौकिक दृष्टीने परमार्थातील अधिकार दाखविणारेसुद्धा कालांतराने निष्प्रभ झालेले दिसतात. वामनरावांच्या जीवनाचा विचार करता असे स्पष्ट दिसते की, त्यांचा अधिकार असामान्य प्रतिपरमेश्वराचा अधिकार होता. ईश्वरइच्छेने, स्वामीकृपेने आज वामनराव गुरुदेवांच्या राजसिंहासनावर विराजमान झाले. आज त्यांच्यावर गुरुत्वाचा अमृताभिषेक झाला. परमार्थाच्या विशाल साम्राज्याचे ते सम्राट झाले. गुरूची गुरुत्वशक्ती प्राप्त होणे सर्वांच्या नशिबी नसते. सर्वच राजपुत्र राजे होत नसतात.

महाराजांनी सौ. गोपिकाबाईंची दक्षिणा रु. दोन म. ऑ. ने श्रीसद्गुरु स्वामींना उज्जयिनीस पाठवून दिली. ज्यांच्या कृपेने कार्य घडले त्यांचा त्या दक्षिणेवर अधिकार आहे, त्यात माझे काही नाही ही विशुद्धवृत्ती होती म्हणून व्यवहारही तसाच घडला. अन्तःकरणातील वृत्ती, मुखातील शब्द आणि कृति सुसंगत—सुसंवादी असेल तर साधुत्व आहे. स्वामींना दीक्षेचे वृत्त कळविले. कृपेची कृतज्ञताही व्यक्त केली. स्वामींनी उत्तर पाठवून कळविले, ‘ ती दक्षिणा तुमचीच आहे, मला पाठविण्याची गरज नाही. आज पाठविली आहे तर ठेवून घेतो. पुढे लक्षात ठेवावे. ’

## 'कुरुगड्डी' ला प्रथम भेट (१९२१)

बार्शीत येऊन चार वर्षे झाली होती. त्या १९२१ सालातील ही घटना आहे. महाराज बापू कुबडे यांस बरोबर घेऊन कुरुगड्डीकडे निघाले. कृष्णा स्टेशनवर उतरले. तिकडे भाषा कानडी. तेव्हा स्टेशनमास्तरच्या मार्फत एक बैलगाडी कुरुगड्डीला जाण्यासाठी ठरविली व पहाटे कृष्णा स्टेशनवरून निघाले. पसपल गावातून कुरुगड्डीचा रस्ता वेगळा होता. गाडीवानाच्या हे लक्षात आले नाही. गाडी पसपलच्या पुढे १।१।। मैल गेली. त्या लहानशा गावाच्या वेशीजवळ गाडी उभी करून चौकशी करण्यासाठी थांबले. तेवढयात नदीवरून स्नान करून एक वैष्णव येत होता. त्याला महाराजांनी कुरुगड्डीचा रस्ता विचारला. त्याने हे स्मार्त आहेत असे समजून चुकलेल्या रस्त्याची वाट सांगितली नाही. उलट स्नानानंतर स्मार्तांचे दर्शन झाले, या पापक्षालनासाठी तो तसाच परत गेला व पुन: नदीत बुडी मारून लांबून गावात गेला. साधन मार्गात संप्रदायाचे संकोचित्व आले म्हणजे व्यवहारातही संकुचित भाव येतात. हा दोष सर्वत्र नेहमी आढळतो. दोष साधनाचे नसतात, तर साधकाच्या वृत्तीचे असतात. एवढे लक्षात घेण्यासाठी असे प्रसंग उपयोगी पडतात.

महाराज यावेळी प्रथमच कुरुगड्डीस आले होते. बरोबर कॅमेरा घेतला होता. सूर्योदय–सूर्यास्ताचे, निसर्गदत्त सौंदर्याचे, देवाच्या महापूजेचे असे विविध फोटो यावेळच्या मुक्कामात महाराजांनी घेतले. कुरुगड्डीला दूध उत्कृष्ट, भरपूर व स्वस्त मिळत असे. याचा भरपूर उपयोग करून घेतला. काही दिवस तर दुधावरच काढले. रोज सकाळचे अनुष्ठान असे. जप–श्रीगुरुचरित्र पारायण, नित्याचे पोथी वाचन, नित्याचे अनुष्ठान कर्म, देवाला अभिषेक–पूजा इ. मध्ये सारी सकाळ जात असे. दुपारी भोजनानंतर विश्रांती घेऊन, तिसऱ्या प्रहरी बापूसह गुरुमहाराज अभ्यासासाठी एका गुहेत जाऊन बसत. ही एक निसर्गदत्त गुहा असून प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज जेव्हा चातुर्मासासाठी कुरुगड्डीला येऊन राहिले होते तेव्हा याच गुहेत समाधी लावून बसत असत. या गुहेत महाराज व बापू रोज तिसऱ्या प्रहरी येऊन बसत. नंतर नदीवर सायं-संध्या करून मंदिरात परत येत.

कृष्णामाईच्या प्रवाहात श्रीपादश्रीवल्लभांची सूर्यनमस्काराची

छाया असलेली एक प्रचंड शिला आहे. तिचे दर्शन घेत. तसेच नारायण गड्ड्यावर एक भला मोठा, तीन मजली इमारतीएवढा, उंच धोंडा असून त्यावर श्रीपादश्रीवल्लभांची स्वारी नित्य जाऊन बसे. तेथे हल्ली त्यांच्या पादुका आहेत. या धोंड्यावर चढण्यास एक लहानशी चिंचोळी-अवघड वाट आहे. तेथे फारसे कोणी जात नाही. श्रीटेंबेस्वामी तेथे जाऊन दर्शन घेत असत. महाराजांनीही कुरुगड्डीमधील वे. मू. नारायण देव यांना बरोबर घेऊन अवघड पाऊलवाटेचे मार्गदर्शन त्यांच्याकडून घेऊन या स्थानाचे बापूसह दर्शन घेतले. या धोंड्याच्या माथ्यावर जेथे पादुका आहेत तेथे १५।२० मंडळी बसतील एवढी सपाट जागा आहे. तेथून कृष्णेचे पात्र व भोवतालचा निसर्गरम्य प्रदेश फारच सुंदर दिसतो.

यावेळच्या कुरुगड्डीमधील आठवणी सांगताना महाराजांनी सांगितले, "ईश्वरभक्ती पूर्वसुकृताने निर्माण होते. जीव कोणत्याही कर्मात असतो तो त्याच्या प्रारब्धानेच असतो. त्याच्या चांगल्या-वाईट कर्मामुळे आपल्या मनात चांगले-वाईट भाव येतात. मी महिनाभर कुरुगड्डीत होतो. त्यावेळी तेथे एक साबू नायकीण सेवेला येऊन राहिली होती. पहाटे ४ ला उठायची आणि देवापुढे गायची. रागदारीत मधुर आवाजात गायची. तिची श्रद्धाभक्ती अशी होती की, पंचवीस वर्षे ती तेथे एकटी राहिली होती. बाईमाणूस. कुरुगड्डी म्हणजे एकांत स्थान. काही केलं तरी कळणार नाही. पण देवानं तिचं रक्षण केलं. अहो ! रोज न चुकता देवापुढे गाणं गायची. कधी तिचा नियम चुकला नाही. महिनाभर पाहिलं ना ! मनात आलं म्हणजे माणूस सर्व सोडून देतो. तेव्हा देवाकडून रक्षण मिळतं.'

वाडीलासुद्धा सरस्वती नायकीण सेवेला येऊन राहिली होती ना ! पहाटे चार वाजता देवापुढे गाणं म्हणायची ! अगदी पुजारी यायच्या आत ! पहाटे चार वाजता घाटावर एकांतात सेवा करायची सोपं नसतं. आणि अगदी नियमित हो ! वेळ आल्यावर देव घेतो करून !

स्वामी महाराजांच्या ( श्रीटेंबेस्वामींच्या ) काळात एक आवडी नायकीण सेवेला आली होती. मी पाहिलंय तिला. पायापर्यंत लांब केस होते तिचे. आधी वाडीला होती. अन् नंतर गरुडेश्वरला गेली होती, स्वामींची सेवा करायला. बाहेर लांब उभी राहून असायची. स्वामी

महाराजांनी हात धुतले म्हणजे उचिष्टशीत उचलून दूर टाकायची. ही सेवा स्वामींनी करू दिली म्हणून झाली. तसे स्वामी कडक होते. पण तिचे भाव कळत होते ना! लांबूनच पदे म्हणायची. अशा व्यवसायातल्या या स्त्रिया! पण त्यांच्या मनातलं जग संपलं होतं. म्हणून बुद्धी इकडे वळली.

कुरुगड्डी अथवा कुरवपूर हे स्थान श्रीपादश्रीवल्लभांचे आहे. सातशे वर्षांपूर्वी पीठापुरात अवतरले. कुरवपुरात त्यांचे श्रीज्ञानेश्वरांप्रमाणे संजीवनी समाधी स्थान आहे. श्रीपाद श्रीवल्लभ हे ज्ञानेश्वर समकालीन होते. श्रीगुरुचरित्रात त्यांच्या कथा आहेत, म्हणून हे सिद्धस्थान दत्तभक्तांचे तीर्थक्षेत्र आहे.

## बार्शीतील विविध घटना

वामनरावांना दीक्षागुरुत्वाचा अधिकार मिळून सद्गुरु पदवी प्राप्त झाली तरी बार्शीकर त्यांना आत्मीयतेने मास्तरच म्हणत असत. मास्तर म्हणताना भाव मात्र आदराचे असत. मास्तरही आपला साधेपणाच सर्वांपुढे पेश करीत. पूर्वीच्या-बोलण्या वागण्यात जो स्वाभाविकपणा होता, त्यात कधीही बदल झालाच नाही. मूळातच जीवनराहणीची जी वैशिष्टये होती ती तशीच होती. जीवनाचा ध्येयवाद निश्चित असेल तर वर्तनाची चाकोरीही निश्चित असते. वामनरावांचा ध्येयवाद परमार्थ होता म्हणून परमार्थला पोषक–अनुकूल असा आचार त्यांचा नित्य असे. ध्येयाशी अनुकूल आचार हे ध्येयनिष्ठांचे लक्षण असते.

वामनरावांचा शाळेतील पोषाख वेगळा असे. घरी आल्यावर तो काढून ठेवून, हातपाय धुवून ते वस्त्रांतर करीत. बार्शीच्या शाळेत असेपर्यंत ते अल्पाकचा डबल प्रेसचा कोट घालीत. पायात कोल्हापुरी वहाणा असत. डोक्याला रुमाल असे. मिशा पिळदार असत. पोषाखाचा रुबाबदारपणा बार्शीकरांमध्ये वैशिष्टयाने उठून दिसत असे. स्वच्छता कमालीची असे. डोक्याचा रुमाल कोईमतुरी असे. त्याची जरीची पट्टी बाहेर काढलेली असे. टापटीप रेखीव असे. स्वभावातच नीटनेटकेपणा असल्याने प्रत्येक क्षणी त्यांच्या हालचालींचा प्रभाव पडत असे. त्यांची पुस्तके नीट लावून ठेवलेली असत. पेंटिंगचे साहित्य, फोटोग्राफीचे

साहित्य व्यवस्थित ठेवलेले असे. स्पर्शास्पर्शाचे नियम काटेकोर असत.

## मातृभक्ती

शुद्ध नी पवित्र अन्नाचा व खाद्यपदार्थांचा कटाक्ष असे. नित्यानुष्ठाननित्यकर्म यात कधीही संकोच किंवा घाई नसे. वामनराव मातृभक्त होते, नुसते मातृभक्त नव्हे तर परम मातृभक्त होते. सकाळी उठल्यावर हातपाय धुवून, चूळ भरून झाल्यावर प्रथम ते आईच्या पायावर मस्तक ठेवून नमस्कार करीत. रात्री झोप वगैरे नीट लागली की नाही याची चौकशी करीत. तसेच त्या दिवशी तिची काही कामे असल्यास विचारीत. मग आपल्या कार्यक्रमाला सुरुवात करीत. संध्याकाळी शाळेतून घरी आल्यावर आईला काय हवे—नको याची चौकशी करीत. आई रात्री जेवत नसे, तर तिच्यासाठी दूध-फळे-लाह्या किंवा पोहे किंवा लाह्याचे पीठ वगैरेंची व्यवस्था आहे—नाही पाहून, स्वत: करीत. रात्री आईचे अंथरूण स्वत: घालीत. आई अंथरुणावर बसली म्हणजे तिचे पाय चेपीत. प्रकृतीची चौकशी करून झोपण्यापूर्वी परत पायावर डोके ठेवून नमस्कार करीत. आईची पातळे (पांढरी आलवणे) वगैरेंसाठी वामनराव स्वत: खर्च करीत. तिचे परगावी जाणे असेल तेव्हा तिच्या प्रवासाचे जाण्यायेण्याचे भाडे ते देत. प्रवासाची नीट व्यवस्था झाली किंवा नाही हे पहात असत. कुडुत्रीला जाणे झाले तरी परतीचे भाडे देऊन ठेवीत असत. आईला काहीही कमी पडत नाही याकडे त्यांचे सतत लक्ष असे. वामनरावांचे हे वागणे शेवटपर्यंत असेच होते. हे अनेकांनी प्रत्यक्ष पाहिले—अनुभवले आहे. 'मातृदेवो भव' ही वेदाज्ञा त्यांनी पाळली.

त्यांची भगिनी ती. गोदूताई हिच्या बाबतीतही वामनरावांचे वागणे ध्येयवादी होते. तिच्यावर लहानपणीच आलेली आपत्ती—तिची पारमार्थिक विशुद्ध वृत्ती आणि तिचा नि:स्पृह स्वभाव याबरोबरच तिची निराधार स्थिती लक्षात घेऊन वामनरावांनी तिला शेवटपर्यंत आधार दिला. अत्यंत आदराने आणि श्रद्धेने तिला शेवटपर्यंत वागविले. पुढे तर या बहिणीला ते आईच्या ठिकाणी मानीत असत.

## कलाकार्यकलाप

वामनरावांच्या विविध कलागुणांनी बार्शीकरांना त्यांनी आकर्षून

घेतले होते. चित्रकला–शिल्पकला आणि छायाचित्रण ( फोटोग्राफी ) यामध्ये फुरसतीच्या वेळात रमून जात. फुकट वेळ घालविणे त्यांना कधीच पसंत नसे. बार्शीला प्लेगची साथ आली तेव्हा ते तुळजापुरी जाऊन राहिले होते. त्या काळात त्यांनी श्रीटेंबेस्वामींची सात उत्तम तैलचित्रे काढली. त्यांतील पहिले चित्र तुळजापुरी भवानीला अर्पण केले. दुसरे चित्र हिंगोलीला दिले. तिसरे नृसिहवाडीत स्वामी स्थानात ठेवले. चवथे कारदगेकरसाहेबांना दिले. पाचवे चित्र तंजावरच्या टी. के. नागराजन् या गुरुबंधूंस दिले. सहावे कोल्हापुरच्या हरिभाऊ कडेकरांना दिले आणि सातवे स्वतःच्या देवघरात ठेवले. २० नारायण पेठेत ते होते. पुरानंतर ती जागा सोडली, पण ते उत्तम तैलचित्र तेथे ठेवले होते. आता ते मोघे किंवा प्राणी यांच्या परिवारात चौकशी करून कोठे आहे ते कळेल. त्यांनी व्यवसायासाठी कला कधीच राबवली नाही. आनंदाच्या आस्वादासाठी कलेची उपासना त्यांनी केली. पण फोटोग्राफी मात्र चार पैसे परमार्थासाठी मिळविण्याकरता केली. त्यातून तीर्थयात्रा, धार्मिक कार्यासाठी पुष्कळ उपयोग झाला. वामनरावांनी श्रीटेंबेस्वामींचे एक श्लोकयुक्त हार घातलेले चित्र काढले. आणि लोकमान्य टिळक सोलापुरी आले होते तेव्हा त्यांना ते भेट म्हणून समर्पण केले. त्या चित्राचे कौतुक लोकमान्यांनी भर सभेत केले. इतकेच नव्हे तर वामनरावांचा सभेत सन्मानही केला. वामनरावांनी नाटकाचे मोठाले पडदेही चित्रण करून रंगवून तयार केले.

त्यांतील गणपतीचा सुंदर पडदा तुळजापुरला दिला. तुळजापूरकर संतोषले. त्या पडद्यासहित वामनरावांचे फोटोही घेतले. तेथेही त्यांचा सत्कार पुष्पहार घालून, भवानीचा प्रसाद देऊन केला. संकेश्वरमठाचे शंकराचार्य श्री शिरोळकर स्वामी या काळात काही दिवस बार्शीस होते. त्यांची चित्रकला उत्तम होती. तेही चांगले कलाकार होते. त्यांचा नि वामनरावांचा परिचय चांगलाच होता. ते वामनरावांच्या या कलागुणावर अत्यंत प्रसन्न झाले होते. त्यांनाही वामनरावांनी त्रिपूर-सुंदरीचा, ध्यानाप्रमाणे उत्तम पडदा करून दिला. या चित्रात त्रिपुर-सुंदरीच्या मागे सिंह उभा आहे. चतुर्हस्ता त्रिपुरसुंदरी हातात आयुधे घेतलेली आहे. भगवतीचे रूप अत्यंत रमणीय आहे. ही पेंटिंगची कामे

बार्शीच्या शाळेच्या खोलीत चालत असत. हे त्रिपुरसुंदरीचे चित्र पाहण्यासाठी एकदा रात्रीच्या वेळी स्वत: शंकराचार्य श्रीशिरोळकर स्वामी आले होते. त्यांनी काही किरकोळ सूचना केल्या. त्या त्यांच्या-समोरच वामनरावांनी दुरुस्ती करून दिल्या. त्यावेळी तर स्वामी फारच प्रसन्न झाले. या शक्तिदेवतेच्या प्रसन्नतेची साक्ष उभयतांना पटली.

वामनरावांच्या कलेत शिल्पकलेचाही अंतर्भाव चांगलाच होता. लाकडाची उत्तम अक्षरे त्यांनी कोरली, लाकडी उपकरणीही सुबक केली. शाडूच्या मातीचे गणपती व इतर मूर्ती तर, मूर्तींना व कला-काराला दृष्ट लागावी अशा करीत असत ते. अनेकांना गणपती करून देत, तेव्हा त्या गणपतीचे विसर्जन करणे त्यांना जड जाई. शाळेत तर चित्रकला शिक्षकच होते. वामनराव शाळेत रुजू झाल्यावर महिन्याच्या आतच शाळेची शोभा वाढली. विद्यार्थ्यांना हाताशी धरून त्यांनी इतकी विविध चित्रे, नकाशे, कलाकृती, कातरकाम, विविध उपयुक्त वस्तू केल्या की सर्वांनी त्यांचे कौतुकच केले. शाळेचे हे एक मोठे आकर्षणच झाले.

वामनरावांच्या अंतरंगातील सद्गुणांचे भांडार बार्शीतील भग-वंताने जनतेपुढे उघडे केले. येथे ते शिकले आणि तयार झाले अशातला प्रकार नाही. पूर्वी त्यांच्यात नव्हते ते त्यांना येथे मिळाले अशातलाही प्रकार नाही. त्यांच्यातील ईश्वरीगुणांचे प्रकटीकरण बार्शीत झाले. त्यांच्या ईश्वरीकार्याचा प्रारंभ बार्शीपासून झाला. लौकिकात कलेने त्यांनी समाजाला आकर्षून घेतले तर परमार्थ मार्गात मुमुक्षूंना आकर्षित करणारी महाविद्या त्यांना ईश्वरी कृपेने प्राप्त झाली. वामनराव येथे घडले नाहीत तर प्रकट झाले. फुलातून सुगंध दरवळू लागला म्हणजे तो कोणी घातला म्हणून दरवळत नाही, तर मूळचाच त्याच्यात असतो, तो वेळ आल्यावर बाहेर पडू लागतो. ईश्वराने सुगंध घातला या विधानाशी दुमत असण्याचे कारण नाही. ईश्वरीकृपा परिणामावरून दिसते, होताना दिसत नसते.

इ. स. १९२५ साली प. प. श्री. चिन्मयानंद सरस्वती स्वामी महाराजांचा चातुर्मास बार्शीत झाला. या चातुर्मासात "जीवनमुक्ती विवेकावर" व्यवस्थितपणे समग्र ग्रंथावर बारकाईने चिंतन झाले. आता

बार्शीत स्वामींना आग्रहाने निमंत्रणे देणारी अनेक घरे झाली होती, परंतु स्वामी वामनरावांकडे आणि प्रल्हादशास्त्रींकडे अधिक काळ वास्तव्य करीत.

गेल्या वर्षी वामनराव प्रल्हादशास्त्री जोशी यांना घेऊन कुडुत्री, कोल्हापूर, वाडी, औदुंबर, कराड वगैरे ठिकाणी जाऊन आले.

वामनरावांच्या प्रिय विद्यार्थ्यांमध्ये बापू कुबडे, व्यंकू कुलकर्णी, भास्कर भागवत आणि रघुनाथ वैद्य या चौघांचा उल्लेख करावा लागतो. पैकी रघुनाथ वैद्य हा एका व्यापारी पेढीवर नोकरीस होता. पुढे त्याने ती नोकरी सोडून पुणे येथे चित्रशाळेत नोकरी धरली. नंतर एकदा आषाढी वारीस निघणाऱ्या ज्ञानेश्वर माउलीच्या पालखीबरोबर तो पायी पंढरीस निघाला. परंतु वाटेतच दुर्दैवाने कॉलरा होऊन निधन पावला. एका सज्जन विद्यार्थ्याच्या निधनाने वामनरावांना फार हळहळ वाटली.

### वैद्य मास्तरांना बरोबर घेऊन कुडुत्री ते कुरुगड्डी

वैद्य मास्तरांची बार्शीहून बदली केली म्हणून ते फर्लोच्या रजेवर गेले. त्यामुळे शाळेच्या वातावरणात बदल झाला. महाराजांनी मोठी रजा घेतली आणि वैद्यमास्तरांना घेऊन ते प्रथम कुडुत्रीस आपल्या गावी गेले. तेथे आपल्या बंधूंची भेट घेतली. अलिकडे वडील गेल्यापासून १५।१६ वर्षांत घरच्या वातावरणातही खूप बदल झाला होता. इस्टेटीच्या वाटण्या कराव्यात म्हणजे जो तो जबाबदारीने आपल्या जमीन-जागेकडे लक्ष देईल, असे आईच्या बोलण्यातून येत असे. महाराज विचार करायचे की, आधी बेताची इस्टेट, एक घर आणि थोडी जमीन. त्यात सहा वाटे करायचे. पाच भावांचे पाच आणि आईचा एक. काय येणार प्रत्येकाच्या वाट्याला ? एक जमीन राहिली तर कसून पीक तरी चांगले काढता येईल. एक घर सहा वाट्यांत किती छोटे होणार ? पण हे कोणाला पटणार ? केव्हा तरी या प्रकरणातून मोकळे झाले पाहिजे. म्हणून वैद्यमास्तरांना बरोबर घेऊन ते कुडुत्रीला गेले होते. वैद्य-मास्तरांचा सल्ला म्हणजे धर्मराजाचा न्याय.

महाराज आणि वैद्यमास्तर यांनी जातानाच इस्टेटीच्या वाटणीचा

आराखडा तयार केला. परमार्थी पुरुषाचा पहिला गुण ' अनपेक्ष ' वृत्ती हा आहे. महाराज आजन्म ब्रह्मचारी व्रत घेतलेले असल्याने व्यक्तिशः ते प्रपंचातून मोकळे झाले होते. त्यांना इस्टेटीतून कसलीच अपेक्षा नव्हती. वाडवडिलांचा आशीर्वाद हीच आपली इस्टेट, हे सांगून इतरांचे वाटे करून देणे यासाठी ते गेले होते. घरी गेल्यावर जेव्हा सर्व बंधू विचारविनिमयासाठी एकत्र बसले तेव्हा स्वसंतोषाने महाराजांनी सर्वांना सांगितले– " मला वडिलार्जितापैकी त्यांच्या आशीर्वादाशिवाय कशा-चीही अपेक्षा नाही. तेव्हा तुम्ही सर्व बंधूंनी आपसात जे काही थोडेबहुत आहे ते वाटून घ्यावे. त्यास माझी पूर्ण संमती आहे. आईचा प्रश्नही माझ्यावर सोपवावा. तिला मी शेवटपर्यंत सांभाळीन. "

श्री गोंदवलेकर महाराजांच्या जीवनात असा वाटणीचा प्रसंग आला तेव्हा त्यांनी आपली वाटणी कोर्टातून वसूल केली आणि ती रामरायाला समर्पण केली. तुलनेने त्यांची इस्टेट मोठी असल्याने इतरांना त्यामुळे काही कमी पडणारे नव्हते. आणि आपला वाटा इतरांनी घेणे हे त्यांना कर्माचे देणे होणार तेही योग्य नाही. असा विचार करून वाटणी वसूल करून देवाला समर्पण केली. इथे महा-राजांची वडिलार्जित इस्टेट थोडी, जमीन विशेष उत्पन्न देणारी नाही, तेव्हा बंधूंना त्यांच्यापुरती जमीन मिळावी – आईची जबाबदारी आपण घ्यावी, या दोन्ही उदाहरणांत अनपेक्षवृत्ती, विरक्ती, इ. दैवी गुणांचाच अनुभव येतो. असा अनुभव सामान्य व्यवहारात आढळणे फार अवघड असते. म्हणून ही उदाहरणे दुर्मिळ असतात. वैद्यमास्तरांचे कौशल्य या कार्यांत चांगले उपयोगी पडले.

## श्रीसंत भटजीबापू महाराज भेट

कुडुत्रीहून दोघेजण प्रथम वाडीला आले. तेथे देवाला यथासांग महापूजा केली. चार दिवस मुक्काम करून टाकळीस संत दाजीमहाराज यांच्या दर्शनास गेले. तेथे त्यांची भेट–दर्शन घेतले. एक दिवस राहून आशीर्वाद घेऊन तेथून हैद्राबादला आले. हैद्राबादला त्यावेळी श्रीभटजी-बापू महाराज म्हणून एक सत्पुरुष होते, त्यांच्या दर्शनास व भेटीस गेले. तीन दिवसांचा मुक्काम झाला. तेथील माहिती सांगताना स्वतः

महाराजांनी खालील माहिती सांगितली.

"सत्पुरुष होते. उत्तम गवई होते. ख्याल–टप्पा ही त्यांची संगीतातील विशेष चीज होती. २४ तास नामस्मरण चालायचे. कितीही माणसे येऊ देत, जेवायला घालायचे. वैद्यमास्तर व मी जेवलोय त्यांच्याकडे. कडबू केले होते. लोणकढं तूप, इतकं उत्तम कधी खाल्लं नाही. भटजीबापूंची विशेष हकीगत आहे. त्यांचा मुलगा वारला. इतक्यात एक उत्तरेकडील गवई ओसरीवर आला. भटजीबापू तिथंच बसले होते. गवई म्हणाला, 'आपली एक चीज ऐकायची आहे.' म्हणाले, 'बरयं.' तंबोरा आणवला आणि उत्तम चीज गायले. तेव्हा इतर मंडळी म्हणाली, 'तयारी झालीय्.' ऐकायला आलेल्या गवयाला वाटले, जेवणाची तयारी झाली. पण प्रत्यक्ष प्रकार पाहिल्यावर तो वरमला. त्याला भटजीबापू म्हणाले, 'त्यात काय आहे ? मुलगा मेलेला काही जिवंत होत नाही. तुम्हाला संतोष झाला ना ? झालं !' प्रत्येक जीव ईश्वर आहे या भावनेने ते वागत असत. एरवी कुणी राजानं गायला सांगितलं तरी गायला जायचे नाहीत. त्याने (राजाने) यांच्या पार्थिव पूजेच्या वेळी गात असत तेव्हा येऊन ऐकावं हवं तर ! रोजचे पार्थिव पूजेचे अनुष्ठान अखंड चालू होते. त्यांना नीट दिसत नव्हतं. आम्हाला लाडू वगैरे देऊन बोळवण करताना डोळ्यात पाणी आणून म्हणाले, जायच्यावेळी 'तुमच्यासारखे सत्पुरुष आले, पण मला दर्शन होत नाही. फार वाईट वाटते."

या मुक्कामात अक्षय्य तृतीया आली. त्या दिवशी त्यांनी कलश दान केले. अक्षय्यतृतीयेचे महत्त्व कलश–कुंभदानाचे आहे तेव्हापासून महाराजांचे प्रतिवर्षी अक्षय्यतृतीयेला कलशदान यथासांग सुरू झाले.

## कुरुगड्डी ( २ री भेट १९२६ )

श्रीसंत भटजीबापू महाराज यांचेकडून महाराज व वैद्यमास्तर निघाले ते कृष्णा स्टेशनवर आले. तेथून कुरुगड्डीला आले. वाटत कृष्णा नदीच्या अलीकडे पसपल गावी रात्रीचा मुक्काम करावा लागला. या उभयतांना तेलंगी भाषा येत नसल्याने व्यवहाराची फार अडचण झाली. कसेतरी करून रात्री पाणी व दूध मिळविले. उघड्यावरच झोपावे

लागले. अशा परस्थ ठिकाणी उघड्यावर झोपण्याचा प्रसंग आला. वैद्य मास्तरांनी प्रवासात सामानाच्या ट्रंका घेतल्या होत्या. रात्री झोपेत त्या कोणी नेऊ नयेत म्हणून दोन्ही ट्रंकांस दोरी बांधून ती दोरी झोपताना आपल्या पायाला बांधून ठेवली व झोपले. सकाळी कृष्णेला पाणी आल्याने बाजेवरून कुरवपूर बेटात आले.

उभयतांचा कुरुगड्डीमध्ये एक महिना मुक्काम होता. गुरुमहाराजांनी तीन–तीन दिवसांचे एक अशी समश्लोकीची सात पारायणे केली. वैद्यमास्तर यांनी श्रीगुरुचरित्र व श्री ज्ञानेश्वरी यांची पारायणे केली. शेवटच्या पारायणाच्या वेळी वैद्यमास्तर आजारी झाले. त्यांचा प्रकृतिधर्म असा की, अंगात किंचित ज्वर भरला की ते बडबडू लागतात. यावेळी त्यांच्या बडबडीत ज्ञानेश्वरीवरील प्रवचने सुरू झाली. तेथील इतर मंडळींना वाटले की, त्यांना वातच झाला आहे. परंतु गुरुमहाराजांना वैद्यमास्तरांची ही सवय माहीत होती. त्यामुळे त्यांनी लोकांची समजूत दूर केली. थोड्याच दिवसांत वैद्य मास्तरांना बरे वाटू लागल्यावर ते दोघे तेथून रायचूरमार्गे बार्शीस आले.

वैद्यमास्तर वारकरी असल्याने त्यांचा वारकरी संप्रदायातील अनेक मान्यवरांशी संबंध आला होता. ह. भ. प. केशवराव देशमुख यांच्या दिंडीमध्ये वैद्यमास्तर असत, त्यामुळे ह. भ. प. केशवराव देशमुखांचा परिचय झाला. वैद्यमास्तरांच्यामुळे महाराजांनाही त्यांचा परिचय झाला. तसेच ह. भ. प. दासगणूमहाराज कीर्तन प्रवचनासाठी बार्शीला जात. तेथे प्रवचनकीर्तनाला महाराज जात असल्याने श्रीदासगणू महाराजांचा परिचय झाला. ह. भ. प. देशमुखमहाराजांच्या दिंडीत नटेश अय्यर सुपरिन्टेंडेंट होते. त्यांचा व वैद्यमास्तरांचा परिचय झाला होता.

## बार्शीचे अन्नोदक संपले !


प. प. श्रीचिन्मयानंदसरस्वती स्वामी महाराज चातुर्मास संपवून मध्यप्रदेशात सागरकडे गेले. त्यावेळी जाताना बापू कुबडे, व्यंकट कुलकर्णी आणि भास्कर भागवत यांना दीक्षा देण्याचे सांगून गेले होते. आता बापू कुबडे सोलापुरला नोकरीनिमित्त गेले होते. व्यंकू कुलकर्णी



महासाध्वी मातुश्री 'उमा'




तरुणपणातील श्रीगुरुमहाराज




बार्शीत ड्रॉइंग मास्तर




गुळवणी मास्तर'



महाराजांचा आसनातील तोल आणि रेखीवपण



पूर्ण मत्स्येंद्रासनात महाराज



गुरुमहाराजांचे योगसाधनेचे शरीर

नोकरीनिमित्त कुरुल येथे गेले होते आणि भास्कर भागवत दौंडला आपल्या घरी गेले होते. या तिघांशी महाराजांनी पत्राने संबंध ठेवला होता. त्यांना दीक्षेसाठी बार्शीला बोलविण्यासारखी परिस्थिती नव्हती; कारण शाळेच्या व्यवस्थेमध्ये बदल झाला होता आणि रोज नवीन काही घडत होते.

शाळेच्या व्यवस्थेत बदल झाल्यावर वैद्यमास्तर नोकरी सोडून गेले. वैद्यमास्तरांचा आणि महाराजांचा संबंध आत्मीयतेचा होता. वैद्य हेडमास्तर असताना महाराज त्यांच्या ऑफिसमध्ये मोकळेपणाने जात असत. त्यांच्यासमोर खुर्चीवर बसत. वेळ मिळेल तेव्हा महाराज वैद्य-मास्तरांच्या कचेरीत जात. कधी परकेपणा वाटला नाही. त्यांच्याजवळ खुर्चीत बसण्याची सवय झाली होती. वैद्यमास्तर नोकरी सोडून गेले आणि दुसरे हेडमास्तर आले. त्या नवीन हेडमास्तरांना गुळवणीमास्तर त्यांच्याजवळ खुर्चीत बसलेले आवडत नसत. त्यांनी कचेरीतील दुसरी खुर्चीच काढून टाकली. फक्त एकच खुर्ची स्वतःपुरती ठेवली. न बोलता काम केले. याला कारण असे काहीच नाही. गुळवणी मास्तरांना व्यवहार कळत नव्हता, किंवा कसं बोलावं ते समजत नव्हतं, का त्यांना काही प्रतिष्ठेची पातळी नव्हती अशातला काही भाग नव्हता. पण अशा वागण्यामुळे वामनरावांना एकटं एकटं वाटू लागलं. त्यांना वाटलं आपलं कोणी नाही आणि आपलेपणा कोणाला नाही. जनरल बोर्डात ३५ रु.वर रोज ५ तास काम करावे असा ठरावही झाला.

वैद्यमास्तर गेल्याबरोबर शाळेतले काही शिक्षक निघून गेले. त्यावेळी नव्या विचाराची नवी लाट आली होती. पंचकमेटीचा कारभार सुरू झाला. वामनरावांचे स्नेही मुगुटकर म्हणून होते. ते म्हणायचे, गुळवणी मास्तर तेवढे जुने राहिले. विरोध व्यक्तीचा नाही. आमचे स्नेहीच आहेत. माणूस चांगला आहे. गावाला माहीत होतं की, गुळवणी मास्तर स्नानसंध्या करणारे, सोवळं ओवळं ठेवणारे आहेत. गावातील लोकांशी संबंध स्नेहप्रेमाचे होते. कुठं कोणाशी म्हणून कटकट नाही; भांडण नाही. उलट सर्वांना काहींना काही त्यांच्यापासून शिकण्याघेण्या-सारखेच होते. पंचकमेटीने वामनरावांची रोज दोन तास मुलींच्या शाळेत नेमणूक केली. वास्तविक मूळची नेमणूक एका शाळेत केलेली.

तेथे कामही कमी नाही. पूर्ण शाळा होती पहिली. पण आता दोन शाळेत काम करण्याचा हुकूम. पहिल्या शाळेचे काम सांभाळून दुसऱ्या शाळेतील दोन तास काम वाढविले तरी पगार तेवढाच. सर्वच गोष्टी मनस्तापाच्या झाल्या म्हणून वामनरावांनी मोठी रजा घेतली. ध्येयवाद आणि ध्येयनिष्ठा न सोडता आलेली परिस्थिती परेच्छा-प्रारब्ध म्हणून सर्व व्यावहारिक गोष्टी सामंजस्यानं सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न चालू होता.

इतर शिक्षक पटापट निघून गेले. पण वामनराव आलेल्या परिस्थितीतून मार्ग काढण्याच्या प्रयत्नात होते. मोठ्या रजेमुळे पंचकमिटीने वामनरावांना सस्पेंड केले.

या मोठ्या रजेच्या काळात वामनराव आक्टोबर २ तारखेस कुरुल, जि. सोलापूर येथे व्यंकू कुलकर्णी यांच्या गावी ४ दिवस गेले होते. तेथे त्याला दीक्षा दिली. तेथून सोलापूरला बापू कुबडे यांच्याकडे चार दिवस गेले. तेथे त्यांना दीक्षा दिली. अशा परिस्थितीमुळे त्यांनी दोन्ही दीक्षा त्यांच्या गावी जाऊन दिल्या. तेथून ते बार्शीला गेले. तेथून आई व बहीण यांना घेऊन गुरुद्वादशीसाठी वाडीला गेले. आपणास शाळेने सस्पेंड केले हे वृत्त त्यांनी कुबडे यांना पत्र पाठवून कळविले. सस्पेंड करण्यात आले हे कळविताना त्यांच्या विशुद्ध-पवित्र मनाला कोणतीही शंका आली नाही. ढगाळ हवेने सूर्याचे तेज मंद वाटते ते सूर्याचा दोष म्हणून नव्हे तर तात्कालिक परिस्थितीचा परिणाम म्हणून भासते. वामनराव वाडीहून एकटेच परत बार्शीस आले.

नोव्हेंबर १९२५ मध्ये दोन्ही शाळांतील कामवर रुजू झाले. मनाच्या अगदी विरुद्ध असून रुजू झाले. घरी येऊन स्नान करून आपले आन्हिक करू लागले. पण कुठेच आपलेपणाचा ओलावा नसल्याने एक दिवस नोकरी पुरे झाली असे वाटू लागले. म्हणून १० दिवसांच्या रजेच्या अर्ज टाकला व शाळा सोडण्यापर्यंत मनाने ठरविले.

पुढे फोटोग्राफीचा व्यवसाय करण्यास करकमला गेले. तेवढ्यात सोलापुरच्या अय्यरसाहेबांच्या कामासाठी मद्रासला जाऊन येण्याची संधी मिळाली, म्हणून मद्रासला गेले व रामेश्वर पाहून आले. म्युनिसीपालिटीला मागील पगाराबद्दल रीतसर नोटीस दिली. त्याची मुदत

झाल्यावर फिर्यादही करण्याचे ठरविले होते. पण ती पाळी आली नाही. शेवटी ईश्वरइच्छा प्रबल म्हणून नोकरीचा राजीनामा दिला व बार्शीची नोकरी सोडली.

बार्शीत असताना वामनरावांचे व बार्शीकरांचे संबंध आत्मीयतेचे होते. पण बार्शी सोडल्यावरही वामनरावांचे आणि बार्शीकरांचे संबंध पहिल्यापेक्षा अधिक जिव्हाळ्याचे-आत्मीयतेचे राहिले आहेत. " अन्न आच्छादन हे तो ईश्वराधीन " हा सृष्टीचा नियम आहे. पुढे पुण्याचा योग होता म्हणून बार्शी सुटली. बार्शी सुटली म्हणून पुण्याला येणे घडले.

## बार्शीहून पुण्यात येण्यातील संक्रमणकाळ

श्रीगुरुमहाराजांच्या जीवनसूत्राचे केंद्र ईश्वर इच्छा हे आहे. वास्तविक यच्चयावत् प्राणिमात्राचे ते सूत्र आहे. पण जाणीवपूर्वक त्या सूत्रावर श्रद्धा ठेवून वागणारे विरळा असतात. ही जाणीव हे 'ज्ञान' आहे. त्या जाणिवेप्रमाणे वर्तन हा 'योग' आहे आणि जाणीव आणि वर्तन यांवरील श्रद्धा ही 'भक्ती' आहे. जेव्हा या ज्ञान–योग–भक्तीचा त्रिवेणी संगम होतो तेव्हाच पूर्णता येते. ज्याची जाणीव होते, त्याप्रमाणे त्यावर श्रद्धा ठेवून वर्तनात येते तेव्हा त्या अनाकलनीय ईश्वरीसत्तेची समज येते. किंबहुना ही समज आली म्हणजे त्रिवेणी संगम होतो. त्या दृष्टीने प्रभू रामचंद्रांचे जीवन मानव समाजापुढे आदर्श उदाहरण आहे. तद्वत श्रीगुरुमहाराजांचेही जीवन त्याच तोलामोलाचे आहे. घटना–प्रसंगाची विविधता असेल, पण याच सूत्राची उकल होणारे जीवन आहे. साक्षात्कारी साधु–संतांच्या जीवनाचे हे रहस्य आहे.

बार्शीच्या शाळेत राजीनामा दिल्यावर दुसऱ्या नोकरीचा प्रयत्न न करता महाराज फोटोग्राफीच्या व्यवसायासाठी पुनः करकमला गेले. तेथून मार्च १९२६ च्या १५ तारखेस बार्शीस आले. ५।६ दिवस मुक्काम केला. तेथून जागा सोडून, सामान आवरून बांधून ठेवून, तेथून काही दिवस कोल्हापूर-कुडुत्रीकडे गेले. दौंडच्या भास्कर भागवतला कळविले की, " बार्शीला जाऊन सामान बांधून, आवरून ठेवले आहे ते पुण्यास घेऊन यावे. तूर्त मी कोल्हापुरास जात आहे. तिकडे एक महिना

राहीन. तसे पत्र टाकीन. त्यावेळी सामान आणावे. शक्य आहे का ते कळवावे. " सोलापूरच्या बापू कुबडे यांनी पाठविलेल्या पत्राला उत्तर देताना लिहिले की, " माझ्याबद्दल कोणत्याही प्रकारची काळजी करण्याचे कारण नाही. भगवदिच्छेने जे जे होते ते ते सर्व आपल्या कल्याणा-करताच होते. " वामनरावांची नोकरी सुटली म्हणून बापुसाहेब कुबडे यांनी काळजीचे पत्र पाठविले होते. " दुखे:षु अनुद्विग्न मना " हे सूत्र आचरणाऱ्यांचे उत्तर होते त्या पत्राला. हेच उत्तर इतरांच्याही पत्रांना पाठविले होते.

या काळात श्रीचिन्मयानंदसरस्वतींनी गयेला जाऊन त्यांचे गुरु प. प. श्रीस्वामी शंकर पुरुषोत्तम तीर्थ यांच्याकडून विधिवत् दंड ग्रहण केला. दंडी स्वामी झाल्यावर त्यांचे नाव " श्रीलोकनाथ तीर्थ " त्यांच्या गुरूंनीच ठेवले. हे वृत्त स्वामींनी वामनरावांना पत्र पाठवून कळविले.

वामनरावांनी दौंडला भास्करराव भागवतांच्या ओळखीकडे कोट शिवायला टाकला होता. तो तयार होऊन आला. फोटोग्राफी भास्कर-रावांना बार्शीलाच शिकविली होती. ते काम व व्यवसाय भास्कररावांनी दौंडला सुरू केला. या संदर्भात फोटोचे साहित्य कोणते चांगले, कोठे चांगले मिळते. इ. मार्गदर्शन व चौकशी पत्राने होत असे. फोटोग्राफीमुळे मनाची चंचलता होत असावी म्हणूनही भास्करचे साधन नीट चालत नसावे अशी सूचना एका पत्रात केली होती. ‘ आपल्या संप्रदायातील दोन समान व्यक्ती एकत्र असताना परस्परातील शक्ती स्फुरण पावत असते, ’ असा उल्लेख एका पत्रात आला आहे.

वैद्यमास्तरांना घेऊन वामनराव कृष्णातीरी असलेल्या पाचवड गावी एक महिना जाऊन राहिले. संधी मिळेल तेव्हा वामनराव मधून मधून एकांतवासासाठी रम्य व पवित्र स्थळी जाऊन येत असत. अशा ठिकाणी विशेष अनुष्ठाने ते करीत असत.

## नू. म. वि. चा योगायोग कसा आला ?

कुरुगड्डी–कुडुत्रीला जाण्यापूर्वी वैद्यमास्तर महाराजांच्या नोक-रीच्या खटपटीसाठी एकटेच पुण्यास आले. त्यांच्या परिचयाचे नटेश अय्यर सुपरिंटेंडिंग इंजिनियर यांची भेट घेतली. महाराजांच्या नोकरी-

विषयी सांगितले. हे सुचविल्यावर अय्यरसाहेब शिक्षण प्रसारक मंडळीस २५० रु. देणगी देऊन संस्थेचे सभासद झाले. या सभासद मंडळींच्या विचाराने कार्यकारी मंडळ काम करीत असे. सभासद झाल्यावर अय्यर-साहेबांनी संबंधितांच्या कानावर गुरुमहाराजांविषयी सांगून ठेवले.

पुढे कुरुगड्डीहून आल्यावर वैद्यमास्तर पुण्यास आले. दुसरे दिवशी अचानकपणे रस्त्यातच प्रो. दत्तो वामन पोतदार यांची गाठ पडली. पूर्व-परिचय होता. तेव्हा त्यांनी स्वतःहून वैद्यमास्तरांना विचारले, ‘ अहो, तुमचे ते सद्गृहस्थ स्नेही गुळवणी कोठे आहेत ? त्यांना ते जेथे असतील तेथून बोलवून घ्या. त्यांची आम्ही आमच्या हायस्कूलात–नूतन मराठी विद्यालयात ड्रॉईंगमास्तर – म्हणून नेमणूक केलेली आहे. ’ हे ऐकल्यावर वैद्यमास्तरांनी मोठ्या समाधानाने त्यांचे आभार मानले व सांगितले, ‘ मी त्यांना ताबडतोब पुण्यास बोलावून घेतो व आपला निरोप सांगतो. ’ वैद्यमास्तर त्यावेळी अय्यरसाहेबांकडे रहात होते. त्या दिवशी अय्यरसाहेब परगावी गेले होते. वैद्यमास्तरांनी बार्शीहून गुरु-महाराजांना ताबडतोब बोलावून घेतले आणि नू. म. वि.मध्ये पाठविले. यामुळे, अय्यरसाहेबांना आणि वैद्यमास्तरांना समाधान वाटले.

अर्ज नाही, मुलाखत नाही, व्यक्ती पाहिलेली नाही, तरीसुद्धा नेमणूक झाली हा अन्नोदकाचा ऋणानुबंध आहे. हा संपला की काहीही निमित्त घडून नोकरी सुटू शकते, हा अनुभवही येत असतो. वास्तविक महाराज मुंबईच्या आर्ट कॉलेजमध्ये टीचर्स ग्रेडसाठी गेले होते. कोर्स पूर्ण झाला होता, पण ऐन परीक्षेपूर्वी आजारी पडून परत गावाकडे आले होते, त्यामुळे हातात सर्टिफिकेट नव्हते. तीच स्थिती मॅट्रिकची झाली होती. परीक्षेचा फॉर्म मिळून मुंबईच्या जे जे स्कूल ऑफ आर्टमध्ये बोलावणे आल्याने कोल्हापुरच्या शाळेतून त्यांना पाठविले होते म्हणून तेही सर्टिफिकेट मिळाले नाही. असे असून कुठलाही वाममार्ग न अवलंबिता नोकऱ्या मिळाल्या. चांगल्या कर्तबगारीचा प्रत्यय देणाऱ्या झाल्या. कला-गुणांचा गौरव–सन्मान झाला हे जीवनचरित्रातून स्पष्ट होते.

श्रीगुरुमहाराजांच्या अंतःकरणाची स्थिती आकाशासारखी व्यापक होती. त्यामुळे त्यांच्या जीवनातील व्यवहार तसेच व्यापक असत.

आकाशात जसा सर्वांचा समावेश होतो तसा महाराजांच्या जीवनाकाशात सर्वांचा समावेश होत असे. त्यांच्यात पंथाचे, मतमतांचे, आचारविचारांचे, सज्जनदुर्जनतेचे, गरीब-श्रीमंतीचे, स्त्रीपुरुषांचे, देशी-परदेशींचे, लहान-मोठ्यांचे कुठलेच संकुचित्व नव्हते. येईल तो त्यांच्यामधे रमून—रंगून जात असे. याचे कारण ते 'वासुदेवस्वरूप' झाले होते. सर्वांना आत्मसात करणारे त्यांचे अंत:करण होते. येईल त्याला आपले करून टाकायचे हा आकाशाचा धर्म महाराजांचा होता, कोणाला बोलवायला आकाश जात नाही, प्रत्येकाला आकाशातच जावे लागते. येणाऱ्यासाठी आकाश अधीर नसते. तसेच श्रीगुरुमहाराजही आपणाकडे लोकांनी यावे अशी अधीरता त्यांची कधीही कोणालाही आढळली नाही. आकाश जसे टोचत खुपत नाही तसे महाराजही कोणालाही खुपले, टोचले नाहीत. आकाशाला स्पर्श करता येत नाही तसे महाराजांच्या अंतरंग अवस्थेला कोणीही स्पर्श करू शकला नाही. कोणी कितीही मोठा येवो, महाराज त्याच्याहून मोठे असल्याचे येणाऱ्यालाच जाणवले आहे. व्यवहारात ज्याप्रमाणे खालच्या वर्गातील विद्यार्थ्याला वरच्या वर्गातील विद्यार्थ्याची परीक्षा करता येत नाही, तसे परमार्थातही वरच्या अवस्थेतील व्यक्तीची परीक्षा खालच्या अवस्थेतील व्यक्तीला करता येत नाही. याउलट खालच्याची परीक्षा वरच्याला करता येते. महाराजांना ओळखणे कोणालाही जमलेले नाही आणि महाराजांनी कोणाला ओळखले नाही असे झाले नाही. याचे उत्तम उदाहरणच सांगायचे झाले तर होशंगाबादला श्रीचिन्मयानंद-सरस्वती स्वामी महाराजांना ओळखणारे फक्त वामनराव निघाले. वामनरावांनी स्वामींना ओळखले म्हणून तेथेच आपल्या घरी आणले, बार्शीत आणले, पुण्यात आणले. सर्वकाळ त्यांच्याकडे लक्ष ठेवले. वास्तविक स्वामींच्या स्वभावाची ठेवण स्पष्ट नि कडक होती. पण म्हणून त्यांनी स्वामींकडे कधीही दुर्लक्ष केले नाही, किंबहुना पहिल्यापासून शेवटपर्यंत महाराजांनी जी स्वामीसेवा केली तितकी, तेवढी, तशी समजून-उमजून कोणीही केली नाही. याचे कारण महाराजांनी स्वामींना ओळखले म्हणून त्या वर्षी वाडीला गेले नाहीत. हा भावना-विकाराचा प्रश्न नव्हता. जाणिवेचा-ओळखण्यातला भाग होता. स्वामींना ओळखले

आणि आपलीही ओळख स्वामींना पटवली. स्वामींच्या अंतःकरणात वामनरावांसंबंधी नितांत आदर होता. वात्सल्य, हे एक मोठा व एक लहान, या संबंधात असते, पण आदर हा परस्परांच्या मोठेपणाच्या भावनेत असतो. जशी समज असते तसा आदर असतो.

स्वामींनी सांगितल्याप्रमाणे दौंडच्या भास्करराव भागवतांची दीक्षा राहिली होती. त्याप्रमाणे महाराजांनी १९२६ च्या मार्चच्या ६ तारखेला भास्कररावांना पत्र पाठविले की, 'आपल्या दीक्षेबद्दल आपण निर्धास्त असावे. माझे तिकडे न येणे झाले तरी मी आपणास येथे बोलावून घेईन. तोपर्यंत दररोज सकाळी नियमाने संध्या झाल्यावर ३०० गायत्री जप करीत जावा. कोणत्याही कार्याला शरीर व मानसशुद्धीची फार जरुरी असते. जप शांत चित्ताने करावा. १५–२० मिनिटे लागतील. कुबडे यास जपापासून फार फायदा झाला हे आपणास माहीत आहेच.' पत्राप्रमाणे भास्कररावांचा जप सुरू झाला. नंतर महाराज कोल्हापूरला जाऊन आले आणि नंतर भास्कररावांना दीक्षा झाली. त्यानंतर महाराज काही दिवस बार्शीला होते.

### पुण्यात आगमन

पुण्यात नू. म. वि. हायस्कुलात नेमणूक झाल्याचे वृत्त वैद्य मास्तरांकडून महाराजांना बार्शीला समजले आणि महाराज पुण्यात आले. वैद्यमास्तर पुण्यातच होते. त्यांची भेट घेतली. दिनांक १६ जून १९२६ ला नू. म. वि. हायस्कूलात ड्रॉईंगमास्तरची जागा महाराजांनी पत्करली. वैद्य मास्तर जागेच्या शोधात होते. सदाशिव पेठेत गोखले यांच्या वाड्यात घ. नं. ३८७ मध्ये जागा मिळाली. वामनरावांच्या नोकरीचे, जागेचे वैद्यमास्तरांचे तळमळीचे प्रयत्न पाहिले म्हणजे त्यांची महाराजांवरील नितांत श्रद्धा स्पष्ट दिसते. ही संतसेवा घडली. या सेवेने संतांची कृपा होत असते. ईश्वर आणि संत कोणाच्याही सेवेचे फळ दिल्याशिवाय रहात नाहीत. सेवा कधी निष्फळ होत नसते. परंतु त्या सेवेचे फळ संतांच्या आणि ईश्वराच्या इच्छेने तात्काळ किंवा कालांतराने मिळते. वैद्य मास्तरांचे संबंध पूर्वऋणानुबंधाने पहिल्या दिवसापासूनच आत्मीयतेचे आले, ते प्रत्यही वाढतच होते. महाराज वैद्यमास्तरांना ज्येष्ठ बंधूप्रमाणे

मान देत होते आणि वैद्यमास्तर महाराजांना मनातून देवाप्रमाणे मान देत होते.

पुण्यात नोकरी लागल्यावर दोघांनी जागा घऊन एकत्र रहावे असा विचार केला होता. त्याप्रमाणे गोखले यांच्या मिळालेल्या जागेत वैद्यमास्तर आणि महाराज हाताने स्वयंपाक करून राहू लागले. जवळच ह. भ. प. केशवराव देशमुख रहात होते. संतांना संतांच्या सहवासाचे आकर्षण असते, त्यामुळे त्यांच्याकडेही उभयताचे जाणे येणे होऊ लागले. श्री. केशवरावांच्या प्रवचनाला जात असत.

बार्शीला असताना महाराजांची घरची व्यवस्थाही वैद्यमास्तर बापू–व्यंकू–भास्कर वगैरे आत्मीय मंडळी पहात होती. महाराजांना बाजारहाट करण्याचे माहीत नव्हते. आता पुण्यात आल्यावर हा प्रश्न कसा सुटेल याची काळजी वैद्यमास्तरांच्या मनात होती. परंतु ‘ ज्याचा सखा हरी त्यावरी विश्व कृपा करी ’ या संत-सूत्रावर त्यांचा विश्वास होता. हे कसे जमून येणार याची ते वाट पहात राहिले. महाराजांचे जीवनसूत्र ‘ प्रारब्धं पुष्यति वै वपुः ’ हे होते. ‘ होणारे न चुके जरि ब्रह्मा तया आडवा ’ अशी खात्री असल्याने अनुकूल–प्रतिकूल घटनांकडे ते तटस्थतेने पहात असत. सामान्य माणूस या अनुकूल प्रतिकूल घटनांमध्ये समरस होऊन सुखदुःखाच्या तरंगावर हेलकावत असतो. वैद्यमास्तर नेहमी म्हणत असत की ‘ प्रारब्धं पुष्यति वै वपुः ’ या सिद्धांताचा अभ्यास करावयाचा असेल तर वामनरावांच्या जीवनचरित्राचा जरूर अभ्यास करावा म्हणजे हा सिद्धांत उत्तम समजेल.

मनुष्य स्वभाव असा आहे की, प्रत्येक मानवास असे वाटते की माझ्याशिवाय माझ्या प्रपंचाचे, गावाचे, समाजाचे, राष्ट्राचे, जगाचे काम कसे चालणार ? परंतु त्याचा हा अभिमान वृथा असतो. ज्या प्रभूने सृष्टी निर्माण केली आहे, तो जगन्नियंता सर्व सृष्टीची सर्वतोपरी काळजी वाहत आहे. त्याने काही आमचा सल्ला घेऊन सृष्टिसृजनकार्य केलेले नाही. तो स्वतः स्वयंपूर्ण व सर्वसमर्थ आहे. त्याने गुरुमहाराजांची पुण्यातील व्यवस्था आधीच करून ठेवलेली होती. ती त्याला माहीत होती म्हणून तो सर्वज्ञ आणि आम्हाला माहीत नाही म्हणून आम्ही अज्ञ !

सत्कार्याचे निमित्त होणारे जीव ईश्वरीकृपेतील असतात. त्यांचे-कडून सत्कार्य करून घ्यावयाचे असल्याने ईश्वर त्याला अनुकूल घटना घडवून आणीत असतो. हे सतत सर्वत्र चालू असते.

मराठवाड्यातील 'डोणजे' गावचे श्री. बळवंतराव भालेराव यांचे आणि वैद्यमास्तर यांचे काही लांबचे नाते होते. त्यांची मुले भुजंगराव व वासुदेव ही दोघेही काही दिवस बार्शीस संस्कृत शिक्षणास राहिली होती. त्यामुळे या मुलांचा सहवास वैद्यमास्तरांशी आला. बार्शीच्या पं. प्रल्हादशास्त्रीबुवांकडे ही दोन्ही मुले शिक्षण घेत होती. भुजंगरावांची सालस वृत्ती, सेवावृत्ती, धार्मिक आचरण हे सर्वच गुण वैद्यमास्तरांच्या मनात भरले होते. भुजंगरावांचे मोडी हस्ताक्षर मोत्यासारखे सुंदर, स्पष्ट, वळणदार होते. अशा मोडी हस्ताक्षरातील भुजंगरावाचे एक पत्र कोणातरी व्यक्तीकडून पुण्यातील सबजज्ज ढेकणे यांच्या नजरेस आले. त्या अक्षरावर सबजज्ज साहेब अति प्रसन्न झाले आणि त्या संदर्भाने चौकशी करीत करीत भुजंगरावांना पुणे येथील कोर्टात सेक्शन रायटर म्हणून नेमणूक करून घेण्यापर्यंत घटना घडल्या. याप्रमाणे भुजंगराव उर्फ नाना हे पुण्यास जात असल्याचे वैद्यमास्तरांना समजले. महाराज पुण्यात जाण्यापूर्वी ४/५ महिने आधी ही घटना घडली. २० नारायण पेठेत नाना भालेराव जागा घेऊन राहिले. त्यांचे कोर्टाचे कामही सुरू झाले. तेव्हा वैद्यमास्तरांनी त्यांची भेट घेतली व त्यांच्याजवळ महाराजांना जागा मिळाली तर सर्वच सोयीचे होईल, असा विचारविनिमय नानांशी करून २० नारायण पेठेत, गोवईकरांच्या चाळीत जागा मिळावी म्हणून चौकशी केली. नानांच्या जवळची जागा रिकामी होती, ती ताबडतोब मिळाली. नियतीने महाराजांची सोय आधीच करून ठेवली होती. आणि नानांच्याही सद्भाग्याची व्यवस्था करून दिली.

२० नारायण पेठेत महाराज आले. बार्शीचे सामान अद्याप आणले नव्हते. तेही भास्कररावांना घेऊन येण्यास दौंडला पत्राने कळविले. दिवाळीची सुट्टी आली. वैद्यमास्तर दिवाळीत आळंदीला गेले. महाराज गुरुद्वादशीसाठी वाडीला व पुढे कुडुत्रीला गेले. सुट्टी संपल्यावर आई व बहीण यांना घेऊन पुण्यास आले. बार्शीहून सामान

आले. आणि २० नारायणमध्ये जागा-सामानाचे स्थिरस्थावर झाले.

### २० नारायण पेठेचे भाग्य

२० नारायण पेठ जागेची प्रसिद्धी महाराजांमुळे जगभर पसरली. वास्तविक ही जागा म्हणजे छोटया दोन खोल्या, उजेड कमी, आणि भाडेही कमी. जागा ताब्यात घेताना मोरीत स्वतंत्र नळाची सोय करून घेतली. ही गोवईकरांची चाळ म्हणून प्रसिद्ध. पुण्यात चाळी वजा इमारती नाहीत, पण अपवाद म्हणून ही होती. चाळीला मोठा दिंडी दरवाजा. चारी बाजूंनी दोन मजली इमारत आणि मध्ये मोठा चौक, त्या चौकात छोटी बाग, पंप असलेली विहीर, बिऱ्हाडकरूंसाठी सार्वजनिक नळ, दोन-दोन खोल्यात बिऱ्हाडे ! पन्नास बिऱ्हाडे असतील. सर्वांसाठी ४/५ सार्वजनिक शौचकूप. गरीब आणि मध्यम वर्गीय वस्ती, चौकात मुलांचे खेळणे-बोलणे ओरडणे-भांडणे सारखे चालू. फेरीवाल्यांना इथे गिऱ्हाईक फार. भिकाऱ्यांचे आशास्थान. सुखदुःखाचे प्रसंग वाडयात कोणा ना कोणाकडे अधूनमधून यायचे. पाण्यावरून बोलणी, धुण्या-भांडयावरून आवाज चढवून चालायचीच. शौचाला नंबर असायचे. त्यातच अस्पर्श स्त्रियांचे प्रसंग यायचे. म्हणून ही चाळ ओळखली जात होती. समाधानाची बाजू अशी होती की मालक चांगले आणि बिऱ्हाडातील माणसे सज्जन, सालस नि सरळ होती. अशी जागा श्रीगुरुमहाराजांची होती. दोन खोल्या, मोरी आणि स्वतंत्र नळ यामुळे शास्त्राचे सर्व नियम पाळणे शक्य झाले. चाळीत राहून स्वतंत्रपणा ठेवता आला.

या जागेचे बहिरंग स्वरूप जितके साधे, सामान्य तितकेच अंतरंग स्वरूप असामान्य होते. येथे धर्मराजांचा धर्म पोसला, शुकाचार्यांचे वैराग्य नांदले, कर्णाचे औदार्य घडले, वसिष्ठांचे ज्ञान फुलले, रामचंद्रांच्या मर्यादा सांभाळल्या, श्रीकृष्णाचा योग आचरला, आणि दत्त प्रभूंचे दीक्षा कार्य चालले. इ. स. १९२६ ते पुढे १९६४ पर्यंतचा सुमारे तीन तपांचा काळ येथे श्रीगुरुमहाराज राहिले. या काळात येथे श्रीस्वामी लोकनाथ तीर्थ महाराज २४ वर्षे येऊन, राहून जात होते. नर्मदातीरावरील व्यासक्षेत्रातील महापुरुष श्रीअवधूत स्वामी व त्यांचे शिष्य

औदुंबरवासी श्रीनारायणनंद स्वामी येथे अनेक वेळा येऊन राहून गेले. प. पू. श्रीरंग अवधूत महाराजांचे चरणकमल या जागेला लागले, कितीतरी अज्ञात साधु-संत संन्याशी-महात्मे येथे येऊन गेले. पंडितजी सातवळेकरांना येथे दीक्षा झाली आणि त्यांचेही येणे वारंवार घडले. लोणावळ्याच्या कैवल्याश्रमाचे कैवल्यानंद येथे येऊन गेले. ह. भ. प. श्री. सोनोपंत दांडेकर आले. श्री. धुंडिराज महाराज कवीश्वर आले. श्री. धुंडामहाराज देगलूरकर आले. श्रीदासगणूमहाराज आले. नागपूरचे श्री. जनार्दन स्वामी आले. सरसंघ चालक श्री गोळवलकर गुरुजी आले. अप्रबुद्ध आले. अनेक विद्वान शास्त्री पंडित आले. बाळशास्त्री हरदास आले. श्रीशंकराचार्य आले. श्री शिरोळकर स्वामी आले, श्री जेरेस्वामी आले. लेखक आले, साहित्यिक आले, कवी आले, सामाजिक कार्यकर्ते आले. काँग्रेस कार्यकर्त्या प्रेमाबाई कंटकांना येथे दीक्षा झाली. संस्थानिक आले. इडर (मध्यप्रदेश) संस्थानचे राजपुत्र आपल्या लवाजम्यानिशी येऊन दीक्षा घेऊन गेले. के. सी. आय्. सर चुनिलाल मेहता येथे आले. रायराजे धुंडिराजबहाद्दर हैद्राबाद, यांना दीक्षा २० नारायण पेठेत झाली. अनेक परदेशी येथे येऊन श्रीगुरुमहाराजांना भेटून गेले व पुढे त्यांना दीक्षाही झाल्या. न्यूयॉर्कच्या विवेकानंद मिशन कॉलेजचे प्रिन्सिपॉल 'वॉलकॉट' महाराजांच्या खास भेटीसाठी विमानाने येथे आले. भेट घेतली आणि गेले. बेळगावचे काणे महाराज पुण्याहून जाताना येताना महाराजांना भेटून जात. माचणूरचे संत श्री बाबा आर्वीकर येथे येऊन 'दिव्यामृतधारा' देऊन व आशीर्वाद घेऊन गेले. महापुरुषांना ओळखणारे महापुरुष असतात म्हणून येऊन गेले. याशिवाय आपली दुःखे मिटविण्यासाठी, परमार्थाच्या मार्गदर्शनासाठी, अनुग्रह घेण्यासाठी, आशीर्वाद घेण्यासाठी, हजारो आर्त, जिज्ञासू येथे येऊन आपले ईप्सित साधून गेले. हा २० नारायणच्या अंतरंगाचा चर्मचक्षूंनी दिसलेला, वैखरीने सांगता येणारा एक भाग म्हणून लिहिला. पण खरे अंतरंग दिव्यचक्षूंनी अनुभवले असेल ते परावाणीमध्ये अव्यक्तच राहिले आहे.

मधुमक्षिका स्वतः कणाकणाने मध आणून पोळे तयार करते. आणि त्या स्वतः आणून ठेवलेल्या मधाच्या रक्षणासाठी हजारोंची संख्या गोळा होते. मधाचे रक्षण त्या स्वतःच्या उपयोगासाठी असलेले

अन्न म्हणून करतात. यथे महापुरुष जो आनंदमधु मिळवतात, तो येईल त्याला वाटून टाकतात, म्हणून हजारोंची संख्या त्यांच्याभोवती गुंजारव करीत गोळा होते. केवळ संत संगतीने येणाऱ्याला अनायासे आनंदमधूची प्राप्ती होत असते.

## पुण्यातील प्रारंभकाळ

घरी आई आणि बहीण गोदावरी असल्यामुळे फार सोयीचे झाले. बरेच दिवस शाळा दुपारी दोन प्रहरानंतरची होती. त्यामुळे पहाटेच्या साधनेला व नित्याच्या आन्हिकाला भरपूर वेळ व शांतता आली. आईच्या हातचे अन्न आणि गोदावरीची सेवा यामुळे परमार्थाला व्यावहारिक अडथळा राहिला नाही. आतला परमार्थ पूर्ण होता. आचारातील कटाक्षही सहजपणे सांभाळले जात होते. कारण ते अंगवळणी पडले असल्याने सहजतेने नित्य होत होते.

बार्शीच्या मंडळींशी पत्रव्यवहार चालू होता. बापू-भास्कर-व्यंकू यांना पत्राने मार्गदर्शन होत होते. श्री दादाशास्त्रींना श्रीगणेशच्या रूपात श्रीधुंडिराजमहाराजांचे दर्शन त्यांच्या श्रीसत्यदत्तव्रतामध्ये झाल्याचे पत्रात होते. श्रीदत्तमहाराज अमरावतीला यज्ञासाठी गेले होते. वैद्यमास्तर एक महिना पाचवडला श्रीकृष्णातीरी अनुष्ठानास गेले होते. श्रीटेंबेस्वामींच्या पुण्यतिथीसाठी दौंडहून भास्करराव येऊन गेले. गुरुपौर्णिमेला प्रल्हादशास्त्री येणार होते. परंतु त्यांचे भगवंताच्या मंदिरात कीर्तन असल्याने आले नाहीत. गोदावरी मलेरियाने आजारी होती. औषध चालू होते. पाचवडहून आल्यावर वैद्यमास्तर भेटून पंढरपुराकडे गेले. दौंडच्या भास्कररावाची फोटोग्राफीची कामे चालू आहेत. महाराजही त्यांना त्यातली कामे सांगत असत. महाराज मधून मधून बार्शीला जाऊन येत होते. मध्ये दौंडला उतरत असत. कोल्हापुरच्या वामनराव गडहिंग्लजकरांचे चिरंजीव पंडितराव सध्या पुण्यात बदलून आले आहेत. त्यांच्याकडे मधून मधून महाराज जाऊन येत. काशीला किंवा अन्य कोठे असतील तेथून श्रीस्वामींची पत्रे येत असत. महाराजांची त्यांना उत्तरे जात असत.

१९२८ च्या जानेवारीत अय्यरसाहेबांच्या कामासाठी एक

आठवड्याची रजा घेऊन महाराज मद्रासला जाऊन आले.

महाराजांचा खेचरीचा अभ्यास नित्य चालू होता. याशिवाय नित्याची अनुष्ठान साधना नियमित चालू असे. जीवनातील क्षण आणि क्षण कारणी लागत होता. मद्रासला गेले तेव्हा भोवतालच्या तीर्थयात्रेस जाऊन आले. मार्च १९२८ मध्ये श्रीस्वामी लोकनाथतीर्थ पुण्यास आले, तेथून ते बार्शीला गेले.

पुणे येथे एक औद्योगिक प्रदर्शन भरले होते. त्यामध्ये महाराजांनी काही क्रेपच्या फुलांचे उत्तम नमुने ठेवले होते. अलिकडे कलेमध्ये क्रेपच्या फुलांची भर पडली होती. कृत्रिम फुले नैसर्गिक वाटावीत इतकी सुरेख होत होती. गणपतीही करण्याचे चालू होते. या वर्षी श्री दत्त-जयंतीला बार्शीला गेले होते. जाताना दौंडला भास्कररावांना आपला कॅमेरा देऊन पुढे गेले. सोलापुरलाही १–२ दिवस मुक्काम होता. बार्शीला श्रीदत्तजयंतीचा उत्सव उत्तम झाला. त्यावेळी श्रीधुंडिराज महाराजांची भेट झाली. प्रल्हादशास्त्री मुगुटकर ही बार्शीची मंडळी मधून मधून पुण्यास येऊन भेटून जात असत. याप्रमाणे संबंधात आलेल्या व्यक्तींचे संबंध आपलेपणाने टिकवणे, वाढविणे महाराजांचे सतत असे. लोकसंग्रह सन्मार्गाला लावण्यासाठी होता. त्यात व्यक्तिगत लाभहानीचा विचार नसे.

महाराजांचे एक बंधू गोविंदराव यांच्यावर अनेक आपत्ती येऊन त्यांची आर्थिक परिस्थिती फारच खालावलेली होती. कुठेतरी–कसेतरी जीवनात उभे रहाण्याची त्यांची सारखी धडपड असे, पण त्यांना यश म्हणून कुठे येत नसे. या काळात ते पुण्यासही व्यवसाय–उद्योगासाठी आले होते तेव्हा त्यांना महाराजांनी चांगलाच आधार दिला होता, पण काही न जमल्याने ते परत कुडुत्रीला जाऊन राहिले, तेव्हा महाराजांच्या आईने आपल्या वाट्याची जमीन त्या मुलाला देऊन टाकली. महाराज आपले कपडे – शर्ट, कोट, धोतरे गोविंदरावांना कोणाबरोबरही तिकडे पाठवून देत असत. महाराजांची आर्थिक स्थिती तशी अगदी सामान्यच होती. नू. म. वि. चा ३५/ रु. पगार हेच त्यांचे उत्पन्न असे. त्यात प्रपंच-परमार्थ, स्वामीसेवा, धार्मिक कार्ये चालत असत. राहणी अगदी रेखीव, योजनाबद्ध असल्याने कधी कशाला कमी पडत नसे. पण इच्छा असून

कधी मर्यादा ओलांडून खर्च करीत नसत. त्याचबरोबर प्रसंगाला कधी नाही म्हणत नसत. आई-बहिणीच्या वस्त्रादींचा खर्च, प्रवास हेही नीट चालत असे.

प्रथम पुण्यात श्रीलोकनाथ तीर्थस्वामी आले तेव्हा त्यांना श्री. नाना भालेराव यांचा परिचय करून देऊन दीक्षा देवविली. नानांचा आणि महाराजांचा सहवास वाढत चालला. ही दोन कुटुंबे राहिली नाहीत. महाराज हे भालेरावांच्या कुटुंबातील झाले होते. आणि भालेराव कुटुंब हे गुळवणी कुटुंबातील झाले होते. या दोन घरांत रोज स्वैंपाकात होणारा चांगला पदार्थ एकमेकांकडे जात-येत असे. विचार-विनिमय-सल्लामसलत याबाबतीत नाना महाराजांना मान देऊन विचारीत असत. नानांचे वागणे महाराजांच्या मनाप्रमाणे असे. धर्मानुष्ठानात नानांनी महाराजांची आणि देवतांची प्रसन्नता मिळविली. स्वामींच्या सहवासात मार्चमध्ये दोन-तीन आठवडे गेले. साधना झाली. सायंकाळचे फिरणे झाले. स्वामींची सर्व व्यवस्था उत्तम असे. त्यामुळे ते नेहमी प्रसन्न असत. स्वभावतःच बालवृत्तीने, मोकळेपणाने रहात असल्याने वातावरणही प्रसन्न असे. पुण्याहून स्वामी बार्शीकडे गेले. महाराज व नाना स्वामींना उतरवून घेण्यासाठी व पोचवण्यासाठी स्टेशनवर गेले होते. गोदावरीचे साधना-जप फारच काटेकोरपणे चालत असे. त्या पहाटे आसनादि योगाभ्यासही करीत असत. घरात शांतता असे.

## क्रेपच्या फुलांना भुंगे भुलले

नू. म. वि. मध्ये प्रारंभीच्या काळात महाराजांच्या कलेचा प्रभाव मुख्याध्यापक दत्तो वामन पोतदार यांच्यावर पडला. त्यांनी महाराजांना 'क्रेपवर्क फ्लॉवर मेकिंग' हे इंग्रजी पुस्तक मुद्दाम दिले. महाराजांनी ते वाचून त्याप्रमाणे क्रेपची फुले तयार करण्यास सुरुवात केली. आणि आश्चर्य असे की, त्यात त्यांना अपूर्व कौशल्य प्राप्त झाले. शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनातील चित्रकला-प्रदर्शनात नवीन तयार केलेल्या क्रेपच्या फुलांचे गुच्छ परड्यातून ठेवले. हे फुलांचे गुच्छ त्या प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरले. विविध प्रकारची, विविध रंगांची फुले, पानांच्या वेली इतके स्वाभाविक होते की या कृत्रिम फुलांवर मधमाशा व भुंगे

येऊन बसून जात होते. क्रेप फुलांचा हा उपक्रम पुण्यात प्रथमच होत होता. हे प्रदर्शन पहाण्यास युरोपियन, पार्शी स्त्रिया आल्या व त्यांनी फुलापरड्यांची मागणी केली. या संमेलनास कॅम्पमधील स्कॉटिश मिशन इंडस्ट्रीजचे मॅनेजर आले होते. त्यांनी या फुलांचे कौतुक करून मुख्याध्यापकांना व कलाकार गुळवणी यांना आश्वासन दिले की आपण अशी फुले तयार करून दिलीत तर आम्ही आमच्या संस्थेमध्ये मुद्दाम एक स्टॉल काढून विक्रीला ठेवू. त्याप्रमाणे लोकाग्रहास्तव महाराजांनी काही दिवस तसे केले.

पुढे डेनिस हा युरोपियन क्रेपपेपर कंपनीचा क्रेपपेपरतज्ज्ञ आणि सिडने डॅन्ट नावाचा एजंट एकदा पुणे येथे आला होता. त्यांनी महाराज हे काम कसे करतात हे समक्ष भेटून अवलोकन केले. त्यांना समाधान तर झालेच पण त्यांनी एक प्रदर्शन भरवून स्पर्धा ठेवली, त्यामध्ये महाराजांना पहिली तीन बक्षिसे मिळाली. त्या बक्षिसाची मोठी मानपत्रे मोठ्या समारंभात मिळाली. आणि या स्कॉटिश मिशनने नागपूरला एक प्रदर्शन आयोजित केले त्यामध्ये प्रात्यक्षिक दाखवायला महाराजांना नागपूरला नेले. महाराजांच्या 'क्रेपवर्क' वर ही युरोपियन मंडळी इतकी खूष झाली की अनेक युरोपियन अधिकाऱ्यांच्या घरी महाराजांचे पुष्पगुच्छ फ्लॉवरपॉटमध्ये त्यांच्या घराघरांतून दिसू लागले. या कला-प्रेमी मंडळींनी महाराजांकडून क्रेपची फुले, वेली इतर वस्तू तयार करून घेतल्या आणि 'बोस्टन' येथे भरणाऱ्या प्रदर्शनासाठी पाठवल्या. त्या प्रदर्शनसमितीने महाराजांच्या फुलांना 'गोल्ड मेडल' दिले व ते पुण्यात पाठवून मोठे प्रशस्तिपत्रही पाठविले.

यामुळे कलाक्षेत्रात महाराजांची कीर्ती फार झाली. अनेक लोक, मुले, स्त्रिया महाराजांकडे हे क्रेपवर्क शिकण्यासाठी येऊ लागली. हा क्रेपच्या फुलांचा वर्गही महाराज काही वर्षे घेत होते. या कलेचेही अनेक विद्यार्थी महाराजांनी तयार केले. नू.म.वि. शाळेचाही लौकिक या क्षेत्रात वाढला.

### युरोपियन शिक्षणाधिकाऱ्यांच्या घरी

मुख्याध्यापक दत्तो वामन पोतदारांनी क्रेपच्या फुलांचा सुंदर

गुच्छ शाळातपासणीस आलेल्या युरोपियन अधिकाऱ्याला भेट म्हणून दिला. त्याला ही फुले पाहून महाराजांच्या कलागुणांचे कौतुक वाटले. मोठ्या समाधानाने तो गुच्छ त्याने आपल्या घरी नेला. त्याची बायको तर ही फुले पाहून त्या फुलांवर मोहून गेली. तिने ही फुले शिकण्याची-तिची इच्छा आपल्या नवऱ्याजवळ आग्रहाने व्यक्त केली. त्या शिक्षणाधिकाऱ्याने नू.म.वि.च्या मुख्याध्यापकांना फोन केला. ' तुमच्या क्रेपची फुले करणाऱ्या शिक्षकाला आमच्या घरी फुले शिकविण्यासाठी पाठवून द्यावे, आमच्या बायकोची इच्छा आहे. '

मुख्याध्यापकांनी महाराजांना ( गुळवणी मास्तरांना ) आपल्या कचेरीत बोलावून घेतले. शिक्षणाधिकाऱ्यांचा फोन आल्याचे सांगितले. पत्ता देऊन ठेवला. तर तुम्ही केव्हा जाऊ शकता ते सांगा म्हणजे मी त्यांना फोन करून कळवतो, यावर महाराज म्हणाले, विचार करून सांगतो.

महाराज विचार करू लागले, चांगलाच व्याप वाढत चालला आहे, हेच करीत सुटलो तर परमार्थ संपलाच. पैसा नि कीर्तींचा लोभ कुठे नि कसा भुलवील काही सांगता येत नाही. त्यातून या परदेशी लोकांच्या घरी जाण्याचे धर्मसंकट ! आमचे स्पर्शास्पर्शाचे नियम कडक, वेळ जाणार इ. विचार होऊन महाराजांनी मुख्याध्यापकांना नाही सांगितले, दत्तो वामनांच्यापुढे प्रश्न उभा राहिला. शिक्षणाधिकाऱ्याला नकार कळवायचा म्हणजे त्याची नाराजी पत्करायची. महाराजांना त्यांनी खूप आग्रह करून पाहिला पण महाराज या कामाला तयार होईनात. वाटेल ती फी द्यायला ते तयार होते.

याप्रकरणी मुख्याध्यापकांनी त्या शिक्षणाधिकाऱ्यांना कळविले की आपल्या घरी येणे आमच्या कलाशिक्षकांना जमणार नाही. त्यावर त्याने सांगितले की आमची पत्नी त्यांचे घरी जाण्यास तयार आहे. ठरल्यावेळी येत जाईल. मुख्याध्यापकांनी ही हकीगत महाराजांना सांगितली. महाराजांना वाटले अशी बाई घरी येणे तर बिलकूल चांगले नाही. आपला व्याप आणि उपाधी अधिकच वाढणार. त्या काळात युरोपियन माणूस भेटून बोलला तर केवढे कुतुहल वाटत असे आणि इतरांकडूनही होत असे. त्या बाईला पहायला लोक गोळा व्हायचे.

त्यातून आपले वर्तन धार्मिक, साधक येऊन साधना करणार, कोणी साधू संन्याशी, जिज्ञासू आपल्या घरी असणार. आपले नित्याचे आन्हिक! या सर्वांवर बंधन येणार. ती येणार म्हणून खुर्ची–टेबलाची व्यवस्था करावी लागणार. पुन: महाराजांचा निग्रह वाढला व हे जमणार नाही हे कळविले.

शेवटी तो शिक्षणाधिकारी व त्याची बायको नू. म. वि. मध्ये आली. मुख्याध्यापकांच्या खोलीत महाराजांना बोलावून घेऊन परस्परांनी खूप विचार केला व नाइलाजाने असे ठरले की सकाळी ९ वाजता त्यांची मोटार २० नारायण पेठेत येईल. त्यामधून महाराजांनी कॅम्पात जावे. त्या बाईला क्रेपची फुले शिकवावीत आणि ठीक १० ला त्याच मोटारीने महाराजांना त्यांचे घरी पोचविण्यात येईल.

गुणामध्ये सापडणे म्हणजे बंधनात सापडणे हे या प्रसंगातून लक्षात घेण्यासारखे आहे. मोठ्या नाइलाजाने महाराजांचा हा उपक्रम सुरू झाला. सकाळी ९ पूर्वी सर्व आन्हिक उरकून ते तयार होऊन गोवईकर चाळीच्या दिंडी दरवाज्यात उभे रहायचे. त्या युरोपियन अधिकाऱ्याची मोटार ठीक ९ च्या ठोक्याला दारात यायची. ती परदेशी मंडळी वेळेत फार काटेकोर असणारी. तो त्यांचा विशेष गुण म्हणून जगप्रसिद्ध आहे. महाराजही वेळेच्या बाबतीत तितकेच काटेकोर होते. हा त्यांचा काटेकोरपणा सर्वांनी अनुभवला आहे. महाराज आणि उशीर असे कधीही घडले नाही. तसेच वेळ सांभाळण्यासाठी वेळ गाठण्यासाठी महाराज आणि घाई असे कधी झाले नाही. त्यांची रोजच्या किंवा प्रासंगिक कोणत्याही कार्यक्रमात कधीही घाई नव्हती आणि उशीरही नव्हता. सर्व ठिकाणी ते वेळेपूर्वी हजर असत.

या सकाळच्या ९ च्या मोटारच्या वेळी मोटारीचे येणे आणि महाराजांचे कोट टोपी बूट घालून बाहेर येणे एकाच वेळी होत असे. या अत्यंत नियमितपणाचा प्रभाव त्या शिक्षणाधिकाऱ्यावर एवढा पडला की त्याने मुख्याध्यापक दत्तो वामन पोतदारांना यासंबंधी कृतज्ञतेचे – अभिनंदनाचे जे दोन अडीच महिन्यांनी पत्र पाठविले, त्यामध्ये महाराजांच्या नियमितपणाचा गौरव केला होता. एकदाचा हा उपक्रम संपला व महाराजांना मोकळे मोकळे वाटू लागले.

## श्रीसद्गुरु टेंबेस्वामींचा पुण्यतिथी उत्सव

बार्शीमध्ये आषाढ शु. १ चा हा पुण्यतिथी उत्सव प्रथम सुरू झाला. वे. शा. सं. प्रल्हादशास्त्री जोशी यांच्या समर्थ नेतृत्वाखाली सर्व धर्मकार्य व्यवस्थित होत असे. कर्म यथासांग पार पाडण्याकडे महाराजांची दक्षता असे. सद्गुरूंच्या सान्निध्यात राहून त्यांचे धर्माचरण, कर्मशास्त्र, अनुष्ठाने, इ. जवळून पाहिले होते, तो संस्कार आणि तीच दृष्टी ठेवून सर्व धर्मकार्य आणि जीवनकार्य स्वाभाविकपणे महाराजांच्या रोमरोमी भरलेले होते. यथासांग कर्मांची प्रसन्नता प्रचीती देणारी असते. यामध्ये येणाऱ्या प्रत्येकाला या प्रसन्नतेची प्रचीती येत असते. या कार्यक्रमात भोजन-प्रसाद असतो. त्याने स्थूल शरीराला प्रसन्नता येते, इतकी साधी पातळी या कार्यक्रमाची नसते. अन्नमय शरीर व प्राण असले तरी अन्ना-तूनच मन तयार होते. त्या मनोमय कोषाची शुद्धी अन्नावर अवलंबून आहे. म्हणून प्रसादाला महत्त्व आहे. 'प्रसादस्तु प्रसन्नता' येते हे प्रसादाचे महत्त्व आहे. प्रसन्नता मनाला येत असते म्हणजे प्रसादाचा आणि मनाचा संबंध आहे. साध्या अन्नापेक्षा प्रसादाला पावित्र्य असते. प्रसादामध्ये ईश्वरशक्तीचे चैतन्य असते, अशी जाणीव व श्रद्धा असेल तर प्रसादाचा परिणामही प्रभावी होतो. शक्तीचा प्रभाव व ती ग्रहण करण्याची क्षमता जाणिवेने आणि श्रद्धेने वाढते म्हणून जाणीव आणि श्रद्धेचे महत्त्व पुनः पुनः लक्षात घ्यावे लागते. 'देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी' या पंक्तीत ग्रहणशक्तीचा दुबळेपणाच दाखविला आहे.

साधकीय जीवनात श्रद्धा-जाणिवेचा परिपोष होतो म्हणून साधकांचे अनुभव तीव्र असतात. बार्शीच्या या पुण्यतिथी-प्रसंगी तीर्थ-राजाची पूजा होऊन तो तीर्थराजाचा कलश महाराजांनी मस्तकी धारण केला. ब्राह्मण मंडळींनी उपनिषदामधील आनंदवल्लीच्या वेदमंत्रांच्या घोषांना प्रारंभ केला. मानुष आनंदापासून आनंदाचे वर्णन टप्प्याची पट दाखवीत सुरू झाले. तरुण सम्राटाचा आनंद हा एक पट प्रमाणाचा पहिला टप्पा समजून मानुष आनंदाची परिसीमा धरली तर यापुढील एकेक आनंद पुढच्या टप्प्यावरचा असून शंभरपट श्रेष्ठ असल्याचे दाखविले

आहे. प्राणमय-मनोमय-विज्ञानमय-आनंदमय व यांवरील ब्रह्मानंद आहे हे क्रमाने दाखविणारे एक-एक वेदमंत्र ब्राह्मणांच्या मुखातून येत होते. या वेळी महाराजांचा श्वासही उर्ध्वगतीने वाढू लागला. आणि अष्टसात्त्विक भाव उत्पन्न होऊन श्वासाच्या गतीने प्रचंड ॐकाराला प्रारंभ केला. भोवताली भक्त होते. त्यांच्यातही शक्तीचा संचार होऊन त्यांचेही ॐकार सुरू झाले. तेथील सर्वच वातावरण चैतन्यशक्तीने व्यापून टाकले. महाराजांची शक्तिसंचाराची तीव्रता एवढी वाढली होती की कलश मस्तकावर घट्ट धरून सारे शरीर कंपाने घुसळत होते, ॐकार प्रचंड स्वरात वाढला होता. आता ते पडतील असे वाटून घाबरून गेलेले सोवळ्यातील भक्त त्यांना धरण्याच्या विचारात होते, परंतु आनंदाचे वर्णन संपताच महाराज शांत व स्थिर होऊ लागले. असा संचार कधी कोणाच्या पाहण्यात आलेला नव्हता. त्यामुळे सर्वच आश्चर्याने मंत्रमुग्ध झाले होते. हा संचार, शक्ती जागृत झालेल्यांना तीव्रतम प्रमाणात अनुभवास येतो. असा शक्तिपात दीक्षा अनुगृहीत साधक मंडळींचा नित्याचा अनुभव आहे. याने प्राप्त होणारे समाधान शब्दातीत आहे. हे ज्याचे त्याने पुण्यतिथीच्या या कार्यक्रमात उपस्थित राहून अनुभवायचे असते.

हा पुण्यतिथीचा कार्यक्रम पुढे पुण्यात २० नारायण पेठेत सुरू झाला. सुरुवातीची काही वर्षे श्रीदत्त जयंती बार्शीला होत असे. त्यासाठी महाराज बार्शीला जात असत. तसेच गुरुपौर्णिमा सोलापुरला बापू-साहेब कुबडे यांच्याकडे काही वर्षे नेमाने होत असे. वैद्य मास्तरांच्या वाड्यातच त्यावेळी बापूसाहेब कुबडे रहात होते, त्यामुळे तेथेच तिसऱ्या मजल्यावरील माळावजा मोकळ्या निवांत जागेत ही गुरु पौर्णिमा साजरी होत असे. पंढरपूरच्या आषाढी वारीहून वैद्य-कुबडे आदि मंडळी आली म्हणजे उत्सवाची तयारी होत असे व सर्व भक्तांना निमंत्रित करून उत्सव भावभक्तीने साजरा होत असे. विशेषतः या उत्सवात गुरुपौर्णिमाच्या शुभ दिवशी अनुगृहीत भक्तांना श्रीगुरु महाराजांच्या समोर साधनेस बसण्याची पर्वणी लाभत असे. श्रीसद्‌गुरूंच्या समोर साधना आणि त्यावेळी होणारा श्रीगुरूंचा आंतरिक कृपाप्रवाह हा भक्तांना मिळणारा श्रेष्ठतम प्रसाद असतो.

## पुणे वास्तव्यातील विशेष

पुण्यातील वास्तव्यात महाराजांची जीवनाची बैठक बार्शीपेक्षा परिस्थित्यनुरूप बदलली होती. बार्शीत योगासनांचे वर्ग होते ते पुण्यात सुरू केले नाहीत. बार्शीत कलागुणांचे कार्य मोठ्या प्रमाणात सुरू होते त्यालाही मर्यादा घातली. गावातील उत्तरेश्वर क्लबातील मंडळींबरोबर फिरायला जात असत व जनसंपर्कात वावरत असत. तें जनसंपर्काचे स्वरूप बदलले म्हणजे सायंकाळी फिरायला जात, पण बरोबर एखाद दुसरी व्यक्ती घेऊन किंवा स्वत: एकटे जाऊ लागले. बार्शीला काही विद्यार्थी घरी येत. सहवासात रहात. त्यांना आपली कामे सांगत. फोटोग्राफी वगैरे शिकवीत. असे बार्शीत करीत असत. पुण्यात आल्यावर त्यांनी हा विद्यार्थी-संपर्क पूर्ण थांबवला. शाळेमध्ये नोकरी, याशिवाय स्वत:ला प्रगटच केले नाही. लोकसंग्रहाची हौस बार्शीत जशी प्रकर्षाने दिसली तशी पुण्यात दिसली नाही. बार्शीत महाराज चारचौघांत वावरताना-मिसळताना दिसत. तसे पुण्यात ते चारचौघांना घेऊन हिंडत–फिरत नसत किंवा बसत नसत. नेहमी एकटे, एकदोन व्यक्तींच्या समवेत असलेले दिसत. बार्शीत फोटोग्राफी जेवढी केली ती पुण्यात केलीच नाही. पुण्यात त्यांनी स्वत:ला जास्तीत जास्त झाकून ठेवण्याचा हेतूपुरस्सर प्रयत्न केला.

पुण्यात ते नवीन होते, फारसा कोणाचा परिचय नव्हता, हे सत्य असले तरी पुढील काळातहीं त्यांच्याभोवती गर्दी दिसली नाही. ते गर्दींत कधी घुसलेच नाहीत. त्यांनी पुणे आणि पुणेकर जवळून बघितले. त्यांच्या सभांना गेले. तेथील ज्ञानसत्रांना गेले, आनंदाश्रमातील कार्यक्रमांना गेले. धेनुदास डोळे यांच्या गोरक्षणसंस्थेत गेले. श्रीशिरोळकर स्वामींच्या आचार्य पीठात गेले. खुन्या मुरलीधराच्या मंदिरातील कीर्तन-प्रवचनांना गेले. ह. भ. प. केशवराव देशमुखांच्या प्रवचनांना गेले. केसरी कार्यालयातील भाषणांना–चर्चासत्रांना गेले. सभासंमेलनांतून जाऊन आले. अहिताग्नि राजवाडे यांच्याकडील अभ्याससत्रांना गेले. इतिहास संशोधकमंडळात गेले, वसंत व्याख्यानमाला कधी चुकली नाही, बाळशास्त्री हरदासांची सर्व प्रवचनमाला ऐकली – पण स्वत:भोवती गर्दी गोळा न करता, एकटे राहून – लोकांमध्ये वावरून एकांताचा

अनुभव घेत घेत हे सारे केले.

त्यांनी समाज समजून घेतला. राजकारण समजून घेतले, राजकारणी समजून घेतले. विद्वान–शास्त्री–पंडित समजून घेण्यासाठी पाहिले. कलाप्रदर्शने पाहिली, कलाकार पाहिले. साहित्य आणि साहित्यकार पाहिले. वर्तमानपत्रे पाहिली आणि वृत्तपत्रकार पाहिले. शास्त्र आणि शास्त्रज्ञ पाहिले, पण स्वत: कशातही घुसले नाहीत. कोणावरही कधीही टीका केली नाही. त्यांचे गुण पाहिले, दोष पाहिले; पण कधी त्याचा उच्चार केला नाही. स्वत:हून कोणाचा परिचय करून घेतला नाही की कोणाकडे परिचय करून देण्या-घेण्यासाठी गेले नाहीत. त्यांना प्रगट होण्याची इच्छा नव्हती. प्रसिद्धी, कीर्तीची हौस नव्हती. कोणाकडून कशाची अपेक्षा नव्हती. कोणाला काही देण्याची घाई नव्हती. कोणाबद्दल रागतिरस्कार नव्हता. कोणाबद्दल आकर्षण नव्हते. माणूसघाणेपणा नव्हता. माणूसवेडेपणा नव्हता. ते कोणाच्याही व्यक्तिमत्त्वाने प्रभावी झाले नाहीत आणि कोणालाही त्यांनी आपल्या बोलण्यावागण्याने प्रभावित केले नाही.

महाराज गुणी होते, परंतु गुणांपासून अलिप्त राहिले. महाराज कलाकार होते, पण कलेपासून अलिप्त राहिले. महाराज असामान्य होते, परंतु सामान्य राहिले. महाराजांजवळ प्रसिद्धीला लागणारे कर्तृत्व होते, परंतु हेतुपुरस्सर प्रसिद्धिपराङ्मुख राहिले. ते ज्ञानी होते, परंतु कोणापुढेही ज्ञानाचे प्रदर्शन केले नाही. ते योगिराज होते पण कधीही योगाचे प्रात्यक्षिक समाजापुढे केले नाही, का यौगिक चमत्कार दाखविला नाही. ते कर्मनिष्ठ होते, परंतु त्यांच्या कर्मनिष्ठेने कधी कोणालाही उपाधी झाली नाही, त्रास झाला नाही की गैरसोय झाली नाही. ते ब्रह्मचारी होते. पण त्यांचे ब्रह्मचर्य कोणाच्या डोळ्यावर आले नाही का कळलेसुद्धा नाही. त्यांचे चारित्र्य आणि व्यवहार इतके विशुद्ध, निष्कलंकित होते की कधीही कोणी त्यांच्यावर कल्पनेनेही आरोप करू शकला नाही. त्यांच्या चरणांशी अष्टसिद्धी ओळंगत होत्या परंतु आयुष्यभर कधी बिचाऱ्या एकीलाही काम सांगितले नाही की मनातही आणले नाही. ते समर्थ होते पण ईश्वर–सद्‌गुरूंना प्रार्थना करून कोणतेही कार्य करीत.

## मुमुक्षु साधकाने कसे रहावे ?

प्रपंच प्रसिद्धीने पोसतो तर परमार्थ अप्रसिद्धीने पोसतो. प्रपंच अपेक्षांनी आणि गरजांनी वाढत जातो. तर परमार्थ अनपेक्षपणाने आणि गरजा कमी करण्याने वाढत जातो. प्रपंच प्रवृत्तीने चालतो, तर परमार्थ निवृत्तीवर चालतो. प्रपंचात सुखाचे अनेक विषय असतात, तर परमार्थात विषयाशिवाय सुख असते. प्रपंचातील सुखाचे अनेक विषय असून सुखाचे अस्तित्व क्षणभरच असते. तर परमार्थात विषय नसून सुख अखंड असते. प्रपंचात सुखाचे विषय बाहेर असल्यामुळे सुख हे बाहेर असते तर परमार्थात सुख विषयविरहित असल्यामुळे सुख आतच असते. प्रपंचातील सुख परावलंबी असते, तर परमार्थातील सुख निरालंब असते. प्रपंचामुळे जीवाला बद्धता येते तर परमार्थाने जीव मुक्त होतो. ही परमार्थाची आणि प्रपंचाची ठेवण आहे. हे लक्षात घेऊन प्रपंचात रहावे लागते तेव्हा परमार्थ साधतो. परमार्थ साधल्यावर प्रपंच सुखी होतो. हे लिहून-बोलून करता येत नाही. सत्पुरुषांनी कसे केले ते पाहून काही जमले तर त्यांची कृपा म्हणून करता–होता येईल.

महाराजांचे जीवन साधकांच्या दृष्टीने आदर्श आहे. उपदेशाचा प्रभावी परिणाम होत नाही. तयारीशिवाय उपदेशाचा उपयोग होत नसतो. तयारी करण्यासाठी सत्पुरुषांच्याा जीवनचरित्राचे निरीक्षण करावे लागते.

हल्लीचे जीवन शहरी झाले आहे. खोली–दोन खोल्यात संसार-प्रपंच करावा लागतो. शांतता कुठेच नसते. लोभामोहाचे सापळे सर्वत्र पसरलेले असतात. अशुद्धपणाच्या धुळीमध्ये शुद्धता हरवलेली असते. सुधारणा, समता, पुरोगामित्व, विश्वबंधुत्व, विश्वोद्धार नावाच्या मेघमालेच्या अंतःरंगात पावित्र्याची विद्युल्लता लुप्त झालेली असते. अंतःकरणातल्या भावनेची जागा मुखातल्या मधुर शब्दांनी घेतलेली असते. अंतःकरणाचे काम मुखातर्फे चालते. यंत्र वापरण्याने त्याची कार्यक्षमता वाढते, त्याप्रमाणे हल्लीच्या काळात सर्वांत अधिक कार्यक्षम मुख झालेले आहे. याउलट उपयोगात न येणारे यंत्र निकामी होऊन पडते. तसे अंतःकरण उपयोगात येत नसल्याने निकामी होऊन पडले आहे. शारीरिक स्थूल यंत्रणाही हल्लीच्या काळात बदलत चालली

आहे. शरीराला ठराविक वेळी अन्न द्यायच्याऐवजी उठसूट खाण्याची इच्छा आणि सोयी सध्या उपलब्ध आहेत. अशा अनेक गोष्टी शहरी जीवन रहाणीमानात आल्या आहेत. त्यामुळे स्वास्थ्य-शांतता-सवड-काही म्हणून शिल्लक राहिले नाही, मग परमार्थ कसा करायचा ? देवाला जागा नाही तर पूजा करायला जागा कुठली ? एकाच खोलीचे रूपांतर कधी न्हाणीघर, तर कधी स्वयंपाकघर, तर कधी कोठीघर, तर कधी शय्याघर म्हणून दिवसातून अनेकदा होत जाणार ! तर मग साधन, उपासना, अनुष्ठान, पारायण कोठे करणार ? भोवतालची बिऱ्हाडं हवं ते करणार ! हवं ते खाणार ! अशा परिस्थितीमध्ये साधकाला रहाणे–सर्व नियम सांभाळून रहाणे, साधन करणे – हे सर्व कसे जमणार ? यासंबंधी प्रश्नच काढावयाचे झाले तर किमान शंभर प्रश्न निघतील. तेवढी उत्तरे द्यावी लागणार. यापेक्षा २० नारायण पेठेत महाराज कसे रहात होते हे पाहिले म्हणजे सोदाहरण उत्तर मिळेल.

महाराज पुण्याला ज्या दृष्टीने राहिले, ज्या पद्धतीने वागले ती दृष्टी आणि पद्धती साधकांनी पाठासारखी गिरवून आचरणात आणली पाहिजे. पहिली महत्त्वाची गोष्ट की आपला जीवनहेतू स्पष्ट व निश्चित असावा लागतो. परमार्थ साधायचा व साधना करायची हे निश्चित असले पाहिजे. म्हणजे या गोष्टीला प्राधान्य देण्याची मनाची भूमिका स्पष्ट पाहिजे. रोजच्या दिनक्रमातसुद्धा कोणती गोष्ट आधी करायची, कोणती नंतर हे कमी-अधिक प्राधान्यानेच ठरत असते. जीवनक्रमात सुद्धा आपल्या आवडीप्रमाणे प्रत्येक गोष्टीला कमी अधिक प्राधान्य देऊनच करीत असतो. हे लक्षात ठेवून आपल्या जीवनाचा हेतू परमार्थ साधणे हे प्रधान कर्तव्य ठरविले पाहिजे. ही जीवनदृष्टी निश्चित केली पाहिजे आणि मग त्याला अनुकूल असेल ते ते केले पाहिजे आणि जे जे प्रतिकूल असेल ते ते टाळले पाहिजे, सोडले पाहिजे. असे झाले तरच महाराजांचे जीवन–जीवनदृष्टी आणि जीवनपद्धतीचा बोध होऊ शकेल, त्यापासून साधकाला मार्गदर्शन मिळेल आणि जीवन कृतार्थ करण्याचे भाग्य या जन्मीच पदरात पडेल.

महाराजांच्या जीवनदृष्टीचा विचार थोडक्यात केला, पण

जीवनपद्धतीचा विचार मात्र अधिकात अधिक केला पाहिजे. सखोल अभ्यासाने केला पाहिजे, अत्यंत श्रद्धेने समरस होऊन केला पाहिजे, तेव्हाच त्याची मार्मिकता अंत:करणावर ठसेल आणि तसे वागण्याचे प्रयत्न विचारपूर्वक होतील.

महाराजांनी आपले लौकिक गुण ओळखून त्यांनी त्या गुणांना झाकून ठेवले. त्या गुणांनी मान-मरातब, पैसा, प्रसिद्धी मिळून मन लौकिकात रमते हे ओळखून त्यांनी ते बंद केले. कारण लौकिक गुण लौकिकाच्या मोहपाशात गुरफटून टाकतात. कालाची जाणीव ठेवू देत नाहीत. म्हणून पुण्यात आल्यापासून लौकिक गुणांना मर्यादेत बंदिस्त केले. कलेच्या उपासकाला कलेचे प्रेम किती असेल हे कलाप्रेमी हृदयाला चांगलेच कळेल. कलेकडे झुकणारे मन कलेपासून काढून घेणे वाटते तेवढे सोपे नसते. कलेची उपजत आवड जोपासली नाही, त्या कलेला अभ्यासाचे खतपाणी घातलेच नाही तर मन कलेपासून अलग होऊ शकते. पण उपजत गुणांचा विकास प्रयत्नांनी केला असेल तर त्यापासून मनाला परावृत्त करणे, जीवनदृष्टीच्या निश्चयाशिवाय अशक्य आहे. परमार्थाच्या यशाचे सूत्र आहे ' असंग शस्त्रेण दृढेण छित्त्वा '

महाराजांचा हा असंग म्हणजे जीवनाच्या सर्व क्षेत्रांतून असे. त्यांच्या खोलीतील वस्तू मोजक्या होत्या. आई–बहीण आणि ते स्वत:, या तिघांची भांडी ठरलेली होती. तिघांच्या स्वैंपाकासाठी भोजनासाठी भांडी म्हणाल तर भाताचे छोटे तपेले, दूध–आमटी–भाजी–वरणासाठी ४ लहानमोठी पातेली, चार ताटे, तवा, दोन पळचा, उचटणे, चार चमचे, या भांड्यांच्या संख्येत कधीही फरक नव्हता. दुपारचे एक वेळेचे तिघांचे भोजन. रात्री भोजन नाही. आई-बहिणीचे लाह्या-पोह्याचे पदार्थ– महाराजांचे दूध–फळे असली तर तिघे घेत. कधी कमी नसायचे. त्यातल्या त्यात विविधता असायची. डालडा तूप कधी वापरले नाही. उत्तम तूपच नेहमी घरात असे. कधी पाहुणा भोजनाशिवाय जात नसे. घरात चहा असायचा, पण पाहुण्यांना लागत असेल तर त्यांच्यापुरता होत असे. आईच्या स्वैंपाकाला अमृताची चव असायची. अधूनमधून या पदार्थांची चव नाना भालेरावांच्याकडील सर्वांना अनुभवण्यास मिळत असे. सोवळे कडक असे, नित्य वैश्वदेव नैवद्य

होत असे. सर्व उत्तम पण आटोपशीर. पसारा नाही, व्याप नाही, कमी नाही. खरे ऐश्वर्य गरीब-श्रीमंतीवर कमी-जास्त होत नसते. ऐश्वर्य हे आचारात असते. उदार हृदयात असते. श्रीमंत कवडीचुंबक असेल तर ऐश्वर्य नाही. श्रीमंत उधळा असेल तरी ऐश्वर्य म्हणता येत नाही. उदार हृदयाचा आचार म्हणजे ऐश्वर्य असते. महाराजांच्या घरात ऐश्वर्य नांदत होते.

घरात परस्परांचा सुसंवाद होता. तिघेही श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे अनुगृहीत होते. तिघेही श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराजांचे अनुगृहीत होते. तिघांचीही दत्त उपासना होती. तिघांचीही शक्तिपातविद्येची नित्य साधना होती. एकमेक परस्परांचा पारमार्थिक अधिकार ओळखून परस्परांशी आदराने, प्रेमाने—वात्सल्याने वागत होते. प्रत्येकजण स्वतःपेक्षा इतरांची सर्व काळजी घेत होते. ती. पू. उमामातेचा स्वभाव तर मधासारखा मधुर आणि लोण्यासारखा मऊ होता. त्यांनी कधीही कोणाच्याही भावनेला दुखावले नाही. बोलण्याने माणसे दुखावली जातात म्हणून त्यांचे बोलणे अत्यंत मर्यादित असे. बोलण्यापूर्वी दहा वेळा विचार करून बोलत. त्यामुळे त्यांचे शब्द फारच मोलाचे, मधुर, अन्तःकरणावर ठसणारे असत. स्वच्छता आणि पावित्र्य या तिघांच्या भोवती आश्रयाला येऊन राहिले होते. महाराज सकाळी अकराची शाळा म्हणून १०॥ ला धरून निघत, तर आई त्यांना ९॥ लाच गरम स्वैंपाक करून जेवायला घालीत असे आणि भोजन झाल्यावर म्हणत असे ‘ वामन, जरा वामकुक्षी घेऊन मग शाळेत जा. ’ महाराजही आईच्या इच्छेप्रमाणे अर्धातास वामकुक्षी करून मग शाळेत जात असत. हे सहृदय भावनेचे ऐश्वर्य ऐकले तरी हृदय भरून येते. मस्तक नमते.

महाराजांचे घर पहाटे चार-साडेचारला जागे होत असे. तिघांची साधना चाले. घराची स्वच्छता. चूल पोतेरे, सडा-रांगोळी, देवाची उपकरणी घासून ठेवणे, पूजा साहित्याची तयारी करणे, हे सर्व चालू असताना प्रत्येकाचे मानसिक नामस्मरण चाले. व्यवहारातील, प्रपंचातील काही बोलायचे झाल्यास मोजक्या शब्दांत बोलले जाई. बराचसा मूक चित्रपटच चालू असे. गप्पागोष्टी करीत वेळ घालविणे कोणालाच पसंत

नसे. सायंकाळी किंवा रात्री थोडा वेळ बोलणे होत असे. प्रत्येकाचे जपानुष्ठान मोठे असे. ते रोजच्या रोज पूर्ण करणे याबद्दल प्रत्येक जण दक्ष असे. महाराज शाळेत गेल्यावर दोघी-मायलेकी जेवण करीत. धुणं भांडी घरात असे. यामुळे स्पर्शाचे दोष कुठूनही प्रवेश करू शकत नसत. महाराजांनी जागा घेतानाच खोलीतील मोरीत नळ बसवून घेतला. दादा गोवईकर हे मालक होते. तेही धार्मिक वृत्तीचे होते. त्यांना महाराजांबद्दल आदर होता. त्यांनी आपल्या खर्चाने नळाची सोय करून दिली होती. घरात नळाची सोय असणे फार महत्त्वाचे असते. धार्मिक आचारातील नियम संभाळण्यासाठी पाण्याची सोय अनिवार्य असते. ऋषीमुनी अनुष्ठानांची जागा नदीतीरावर ठेवीत. नदीचे सान्निध्य हे पाण्याच्या सोयीसाठी असे. पाण्याची सोय चांगली असेल तर सर्व व्यवहाराला पावित्र्य आणण्यासाठी उपयोगी पडते. हातपाय धुवून देवाला नमस्कार करणे, देवपूजेचे संध्येचे पाणी सोवळयात भरण्यासाठी, स्नानास्वैंपाकासाठी पाणी चांगले मिळते.

महाराजांचे कपडे मोजके असत. एक कोट, दोन शर्ट, दोन धोतरे, दोन बनियन्स एवढेच. पण धोतरे फिनलेची उत्तम असत. कोट उलनचा असे. पुण्यात आल्यापासून कातडी कोल्हापुरी वहाणा बंद करून बाटाचे कापडी बूट वापरण्यास सुरुवात केली. उत्तम 'क्वालिटी' हे महाराजांच्या वस्तूंचे वैशिष्टय असे. बार्शीत कोईमतुरी फेटा घालून शाळेत जात असत. पुण्यात आल्यावर टोपी घालू लागले. कोणतीही उपाधी न वाढवता आटोपशीरपणा कशाने साधेल हे त्यांनी प्रत्येक बाबतीत पाहिले. त्यांच्या वृत्तीत संग्रह नव्हता. त्यामुळे घर नेहमी मोकळे व स्वच्छ रहात असे. त्यांचे आहाराचेही वैशिष्टय हेच होते की, आहार आटोपशीर म्हणजे लघू होता. उत्तम सात्त्विक अन्नपदार्थ ही त्यांची आवड होती. चमचमीत तिखट-तेलकट याची आवड नसे. मधुर सौम्य चवीची त्यांच्या जिभेला सवय होती. रात्री भाजलेल्या शेंगा, शेंगदाणे, लाह्या, फळे, दूध या साध्या पदार्थांपैकी एखादा व दूध अल्प प्रमाणात फराळात असे. मधीकधीही काहीही तोंडात टाकण्याची सवय नव्हती.

संध्याकाळी शाळेतून आल्यावर हातपाय धुवून, देवाला नमस्कार करून फिरायला जाऊन येत असत. या फिरण्याबाबत रोज बदलत्या

बाजूला जाण्याकडे कल असे. त्यामुळे शहराच्या रस्त्यांची, ठिकाणांची माहिती होत असे. गावाबाहेर जाणे असे. कधी फर्ग्युसन कॉलेजच्या बाजूने हनुमान टेकडीवर जात तर कधी स. प. कॉलेजच्या बाजूने पर्वतीवर जात असत. हा त्यांच्या नित्याचा व्यायामच असे. हे फिरणे १–१।। तासाच्या वर कधी होत नसे. सायंकाळी ७–७।। ला परत घरी आले की थोडी विश्रांती घेऊन, शौचाला जाऊन येऊन, हातपाय धुवून सायं-संध्या–आरती स्तोत्रादि पठण करीत असत. मग फराळ वगैरे चाले. रात्री स्वैपाकाचा प्रश्न नसल्याने सर्वांना विश्रांती व शांतता असे. महाराजांची साधना पहाटे विशेष चाले. त्यात कधीही खंड नसे. सायंकाळी संध्येच्या वेळी तासभर होत असे तेवढीच. रात्री झोपण्यापूर्वी आईचे अंथरूण स्वत: घालणे, आईचे हातपाय चेपून देणे, तिच्या पायावर डोके ठेवून नमस्कार करणे व नंतर झोपणे.

त्यांच्या साधनेमध्ये भ्रामरीचा गुंजारव बराच वेळ चालत असे. तसेच ते साधनेत कधी जमीन सोडून वर अधर उचलले जात असत तर कधी त्यांची निर्विकल्प समाधीही लागत असे. हे कोणाला कळू नये, यासाठी त्यांनी आतल्या खोलीच्या दाराला लिंपून घेऊन सर्व भेगा बंद केल्या होत्या. त्यांना खेचरी सिद्ध झाली होती. त्यांची पहाटेची साधना मोठी होती. हल्लीच्या काळात ३ तासांची असे. पुढेपुढे ती कमी होत होत तासा–दीड तासापर्यंत आली.

पहाटे उठल्यावर प्रात:र्विधी मुखमार्जन झाल्यावर प्रथम अजपाजप संकल्प होत असे. त्यानंतर देवाला, आईला नमस्कार करून साधनेला बसत. त्यानंतर ते दैनिक सकाळ वाचत असत. पुण्यात आल्यानंतर त्यांनी सकाळ वर्तमानपत्र सुरू केले. ते सकाळचे वाचक पहिल्यापासून शेवटपर्यंत राहिले. सर्व वृत्त समजून घेण्यात ते दक्ष असत. पण त्या वृत्तावर कधीही चर्चा करीत नसत. ठराविक दिवशी शास्त्र-नियमाप्रमाणे दिवस ठरवून मारुती न्हाव्याला बोलावून हजामत करवून घेत. याबाबतीतही ते दक्ष असत. मारुती न्हावी याला त्यांनी चाळीस वर्षे सेवेची संधी दिली. स्वत:हून कोणालाच सोडले नाही. सर्वांनाच जवळ करणारे महाराज मारुती न्हावी का सोडतील ! पुढे आश्रम झाल्यानंतरही मारुती गावातून पायी ठरलेल्या दिवशी लवकरच येऊन

बसत असे व महाराजांच्या सोयीप्रमाणे ते आले म्हणजे गच्चीवर त्यांची स्मश्रू होत असे. पुढे त्याला मोतीबिंदू झाल्याने येणे जमेनासे झाले तेव्हा येता येणार नाही असा निरोप दिला. तेव्हापासून त्यांचे येणे बंद झाले. अशी त्याची चाळीस वर्षे सेवा झाली.

महाराज स्नानानंतर आन्हिकास बसत. त्या आन्हिकात नित्याचा गायत्रीचा बाराशे जप असे. श्रीसद्गुरु टेंबे स्वामी महाराजांनी दिलेला जप असे. जपासाठी ठराविक रुद्राक्ष माला व गोमुखी असे. नित्य द्विसाहस्रीचे म्हणजे श्रीगुरुचरित्राचे सप्ताह पद्धतीने वाचन असे. द्विसाहस्री मुखोद्गत झाली म्हणजे कमी वेळात वाचन होते. दोन हजार श्लोक सात दिवसांत वाचायचे म्हणजे रोज सुमारे २८० ते ३०० श्लोक वाचावेच लागतात. महाराजांनी बार्शीत असताना द्विसाहस्री गुरुचरित्र हाताने लिहून काढले. ते सोवळ्यात लिहिले होते. प्रवासातही नेता येण्यास सुलभ व्हावे म्हणून लहान अक्षरात लिहिलेली ती पोथी आहे. श्रीटेंबेस्वामी महाराजांनी हावनूरला संथा देते वेळी वापरलेली श्रीमद्भगवत गीता व विष्णुसहस्रनामाची पोथी त्यांचे हातून प्रसाद म्हणून घेतलेली महाराजांच्या संग्रही होती. रोज त्याचेही नित्य पठण असे. शिवाय स्वशाखोपनिषद 'ऐतरिय' हे स्वहस्ते लिहिलेले त्यांच्या नित्य पठणात असे; याशिवाय ब्रह्मयज्ञ-तर्पण कधी चुकले नाही.

पुण्यातील सुरुवातीची दहा वर्षे श्रीपादुकांचे अर्चन महाराज करीत असत. कुठे परगावी जाणे झाले तर आई करीत असे. बार्शीची ९।१० वर्षे असेच होत असे. ही अर्चनपूजा रुद्राभिषेक पुरुषसूक्ताने होत असे. पवमानाचाही अभिषेक होत असे. पूजेत श्रीसद्गुरु टेंबेस्वामींचा स्वतः काढलेला ऑईल पेंटिंगचा मोठा फोटो असे. हा अत्यंत अप्रतिम भाव असलेला तेजःपुंज फोटो आहे. यात कलेचे उच्चतम गुण उतरले आहेत.

या २० नारायण पेठेतील वास्तूमध्ये अनेक सत्पुरुष येऊन गेल्याचा उल्लेख आहे. यामध्ये विलासपुरचे श्री गोपाळराव महाराज यांचा उल्लेख आवश्यक आहे. हे योगी होते. यांचे भोजन झाल्यावर वैद्यमास्तर व महाराज यांचेसह श्री गोपाळराव महाराज आळंदीस जाऊन आले.

इ. स. १९२९–३० या काळात श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराजांना प्रतिमास गुरुदक्षिणा महाराज पाठवीत असत. पुढेही पाठवीत राहिले आहेत, परंतु सामान्य आर्थिक परिस्थितीच्या या काळात महाराजांनी दुर्लक्षित केलेली नाही ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे. असेल त्या परिस्थितीत हेतूला अनुकूल गोष्टी करणे निष्ठेशिवाय घडू शकत नाहीत. यामधून शक्याशक्यतेचा विचारसुद्धा जीवनाच्या हेतूला अनुकूल असाच करणे साधकाचे कर्तव्य असते हे स्पष्ट होते.

होणाऱ्या पत्रव्यवहारातून साधकावरील प्रेम चांगलेच व्यक्त होते. आत्मीयतेने घरगुती चौकशी, साधनेसंबंधी सतत प्रोत्साहन, स्वतःच्या प्रकृतीचे आजारपण इ. माहितीने भरलेली पत्रे पाहून गुरूंचा मोठेपणा अनुभवता येतो. यावर साधकाला प्रेमाने 'प्रकृतीला जपून रहावे' अशी सूचनाही असते. स्कॉटिश मिशनने घेतलेल्या क्रेप फुले आणि वस्तूंच्या स्पर्धेत मिळालेल्या सर्वप्रथम बक्षिसांचा उल्लेखही आपलेपणाने केलेला पाहिला. म्हणजे कलेच्या क्षेत्रातील कलाधिकाराची कल्पना येते. नाहीतर या गुणांची कल्पना आलीही नसती. स्कॉटिश मिशनने नागपूरला नेऊन फुलांची डेमॉन्स्ट्रेशन्स द्यायला लावली हे वृत्तही त्यांनी लिहिलेल्या पत्रावरून आपल्याला स्पष्ट झाले.

महाराजांचे पूर्वीचे स्नेही श्री. गोपाळराव नागावकर यांचा विटे येथे मळा होता. मळयात औदुंबराचे झाड व श्रीदत्तपादुका होत्या. गोपाळरावांचा आणि महाराजांचा स्नेह होता. गोपाळराव दत्तभक्त होते, मळयातील वातावरण रम्य आणि शांत होते. गोपाळरावांनी मळयातच वस्तीसाठी वास्तू बांधली होती. तेथे जुने स्नेही येऊन रहात. श्रीगुरुचरित्राची पारायणे करीत. आनंदाने परमार्थाची चर्चा करीत. स्नानसंध्या, अनुष्ठान, सायंआरती करीत. निसर्गात रमून जात. हे गोपाळराव नागावकर म्हणजे श्री. पंडितराव गर्डहिंग्लजकरांचे मामा. यांच्यामुळे वामनराव गर्डहिंग्लजकर व पंडितराव या पिता–पुत्रांचा महाराजांशी संबंध आला व परमार्थाचे मार्गदर्शन–शक्तिपात दीक्षेचा अनुग्रह घेऊन कृतार्थ झाले. महाराज–वैद्यमास्तर या ठिकाणी येऊन बरेच दिवस रहात असत. बार्शीच्या श्रीप्रल्हाद शास्त्रींनाही महाराजांनी येथे आणले होते.

इ. स. १९३० मध्ये पंडितरावांची बदली नाशिकला झाली होती. पोस्टखात्यात ते होते. येथे पंडितरावांकडे महाराजांच्या मातुश्री व भगिनी गोदावरी जाऊन राहून आल्या. महाराजही अनेकदा नाशिकला पंडितरावांकडे जाऊन येत असत.

फेब्रुवारी १९३० मध्ये महाराजांनी श्री. बापूसाहेब कुबडे यांना मार्गदर्शनपर पत्र पाठविले; ते असे– " प्रकृतीस जपून असावे. साधकावस्थेत देहावर वैराग्य ठीक नाही. याकरिता अभ्यास (साधन) दररोज थोडा पण नियमित करावा म्हणजे सर्व दोष आपोआप नाहीसे होतील. प्रकृती उत्तम राहाणे हा साधनेचा पहिला गुण आहे. त्यायोगे मनस्वास्थ्य राहाते. ज्या सद्‌गृहस्थांनी श्रीबंगाली स्वामींची व माझी भेट करविली ते रिटायर्ड डिस्ट्रिक्ट जज्ज श्री. परांडे येथे आले होते. काल त्यांचे व माझे या विषयावर बरेच बोलणे झाले. या दैवी शक्तीचा ईशकृपेने आपण सर्वांस लाभ झाल्याचे पाहून त्यांना फारच समाधान झाले. काही दिवस नियमित अभ्यास करून प्रकृती कशी राहाते ते जरूर कळविणे. "

१९३० च्या एप्रिलमध्ये महाराज मातुश्री, भगिनी गोदावरी आणि श्रेष्ठ दत्तभक्त श्री. काकासाहेब दामले सोलापूरहून गाणगापूरला जाऊन परत बार्शी–सोलापूर करून पुण्यास आले. सोलापूर-बार्शीला सर्वांच्या भेटीने समाधान झाले. बार्शी–येथे भगवंताच्या मंदिरात दत्तयाग होता. त्याच्या समाप्तीपर्यंत महाराज बरोबरच्या मंडळीबरोबर थांबले होते. तेथे देऊळगाव राजाहून श्री. धुंडिराजबुवा कवीश्वर आले होते. त्यांची भेट झाल्याने समाधान झाले.

मे मध्ये वैद्यमास्तर पुण्यास महाराजांकडे होते. ते तापाने आजारी होते, त्यामुळे त्यांना महाराजांनी ठेवून घेतले. औषधपाणी विश्रांतीने बरे झाल्यावर सोलापूरला गेले.

श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज कर्नाळी–व्यासक्षेत्र या नर्मदा तीरावरील तीर्थक्षेत्री चातुर्मासासाठी होते. तेथून ते पुण्यास आले. स्वामींचा पुण्यात दोन महिने मुक्काम होता. याकाळात श्रीस्वामी नाना भालेराव यांच्याबरोबर डोणज़े गांवी गेले होते. तिकडे त्यांना बैलगाडी उलटल्याने हाताला फ्रॅक्चर झाले होते. तो हात त्यांनी झाटीमध्ये गुंडाळून छाटी गळ्यात अडकवून ठेवली. हे दृश्य पुण्यात

महाराजांना स्वप्नात दिसले. महाराजांनी ते डायरीत लिहून ठेवले होते. स्वामी आल्यावर ती डायरी महाराजांनी श्रीस्वामींना दाखविली. स्वप्नाला सत्यता असू शकते हे अशा उदाहरणावरून लक्षात घ्यावे लागते.

## श्रीसद्‌गुरुसान्निध्याचा प्रभाव

प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज हे सांगत असत की, शिष्याने आपल्या सदगुरूंचे दर्शन अवश्यमेव घेत जावे. सदगुरूंच्या केवळ दर्शनाने शिष्याची शक्ती तीव्रतेने संचार करू लागते. साधकाला साधनेत तींव्रतेने शक्तिकार्याचे अनुभव येऊ लागतात. सद्‌गुरूंच्या सान्निध्यात एकदा साधनेची बैठक झाली तर सहा महिन्यांच्या साधनेचे लाभ मिळतात. त्यांनी हे जांबवंत सिंहाजवळ आपले हृदगत एकदा प्रगट केले होते. हे उद्‌गार बरेच पुढच्या काळातले आहेत. पण याच्या सत्यतेची प्रचीती पूर्वीपासूनच येत होती. बार्शीहून स्वामी व वामनराव पंढरपूरला गेले होते, तेव्हा पंढरपूरला रात्री गच्चीवर बसले असता बोलता बोलता वामनरावांची साधना तीव्रतेने सुरू झाली होती; मग स्वामींनी वामनरावांना स्पर्श करून म्हटले 'वामन आखे खोल' तेव्हा तो संचार कमी झाला. श्रीसद्‌गुरु सान्निध्याचा प्रभाव आहे.

पुण्यात स्वामींचा मुक्काम होता. पुण्यात स्वामींचा नित्यक्रम अगदी मनाला प्रसन्न ठेवणारा असे. सद्‌गुरूंना विलासी किंवा ऐश्वर्याची सेवा नको असते. श्रद्धाभक्तीच्या भावाने सेवा झाली म्हणजे त्यांची प्रसन्नता वाढत असते. त्यांना पाच पक्वानांची अपेक्षा नसते. त्यांना भाव हवा असतो. देव आणि सद्‌गुरु भावाचे भुकेले असतात. सद्‌गुरुकृपेचा पान्हा भावाच्या ढुशणीने फुटत असतो. वामनरावांकडे श्रीमंती नव्हती. ते अगदी साधे होते. जागाही छोटया दोन खोल्यांची होती. पण वामनरावांच्या श्रद्धाभक्तीच्या भावामुळे स्वामी तेथे रमून जात. अगदी प्रसन्नतेने रमून जात. दिवसभर वामनरावांची नोकरी आणि स्वामींची विश्रांती चाले, पण कधी कंटाळले नाहीत. घरच्यासारखे राहात. संध्याकाळी वामनराव शाळेतून आले की दोघे फिरावयास जाऊन येत. त्यानंतर सायं-संध्या आणि फराळ होत असे.

अलीकडे या पुण्याच्या मुक्कामात स्वामींचा एक नवा कार्यक्रम वाढला होता. रात्री ८/८॥ पर्यंत फराळ-पाणी उरकले की, वामनराव आई, गोदावरी, नाना भालेराव स्वामींशी बोलत बसत. स्वामींना बोलायला खूप लागायचे. बोलण्यातही खूप प्रकार असायचे. बोलतील हिंदीत, पण त्यात बंगाली शब्द येतील, मराठी येतील, संस्कृत येतील, इंग्रजी पण येतील. त्यामुळे ऐकणाऱ्याला मोठी मजा वाटत असे. स्वामींचे भांडार मोठे असायचे. बोलू लागले की मध्ये दुसऱ्याला बोलूनही देत नसत. ही मैफल रंगत असे.

स्वामींचा आवाज गोड आहे, स्वामी गाणी चांगली म्हणतात हे सर्वांना माहीत होतं, पण स्वामींना गाणे म्हणायला सांगायचे कोणी ? त्यांच्यापेक्षा कोणी मोठा असेल आणि त्याने सांगितले तर बरे दिसणार. ही कामगिरी वामनरावांची आई करीत असे. अलीकडे या रात्रीच्या खाजगी मैफिलीत नव्याने गाण्याची सुरुवात झाली होती. रात्री मंडळी बसली की आतून आईने म्हणावे, 'स्वामीजी, तुमचा गोड आवाज कानाला फार आवडतो.' स्वामींना एवढी सूचना पुरत असे. ते म्हणत, 'अच्छा, सुनो !' मग स्वामींचे गाणे सुरू होई. स्वामींच्या स्मरणात अनेक चांगली भजनें, पदे असत. त्यांच्या चालीही गोड असत. आवाजाला कोमल धार असे. भावभक्तीत रंगून पदाची एक-एक ओळ ते म्हणू लागले की वातावरणात ध्वनिलहरींची कंपने सुरू होत.

स्वामी बंगाली गाणीही म्हणून दाखवीत. त्यांचे कुंडलिनी-शक्तीवरील पद तर इतके प्रभावी व भावमधुर असे की कितीही वेळा ते ऐकले तरी पुन्हा ऐकावेसे वाटे. एकदा स्वामींनी श्रीदत्तात्रेयांचे बंगाली पद म्हटले.

गुरु दत्तात्रेय तव करुणा अपार... धृ०  
अनसुयानंदन, त्रिजगत वंदन  
दुष्ट भय भंजन, भक्तजन रंजन  
भवसागर हय अति दुस्तर  
भव बन्धन मोचन शील तुमार...तव करुणा अपार... १  
अमी नैष्कृतिक पामर आलस  
कृपा करे दया परबस

भवसागर ह्य अति दुस्तर
तारित रे केवल...चरण तुमार...तव करुणा अपार...२
अमी हौओ रे शरणगति
न मे भक्तः प्रणश्यति
दुस्तर नही भवसागर
श्रीगुरु दत्तात्रेय...वचन तुमार...तव करुणा अपार...३
भवतवत्सल दीनानाथ
योगेश्वर लोकनाथ
भवसागर कर पार
वंदित लोकनाथ...चरण तुमार...तव करुणा अपार...४

हे पद स्वामींनी केलेले आहे. त्या दिवशी हे फारच रंगले. श्रीवामनरावांची दत्तोपासना परंपरेने चालत आलेली होती. दत्तभक्ती मोठी होती. स्वामींनी या पदाला सुरुवात केली. पहिली ओळ २।३ दा आळवून म्हणतानच वामनरावांनी डोळे मिटून घेतले. स्वामींच्या भाव-मधुर शब्दांनी वृत्ती अंतर्मुख झाल्या. आणि त्या पदाच्या ध्वनिलहरी कानावर पडता पडताच वामनरावांना शक्तिसंचार झाला. सिद्धासन घातले गेले. शरीर ताठ झाले आणि वामनराव एकदम स्थिर झाले. आतमध्ये गोदूताईंचेही साधन सुरू झाले. त्याही सिद्धासनात स्तब्ध होऊन बसल्या. स्वामी पहात होते. गाणे शांतपणे आळवून आळवून म्हणत होते.

वातावरण चैतन्याने भरून गेले होते. दिव्यानंदाने ओसंडत होते. नानांचेही साधन सुरू झाले. आईंचेही साधन सुरू झाले. सर्वचजणांची साधना सुरू झाली. आज साधना एकदम शांतपणे चालू होती. स्वामींचे पद संपले तरी कोणी उठायला तयार नाही. पण गाणे थांबल्यावर वामनरावांखेरीज तिघांचे डोळे उघडले गेले. त्यांची साधना संपली होती पण वामनरावांचे साधन चालू होते. त्यांना बाहेरचे काहीच समजत नव्हते. स्वामीही गाणे संपल्यावर बराच वेळ शांतपणे तसेच स्वस्थ बसून राहिले. वामनरावांच्या साधनेकडे लक्ष देऊन पहात होते. त्यांची साधना पाहून स्वामी अधिकच प्रसन्न झाले.

तास-दीड तास झाल्यावर स्वामी वामनरावांना म्हणाले, " वामन

आँखें खोल दो। अब दस बज गये है। हम सोयेंगे।" असे म्हणून उठून आसनावरच उभे राहिले. स्वामींच्या शब्दाने वामनरावांची वर गेलेली शक्ती शांत होऊन खाली उतरली. मग वामनरावांनी स्वामींना कृतज्ञतेने नमस्कार घातला. स्वामी साधनेसंबंधी काहीही न बोलता म्हणाले, 'अब हम सोयेंगे.'

त्यानंतर सर्वांची झोपायची तयारी झाली. त्यावेळी वामनरावांच्या मनात श्लोक घोळत होता.

गुरुर्निरुपमो यस्य शिष्य संस्पर्शमात्रतः ।
मायामय प्रपंचं तु परं ब्रह्मैव पश्यति ।

## नू. म. वि. शाळेतील छोटे प्रसंग

नू. म. वि. मध्ये चित्रकला आणि हस्तकला यांमधील आपल्या विशेष गुणांनी महाराजांनी शाळेचा लौकिक जगभर पसरविला. परंतु लौकिकाच्या मागे ते चुकूनही गेले नाहीत. नाहीतर एवढा मोठा लौकिक मिळवून देणारी कला हातात असताना त्याच क्षेत्रात ते रमते, तर लौकिक व्यवहारात त्यांना काय मिळाले नसते ? नावलौकिकाबरोबर पैसाही मिळाला असता. सामान्य गरिबीचे जीवन बदलून गेले असते. पण त्या उद्योगापायी देवाचे नाव घ्यायलाही फुरसत मिळाली नसती. महाराजांनी तसे होऊ दिले नाही. 'अखंड असावे सावधान। सर्व विषयी' हे तर ध्येयवादी माणसांचे ब्रीद असते. महाराजांच्या या कलागुणांनी शाळेत त्यांना सर्वजण आदराने मानीत असत. गुणी शिक्षक म्हणून मुख्याध्यापकांनाही त्यांच्याबद्दल आदर वाटत होता. त्यांच्या विषयात ते पारंगत होते, नोकरीमध्ये हाच गुण महत्त्वाचा असतो. आपल्या विषयात निष्णात असले म्हणजे विद्यार्थ्यांनाही आदर आणि आपलेपणा वाटत असतो. अशा गुणवत्तेचे शिक्षक असणे हे शाळेचे भाग्य आहे. खरं म्हणजे देशाचे भाग्य अशा गुणसंपन्न शिक्षकांमुळे टिकते आणि वाढते. तो काळाच असा होता की, शाळाशाळांतून गुणी शिक्षक असत. म्हणून विद्यार्थ्यांना शिक्षकांबद्दल आदर आणि आपलेपणा होता.

महाराज शाळेत कधीही अध्यात्म आणि परमार्थ हा विषय

चुकूनही बोलत नसत. स्वत:बद्दलही कधी बोलत नसत. स्वभावही कमी बोलण्याचा होता. मधल्या सुट्टीत रिकाम्या तासाच्या वेळी ते शिक्षकांच्या खोलीत येऊन बसत. त्यावेळी कोट–टोपी खुंटीला ठेवून बसत. ही शिक्षकांची खोली त्यांच्या विश्रांतीसाठी असे. तेथे गाद्या तक्के असत. महाराज नीट-नेटकेपणाने राहणारे असल्याने त्यांचे कोट, टोपी काढून व्यवस्थित, आटोपशीरपणे तक्क्याला टेकून बसणेही सर्वांना त्यांच्या नेटकेपणाची जाणीव देत असे. कधी आवाज वाढवून बोलत नसत. बोलण्यातून वा विनोदातून त्यांची अन्तस्थ उच्च पातळी घसरत नसे. साधे–सरळ बोलणे असले तरी त्यात प्रौढत्व होते. त्यांची जबरदस्त मोठी शेंडी आणि घेरा सर्वांच्या कुतूहलाचा विषय असे. पण स्वभाव आणि बोलणे त्यांच्या वैशिष्टयामुळे कधी हा विषय टीकेचा, चर्चेचा, वा विनोदाचा होत नसे. त्यांच्या प्रौढत्वाची ती साक्ष होती. त्यांच्या साक्षेपी जीवनाचे ते चिन्ह होते. कपाळावरील केशरी गंधाचा त्रिपुंड्र त्यांच्या धर्मशास्त्राच्या आचाराचे प्रतीक असे. स्वीकारलेल्या उदात्त ध्येयाचे दर्शन व्यक्तीच्या आचरणातून दिसले तरच तत्त्व आणि व्यवहार यांचा सुसंवाद प्रत्ययाला येत असतो आणि समाज अशा व्यक्तींना मान देत असतो. तत्त्व आणि व्यवहार यांची विसंगती जीवनात असली म्हणजे जीवन हास्यास्पद होत असते. समाज अशा व्यक्तीच्या दोषांकडेच बोट दाखवीत असतो. परंतु तत्त्व आणि व्यवहार यांचा सुसंगत सुसंवाद ज्यांच्या जीवनात दिसतो अशा व्यक्तींच्या गुणांचा प्रत्यय समाजाला प्रत्यही येत असतो. समाजाने कितीही दोषैक दृष्टींनी अशा व्यक्तींचे निरीक्षण केले तरी दोष औषधालाही सापडत नसतो. महाराजांचे असे होते.

शाळेत महाराज कधी पाणी पीत नसत. कुठल्याही प्रसंगी काही खात नसत. पण सर्वांमध्ये मिसळून रहात असत. खाण्यापिण्यावर सतत लक्ष असलेल्यांना याचे आश्चर्यही वाटत असे. अशा प्रसंगी कोणीही आग्रह केला तरी निर्धार आणि निश्चय ढळत नसे. पण हे ते शांतपणे सांगून सर्वांना शांत करीत. पुढेपुढे तर हाही त्यांचा गुण त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या आदरात भरच घालू लागला. अशा प्रसंगी इतर शिक्षकच त्यांचे वतीने सांगत, “ गुळवणी सर यातले काहीही कधीही घेत नाहीत.

त्यांना उगाच आग्रह करू नका." शाळेत वेळेवर जाणे-आपले कार्यक्रम-अभ्यासक्रम-तपासण्याची कामे वेळेवर करण्याबद्दल सर्वजण त्यांची प्रशंसा करीत. महाराजांना कामाचा उरक मोठा होता. वेळच्या वेळी ती ती कामे संपविल्याने कधी त्यांचे काम रेंगाळून पडत नसे. याचे कारण घरी दुसऱ्या कामाला फुरसत नसे. शाळेत व्यवहार होता. घरी परमार्थ होता. देहाच्या बाहेर व्यवहार होता-देहाच्या आत परमार्थ होता. व्यवहार लोकांसाठी असतो तर परमार्थ स्वत:साठी असतो. अशा निश्चित जाणिवेचे त्यांचे वर्तन होते म्हणून निर्दोष होते. संघर्षविरहित होते. बाह्यव्यवहारात परमार्थ आणला तरी संघर्ष होतो आणि आतल्या परमार्थात व्यवहार आणला तरी संघर्ष होतो. परमार्थ आणि व्यवहार यांचे दोन स्वतंत्र रस्ते आहेत. हे समजणे व तसे करणे याला 'योगः कर्मसु कौशलम्' म्हटले आहे. महाराजांचे असे होते. म्हणून वर्तमान-काळात, शहरी जीवनात, सर्वच्या सर्व जीवन समाजाच्या नजरेसमोर असताना कोणालाही कधीही महाराजांच्या जीवनात दोष म्हणून आढळला नाही.

एकदा एका वर्गात विद्यार्थ्यांचा गोंधळ चालला होता. त्या वर्गा-वरच त्यांचा तास होता. आधीचा दुसऱ्या वर्गावरील तास संपवून दुसऱ्या वर्गावर जाण्याच्या मधल्या वेळात वर्गावर शिक्षक नसतात. तेवढ्या वेळातील तो गोंधळ होता. अशा वेळी वर्गावर गेल्यावर शिक्षक गोंधळ पाहून वर्गावर राग काढतात, काही विद्यार्थ्यांना शिक्षा देतात; मग वर्ग शांत करून पुढे तास सुरू होतो. महाराजांनी तो गोंधळ ऐकला. ते वर्गाच्या दारामध्ये येऊन क्षणभर उभे राहिले आणि मागे वळून परत चालू लागले. एवढ्या कृतीवरून विद्यार्थी एकदम शांत झाले. आपला गोंधळ सरांना आवडला नाही हे विद्यार्थ्यांच्या ध्यानात आले. लगेच वर्ग-सेक्रेटरी पुढे गेला व गुळवणी सरांना म्हणाला, 'सर, वर्ग शांत आहे. परत जाऊ नका.'

मग सर परत आले व तास सुरू झाला. महाराज वर्गातील विद्यार्थ्यांना चित्रकलेतील विविध गमतीजमती फळ्यावर दाखवीत असत. स्वतः फळ्यावर चार पायाचा प्राणी काढीत व त्याचे शेपूट पुसून टाकून विद्यार्थ्यांना सांगत, कोणीही फळ्याजवळ यावे व डोळे बांधून

या प्राण्याचे शेपूट खडूने काढून दाखवावे. मग एक–एक विद्यार्थी फळ्याजवळ येई. त्याचे डोळे रुमालाने बांधले जात. त्याच्या हातात खडू देऊन त्याला फळ्याजवळ सोडले जाई. विद्यार्थी अगदी रंगून जाऊन काय मजा होते ती पाहण्यासाठी उत्सुक होत असत. तो फळ्याजवळचा विद्यार्थी त्या प्राण्याच्या पोटाला शेपूट काढे–वर्ग हसून हसून आनंद लुटीत असे. कोणी तोंडाजवळ शेपूट काढे, कोणी पायाला, कोणी पाठीला--थोडा वेळ वर्गात असे वातावरण निर्माण करून मग चित्राच्या कामाला सुरुवात होत असे.

वर्गावर गेल्यावर कधी महाराज दोन हातांत खडू घेऊन फळ्यावर एकच चित्र दोन्ही हातांनी काढीत, तर कधी दोन सारखी चित्रे एकदम काढून त्या प्राण्यांची तोंडे जवळ जवळ येत असत. मुक्तहस्त चित्राप्रमाणे प्राणी काढीत. रेषांचा नाजूक रेखीवपणा, चित्रांचा सुबकपणा इतका असे की, विद्यार्थीही आनंदाने मंत्रमुग्ध होत असत. विद्यार्थ्यांकडून तयारी करून घेताना इतके कडक असत की चित्र आकृती चांगली येईपर्यंत खोडायला लावीत.

त्यांचा ७ अ वर तास होता. वसंत कृष्णाजी देशमुख हे सध्या रिटायर्ड झालेले DIG त्यावेळी त्या वर्गात होते. त्यांची चित्रकला चांगली होती. त्यांनी सर वर्गात येण्यापूर्वी सरांचे हुबेहुब चित्र तेवढ्या वेळात काढून ठेवले, आणि सारा वर्ग गप्प बसला. महाराज वर्गात आले. त्यांनी फळ्यावरचे चित्र पाहिले. जरा आक्षेप घेतला व म्हणाले ‘ कोणी काढले हे चित्र ?’ तेव्हा देशमुख उभा राहिला. म्हणाला, ‘ सर मी प्रयत्न केला आहे. मला काही जमते का पाहिले व आपण पहावे म्हणून ठेवले आहे. ’ त्याचे उत्तर व भाव पाहून महाराजांनी त्याचे कौतुक केले. पण सूचना देऊन ठेवली की, ‘ अशी चित्रे काढणे बरे नाही. यातून पुढे विडंबन सुरू होते, ते चांगले नाही. म्हणून पुन: अशी चित्रे काढू नका. ’ सर्वांना हा विचार पटला व पुन्हा अशा चित्राचा प्रयत्न केला नाही.

आकाशवाणी केंद्रावरील अधिकारी एम. वाय. जोशी, अशोक त्र्यंबक बंबावाले हे सेक्रेटरी टू दि गव्हर्मेन्ट, मॉडर्न हायस्कूलचे सुपरिटेंडेंट मोरेश्वर लक्ष्मण पटवर्धन, पद्माकर केशव पिंगळे, पंडित,

टाटानगर इ. विद्यार्थी त्या वर्गात होते. आनंद मुद्रणालयाचे दादा जोशी त्यावेळचे नू. म. वि. चे विद्यार्थी महाराजांच्या वर्गात होते. त्यांना त्यांच्या खूप आठवणी–प्रसंग आठवत असतात.

महाराजांचे भाचे श्रीपाद जोशी हे नू.म.वि. मध्ये शिकत होते. त्यांनाही त्यांचे मामा चित्रकला-शिक्षक होते. आपल्या मामांचा उपयोग श्रीपादरावांना शाळेतल्या एका प्रसंगी चांगलाच झाला. एकदा बार्शीच्या रमेश सुलाखे या श्रीमंत मुलाशी काही कारणाने श्रीपाद जोशीची मारामारी झाली. श्रीपाद जोशीला शाळेत नादारीची सवलत होती. शाळेत नादारी मिळणाऱ्या एका भिकारड्या पोरानं एखाद्या श्रीमंताच्या मुलावर हात टाकणं हा फारच मोठा गुन्हा होता. मुख्याध्यापक श्री. म. शं. गोडबोले यांच्याकडे तक्रार गेली. त्यांनी श्रीपाद जोशीला कचेरीत बोलावून घेऊन चांगले फोडून काढले. आणि नादारी बंद करून टाकण्याचं सांगितलं. मार सहन करता आला, पण नादारी जाणे हे कसं सहन होणार ! या प्रसंगाने श्रीपाद जोशीला शिक्षणाला रामराम ठोकण्याची वेळ आली. तेव्हा या प्रकरणी मामांच्या म्हणजे महाराजांच्या रदबदलीने शिक्षा रद्द झाली आणि नादारी चालू राहून शिक्षण पूर्ण होऊ शकले. हे श्रीपाद जोशी मोठे लेखक आहेत. त्यांनी ही आठवण आपल्या ‘ उलगा-उलग ’ या आत्मचरित्रात दिली आहे.

शिक्षण प्रसारक मंडळींच्या या नू. म. वि. प्रशालेत महाराज नोकरीस असताना तीन मुख्याध्यापक झाले. एक प्रो. दत्तो वामन पोतदार, दुसरे प्रो. म. शं. गोडबोले आणि तिसरे प्रो. नारळकर. यांपैकी श्री. दत्तो वामनांचा संबंध पुढे महाराजांच्या सर्व सत्कार-समारंभांचे अध्यक्ष म्हणून व अनेक प्रसंगी वारंवार आला.

एक विशेष गोष्ट उल्लेख करण्यासारखी आहे की, महाराज नू. म. वि. मध्ये शिक्षकांच्या नित्य सहवासात असून कित्येक वर्षे कोणालाही माहीत नव्हते की, आपले सहशिक्षक गुळवणी हे ब्रह्मचारी आहेत. त्यांना कधीही सपत्नीक पाहिलेच नाही असा विषय जेव्हा शिक्षकगृहात चर्चेत निघाला तेव्हा त्यांना समजले की, ते ब्रह्मचारी आहेत. हे समजल्यावर सर्वांना कुतूहल तर वाटलेच, पण आदरही पहिल्यापेक्षा अधिकच वाढला. हा विषय आणि प्रसंग महाराजांच्या

गुणांचे दर्शनच घडविणारा आहे. तो वाचकांच्या चिंतनावर सोडून विस्तारही सोडून देतो.

या संदर्भात आणखी एका प्रसंगाचा उल्लेख येथे उचित ठरणार आहे. महाराज स्वत:संबंधी कधी बोलत नसत; त्यामुळे त्यांच्याबद्दल अनेक दिवस सहवासात राहणारेही पुढे काही दिवसांनी महाराजांची माहिती मिळाली म्हणजे आश्चर्य व्यक्त करीत असत. व्यवहारात माणूस दोष लपविण्यासाठी बोलणे टाळीत असतो. पण महाराज आपले गुण लपवून ठेवण्यासाठी बोलणे कमी करीत असत. आपले दोष लपवून ठेवणारा आपली कुप्रसिद्धी होऊ नये याची काळजी घेत असतो तर गुणी माणसांना गुण लपविण्याची इच्छा होणे म्हणजे आपली सुकीर्ति लपवून ठेवण्यासारखेच असते. म्हणून सर्वसाधारण मनुष्य आपले गुण प्रगट करण्याच्या वृत्तीचा असतो. आपली सुकीर्ती प्रसिद्धी झालेली त्याने ऐकली म्हणजे त्याला समाधान मिळत असते. यामुळे ही माणसे मोठी असूनही सामान्यातच मोडतात. महापुरुषाचे–सिद्ध सत्पुरुषांचे असामान्यत्व हुडकूनसुद्धा सापडावे तेवढे सापडत नाही. मिळालेल्या माहितीवरून त्यांचे असामान्यत्व अंदाजाने समजून घ्यावयाचे असते. ईश्वर समजत नाही तो याच गुणामुळे. सर्व करून अकर्ता, सर्वज्ञ असून अज्ञ, सर्वशक्तिमान असून दयाळू, तापहीन मार्तंड, सर्वत्र असून अदृश. असे महापुरुषांचे असते. ते जेवढे समजतात, प्रसिद्धीस येतात, आकळतात त्याच्या अनंतपटीनें मोठे असतात. आपल्या कुवतीप्रमाणे त्यांच्या माहात्म्याची जेवढी जाणीव होईल तेवढचावर लुब्ध होऊन त्यांच्यावर प्रेम केल्याने समाधान वाटते. म्हणून त्यांचे अल्प-स्वल्प माहात्म्य समजून घ्यायचे आणि त्यात रमायचे इतकेच !

श्री टेंबे स्वामींनी श्रीदत्तप्रभूंच्या मानसपूजेत हे भाव आणि वस्तुस्थिती उत्तम प्रकट केली आहे. जो अचिंत्य आहे त्याचे ध्यान कसे करावे ? कूटस्थाला आवाहन कसे करावे ? या विश्वव्यापक परमात्म्याला कोणते आसन घालता येणार आहे ? या निर्मल परब्रह्माला स्नान घालण्याची काय गरज आहे ? सर्व दिशा हे ज्याचे वस्त्र आहे त्याला कोणते वस्त्र अर्पण करणार ? या विश्वाचा जो सूत्रधार आहे त्याला यज्ञोपवित सूत्र अर्पण करणे हास्यास्पद नाही का ? या

स्वयंप्रकाशी परमात्म्याला निरांजनातील ज्योतीने ओवाळण्यात काय अर्थ आहे ? या आत्मतृप्ताला कशाचा नैवेद्य दाखविणे योग्य होईल ? सर्वव्यापकाला कोठून प्रदक्षिणा घालणार ? अनंताला कोठे वंदन करावे ? वाणीला अगोचर असलेल्या चिद्‌घनाची कोणत्या शब्दांनी स्तुती करता येईल ? केवळ भक्त हृदयातील भक्ती म्हणूनच त्याच्या प्रतीकाची पूजा करण्याची इच्छा होते, अशा पूजेने समाधान होते म्हणून ही पूजा आहे.

पूर्व सूत्र धरून पहिल्या मुद्याकडे जाऊ. महाराज जवळच्या सहवासातील मंडळींनाही ओळखता आले नाहीत. आणि महाराजांनी आपला परिचय कोणाला करून दिला नाही. अनेकांना सहवास दिला, जवळ घेतले. एकत्र बसले–उठले–बोलले पण आपला खरा परिचय होऊ दिला नाही.

महाराज २० नारायण पेठेतून नू. म. वि. शाळेत पायी जात असत. रस्ता आणि वेळ ठरलेली असे. जाताना केसरी कार्यालयावरून जात आणि येताना नवीन मराठी शाळेवरून म्हणजे घराच्या मागच्या रस्त्याने येत असत. नवीन मराठीवरून येताना नवीन मराठी शाळेचे मुख्याध्यापक प्रो. साने हे त्यांच्या शाळेच्या फाटकाजवळ उभे असत. त्यांचीही शाळा त्यावेळी सुटत असे. रोज ‘गुळवणी सर’ त्यांच्या समोरून जात असत. प्रो. साने यांना या नियमित जाणाऱ्या गृहस्थांचा परिचय करून घेण्याची इच्छा झाली. दुसरे दिवशी परिचय झाला. त्या दिवसापासून रोज नमस्कार, बोलणे होऊ लागले. प्रो.साने आळीच्या कोपऱ्यापर्यंत बोलत जाऊ लागले. रोज असे चाले. हा कार्यक्रम १४/१५ वर्षे चालला होता. पण नू. म. वि. मधले गुळवणी ड्राईंग मास्तर इकडे जवळच २० नारायण पेठेत राहतात, एवढ्या माहितीवर एवढी वर्षे गेली. पुढे महाराजांच्या ७० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने अमृत महोत्सव झाला. त्याचे वृत्त वर्तमानपत्रात आलेले प्रो. साने यांच्या वाचनात आले. तेव्हा ते आश्चर्याने पत्नीला म्हणाले, ‘हे गुळवणी ड्राईंग मास्तर महाराज कधी झाले ?’ म्हणजे तोपर्यंत त्यांना काहीही माहीत नव्हते. त्यांना माहीत होते ते नू. म. वि. मधील ड्रॉईंग मास्तर गुळवणी. एक नेमस्त सज्जन.

इ. स. १९३० साली श्रीगुरुद्वादशीस महाराज वाडीला गेल्यावर कुडुत्रीला जाऊन आले. तेथून कोल्हापूरला येऊन तेथून रात्री ११ च्या गाडीने निघून पहाटे कऱ्हाड स्टेशनवर उतरले. तेथून मोटारने १० वाजता विटे येथे गेले. येथे ७/८ दिवस श्री. गोपाळराव नागावकर यांच्या मळ्यातील वस्तीवर मुक्काम केला. येथून पुण्याला ३ नोव्हेंबर १९३० ला श्री. नाना भालेराव यांना पत्रात लिहितात, 'मी येथून बुधवारी सकाळी १० वाजता निघून रात्री ८/४० ला पुण्यास येत आहे. दूध घेऊन ठेवावे, व सोवळ्याकरता पंचा किंवा धोतर वाळत घालणे. कदाचित गाडी चुकल्यास रात्री १२ वाजता येईन. दरवाज्यावर लक्ष असावे. आम्ही गेल्या शुक्रवारी येथून ६ मैलांवर असलेल्या रेवणसिद्धाचे स्थान पहावयास गेलो होतो. स्थान फार सुंदर आहे.'

महाराजांच्या अनेक गुणांचे दर्शन घडवणारी पत्रे असतात. या पत्रातून त्यांच्या अनेक गुणांचे दर्शन घडते.

### श्रीदत्तमहाराजांच्या विवाहोत्तर ओहर यात्रेत महाराज

महाराजांची वाडीवारी चालू होती. वाडीला गेल्यावर श्रीधुंडिराज महाराज कवीश्वरांची गाठ-भेट होत असे. एप्रिलमध्ये बार्शीत दोघांची भेट झाली होती. त्या भेटीत दत्तमहाराजांचे लग्न ठरले असून वाडीला होणार आहे, या विषयाची चर्चा झाली. निमंत्रण झाले. महाराज वाडीला लग्नाला जाऊन आले. पुढे काही दिवसांनी या नवीन दांपत्याला कुलस्वामिनीच्या दर्शनासाठी माहुरला नेण्याचे ठरले. सोय सवड पाहून जाण्याचे नक्की झाले. यावेळी श्रीधुंडिमहाराजांनी हा विषय महाराजांजवळ काढला तेव्हा महाराजांनी म्हटले, 'घरच्या कार्यात मलाही आले पाहिजे. मीही येतो तुमच्या-बरोबर.' धुंडिराजमहाराजांना आनंद झाला. म्हणाले, 'वामनराव, तुमची नोकरी, कामाचा व्याप, म्हणून चला म्हटले नाही. मी म्हटले, तर अडचण सोसून याल म्हणून मनात इच्छा असून शब्द टाकला नाही, पण आई भगवतीची इच्छा. तिलाच आपल्या दर्शनाची ओढ लागली असावी. आपण येता हे ऐकून फार आनंद झाला.'

ठरल्याप्रमाणे माहुरच्या श्रीरेणुकामातेच्या दर्शनाला कवीश्वर

परिवार निघाला. त्या परिबारात महाराज होते. वास्तविक हा कार्यक्रम त्या परिवाराचा, पण महाराज जणू त्या परिवारातीलच असल्याप्रमाणे त्यात सामील झाले होते. कोणालाही कोणी परके वाटतच नव्हते. या ओहर यात्रेत श्री धुंडिमहाराज, श्री सौ. आईसाहेब, श्रीदत्तात्रेयशास्त्री, सौ. लक्ष्मीबाई आणि श्रीगुरुमहाराज एवढे यात्रेकरू होते. सर्वांचा माहुरला एक आठवडाभर मुक्काम होता. विधिवत कुलधर्म-कुलाचार झाले. भगवतीची महापूजा झाली. सप्तशती पाठ झाले, होमहवन झाले. भगवतीला वस्त्र अर्पण केले. पुरणावरणाचा नैवेद्य झाला. ब्राह्मण-सुवासिनी-भोजन झाले. तेथील दत्तप्रभूंच्या स्थानी पूजापाठ दर्शन झाले. अन्य सर्व स्थानांचे दर्शन झाले. सत्संगतीचा आनंद सर्वांनाच होत होता. माहुरला या मंडळींचा मुक्काम विष्णुदासबुवांच्या मठात होता. या परमार्थी मंडळींना परमार्थाशिवाय विषय नव्हता. परमार्थाला लागणारा एकांत आणि देवता-सान्निध्य येथे लाभले होते. व्यवहाराच्या स्थल-कालाचे बंधन नव्हते. शास्त्रशुद्ध आचारसंपन्न अंतःकरण भावभक्तीने समृद्ध आणि ईश्वरानुभूती व सद्‌गुरु कृपासंपन्न असे हे गुरुबंधू आहेत. श्रीसद्‌गुरुटेंबेस्वामींचे अनन्याश्रित भक्त. परस्परांमध्ये विशुद्ध प्रेमाचे ऋणानुबंधाचे आकर्षण होते. हा आठवड्याचा काळ किती आनंदात गेला असेल ! सद्‌गुरूंच्या आठवणीने कितीदा डोळे पाणावले असतील. हावनूरच्या आठवणी – मदिहाळाच्या आठवणी निघाल्या असतील. स्वामीकृपेची कृतज्ञता शब्दाशब्दांतून प्रगटली असेल. असा हा महान गुरुबंधूंचा संवाद प्राण कानात आणून श्रीदत्तात्रेयशास्त्री ऐकत असतील. केवढी धन्यता वाटली असेल त्यांना !

हा दिव्यानंद लुटण्यासाठी संत संतांच्या भेटीस जातात. सहवासात रहातात. मनमुराद आनंदाची दिवाळी साजरी करतात. महाराजांकडे आश्रम झाल्यावर फलटणचे पू. काका उपळेकर महाराज रात्री ११॥ वाजता आले होते. काय व्यावहारिक काम होते त्यांचे ? काही नाही. पण आले होते. कशासाठी तर संतसहवासातील दिव्यानंदाची दिवाळी साजरी करण्यासाठी. लौकिकाचे सीमोल्लंघन करून अलौकिक विजया-दशमीचे सोने लुटण्यासाठी आले होते. ही दिवाळी पहाणारेही त्या आनंदात कळत असले–नसले तरी समरस होऊन जातात.

माहुरचा कार्यक्रम संपल्यावर ही सर्व मंडळी बडनेरा येथील पू. श्रीसीतारामहाराज (टेंबे) यांच्या समाधीच्या दर्शनास गेली. तेथे एक रात्र मुक्काम केला. श्रीसीतारामहाराज यांच्याशी बोललेली, त्यांच्या सहवासात राहिलेली ही मंडळी होती. त्यांच्या समाधीचे दर्शन घेताना अनंत आठवणींनी यांच्या भावना किती अनावर झाल्या असतील सारा भूतकाळ दोघांच्या डोळ्यासमोर चित्रपटासारखा आला असेल आणि प्रत्येक चित्रात श्रीसीतारामहाराज आणि श्रीसद्‌गुरुवासुदेवानंद-सरस्वती स्वामी महाराज यांचे दर्शन घेतले असेल.

बडनेऱ्याहून ही मंडळी कारंजाला आली. श्रीदत्तप्रभू नृसिंह-सरस्वती स्वामीमहाराजांचे जन्मस्थानी आली. येथे श्रींची महापूजा केली, नैवेद्य केला. सुवासिनी ब्राह्मणभोजन घातले. प्रसाद घेतला. तेथून पुढे मूर्तिजापूर, वाशीम इ. ठिकाणी जाऊन आपापल्या गावी गेली. श्रीदत्तमहाराजांना हा उभयगुरूंचा – एक पिताजी आणि एक सद्‌गुरु यांचा सहवास–संभाषण व नित्य व्यवहार जवळून पहाण्याचा सुमंगल योग आला. उत्तम स्थानांच्या तीर्थयात्राही झाल्या.

**पन्नास वर्षे सद्‌गुरुसान्निध्य व सेवासंधी लाभलेले भाग्यवंत–**
**नाना भालेराव**

श्रीगुरुमहाराजांच्या सहवासात अनेक शिष्यभक्त आले. कमी अधिक काळ सहवासात राहिले. सेवेची संधी मिळाली आणि संधीला मर्यादा पडली. काहींना मधून मधून सहवास–सेवेची संधी मिळाली. काहींना फारच अल्पकाळ हे भाग्य लाभले. काहींना तर त्यांचे गावी जाऊन सहवासाचा लाभ सद्‌गुरूंनी दिला व सेवेची संधी दिली. साधनेच्या माध्यमातून तर सर्वांनाच सहवास देत व स्मरणभक्तीची सेवा देत असतात. हे सर्व पूर्व ऋणानुबंधाप्रमाणे घडत असते.

बार्शीपासून हे ऋणानुबंध प्रगट होऊ लागले. त्या काळातही अनेकांना सेवेची संधी मिळाली. सहवासाचा लाभ मिळाला. पुढे महाराज पुण्यास आले तेव्हापासून पुढे त्यांच्या हयातभर सहवास आणि सेवेची संधी मिळालेले भालेराव कुटुंब सर्वांना स्पष्टपणे माहीत आहे. या काळात महाराज आसेतु हिमाचल हिंडले. त्या सर्व ठिकाणी तेवढ्या तेवढ्या काळापुरती ही संधी त्यांना त्यांना मिळाली आहे. पण जे परम भाग्य

नाना भालेराव यांना व त्यांच्या परिवाराला लाभले ते निःसंदिग्धपणे पन्नास वर्षांचे लाभले आहे. एवढी पर्वणी त्यांच्या जीवनात आली म्हणून त्यांनी कधीही मी सेवा केली, किंवा मला सर्वात अधिक सेवेची संधी मिळाली असे उद्‌गार काढले नाहीत. आपल्या सेवेचे भांडवल केले नाही.

मनुष्य गुणदृष्टीने जगाकडे कमी पहातो आणि दोषैक दृष्टीने अधिक पहात असतो. स्वतःचे गुण आणि दुसऱ्याचे दोष मनुष्य दृष्टीला चटकन दिसतात. ही दृष्टी प्रखर झाली की मनुष्यातील खलत्त्वही स्पष्ट होत जाते. न्याय दृष्टीने नानांची सेवा फार मोठी झाली असेच मानावे लागते. नाना भालेराव हे लोकांपुढे कधी आलेच नाहीत. कधी कोणत्या समारंभात बोलले नाहीत की महाराजांच्या बरोबर कधी प्रवास केला नाही. त्यामुळे ते सर्वांना ज्ञात असून मागे राहिले.

परंतु त्यांना त्यातच समाधान होते. मागे राहून, अप्रसिद्ध राहून महाराजांची पडेल ती सेवा करावी, देवाची मनोभावे यथासांग शांत चित्ताने पूजा करावी, देवाला नैवद्य करावा. महाराजांना भोजन प्रसाद द्यावा आणि आपणही सर्वांनी तो प्रसाद घ्यावा. नानांची सेवा दिसण्यासारखी नव्हती. करण्यासारखी होती. महाराजांनी सुद्धा नाना भालेराव यांच्या कुटुंबातील सर्वांवर पितृतुल्य प्रेम केले. आज आपण नानांच्या सेवेचे स्वरूप पाहू म्हणजे त्यातून आपणास महाराजांचे दर्शन घडणार आहे. पूजा पाहाताना पुजाऱ्यापेक्षा देवाकडेच पहाणाऱ्याचे लक्ष असले पाहिजे.

इ. स. १९२३ ते १९३३ या काळात महाराजांकडे त्यांच्या मातुश्री आणि भगिनी गोदावरी असत. त्यामुळे नाना भालेराव यांचे संबंध शेजारधर्माचे होते. दोन कुटुंबांचे अस्तित्व स्वतंत्र होते. तरी घरोबा होता. नानांच्या गावी महाराज, स्वामी जाऊन येत असत. स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराज अनेकदा पुण्याला येऊन रहात त्यावेळी महाराज परगावी गेले असतील तर स्वामींची व्यवस्था नाना पहात असत. महाराजांच्या खोलीत रहात असत. देवाला अभिषेक पवमानासाठी, लघुरुद्रासाठी याही काळात महाराज नानांना बोलावीत असत. उत्सवाच्या निमित्ताने दोन्ही कुटुंबें एक होऊन उत्सव आणि भोजन प्रसादाची जबाबदारी पार पाडीत असत. महाराज परगावी गेले म्हणजे

देवाची पूजा नानांकडे असे. आला गेला पाहुणा नानांकडे असे. महाराजांची आलेली पत्रे, म. ऑ. इ. व्यवस्था नानांकडे असे. म्हणजे याही काळात संबंध जवळचे होते. संध्याकाळी महाराज नानांना बरोबर घेऊन फिरायला जात. 'नानांना दीक्षा द्या' असे महाराजांनी स्वामींना सांगितले. त्यानंतर नानांची साधना रोज महाराजांबरोबर होत असे. बोलण्या चालण्यासाठी या दोन कुटुंबांत तिसरे कोणी नसे. महाराजांकडे येणारे वैद्यमास्तर, बापूसाहेब कुबडे, गावाकडची मंडळी, बार्शीची मंडळी या सर्वांना नानांचा परिचय होता. महाराजांचा बाजारहाट नाना करीत असत.

पुढे इ. स. १९३३ मध्ये महाराजांच्या मातुश्रींचे निधन कुडुत्रीला झाले. त्यानंतर एकटी गोदावरी महाराजांकडे रहात असे, तेव्हा भालेराव कुटुंबाचे संबंध तर अधिकच वाढले. या दोघांच्या जागेत मध्ये फक्त दोन बिऱ्हाडे होती. त्याच वाड्यात, एकाच ओळीत दोन खोल्यांच्या अलिकडे पलिकडे महाराजांची व नानांची जागा होती. महाराजांच्या देवाची रोजची पूजा नानांकडे आली. या पूजेमुळे तर नाना आणि महाराज फारच जवळ आले. महाराजांच्या आईला प्रत्यक्ष देवाकडून मिळालेल्या प्रसाद-पादुकांची रोजची पूजा नानांकडे सोपविण्यात महाराजांना नानांची पूजा पसंत पडली, त्यांचे म्हणणे, यथासांग कर्म करणे, स्वच्छता, शांतपणा, श्रद्धा, भक्ती, आचरण सारे काही पसंत पडले. प्राणप्रिय प्रसाद-पादुकांची सेवा करण्याची संधी देण्यामध्ये नानांच्या बद्दल महाराजांचा विश्वास, आणि त्यांच्या उत्कट पुण्याईचा फलोद्भव स्पष्ट होतो.

याच बरोबर आणखी एक महत्त्वाची गोष्ट स्पष्ट होते. महाराजांचे भोजन चाळीस वर्षे भालेराव कुटुंबात होत होते. शुद्धान्नाच्या बाबतीत महाराजांचा फार कटाक्ष होता. सोवळ्यात रोजचा स्वयंपाक करणाऱ्या काकूंच्या सेवेला शब्दांकित करणे अशक्य आहे. सोवळ्याचे नाटक वेगळे आणि खऱ्या सोवळ्याचा काटेकोरपणा वेगळा असतो. भासवण्याचे सोवळे वेगळे आणि शास्त्रपूत आचरणाचे सोवळे वेगळे असते. सोवळ्यातील वस्त्रे, सोवळ्यातील पाणी, सोवळ्यातील स्पर्शास्पर्श वाटते तेवढे सोपे नसते. याबाबतीत महाराजांचे लक्षही बारीक

असे. चूक दिसली की दुरुस्त करायला लावणार. शुद्ध आचरणात तडजोड नसते. थोडा अशुद्धपणा चालणारे शुद्ध कसे असू शकणार ? या काळात गृहस्थाश्रमी नानांचा प्रपंच चालू होता. घरात भालू–नारायण ही मुले लहान लहान होती. मुलांमुळे हे सोवळ्याचे कटाक्ष संभाळणे किती अवघड असते हे प्रपंची माणसाच्या सहज लक्षात येईल. पण इच्छा असली, समज असली, काटेकोरपणाचा कटाक्ष असला, चालढकल करण्याची बुद्धी नसली म्हणजे जमते हे. नवीन सामाजिक दृष्टीत हे बसत नाही. कारण याचे महत्त्व, याचे फायदे, समजून घेतले जात नाहीत. जीवनाच्या सर्व क्षेत्रातील विशुद्ध आनंद या शास्त्रपूत आचरणाने प्राप्त होत असतो, तृप्तता येत असते, याची कल्पना नव्या समाज सुधारणेच्या दृष्टीमध्ये नाही. त्यांना सदाचाराची बंधने वाटतात आणि स्वैराचार हे स्वातंत्र्य वाटते.

इकडे महाराजांच्या खोलीत नानांची पूजा चाले, महाराजांचे आन्हिक चाले आणि तिकडे सौ. काकूंचा स्वैपाक चाले. मुलांचे उरकून, स्वच्छता करून, स्वैपाकाची तयारी करून, स्नान करून सोवळे नेसून, तुळसीला पाणी घालून, नामस्मरण करीत सौ. काकू स्वैपाकाला लागत. रोजचा स्वैपाकही व्यवस्थित असे. महाराजांना जेवायला वाढायचे आहे. काही कमी-दोष राहून कसे चालेल ? या भावनेने त्यांचे सर्व करणे महाराजांच्या पसंतीला उतरत असे. नानांना कोर्टात नोकरी होती. सर्व उरकून ते वैश्वदेव करीत. या खोलीतून तिकडे नेऊन नैवेद्य दाखवीत. नैवेद्य आला म्हणजे महाराजही आपले आन्हिक उरकून, कपाळी गंधाचा त्रिपुंड्र लावून, देवाला साष्टांग नमस्कार घालून, भोजनाला येत. सोवळ्यातून जाताना हातात पळीपंचपात्र असावे असे शास्त्र आहे हे त्यांच्या हातातील पळीपंचपात्र पाहून शास्त्र समजे. भोजनाचा संकल्प सोडून – त्रिसूपर्णाची आवृत्ती होऊन भोजनाला सुरुवात होई. १० ला जेवायला बसत. सकाळी सर्व उरकून ही वेळ रोज सांभाळायची, सर्वांना किती दक्षतेने आपापले व्यवहार करावे लागत असतील हे लक्षात घ्यावे लागेल.

महाराजांकडे माणसांची वर्दळ अधून मधून असे. पुढे जेवढी गर्दी झाली तेवढी नसली तरी कोणी ना कोणी परगावचे येऊन राहून जात

असत. गावाकडचे कोणी यायचे, बार्शी सोलापूरचे कोणी यायचे, स्वामी यायचे, संन्यासी यायचे, असे नेहमी चालू असे. कोणीही आले तरी नित्याच्या कार्यक्रमात बदल नसे. शांततेत फरक नसे. मग या आलेल्यांचे आतिथ्य नानांच्याकडे होत असे. नानांचेही बंधू, नातेवाईक येत असत. पुढे पुढे हे फार वाढत गेले.

सोलापूरच्या बापूसाहेब कुबडे यांना नानांच्या परिचयाने आणि सहवासाने फार आदर वाटत असे. त्यांचा आणि नानांचा पत्रव्यवहारही होत असे. नानांनी बापूसाहेबांना पाठविलेल्या पत्रातून त्यांची भाववृत्ती, महाराजांचे सान्निध्याचा लाभ, येणारे अनुभव यांचा उल्लेख असे. अशापैकी एक पत्र खाली देत आहे. त्यातून बरेच समजून येते.

" मित्रोत्तम बापूसाहेब कुबडे यांचे सेवेशी कृ. नमस्कार.

आपले पत्र पोचले. वाचून आनंद झाला. देवगुरुनिष्ठांच्या शब्दांची चटक काही और असते. आपली पत्रे पुन: पुन: वाचीत रहावीत अशी असतात.

पुष्कळशा पुण्याईने ' श्री ' (महाराज) सान्निध्याचा लाभ झाला आहे. ती पुण्याई काय असेल ते श्रेय वडील मातोश्रीकडे आहे. माझ्या हातून तर काहीच श्रीसेवा वगैरे घडली नाही.

श्रींच्या इच्छेप्रमाणे माझ्या हातून काही उपासना सेवा घडावी हा हेतू आहे. श्रींचीच कृपा हा योग घडवून आणील अशी पूर्ण खात्री आहे. उत्तम धर्माचरण व चांगली उपासना आपल्या हातून व्हावी अशी फार फार इच्छा आहे. परंतु काहीच घडत नाही. याबद्दल रात्रंदिवस दिलगिरी आहे.

श्रीगुरुवर्यांची प्रथमभेट बार्शीस झाली. त्यावेळी त्यांना पाहताच हे कोणी तरी फार मोठे आहेत असे मला वाटले, व ती आठवण कायम टिकली. त्यांच्या जवळ राहून आपणास काहीतरी शिकता येईल काय ? असाही विचार त्यावेळी मनाला आला. पुढे अन्नोदक ऋणानुबंधाने मी पुण्यास आलो. ईश्वरेच्छेने एकाच वाड्यात श्रींचाही मुक्काम झाला.

पुढे नेहमी त्यांचेकडे जाऊन बसू लागलो. स्वभाव भिडस्त व विचारण्याचे ज्ञान नाही. यामुळे त्यांच्याजवळ नुसता बसून असे. ते मला त्यांच्याबरोबर फिरावयास नेऊ लागले. त्यावेळी किंवा आम्ही दोघे

असू तेव्हा, बंगाली स्वामींच्या गोष्टी सांगत. त्यांना स्वामींचा अनुग्रह कसा झाला वगैरेही सांगत असत. ते ऐकताना मला वाटे आपणास हा लाभ मिळेल का ? या गोष्टीला आपण पात्र आहोत का ? एकदा बोलता बोलता श्रीस्वामींचे दीक्षा देण्याचे सामर्थ्य श्रीगुरुवर्यांकडेही आहे असे कळून मनाला फार समाधान वाटले. पुढे स्वामी येथे आल्या-वेळी श्रीगुरुवर्यांनी स्वामींची कृपा करविली.

सुप्तावस्थेत असलेल्या सूक्ष्म अभ्यासात आपल्याजवळ बसवून घेऊन अत्यंत कृपाळूपणाने चालना देऊन कासवी जशी आपल्या पिलांना केवळ दृष्टीने पोषण करिते त्याप्रमाणे नेहमीच कृपादृष्टीत ठेवले आहे.

आता इच्छा हीच आहे की, जसे आपण मोठ्या अधिकारी महात्म्याकडे आहोत त्याचप्रमाणे मोठी ईशसेवा, उपासना त्यांच्या आज्ञेप्रमाणे आपल्याकडून व्हावी. त्यांच्याच अमृतदृष्टीने हेतू सफल होईल असा विश्वास वाटत आहे. सान्निध्यलाभ कायम राहून काही अल्पस्वल्प सेवा निरंतर घडावी ही इच्छा.

अनुग्रहाची तळमळ रात्रंदिवस, वडील, आजोबा यांनी ज्या मंत्राची उपासना केली तोच श्रीसमर्थांचा मंत्र. जो श्रीसमर्थ रामदास स्वामींना प्रत्यक्ष प्रभुरामचंद्रांनी अनुगृहीत केला, तो त्रयोदशोक्षरी राम मंत्र योग्य अधिकारी पुरुषाकडून आपणास मिळावा अशी तळमळ असता, एके दिवशी पहाटे दृष्टांत झाला. श्रीटेंबेस्वामी, श्रीगुरुवर्य व बरीच आणखी काही मंडळी होती. त्यात मीही एका बाजूस होतो. श्रीस्वामीमहाराज कोणाकोणाला काही काही सांगत होते. ते सर्व आपल्या गुरुवर्यांकडून (महाराजांकडून) सांगत होते. त्यावेळी मलाही वाटले की, स्वामी महाराज आपल्याला काही सांगतील का ? इतक्यात एक चिठ्ठी स्वामी महाराजांनी मला देण्याकरिता गुरुवर्यांना सांगितले. ती चिठ्ठी गुरुवर्यांनी मला देताना म्हटले की ही तुमच्याकरिता आहे. ती चिठ्ठी मी पाहतो तो तिच्यावर त्रयोदशाक्षरी राम मंत्र लिहिलेला पाहिला. मी स्वामीमहाराजांना नमस्कार केला.

दुसरे दिवशी हा दृष्टांत मी श्रींना सांगितला. त्यांनी सदर मंत्राचा १०८ जप नित्य करण्यास सांगितले. त्याप्रमाणे चालू आहे. क्षुल्लक व्यवहारातसुद्धा श्रींच्या कृपेचे पुष्कळसे अनुभव नेहमी येतात. वरिष्ठांची

मर्जी, सहव्यवसायींचा लोभ, पात्रता नसताना सुद्धा अधिकारापेक्षा जास्त द्रव्य प्राप्ती, या सर्व गोष्टी श्रीगुरुवर्यांच्या कृपेमुळेच होत आहेत. त्यांची पुष्कळशी सेवा घडावी हीच इच्छा आहे. "

आपला

दि. ५-४-१९३१ **भुजंग बळवंत भालेराव**

नानांचे वडील बळवंतराव भालेराव हे मराठवाड्यातील डोणज्याचे सधन, संपन्न कुलकर्णी वतनदार. वाडवडिलांच्या पुण्याईने चालत आलेली ही संपन्नता होती. घरामध्ये शास्त्रशुद्ध आचरण पाळले जात होते. पंचक्रोशातील मंडळी बळवंतरावांना देवाप्रमाणे पूज्य मानीत. नानांच्या आईसुद्धा सात्त्विक-धर्मपरायण-साध्वी होत्या. त्या प्रत्यक्ष अन्नपूर्णा होत्या. त्यांनी मृत्यूपूर्वी प्रत्यक्ष स्वर्ग पाहिल्याचे सांगून नंतर प्राण सोडले.

नानांना व्यायामाची आवड फार होती. पोहणे आणि कुस्ती यामध्ये ते सर्वांपुढे असत. त्यांनी उत्तम कुस्त्या जिकल्या, मोठमोठ्या पुरात पोहले. त्यांची उत्तम प्रकृती हा त्याचाच पुरावा आहे. त्यांची उंच गोरीपान भव्य शरीरयष्टी कमावलेली आहे. त्यांच्या शारीरिक सौंदर्याचे मोल वाढविले ते त्यांच्या अनेक गुणांनी ! ते उत्कृष्ट वेदाभ्यासी आहेत. त्यांच्या मंत्रोच्चाराची गोडी मधुर, लयबद्ध. स्पष्ट व अचूक उच्चार वातावरण प्रसन्न करते. त्यांचा ज्योतिषशास्त्राचा - वैद्यकशास्त्राचा अभ्यासही उत्तम आहे. या शास्त्राधारे ते मार्गदर्शन करतात. त्यांनी संगीताचा अभ्यास केला होता. त्यांना वेदांताची माहिती आहे. त्यांचे मोडी हस्ताक्षर उत्तम आहे. अशा गुणसंपन्न व्यक्तीला महाराजांचे सान्निध्य व मार्गदर्शन लाभले हे केवढे मोठे भाग्य आहे !

नानांची वृत्ती परमार्थी होती. म्हणून गावच्या श्रीमंतीत ते रमले नाहीत. ईश्वरी योजनेला अडथळा न आणता ते सहज पुण्यात आले आणि त्यांना सद्‌गुरुसान्निध्याचा लाभ झाला.

## १९३१-३२ मधील घटना

१. मे महिन्यात अनेकांच्या आग्रहास्तव क्रेपच्या फुलांचा वर्ग

महाराजांनी सुरू केला. सकाळी ८ पर्यंत आन्हिक उरकून ८ ते १० ही वेळ क्लासची ठेवली होती. हा वर्ग पुढे बरेच दिवस ठेवावा लागला. क्लास चांगला चालला. अनेक–मुले मुली वर्गाला येत होती. " Flower Making Class" असे नाव मुलांनीच दिले होते. यासाठी कात्र्या–क्रेपचा कागद इ. वस्तू विद्यार्थ्यांना आणण्यास सांगितले होते. या क्लासमधील मुलांची तयारी चांगली होत असे. क्लास सारखा वाढतच होता. पुष्कळ तऱ्हेची रंगीबेरंगी फुले तयार होत होती. त्या फुलांचे गुच्छ केले जात होते. परड्यामधून फुले भरून ठेवली जात होती. गुलाबांची फुले सर्वात मोठे आकर्षण असे. विविध पानांच्या हिरव्यागार वेलीही शिकविल्या जात होत्या. परमार्थी मनुष्य रसिक असतो हे लक्षात घेण्यासारखे आहे. जगाला मिथ्या म्हणणारा परमार्थ, कृत्रिम फुलातही ईश्वरी तत्त्व 'सौन्दर्य' आहे, हे दाखवीत होता.

२. स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराज कुडुत्री–तारळे–मुरगुड–कोल्हापूर–मिरज भागात जाऊन आले. तिकडे त्यांनी महाराजांचे गाव पाहिले. शंकरभट, गोविंदभट, नरसूतात्यांची भेट घेतली. घरी भिक्षा घेतली. सर्वांना वामनरावांचे गुरु भेटल्याने आनंद झाला. स्वामी महाराजांच्या तारळे व मुरगुड येथील बहिणींच्या घरीही जाऊन आले. नंतर तिकडून ते परस्पर होशंगाबादेवरून काशीला गेले. हे सर्व वृत्त स्वामींनी महाराजांना पत्राने कळविले.

३. श्रीटेंबेस्वामींचा पुण्यतिथी उत्सव दरवर्षीप्रमाणे साजरा झाला. भुजंगरावांनी व सौ. काकूंनी खूप मेहनत घेतली.

४. दिवाळीची सुट्टी दिवाळीच्या आधी पंधरा दिवस आली म्हणून महाराज विटयाला गोपाळराव नागावकरांचे शेतावरील मळयात गेले. हे स्थान निवांत व रम्य होते. या ठिकाणी कोल्हापूरची स्नेही मंडळी एकत्र जमत असत. यामध्ये मिरजेचे गोविंदराव गोखले, डॉ. प्राणी, डॉ. देशपांडे, आण्णासाहेब गोगटे, आप्पा गुळवणी, भाऊसो मोघे, तात्या दिवेकर यांचा उल्लेख करावा लागेल. सर्वच मंडळी दरवेळी येथे येतील असे नाही. पण यापैकी येतील त्यांच्या भेटीने परस्परांना आनंद होत असे.

५. महाराजांनी विटयाहून पुण्याला भुजंगरावांना पत्र पाठवून सर्वांना

घेऊन वाडीला येण्याचे लिहिले. गुरुद्वादशीला पुण्याहून नाना–सौ. काकू महाराजांच्या मातुश्री व भगिनी गोदावरी असे पत्राप्रमाणे मिळून आले होते. हैद्राबादहून शंकरकाका आजेगावकर व त्यांचे बंधू दत्तूकाकाही वाडीला आले होते. शंकरकाका व दत्तूकाका यांचा परिचय फार जुना. त्यांच्या भेटीने परस्परांना फार आनंद झाला. गुरुद्वादशीच्या आनंदात गुरुबंधूचाही आनंद मिळाला.

६. तेथून ही सर्व मंडळी मिरजेला डॉ. प्राणी यांचेकडे आली. डॉ. प्राणींचे घर म्हणजे संतसत्पुरुषांच्या भेटीगाठीचे केंद्र. तेथे दोन दिवस मुक्काम करून नाना व सौ. काकू पुण्याला गेले. महाराज, शंकरकाका, दत्तोपंत ही मंडळी पंढरपुरला गेली. पढरपुरात श्रीदासगुणमहाराजांचे घरी मुक्काम केला. देवदर्शन व भोजनप्रसाद झाला.

७. पंढरपूरहून कुर्डुवाडीपर्यंत तिघेही गुरुबंधू एकत्र होते. तेथून शंकरकाका व दत्तोपंत हैद्राबादेकडे गेले व महाराज बार्शीला गेले. तेथून ते पुण्यास आले. पुण्याला पुनः नित्यक्रम सुरू झाला. पत्रव्यवहार सुरू झाला. पुढे स्वामींची पुण्यतिथी आली. व्यंकू–बापू–भास्कर यांना पुण्यतिथीला येण्याची पत्रे गेली. बापूच्या पत्रात लिहिले की गेल्या ३।४ वर्षात अडचणीमुळे या उत्सवाला येता आले नाही. यावेळी जरूर यावे. पत्रात पुढील वाक्य होते, "आपला व तसाच भुजंगरावांचा माझ्याशी संबंध आल्यामुळे मला फार धन्यता वाटते. मात्र माझ्या हातून काहीच होत नाही याबद्दल मला फार वाईट वाटते." वास्तविक महाराजांच्या कृपेने नाना-बापूंच्या आयुष्याला चांगले वळण लागले, ईश्वरी कृपाप्रसाद मिळाला याची कृतज्ञता त्यांचे अंतःकरणात आहे. पण महाराजांना वाटते आपण काहीच करू शकलो नाही. करून केवढा अकर्तेपणा अन्तःकरणात सहजपणे दिसतो. आणि त्यांचे श्रेष्ठत्व अबाधित राहते.

८. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांची इच्छा होती की त्यांना श्री समर्थांचा दासबोध व श्रीसमर्थांचे एक छायाचित्र मिळावे. ते लक्षात ठेवून महाराजांनी स्वामींना दासबोध व श्रीसमर्थांचे चित्र व्यवस्थित पार्सल करून पाठवून दिले. 'अखंड असावे सावधान–सर्व विषयी' या छोट्या घटना वाटतात पण त्यातूनच महाराजांच्या मोठ्या व्यापाची कल्पना येते

व तो व्याप सहज सांभाळण्याचे त्यांचे कौशल्यही दिसते.

९. महाराजांचे बंधू गोविंदराव तुळजापूर-गाणगापूरला जाण्यासाठी कुडुत्रीहून पुण्यास आले होते. महाराजांनी सोलापूरला बापूसाहेब कुबडे यांना पत्र पाठवून गोविंदरावांची सर्व व्यवस्था त्यांचे इच्छेप्रमाणे करण्याचे पत्र पाठवून दिले व नंतर गोविंदरावांना सोलापूरला पाठविले. प्रत्येकाला मार्गी लावणे हे सपुरुषांचे कार्य सतत चालू असते. जो जेथे अडला असेल तेथून त्याला पुढे काढणे हे त्यांचे कार्य प्रत्येक प्रसंगातून दिसत असते.

१०. १९३३ च्या मार्चमध्ये तारळ्याची बहीण तानुबाईच्या यजमानांना एकाएकी देवाज्ञा झाली हे समजल्यावर गोदावरीला गावाकडे पाठवून दिले.

या घटनेपासून गुळवणी कुलावर आपत्तींचे आघात सुरू झाले. संकटे येऊ लागली म्हणजे टोळधाडीप्रमाणे येऊ लागतात. ग्रहमान फिरले की कोणते संकट कसे येईल याचा अंदाजही येत नाही.

## मातृवियोग !

महाराजांच्या जीवनात मातेवरील श्रद्धा सर्वोच्च होती. मातेच्या मनात वामनरावांचेवर नितांत वात्सल्य होते. महाराजांना आईचे जीवन म्हणजे सती अनसूयेचे जीवन दिसत होते. ईश्वरनिष्ठा, पतिनिष्ठा, व्रतनिश्चय, निष्कलंक, मधुर वाणी, हे सारे अनसूयेचे गुण उमामातेमध्ये महाराज सतत पाहात होते. महाराजांनी मातृसेवेची पराकाष्ठा केली. पूर्वी उल्लेख राहून गेला पण महाराजांनी आई आणि भगिनी गोदावरीची काशीयात्रा करवून आणली. केवळ मातेच्या काशीयात्रेसाठी ते गेले होते. महाराजांचे हे प्रवास, ही धर्मकृत्ये, दानधर्म, मातेची वस्त्रप्रावरणे, मातेच्या वाडी कडुत्रीच्या जाण्यायेण्याची भाडी, कशात म्हणून त्यांनी काटकसर केली नाही. त्यांच्या मिळकतीचे आणि खर्चाचे अंदाजपत्रक कोणत्या अर्थशास्त्रावर आखले होते हे त्यांचे त्यांनाच माहीत.

दरवर्षी वाडीला गुरुद्वादशीला जाताना आईला आणि बहिणीला घेऊन जाण्याचा त्यांचा नियम होता. सोयीसाठी कधी त्यांना आधी पाठवीत तर कधी वेळेपूर्वी पण मागाहून येण्याची सोय करीत. गुरुद्वादशीनंतर

कुडुत्रीला काही दिवस मुक्काम होत असे. नंतर सर्वजण पुण्यास येत असत. उमामातेचा प्रपंच मोठा होता. या मोठ्या प्रपंचात सुख वाट्याला आलेली मुले म्हणजे नरहरी तात्यांचे–सखूबाईंचे आणि प्रपंच न करणाऱ्या वामनरावांचे नाव घ्यावे लागेल. बाकी सर्व मुलांच्या वाट्याला-आपत्ती आणि दुःखच फार होते. आईला मुलांवरची आपत्ती पहाणे हेच फार मोठे दुःख असते. जर उमामाता पुण्याला वामनरावांकडे न येता कुडुत्रीमध्येच राहिली असती तर डोळ्यासमोर धगधगणाऱ्या दुःखाग्नीच्या ज्वालांनी होरपळून गेली असती. गोविंदरावांवरच्या आपत्ती इतक्या तीव्र वेदना देणाऱ्या होत्या की, त्या ऐकणेही असह्य होऊन जाते, मग त्या पहाताना काय झाले असते ? वास्तविक गोदावरीचे दुःखही मातेच्या दृष्टीने असह्यच होते. बिचारी बालविधवा झाली ! काय सुख मिळालं तिला ? शंकर-भटजीच्या संसारातही सुख नव्हते, बापूभटजींच्या नशिबी सुख नव्हते. प्रपंचात सगळीकडे उन्हाळा होता. उमामाता वामनरावांचेखेरीज कोण-त्याही मुलाकडे राहिली असती तर कदाचित तिला अन्नवस्त्राला कमी पडले नसते पण मनःशांती मिळाली नसती. वामरावांकडे राहिल्याने दोन्ही गोष्टींची सोय झाली. ही ईश्वरी योजना होती. सुख दुःख हे प्रारब्धाने मिळते म्हणून टाळता येत नाही पण मनःशांती सत्संगतीने–उपासनेने मिळविता येते. ती उमामातेला वामरावांकडे मिळाली यात तिळमात्र शंका नाही.

वामनरावांचे घरी संतसत्पुरुषांची दिवाळी असे. स्वामी श्रीलोक-नाथतीर्थ महाराजांचे सान्निध्य वारंवार लाभत असे. व्यासक्षेत्राचे श्री. अवधूतस्वामी येत, औदुंबरचे नारायण स्वामी येत, शंकरकाका आजे-गावकर, काशीताई, दत्तोपंत ही पवनीच्या वेळी अनुग्रह घेतलेली गुरुबंधू मंडळी येत असत. धुंडिराज महाराज कवीश्वर आणि सौ. सरस्वतीबाई यांचीही मधून मधून भेट होत असे. वाडीला गेल्यावर प. पू. श्रीदीक्षित स्वामींची भेट होत असे. अशी संत सत्पुरुषांची मांदियाळी वामनरावांच्या-मुळे भेटत असे. श्रांत जीवांना शांत करतात ते संत असतात. उमा-मातेच्या जीवनात प्रतिकूल परिस्थितीत जी प्रगाढ शांतता आली ती या संतांमुळे आली.

स्वभावतःच त्या ईश्वरनिष्ठ असल्याने त्यांचेवर ईश्वर कृपेचा

वर्षाव झाला. प्रत्यक्ष श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांनी पादुका देऊन उमामातेची मनोकामना पूर्ण केली आणि वामनरूपाने स्वत: श्रीदत्तप्रभू तिच्या पोटी जन्मास आले. धाकटचा मुलीच्या वेळी झालेल्या भयंकर रोगात श्रींनी तीर्थ देऊन त्यांना संकटमुक्त केले. या घटना उमामातेचा अधिकार दाखविणाऱ्या आहेत. महाराजांना आपल्या आईचा अधिकार अखंड स्मरणात होता. म्हणून त्यांनी या जाणीवेने मातृसेवा केली हे त्याच सेवेचे विशेष महत्त्व आहे. जशी महाराजांनी आईची सेवा केली तशीच गोदावरीनेही केली. त्यांच्या अशा जीवनात आईला गोदावरीचा आणि गोदावरीला आईचा आधार असे. या मायलेकी नेहमी सावली-सारख्या एकमेकांबरोबर असत.

दरवर्षीपेक्षा यावर्षी गुरुद्वादशीपूर्वीच आई आणि गोदावरीला गावी कुडुत्रीला जावे लागले. कारण पुण्यात ऑगस्टपासून प्लेग सुरू झाला होता. तेव्हा शाळेला १५ दिवसांची सुट्टीही मिळाली होती. तेव्हा पुण्यातील अशा वातावरणामुळे आई बहिणीला गावी कुडुत्रीला पाठवून दिले महाराज पुण्यातच राहिले. शाळेची नक्की सुटी ठरायची होती. सदाशिव-नारायणपेठेतील वातावरण स्वच्छ होते. महाराज दसऱ्यास बार्शीस गेले तेथूनच परस्पर वाडीस जाणार होते. वाडीला गेल्यावर समजले, आईची प्रकृती ठीक नाही. म्हणून गुरुद्वादशी झाल्याबरोबर महाराज कुडुत्रीला गेले. आईची सेवा करीत तेथे राहिले. इतरही सर्व बंधु–बहिणी तेथेच आलेले होते.

कार्तिक शुद्ध षठीला पू. श्री. उमामातेने सर्वांचा कायमचा निरोप घेतला आणि केवळ स्थूल देहाचा नव्हे तर सूक्ष्म देहाचाही संबंध कायमचा सोडून जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून आपली कायमची सुटका करून घेतली.

पुढे श्रीवैद्यमास्तरांच्या निधनाचा जो प्रसंग आहे त्या आधारे हे म्हणणे अवास्तव होणार नाही. महाराजांसारख्या दत्तावतारी मुलाने उमामातेची आत्मज्योति आपल्यामध्ये सामावून घेतली आणि मातृ-ऋणातून अंशत: स्वत:ला मोकळे केले.

मातृवियोगाने महाराज अतिशय व्यथित झाले. त्यांच्या मन:-पटलावर वारंवार मातेच्या अनेक स्मृती येत होत्या व त्यांना मातृ-

भक्तीचा उमाळा येऊन ते अतिशय अस्वस्थ होत होते. गोदावरीच्या दुःखाचे कढ हृदय विदीर्ण करीत होते. दुःख हा विषयच असा आहे की त्याचा प्रभाव आसमंतात कारुण्य पसरवून टाकतो. याची प्रचीति महात्म्याच्या निर्वाणाने सर्वांना येत असते. गोदावरीकडे पाहून महाराजांनी हे भयंकर दुःख आवरून घेतले.

## आपत्तींच्या वज्राघातांनी जर्जर केले

इ. स. १९३३ च्या मार्चमध्ये तारळचाच्या बहिणीचे यजमान गेले. त्यानंतर ७ / ८ महिन्यांनी मातुश्रींचा वियोग झाला. आई गेल्या-पासून कुडुत्रीच्या घराचे ऐश्वर्यच गेले. अधून मधून जरी आई कुडुत्रीला जाऊन राहिली तरी आसपासची मंडळी तिला भेटायला येत असत. सर्व मुले–मुली–नातवंडं उमेला भेटायला माहेराला येत असत. घराचा गोकुळवाडा होऊन आनंदाने बहरून जायचा. सर्वांच्या प्रेमाचा धागा ‘ उमा ’ होती. ती गेल्यावर कुडुत्रीमधले चैतन्यच संपले.

तरी कुडुत्रीमध्ये गोविंदरावांचे कुटुंब, शंकरशास्त्रींचे कुटुंब, नरहरी तात्यांचे कुटुंब तिथे राहात होते. गोविंदरावांच्या मंडळींच्या मनावर परिणाम झाला होता. त्यांची मुले लहानपणी गेल्यामुळे आणि गोविंदरावांची आर्थिक स्थिती फार बिघडल्यामुळे तो परिणाम झाला होता. इ. स. १९३४ च्या जानेवारीत थोडचा दिवसांच्या अंतरात महाराजांच्या दोन वडील भावजया कैलासवासी झाल्या. आणि कुडुत्रीचे घर ‘ गृहं तु गृहिणीशून्यं कान्तारात् अतिरिच्यते ’ अशा स्थितीप्रत पोचले.

अशा दुःखद प्रसंगी कोण कोणाचे सांत्वन करू शकणार ? प्रत्येकाने ते आपापल्या परीने सहनच करावे लागते.

इकडे पुण्यात गोदावरी तापाने आजारी पडली, ते तिने तीन आठवडे अंथरूण धरले. यावेळी भुजंगरावाची मंडळी सौ. काकूही पुण्यात नव्हत्या. भुजंगराव (नाना) गोदावरीचे औषध पाणी आणणे करणे, बाजारहाट करणे, देवपूजा करणे–इ. करीत असत. नानांना हा त्रास वाटत नव्हता. करायला कोणीही नव्हते. आणि महाराजांचीही प्रकृती या सुमारास ठीक नव्हती. सर्व बाजूंनी काळ प्रतिकूल झाला होता.

श्रीदत्तजयंतीचे दिवस आले. बार्शीला पत्र पाठवून दादाशास्त्री आणि त्यांची मंडळी यांना बोलावून घेतले. त्यांचा मुक्काम तीन आठवडे होता. पण दादाशास्त्रींच्या मंडळींची प्रकृती बिघडल्याने त्यांनाही बार्शीला पाठवून देणे भाग पडले. श्रीदत्तजयंती सप्ताह पारायण नानांनाच करायला सांगितले. या उत्सवाची–आणि इतरही कामे नाना करीत होते. नानांची धावपळ–कष्ट पाहून महाराजांना फार संकोच होत असे. आपल्याला काही करता येत नाही, सर्व नानांना करावे लागते, यामधूनच अंतःकरणामध्ये नानांच्या सेवेने महाराजांच्या चित्तात नानांच्याबद्दल अनुकंपा निर्माण होत असे. सद्‌गुरूंना निर्माण होणारी अनुकंपा भक्ताचे कल्याण करीत असते.

या परिस्थितीत सखूबाईचा मुलगा श्रीपाद विषमज्वराने आजारी पडला. त्याला २० नारायण पेठेत घेऊन सखूबाई आली. तिची आणखी दोन लहान मुले बरोबर होती. महाराजांची जागा लहान. तिथं गोदावरी आजारी. महाराजांना बरे नाही. अशा स्थितीत त्याच जागेत विषमज्वराचा श्रीपाद ठेवणे योग्य नव्हते. म्हणून गोवईकरांच्या त्याच चाळीत दुसऱ्या मजल्यावरील एक खोली घेऊन तिथं श्रीपादला ठेवले. त्याच्याजवळ सखूबाई (श्रीपादची आई) दोन मुलांना घेऊन राहिली. सखूबाई श्रीपादकडे लक्ष देत असे, तसे खाली गोदावरी व महाराजांकडे सुद्धा लक्ष देत असे. अलिकडे या दोघांच्या प्रकृतीत चांगला फरक पडू लागला होता. त्यांचा नित्यक्रम सुरळीत होऊ लागला होता.

श्रीपादरावांनी आपल्या आजाराची आठवण त्यांच्या जीवन चरित्रात शब्दांकित केली आहे. ती त्यांच्याच शब्दात खाली देत आहे.

“नारायण पेठेतल्या गोवईकरांच्या चाळीत दुसऱ्या मजल्यावरील खोलीत मला हालविण्यात आले. महाराज तळमजल्यावर राहात होते. त्यांच्या खेरीज आमच्या नात्याचे पुण्यात दुसरं कोणीच नव्हतं! ताप उतरल्या खेरीज गावी जाणं शक्य नव्हतं. परंतु गावी घरात गुरं ढोरं आणि लहान मुले असल्याने आई आणि भाऊ (माझे वडील) या दोघांनाही पुण्यात राहाता येण्यासारखी स्थिती नव्हती. कुणी तरी परत जाणं भाग होतं. चातुर्मास्यामुळे भिक्षुकीची कामे वाढली होती. म्हणून भाऊंना पुण्यात राहणे शक्य नव्हते. अखेर आईच्या भरवशावर ठेवून

भाऊ मुरगुडला गेले. आई बिचारी एकटी काय करणार? त्यामुळे ती जबाबदारी अखेर महाराजांवर पडली.

रोज नियमानं दवाखान्यातून औषधं आणणे, मला एनिमा देणे, तापाची नोंद ठेवणे, वगैरे कामे महाराज स्वतःच शांतपणे, कसलाही त्रागा न करिता, व्यवस्थितपणे पार पाडीत. त्यांच्या भक्तांपैकी एक बाई नर्स होत्या. स्पंजिंग वगैरे कामात आईला त्यांची मदत होई. २१ दिवस झाल्यावर माझा ताप पुनः उलटला. मी बेशुद्ध होऊन बरळू लागलो. त्या काळी विषमज्वर हा प्राणघातक आजार समजला जाई. त्यामुळे बहुतेकांनी माझी आशा सोडली होती. पण महाराजांचं मन खंबीर होतं. ते सर्वांना धीर देत होते. जणू त्यांनी स्वतःची पुण्याई माझ्यासाठी पणाला लावली होती. 'अनन्यास रक्षीतसे चापपाणी। नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥' हे समर्थांचे शब्द अखेर खरे ठरले. आणि त्या जीवघेण्या आजारातून मी बरा झालो. महाराजांनीच मला मृत्यूच्या दाढेतून परत आणले, अशी माझी भावना झाली.

त्यानंतर जे औषध सुरू झालं त्यात अंड्याचा भाग असावा. त्याला स्पर्श करणे म्हणजे महाराजांच्या दृष्टीने अब्रह्मण्यम् होते. तरीही ते औषध आणीत, मग स्नान करीत आणि आपल्या दैनंदिन कार्यक्रमाला लागत. त्यावेळी महाराजांच्या जवळ भक्तांचा फार मोठा ताफा नसला तरी एवढं काम करू शकणारी नाना भालेरावांसारखी काही शिष्य मंडळी होती. त्यांना ते काम न सांगता महाराज स्वतःच ते करीत असत. त्या प्रसंगातून त्यांच्या माणुसकीचे, कळकळीचे जे दर्शन मला घडलं त्याने मी अत्यंत प्रभावित झालो."

## देवतेच्या आदेशाने महाराजांकडे

महाराजांचे कार्य ईश्वरी असल्याने त्यांनी कोणाला आपलेकडे येण्याचे निमंत्रण दिले नाही का येण्यासाठी कोणतेही आकर्षण ठेवले नाही. कारण त्यांनी स्वतःच याचे अनेक अनुभव घेतले होते. 'होणारे न चुके जरी ब्रह्मा तया आडवा' असे नियतीचे सामर्थ्य असते. सत्संग दुर्लभ सामान्य जीवांना असतो. पुण्याई–प्रारब्धाचे गाठोडे पाठीशी असणाऱ्यांना सत्संग कसा घडतो हे समजत सुद्धा नाही. सहज सत्संग घडणे

ही खरोखर फार मोठी पुण्याईच म्हटली पाहिजे. हा सारा ऋणानुबंधाचा खेळ आहे. सत्संग मिळूनही त्याचा लाभ घेता आला तरच त्या सत्संगाला अर्थ आहे. नाहीतर आलेली संधी पुढे ढकलली जाते.

महाराजांकडे २० नारायण पेठेत नोव्हेंबर १९३४ मध्ये एक व्यक्ती पत्ता शोधीत आली. महाराजांच्या सान्निध्यात चार दिवस राहिली. आपली सर्व हकीगत सांगितली. दीक्षा घेतली आणि निघून गेली. या संबंधीचे एक सविस्तर पत्र महाराजांनी बापूसाहेब कुबडे सोलापूर, यांना पाठविले. ते पत्र खाली देत आहे.

दि. २-१२-१९३४

" .... पंधरा दिवसापूर्वी कोल्हापूरकडील एक तरुण गृहस्थ बी. ए. झालेले मुद्दाम दीक्षेकरिता देवतेच्या सांगण्यावरून आले होते. अर्थात् दीक्षा उत्तम झाली. क्रिया फार जोरात सुरू झाली आहे. चार दिवस राहून मुंबईस गेले आहेत. मोहोळकर यांना हा सर्व प्रकार पाहण्यास मिळाला. आपल्याला असा अनुभव यावा अशी त्यांची फार इच्छा आहे. परंतु सर्व गोष्टी आपल्या इच्छेवर थोडयाच अवलंबून असतात ?

सदर गृहस्थाला लहानपणापासून दक्षिणामूर्तीचे सान्निध्य आहे. व त्यांच्या सांगण्याप्रमाणेच ते सर्व व्यवहार करतात. ते विवाहित असून त्यांना चार मुले आहेत. देवतेच्या सांगण्याप्रमाणे नेहमी साधुसत्पुरुषांच्या सहवासात राहून पुष्कळ तपश्चर्या केली आहे. प्रवासही फार केला आहे. इतःपर पतिपत्नींनी पूर्ण ब्रह्मचर्य पाळून राहिले पाहिजे असे देवतेचे सांगणे आहे. विरुद्ध वागल्यास फार त्रास होतो.

त्यांनी पुष्कळ गोष्टी सांगितल्या. त्या सर्व पत्री लिहिणे शक्य नाही. उपासना रामाची आहे. श्रीगुरुचरित्राची पुष्कळ पारायणे लहानपणापासून केली आहेत. काही दिवस महाराजांची (श्रीटेंबेस्वामी) उपासना केली आहे (प्रत्यक्ष पाहिले नसता). मी तुझा गुरु नव्हे, तो दुसरा आहे असे त्यांनी सांगितले. उपासनीमहाराज व नारायण महाराज यांच्याकडेही राहून आले आहेत. पुष्कळ गोष्टींची माहिती आहे. कोणाजवळ व देवतेच्या आज्ञेशिवाय फारसे बोलत नाहीत. असो. एक चांगली व्यक्ती पाहण्यात आली.... "

आपला

वा. द. गुळवणी.

पत्रातच व्यक्तीचे नाव नसल्याने– व अद्याप न समजल्याने– देता आले नाही. तरी पत्रावरून खूप समजण्यासारखे आहे.

## योगी माधवनाथ महाराज यांची भेट व परिचय

श्रीगुरुमहाराजांच्या जीवनात अनेक संतसत्पुरुषांच्या भेटीगाठी, सहवास घडल्याचे सतत दिसून येते. इ. स. १९३४–३५ सालामध्ये महाराजांचा संबंध पुण्यातच निवासास असलेले चित्रकूटचे श्रीयोगाभ्यानंद श्रीमाधवनाथमहाराज यांचेशी आला. ते पुण्यात बोहरी लोकांच्या ताबुताजवळ, जुन्या गजरीच्या बोळात, घ. नं. १२४२ रविवार पेठेत श्री. चंपाबाई परदेशी, हेडमिस्ट्रेस यांचेकडे रहात होते. त्यांनी बालपणीच चित्रकूटचा त्याग केला. तेथेच १० व्या वर्षी श्रीगुप्तनाथपदी नत होऊन ते महान योगी बनले होते. पुढील बराच काळ ते अज्ञातवासात राहत होते. पुढे शेवटची ४० वर्षे पुण्यात वास्तव्य केले.

दरवर्षी रामनवमीस नाशिकच्या पंचवटीतील रामाचे दर्शनास व पौष वद्य ११ त्र्यंबकेश्वरी श्री निवृत्तीनाथांच्या दर्शनास जाण्याचा त्यांचा नियम होता. त्यांनी भक्तांकडून अनेक हवने करविली होती. त्यांची दिनचर्या : रात्री ११ नंतर ध्यानस्थ होऊन पहाटे ५ अगर ६ पर्यंत निर्विकल्प समाधीत निमग्न व्हायचे. नंतर २।३ तास शय्येवर पडून रहात असत. सकाळी ८ ते ९ शिष्यांना दर्शन. त्यांचेशी संभाषण करीत. ११ च्या सुमारास वस्त्रधौती करीत. नंतर लिंबाचा पाला खात. वर १ प्याला दूध घेत. पुढे स्नान-संध्या-पूजन चाले. पूजन म्हणजे निर्गुण उपासनाच असे. हातावरील नवग्रह चक्राचे व एका सत्पुरुषाने दिलेल्या पादुकांचे पूजन ३ तास चाले. पूजेचे तीर्थ लोककल्याणार्थ देत असत. पूजनानंतर पुनः त्यांची समाधी लागे. त्यानंतर नैवेद्य होत असे. भोजनात भात वरण व ठराविक भाज्या असत. तेल, साखर, गूळ अगदी वर्ज्य असे. सायंकाळी संध्येनंतर फुलपात्रेभर पाणी व रात्री १ प्याला दूध ते घेत असत. दुपारी ३॥/४ पासून भक्तांसाठी गादीवर येऊन बसत. अडीअडचणीवर उपाय सांगत. पत्रोत्तरे लिहीत.

योगाचा अभ्यास उत्तम होता. चांगल्या तयारीच्या साधकांना ते अजपाजप– ‘ ॐ हंसः–सोहम् ’चा प्राणायाम, कुंभक रहित सव्यापसव्य,

हृदयस्थानी सूक्ष्म नजरेने पहाणे, सिद्धासनातील साधना, वेगवेगळे सिद्धमंत्र, इ. साधने देत असत. यातील सर्व बारकावे, उच्चार, स्वरांची गती, इ. स्वतः करून समजावून सांगत.

हिंगणघाट येथे १४।८।१९३६ रोजी त्यांनी आपल्या कलेवराचा त्याग केला. तेथून त्यांचा देह इंदोरला नेला. तेथे अंत्यसंस्कार होऊन मंदिरही झाले आहे.

श्री माधवनाथांची माहिती, त्यांचे काही शिष्य महाराजांकडे येत असत त्यांचेकडून मिळाली. तेव्हा महाराज अनेकदा त्यांचेकडे जाऊन येत असत. दर्शन घेऊन त्यांचेजवळ बसून उभयतांचे योगावर चांगले बोलणे होत असे. महाराजांनी त्यांना खेचरी मुद्रेबद्दल काही माहिती विचारली होती. तेव्हा माधवनाथ महाराजांना खेचरी-बद्दल चांगली माहिती असल्याचे महाराजांचे लक्षात आले. ते 'सोऽहं' मंत्राचा जप श्वासाबरोबर करण्यास सांगत. तो विधी फार उत्तम असल्याचेही महाराज त्यांचे संबंधी सांगत असत. या प्रकारे केलेल्या सोऽहं जपाचा उपयोग झाल्याशिवाय रहाणार नाही असेही महाराज सांगत असत.

श्रीमाधवनाथ महाराजांच्या निर्वाणानंतर त्यांची अनेक भक्त मंडळी महाराजांकडे दर्शनास व मार्गदर्शन घेण्यास येत असत. त्यावेळी महाराज त्यांना सांगत–

"प्रणव रूप श्वासोच्छ्वास। हाचि तारक उपदेश। परि हे गुरुकृपेचे देणे। विरळा भाग्यवंत जाणे ।।

हा तुकाराम महाराजांचा अभंग आहे. सोऽहं मधला 'स'कार व 'ह'कार काढला म्हणजे 'ॐ' राहतो. हा प्रणवजप आहे. चित्त स्थैर्याला याच्या इतका उत्तम उपाय दुसरा नाही. आपणाला सद्गुरूंनी याच तारक मंत्राचा उपदेश केला आहे. त्याचा अभ्यास केला पाहिजे. सद्-गुरूंनी दिलेल्या वस्तूचे मोल त्यांनी सांगितल्याप्रमाणे नेटाने काही दिवस अभ्यास केल्यावर चांगले कळायला लागेल व गोडी वाढून अभ्यास होईल. अभ्यास झाला म्हणजे प्रगती होईल. काय वाटेल ते झाले तरी सद्गुरूंनी सांगितलेला व दिलेला साधनाभ्यास झालाच पाहिजे. म्हणजे आपले आपल्याला कळून येईल."

इकडे आल्यावर आपल्याच सद्‌गुरूंचे महत्त्व व साधनमार्गाचे वैशिष्टय समजल्यावर त्या मंडळींना त्यांच्या गुरूबद्दलची श्रद्धा तर वाढत असेच पण त्याच बरोबर मार्गदर्शनाने समाधान पावल्यामुळे महाराजांच्याबद्दलही आदर त्यांना वाटत असे. मग श्रद्धेने नमस्कार करून ते जात.

अन्य सत्पुरुषांसंबंधीची ही आदराची बुद्धी असली पाहिजे. प्रत्येकाच्या ऋणानुबंधाप्रमाणे सद्‌गुरूंच्या भेटी गाठी होत असतात. सद्‌गुरु बदलले, मार्ग भिन्न दिसले, तरी सर्व जण एकाच ठिकाणी जाणार आहेत. एकाच गुणधर्माची निर्मिती सर्व साधकांमध्ये होणार आहे.

आपण सर्वांना आदराने मान दिला पाहिजे.

## चि. श्रीपाद कुबडे यांच्या मुंजीचे आहेर

श्रीगुरुमहाराज आणि त्यांचा शिष्यपरिवार हे संबंध कसे असतात हे दाखविणारे प्रसंग म्हणजे ' अवघे विश्वचि माझे घर ' याची प्रचीति देणारे असतात. शुद्ध प्रेमाला लौकिक व्यवहार असतोच. व्यवहारातले प्रेम ' देणे–घेणे ' तत्त्वावर असते, तर शुद्ध प्रेम फक्त देण्याचाच विचार करते. म्हणून हे प्रेम अन्त:करणावर ठसत असते.

श्री. बापूसाहेब कुबडे आणि श्रीगुरुमहाराज यांचे संबंध बार्शीपासून म्हणजे इ. स. १९१७ पासून आलेले. प्रत्यक्ष सहवास मधून मधून अनेकदा आला तरी आंतरिक संबंध–पत्रद्वारे संबंध सतत असे. महाराजांना प्रत्येक प्रसंगात आधी आणि वारंवार आठवण येई ती बापूसाहेबांची. आणि बापूसाहेबांना तर महाराजांचे नित्य स्मरण असे. इ. स. १९३५ च्या मे मध्ये बापूसाहेबाच्या चिरंजीवाची – श्रीपादची मुंज ठरली. श्रीगुरुमहाराजांना निमंत्रण गेले. श्री. वैद्यमास्तरही पुण्याकडे होते त्यांची पत्रिका महाराजांकडे पाठविली. महाराजांनी वैद्यमास्तर आळंदीस राहावयास गेले असल्यामुळे ती पत्रिका पोष्टाने आळंदीस पाठविली. भुजंगरावांच्याकडे त्यांची वडील भावजय औषधोपचारासाठी मुलांसह पुण्यात आली असल्यामुळे त्यांना मुंजीला जाणे जमणार नव्हते.

महाराज मेच्या सुट्टीत यथाशक्ती श्रीगुरुचरित्राची पारायणे करीत असत. त्याप्रमाणे याही वर्षी त्यांनी सप्ताह पारायणे सुरू केली होती.

पहिले पारायण संपून दुसरे सुरू झाले होते. त्यामुळे मुंजीला जाणे त्यांनाही शक्य नव्हते. म्हणून त्यांनी या खुलाशाचे पत्र पाठवून आपले मनोगत पुढील शब्दांतून प्रगट केले.

"श्रीगुरुमहाराजांचे चरणासन्निध आपण माझे नित्य स्मरण करीतच आहात. सोबत वाडीच्या श्रीपादुकांवरील गंध व हळद कुंकू पाठविले आहे. तसेच सोबत या मंगल प्रसंगी आहेर म्हणून आपणा त्रिवर्गाकरिता श्रीगुरुमहाराजांच्या कृपाभांडारातून प्रसादरूपी तीन स्तोत्र रत्ने, महाराजांचा एक नम्र सेवक या नात्याने, आपणाकडे पाठविण्याचे पवित्र कार्य करताना, अतिशय आनंद होत आहे. १ आपणाकरिता, २ चि. सौ. रमाकरिता ३ चि. श्रीपाद करिता. तो प्रसाद प्रत्येकास यथोचित असल्याचे कळेलच. तरी तो निरंतर पठणरूपाने धारण करावा, अशी इच्छा आहे. श्रीकृपेने सर्व मनोरथ पूर्ण होतील.

चि. श्रीपाद करिता बनारसी रेशमी पामरी पाठविली आहे. त्याचा मंगलप्रसंगी अवश्य उपयोग करावा."

प्रपंचामधील व्यवहार, ईश्वरनिष्ठा श्रद्धा–भक्ती वाढविणारा कसा असतो हे या प्रसंगामधून दिसते. आहेर देताना काय दिले हे लक्षात घेण्यासारखे आहे. स्वतःबद्दल सहज लिहिलेले वाक्य तर पुनः पुनः चिंतन करावे असे आहे.

"श्रीगुरुमहाराजांचे चरणासन्निध आपण माझे नित्य स्मरण करीतच आहात." ते आणि मी एक आहे असे कोणता भक्त सांगेल, पण तेच सुचविल्याखेरीज त्याला राहवतही नसते. त्यांतूनच हे समजून घेतले पाहिजे.

'देह ही पंढरी आत्मा हा विठ्ठल' हे संतांचे शब्द असतात. हे वर्णन त्यांच्या अनुभूतीमधून आलेले असते. आपल्याला ते आवडते ते भावकल्पनेने आवडते, अनुभूती नसते.

"राम हमारा जप करे। हम बैठे आराम" ही अनुभूती घेतल्यावर संत कबीरदासांनी म्हटले आहे.

**'कल्याण' योगांकाने प्रसिद्धीस आणले.**

इ. स. १९३५ मध्ये गोरखपूरच्या 'कल्याण' मासिकाने 'योग'

विशेषांक काढला होता. त्यामध्ये योगावर अनेक उत्तमोत्तम लेख आले आहेत. उत्तम उत्तम रंगीत आकृत्यांसह नाडी-चक्रे-इ.चे स्पष्टीकरण आलेले आहे. त्यामध्ये छोटीगैबी वाराणसी येथील शक्तिपात पीठाचे आचार्य प. प. श्रीशंकर पुरुषोत्तम तीर्थ यांचा लेख आहे. पं. श्री. गोपीनाथ कविराज यांचा लेख आहे. सुमारे शंभर दीडशे योगातील अधिकारी महात्म्यांचे लेख आहेत. हा योगांक निश्चित वाचनीय व प्रशंसनीय आहे. 'कल्याण' मासिकाचे वृत्तपत्रातील स्थान भारतात सर्वश्रेष्ठ असे आहे. त्यातून प्रसिद्ध होणारे सर्व वाङ्मय भारतीय वैदिक तत्त्वज्ञानाचे – धार्मिक उपासनादींचे –भारतीय महापुरुषांचे– विविध साधन संप्रदायाचे उत्कृष्ट दर्शन घडविणारे असते. अशा श्रेष्ठ दर्जाच्या योगविशेषांकात नागपूरच्या खरे ऑडिटर यांचा लेख आला आहे. त्यामध्ये लेखाच्या शेवटी, कुंडलिनी जागृती करणारे अधिकारी म्हणून श्रीचिन्मयानंदसरस्वती किंवा श्रीलोकनाथतीर्थ यापैकी नाव लिहिण्या-ऐवजी 'नित्यानंद' असे नाव लिहिले. बाकी वर्णन श्रीलोकनाथतीर्थ स्वामींचे आहे. पण त्यांचा पत्ता निश्चित नसल्याने व तसाच अधिकार असलेले म्हणून श्री. वामन दत्तात्रय गुळवणी, २० नारायण पेठ, पुणे २ यांचाही उल्लेख केला आहे.

या लेखाची कल्पना स्वामींना नव्हती. योगांकात लेख प्रसिद्ध झाल्यावर जेव्हा त्यांना समजले तेव्हा त्यांनी तो वाचून काढल्यावर त्यातील चुका त्यांना पसंत पडल्या नाहीत. याबद्दल स्वामींनी पुण्याला वामनरावांना पत्राने कळविले. पण लेख प्रसिद्ध होऊन गेल्यामुळे इलाज नव्हता. प्रसिद्धीची अपेक्षा नसता प्रसिद्धी केली म्हणून नाराजी होती. चुकीच्या लेखामुळे ती अधिकच वाढली. पण ईश्वरी योजना हीच होती. यामुळे या विद्येचे व अधिकारी महात्म्यांचे नाव जिज्ञासूंचा कानावर गेले, वाचनात आले, आणि पुढे महाराजांनी शक्ति संक्रमणावर जो इंग्रजी लेख कल्याण मासिकाला पाठविला त्याचे मूळ या लेखाच्या चुकीच्या लेखनात होते. या चुकीच्या लेखामुळे आणि स्वामींच्या नापसंतीच्या दुरुस्तीसाठी महाराजांना हा लेख लिहावा लागला. खरे ऑडिटर यांचा असा लेख आला नसता तर महाराजांनी कधीही लेख लिहिला नसता. जे घडते ते ईश्वरी योजनेने घडते.

नागपूरच्या खरे ऑडिटरांना हा लेख लिहिण्याची बुद्धी झाली याचे कारण त्यांचा आणि महाराजांचा आलेला संबंध. त्यांना व त्यांच्या मुलांना झालेल्या दीक्षा. तेव्हा त्यांच्या संबंधीची माहिती पाहू.

नागपूरचे डॉ. ना. भा. खरे यांचे बंधू व पूर्वाश्रमीचे त्र्यंबकशास्त्री खरे यांना योगाची चांगली आवड असल्यामुळे त्यांचा व गुरुमहाराजांचा चांगला स्नेह जडला. त्र्यंबकशास्त्री पूर्वी सोलापूर येथे प्रथम काही दिवस व्यापारी शाळेत मास्तर होते. नंतर काही दिवस त्यांनी ऑडिटर म्हणूनही काम केले व शेवटी चतुर्थाश्रम स्वीकारून जगन्नाथ पुरीचे शंकराचार्य झाले. त्यांना योगाप्रमाणेच परलोक विद्या, मंत्र, यंत्र, ताईत, गंडा, दोरा, नाडीपुडी यांचा फार नाद होता. अनेकांना त्यांनी या विद्येत ज्ञानही दिले. नाशिक पंचवटी येथील "क्षीरसागर इंजिनियरिंग" कारखान्याचे संस्थापक श्री. दाजीसाहेब क्षीरसागर हे या खरेस्वामींचे मोठे अधिकारी शिष्य होते. त्यांनी सद्गुरु खरेस्वामींकडून मिळालेल्या विद्येचा लोककल्याणाकरिता बराच विनियोग केला. त्यांचे चिरंजीव सुप्रसिद्ध अभ्यासू प्रवचनकार वाचस्पती पं. विष्णूजी क्षीरसागर आहेत. महाराजांचा व दाजीसाहेब क्षीरसागर व विष्णूजी क्षीरसागर यांचा चांगला परिचय होता व आहे.

तेव्हा ऑडिटर खरे यांनी आपल्या मुलाला महाराजांकडून दीक्षा देवविली. या संदर्भातील प्रत्यक्ष माहिती महाराजांच्या पत्रात पुढीलप्रमाणे आहे.

पुणे

२८–६–३५

रा. रा. खरे ऑडिटर हे आठ दिवसापूर्वी येथे आले होते. त्यांचा नंबर तीनचा मुलगा M. B. B. S. झाला असून M. D. च्या परीक्षेस बसला आहे. त्याला बरोबर घेऊन आले होते. रा. रा. खरे यांचे सांगण्यावरून त्याला दीक्षा देणे भाग पडले.

त्याच्या दीक्षेच्या वेळी रा. रा. खरे जवळच बसले होते. "दीक्षेकरिता श्रीकाली भगवती आली होती व ती तुमच्या दुसऱ्या बाजूस उभी होती. तिच्या व तुमच्या शरीरातून प्रकाश निघून त्याचे वर्तुळ तयार होत होते." असे आपणास दिसले असे सांगत होते. ते उपासक असल्याने

त्यांना दर्शन होणे शक्य आहे. मला त्याबद्दल काही सांगता येणार नाही. मात्र मुलाच्या शरीरावर चांगला परिणाम झाला आहे. एकंदर तो चार वेळा जवळ बसला होता. तीन वेळा शरीराला स्पर्श करावा लागला. त्याची M. D. ची प्रॅक्टिकल परीक्षा असल्याने मुंबईस गेला. तो तेथे कॉलेजमध्ये फेलो आहे. तीन ग्रॅज्युएट मंडळींना दीक्षा का द्यावी लागली समजत नाही.

रा. खरे यांचा कनिष्ठ मुलगा M. A. चा अभ्यास करीत आहे. त्यालाही दीक्षा द्या म्हणत होते. परंतु यावेळी नको, पुढे पाहू म्हणून सांगितले. ''

**वा. द. गुळवणी.**

असा रोकडा अनुभव रा. खरे यांचा असल्याने व त्यांची योग-शास्त्राची माहिती–चांगली असल्याने–कल्याण योगांकासाठी त्यांनी लेख लिहिला. तो महाराजांना दाखविला. महाराजांनी वाचूनही पाहिला. त्यातील महाराजांचे नाव प्रसिद्ध न करण्याचे सांगून तो मजकूर महा-राजांनी स्वत: खोडला, परंतु रा. खरे यांनी कल्याण मासिकाकडे एक प्रत आधीच पाठविली असल्याने तो मजकूर छापून आला.

श्री. खरे स्वामींनी मोठ्या आपुलकीने व सद्हेतूने हा लेख पाठ-विला होता. श्रीस्वामी चिन्मयानंद सरस्वती महाराजांकडून गुरुमहा-राजांना दीक्षाधिकार प्राप्त झाल्याचे फक्त संबंधितांनाच माहीत होते. त्यांचा स्वभाव प्रथमपासूनच प्रसिद्धी पराङ्मुख. कला क्षेत्रातूनही आपला फारसा गाजावाजा होऊ नये म्हणून महाराजांनी फार दक्षता घेतली होती. परंतु कस्तुरी मृगाने कितीही लोकेषणा टाळण्याचा प्रयत्न केला तरी त्याच्या नाभिकमलातून निघणारी कस्तुरी थोडीच ऐकणार आहे ? सुगंधाला फक्त वाऱ्याचे सहाय्य मिळावे लागते. ईश्वरदत्त सुगंध कोण अडवणार ? या लेखाने गुरुमहाराजांची 'शक्तिपात विद्येचे' 'कुंडलिनी-शक्ती जागृत करणारे ' ' वेध दीक्षेचे ' एक थोर प्रणेते म्हणून स्पष्ट प्रसिद्धी दिली व त्यांचे नाव व पत्ताही प्रसिद्ध झाला. या प्रसिद्धीनंतर अखिल भारतातून अनेक जिज्ञासू साधकांची गुरुमहाराजांकडे रीघ लागली. असा हा कल्याण मासिकाने केलेला कल्याणकारक प्रसिद्धीचा इतिहास आहे.

## १९३५–३६ मधील काही घटना

१. प. प. श्रीलोकनाथ तीर्थस्वामींचा अखंड प्रवास चालू असे. त्या त्या ठिकाणाहून वामनरावांना त्यांची पत्रे जात असत. स्वामी उत्तर प्रदेशातील विहारघाट ठिकाणाहून व्यासक्षेत्री आले. यावर्षीचा चातुर्मास येथे झाला. येथून स्वामी काशीला गेले. त्यांना त्याचे सद्गुरु प. प. श्रीशंकर पुरुषोत्तमतीर्थ स्वामी महाराज यांचे पत्र आले होते म्हणून ते काशीस गेले होते.

काशीला छोटी गैबीमध्ये " सिद्धयोगाश्रम " नावाचा मठ निर्माण झाला. त्याची वास्तुशांति–उद्घाटन यासाठी स्वामी गेले होते. शक्तिपात योग विद्येचे हे प्रमुख व आद्य केंद्र म्हणून सर्व साधक बंधूंना या केंद्राबद्दल आदर आहे.

२. या वर्षात महाराजांना प्लीहेचा म्हणजे पांथरीचा आजार सुरू झाला. आजाराने त्रासही बराच दिला व बरेच दिवस पुढे होत राहिला आहे. खूप औषध योजना झाल्या. परंतु " भोगात् एव क्षय: " असे मानावेच लागते. आपल्या आजाराबद्दलच्या त्यांच्या भावना त्यांच्याच शब्दात वाचू या–

" पूर्व जन्मी पापे करिती । व्याधिरूप होऊनि पीडिती । " असे श्रीगुरु चरित्रात आपण वाचतोच. तेव्हा आजार वरचेवर का होतात ते समजेल व आताही

" पुण्यस्यफलमिच्छान्ति पुण्यं नेच्छन्ति मानवा: ।
न पाप फलमिच्छन्ति पापं कुर्वन्ति नित्यश: "

अशी स्थिती असल्याने दोष आपलाच आहे. "

३. अशा आजारात महाराज वाडीला जाऊन आले. महाराजांना वाचनाची आवड होती. उत्तम उत्तम ग्रंथांचा त्यांचा अभ्यास झाला आहे. संतवाङ्मयाचाही त्यांनी अभ्यास केला आहे. स्वामी श्रीलोकनाथ तीर्थ बंगाली असून मराठी भाषेचा अभ्यास करून मराठी संत साहित्य त्यांनी वाचले. एवढे उदाहरण समोर होतेच. पण महाराजांना वाचनाची आवड लहानपणापासून होती. भरमसाट काहीही वाचीत बसणे त्यांच्या कोषात नव्हते. यावर्षी त्यांच्या वाचनात श्रीनिरंजन रघुनाथांची कविता आली. याबद्दल ते लिहितात, " ग्रंथ फारच उत्कृष्ट आहे.

आत्मानुभव साक्षात्कार, श्रीरघुनाथ चरित्र, चैतन्यकथा, वगैरे ओवीबद्ध प्रकरणे फारच बहारीची आहेत. ग्रंथ कोठे मिळाल्यास अवश्य वाचावा. सांगलीचे रावसाहेब कोल्हटकर यांनी हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. मराठी ग्रंथात शक्तिपाताचा स्पष्ट उल्लेख याच ग्रंथात प्रथम पाहाण्यात आला. ''

४. महाराजांच्या प्लीहेसाठी सोलापूरहून वैद्य मास्तर यांनी काही औषध योजना करून पाहिली. त्याप्रमाणे वैद्य पराडकर यांचेही औषध महाराजांनी बरेच दिवस घेतले. प्रकृतीला आराम वाटला, पण रोगनिवृत्ती मात्र झाली नाही.

५. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराजांची पत्रे स्पष्ट शब्दात येत असत. त्यात शब्दांची कसरत नसे. ते प्रभास पाटनहून दि. ७–१–७६ च्या पत्रात लिहितात, – " सांप्रत मेरा शरीर नाना रोगोंके कारण अतिशय शिथिल हो गया है। अति सत्वरही कुछ दिवसमें इस देहका अन्त होगा। और अधिक दिन यह शरीर नहीं रहेगा। मैं मृत्यूसे कुछ भी डरता नही। केवल तुम लोगोंको बोध कराने निमित्त ही यह समाचार लिखा। कुछ दिन मेरा पत्र न मिलनेसे तुम समझ लो कि मेरा देहान्त हो गया। "

स्वामींची अशी पत्रे वाचून महाराज भांबावून जात असत. त्यांच्या औषधपाण्यासाठी, व्यवस्थेसाठी, न चुकता दरमहा पैसे पाठवीत असत. पुण्याहून कच्छ काठेवाडात जाणे सोपे नव्हते. स्वामींचे पत्र तर असे. काय करावे ते सुचत नसे. बरं, स्वामी पैशाची गरज असेल तेव्हा निःसंकोचपणे कळवितात. या पत्रात पैशाचा शब्द नव्हता. बोलावलेही नव्हते. पण ७–८ दिवसांनी स्वामींचे पत्र वेरावळहून " कुशल आहे. " असे आले.

प्लीहेसाठी ' पश्चिमोत्तान ' – ' मयुरासन ' आणि ' मत्स्येंद्रासन ' करीत जाणे म्हणजे रोग शमेल असे स्वामींनी कळविले.

६. महाराजांनी स्वामींना चष्मा घेण्यासाठी रु. १०/– म. ऑ ने पाठविले. आश्चर्य असे की चष्मा घेण्याचे विचार स्वामींच्या मनात येतच होते. तेवढ्यात त्याच कामासाठी वामनरावांची M. O. आली. डोळ्याची तपासणी करून स्वामींनी सोन्याच्या काडीचा नाजुक सुंदर

चष्मा घेतला. त्याला नेमके १०/– रु. पडले. स्वामींना आश्चर्य वाटले. स्वामींनी वामनरावांना कळविले तेव्हा त्यांनाही आश्चर्य वाटले. आपल्या हातून कार्य घडत असते पण आपल्याला वाटते मी केले. पण तसे नसते. ईश्वरी सत्तेच्या योजना असतात.

७. पांथरीच्या दुखण्यातच सर्दी पडशाने मार्च १९३६ मध्ये महाराजांना बेजार केले होते. बापूसाहेबांना मातृसेवेसंबंधी महाराज लिहितात,

" आपल्या मातुश्रींची प्रकृती आता कशी आहे ते कळविणे. वृद्धपणी माता पितरांची सेवा करणे यासारखे दुसरे मोठे साधन नाही. "

८. महाराजांचे वडील बंधू श्री. शंकरशास्त्री पुण्यात आले. येथून कुरुगड्डीला गेले. येताना सोलापूर पंढरपूर केले. त्यांची व्यवस्था बापूसाहेबांनी ठेवली.

९. महाराजांच्या वाचण्यात श्री आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर यांचे चरित्र आले. हे सांगली येथील एका वकिलाने प्रसिद्ध केले आहे. फारच सुंदर चरित्र आहे. याशिवाय कल्याणचा भक्तांक व रामायणांक आणवून वाचन केले. गुलाबराव महाराज यांचे ' सुर तरु व व्यवहार धर्मबोध ' हे पुस्तक या काळात वाचून झाले.

## पंडितजी सातवळेकर यांना दीक्षा

पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांची राष्ट्र आणि समाज यांच्या कल्याणासाठी व उद्धारासाठी आपण आपले आयुष्य वेचावे अशी वृत्ती लहानपणापासूनच होती. ते उत्तम आर्टिस्टही होते. सातारा जिल्ह्यातील औंधचे रहाणारे. आयुष्याचा सुरुवातीचा काळ निसर्गरम्य कृष्णेकाठी गेलेला. जुन्या पिढीतील वातावरणानुसार त्यांचे संस्कृत अध्ययन झाले होते. घरचे वळण धार्मिक सुसंकृत होते. औंधमध्ये त्यांचा चित्रकलेचा अभ्यास नि विकास झाला. सामाजिक कार्याकडे ओढ म्हणून ते दयानंदांच्या आर्यसमाजात शिरले. त्यासाठी ते लाहोरला गेले. तेथे ड्रॉइंग टीचर म्हणून नोकरी केली. ते कट्टर आर्यसमाजी झाले. आर्यसमाजामध्ये मूर्तिपूजा–श्राद्ध–इ. धार्मिक आचार मान्य नसे. पंडितजी या विचारधारेत असताना त्यांनी वेदांचा अभ्यास सुरू केला. वाचन सुरू केले. तेव्हा त्यांना वेदांमध्ये मूर्तिपूजा–श्राद्ध इ. आचार

दिसायचे. त्याचा कार्यकारण भाव दिसायचा. आर्य समाजींना हे आचार नको होते. वेदांत नको होता. मूळचे वेद वाचलेले नसले आणि श्रद्धाकेंद्रे नसली म्हणजे दुसऱ्याचे विचार पटायचे. दुसऱ्याच्या सांगण्यावर विश्वास बसायचा. पण पंडितजींचे वेदाध्ययन सुरू झाल्यानंतर त्यांच्या बुद्धीला आर्यसमाजाची तत्त्वे पसंत पडेनाशी झाली. वेदात मूर्तिपूजा नाही– श्राद्धपक्ष नाही अशी आर्यसमाजी माणसांची विधाने खोटी आहेत हे त्यांच्या बुद्धीला पटल्यावर त्यातून ते बाहेर पडले.

त्यानंतर पंडितजी ‘ थिऑसॉफी ’मध्ये शिरले. थिऑसॉफीमधील अगदी ‘ इनर सर्कल ’मध्ये ते होते. तत्त्वज्ञानाच्या मूळच्या स्वरूपातून आपल्या मताप्रमाणे व कल्पनेप्रमाणे हवे तेवढे निवडून घ्यायचे व बाकीचे पटत नाही म्हणून त्याज्य करायचे ही वृत्ती थिऑसॉफीची. थिऑसॉफीच्या भजनात ‘ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ’ या भजनाचा अंतर्भाव आहे. सगळं निवडून घ्यायचे. निवड करताना दिगंबराच्या भजनात त्यांना काही चांगले आढळले. या संप्रदायांना शास्त्रप्रामाण्य नाही. आपली बुद्धी–कल्पना प्रमाण. पंडितजींचे येथेही वाद होऊ लागले. पंडितजींची वृत्ती चांगली होती. ते चिकित्सक होते. विवेकी होते. एखादी गोष्ट पटली तर सोडीत नसत. आणि पटले नाही तर सोडायला तयार. त्यांची थिऑसॉफीही सुटली.

त्यानंतर त्यांना वाटले बहुजन समाज अडाणी–अशिक्षित आहे, त्याला धार्मिक–वेदाध्ययन शिकविले तर समाज सुशिक्षित होईल. त्याप्रमाणे काही वर्षे कोल्हापूरला शाहूमहाराजांनी बहुजनसमाजासाठी वेदपाठशाळा काढली त्यामध्ये पंडितजी शिकवायला होते. तेथे त्यांचा अनुभव असा की मूळचे संस्कार नसल्यामुळे त्या मुलांना कितीही शिकविले तरी त्यांच्या वृत्तीत फरक पडत नाही. ते कामही त्यांनी सोडून दिले, मग ते परत औंधला गेले. तेथे चित्रकला–वेदाध्ययन सुरू केले.

मंगलदेव वेदालंकार नावाचे एक गुरुकुलचे स्नातक त्यांचे स्नेही होते, ते १९३६ मध्ये पंडितजींकडे औंधला गेले होते. त्या मंगलदेवांना दोन महिन्यापूर्वी महाराजांकडून दीक्षा झाली होती. त्यांचे अनुभवही चांगले होते. त्यांचेकडून महाराजांचे नाव व माहिती–शक्तिपात

साधनेची माहिती पंडितजींना बरीच ऐकायला मिळाली. यापूर्वीही पंडितजींचे परिचयाचे काही आर्यसमाजी, महाराजांचे अनुग्रह घेतलेले, पंडितजींना या विद्येसंबंधी सांगत असत. या माहितीच्या आधारे त्यांचे समाधान झाले नाही, पण कुतूहल खूप वाढले होते. म्हणून त्यांचा व महाराजांचा पत्रव्यवहार सुरू झाला. पुढे त्यांची भेट होण्याचा योग पंडितजींनीच घडवून आणला. त्यांना दीक्षेसंबंधी महाराजांशी चर्चा करायची होती. त्यासाठी महाराजांना औंधला येण्याचे निमंत्रण दिले होते. आपल्या सर्व नियमांचे पालन आमचे येथे होईल, आपणास स्वतंत्र खोली देऊ, असे अगत्याचे निमंत्रण होते. पण महाराजांना जाणे जमले नाही. तेव्हा पंडितजी स्वतःच पत्राने दिवस ठरवून, २० नारायण पेठेत, महाराजांच्या भेटीसाठी १९३७ च्या मेमध्ये आले.

त्या चर्चेत पंडितजींचे चांगलेच समाधान झाले. पंडितजींनी दीक्षा घेण्याचा आपला मनोदय स्पष्ट केला. त्यावर महाराजांनी त्यांना सर्व अटी स्पष्ट सांगितल्या. आपली धार्मिक आचारप्रधानवृत्ती सांगितली. हे सगळे पटत असेल तर दीक्षा होईल, नाहीतर होणार नाही इतके सांगितले. पंडितजींनी सर्व अटी प्रांजलपणे मान्य केल्या. त्या भेटीनंतर ते महाराजांकडे बरेच वेळा आले. दीक्षा दिल्यावर कसे अनुभव येतात, काय काय होते हे पाहण्याची इच्छा प्रकट केली. तेव्हा महाराजांनी आतल्या खोलीत साधनेस बसलेल्या मोहोळकरांची बैठक दाखविली.

पुढे १९३७ च्या ऑगस्टमध्येच पंडितजींना २० नारायण पेठेत दीक्षा झाली. उत्तम अनुभव आले. त्यावेळेपासून त्यांची नियमित अखंड साधना सुरू होती. या साधनेने त्यांचे शरीर आणि मन अत्यंत निरोगी झाले. वास्तविक ते महाराजांपेक्षा वयाने मोठे होते. विद्वान पंडित होते. त्यांचा लौकिक मोठा होता. परंतु पंडितजी मोकळेपणाने सांगत की 'गुळवणीमहाराज माझे गुरु आहेत. मी त्यांचा शिष्य आहे. ही विद्या श्रेष्ठ आहे. सर्वांनी या विद्येचा लाभ घ्यावा. महाराजांना गुरु करावे.' या दीक्षेच्या वेळी महाराजांचे वय ४९ होते तर पंडितजीचे वय ६९ होते.

पुढे पंडितजी त्यांच्या शतसांवत्सरिक समारंभासाठी पुण्यास आले तेव्हा महाराजांच्या दर्शनास, समारंभास जाण्यापूर्वी आले होते. त्यावेळी

महाराजांचा सहस्रचंद्रदर्शनशांती समारंभ गरवारे कॉलेजमध्ये चालला होता. तेथे पंडितजी आपल्या पत्नीसह येऊन दर्शन घेऊन गेले. तेव्हा महाराजांनी त्या उभयतांचा सत्कार केला.

**शक्तिपात साधना दिव्य । शक्तिपात साधना भव्य ।**

१ – मेच्या शेवटच्या बुधवारी महाराज सकाळी बार्शीला गेले. बार्शीत श्री. गुर्जर मास्तर, दादाशास्त्री महाराजांची आतुरतेने वाट पहात होते. मग स्नान करून महाराज संध्येला दादाशास्त्रींच्या माडीवर बसले. तेव्हा दादाशास्त्रीही स्नान करून आले. त्यांना महाराजांच्या जवळ साधनेला बसण्याची फार ओढ लागली होती. दादाशास्त्री आले आणि महाराजांच्या जवळच बैठकीला बसले. त्यावेळी त्यांच्या क्रिया फारच जोरात झाल्या. साधनेला शरीर अनुकूल असते तेव्हा साधन भरपूर झाले तर फार फायदा होत असतो. अशावेळी साधनेची प्रगती फार भराभर होत असते. आतून येणाऱ्या साधनेच्या संवेदना दाबून ठेवू नयेत, असे महाराजांनी दादाशास्त्रींना सांगितले.

दुपारी जेवण झाल्यावर महाराज श्री. गुर्जर मास्तर, आण्णासाहेब वझे, डॉ. सहस्रबुद्धे यांचेकडे जाऊन आले. रात्री दादाशास्त्रींनी महाराजांचे जवळ बसून पुन: साधना केली. त्यावेळी क्रियांचा जोर सकाळपेक्षा अधिक होता. तेव्हा महाराजांनी त्यांना पुन्हा बजावले की साधना रोज नियमित करावी. चांगले साधन चालू असताना हयगय करणे बरे नाही. रोज नियमित साधना केली तर साधन केल्याशिवाय चैनच पडणार नाही अशी स्थिती येईल.

बार्शीला यावेळी संत परिषद होती. त्याला महाराज गेले होते.

२ – महाराजांचे बंधू आपत्तीच्या घेऱ्यात त्रस्त होऊन गेल्याचे त्यांचे पत्र स्वामींना गेले होते. त्यावर स्वामींनी उत्तर दिले, " हा संसार इतका अत्यंत दु:खमय आहे म्हणून भगवंताने म्हटले आहे की– अनित्यं असुखमयं इमं लोकं प्राप्य भजस्व माम् ।। " यावर्षीचा स्वामींचा चातुर्मास बडोद्याला झाला.

३ – गुजराथमधील थुरावासचे भगवंतराव उपाध्ये यांना या महिन्यात दीक्षा झाली. भगवंतराव योगासने करणारे होते. त्यांना व्रण

झाला होता तो काही केल्या दूर होईना. अशा परिस्थितीत ते महाराजांकडे येऊ लागले होते. कल्याण मासिकातील योगांकामधून महाराजांचा पत्ता मिळाला होता त्या आधारे आले. सर्व हकीकत महाराजांना सांगितली. दीक्षेचीही प्रार्थना केली. पण महाराज म्हणाले, " पुढे पाहू. प्रकृती बरी होऊ द्या. " भगवंतराव महाराजांकडे रोज येऊ लागले. त्यांना वाटले महाराजांना पैशाची अपेक्षा असावी, म्हणून दीक्षा देण्याची टाळाटाळ करीत आहेत. म्हणून एके दिवशी सकाळी भगवंतराव बायकोची नथ घेऊन आले व नमस्कार करून महाराजांच्या पुढे नथेची डबी त्यांनी ठेवली.

महाराज म्हणाले " हे काय ठेवले ? " त्यावर डबी उघडून दाखवीत भगवंतराव म्हणाले " ही गुरुदक्षिणा ठेवली आहे. " तेव्हा महाराज एकदम अस्वस्थ झाले. त्यांच्या मनातील भाव ओळखून म्हणाले " भगवंतराव, तुम्हाला असे वाटते का मी पैशासाठी तुम्हाला दीक्षा देत नाही. तुमची कल्पना चुकीची आहे. आधी उचला ती डबी. एवढीच तुमची इच्छा असेल तर उद्या सकाळी या दीक्षेला. " दुसरे दिवशी भगवंतरावांना २० नारायण पेठेत दीक्षा झाली. दीक्षेनंतर महाराज त्यांना म्हणाले, " नियमित साधन केले तर एक वर्षांत तुमचा आजार बरा होईल. काही काळजी करू नका. " याप्रमाणे एक वर्षाच्या नियमित साधनेने भगवंतरावांचा दुर्धर व्रणाचा आजार बरा झाला. योगायोगाने याच वर्षात स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराज थुरावासाला भगवंतरावांच्याकडे एक महिना मुक्कामास गेले होते. स्वामींनीही हा आजार वर्षात बरा होईल असेच सांगितले होते. पण सत्पुरुषांचे शब्द खरे झाले. साधनेचे सामर्थ्य पण स्पष्ट झाले.

महाराज पुण्यात नोकरीमध्ये असताना त्यांचेकडे येणाऱ्या भक्तांची, शिष्यांची विशेष गर्दी नसे. महाराजांच्या घरातले वातावरण शांत असे. एक दोन, एक दोन जिज्ञासू शिष्य येऊन जात असत. त्यामुळे कधी कोणाला गर्दी दिसत नसे. महाराजही कोण आले, कोण गेले याचा उल्लेख कधी करीत नसत. त्यामुळे येणाऱ्याला आपण एकटेच येऊन जातो असे वाटत असे. याही काळात महाराजांचे लोकोद्धाराचे कार्य अखंड चालू होते. प्रवासही होत होता. पण दिसत होते की सारे शांत

निवांत आहे. कारण पुढे जेव्हा प्रसिद्धी होऊन गर्दी वाढली तेव्हा हे जुने शिष्यही येत असत. या जुन्या शिष्यांची संख्या कमी नव्हती.

४. या काळात वारकरी संप्रदायातले नागपूरचे शंकरराव आसकर यांना दीक्षा झाली. हे दरवर्षी पंढरपूरला वारीला येत तेव्हा महाराजांना भेटून जात असत. वारकरी संप्रदायात वर्णाश्रमधर्माचे नियम पाळण्याचा कटाक्ष नसतो. ही गोष्ट महाराजांना व स्वामींनाही पसंत नव्हती. म्हणून शंकरराव आसकरांना दीक्षा देताना महाराजांनी त्यांना बजावले होते की " गुरु स्वामी लोकनाथतीर्थ या वर्णाश्रमांच्या नियमांच्या बाबतीत फार कडक आहेत. तुम्ही त्यांचेकडे जाऊ नका. त्यांचेपुढे जाणे सोपे नाही. त्यांना शास्त्रविरुद्ध काही खपत नाही. त्यांचे पुढे गेल्यावर तुम्ही कितीही लपविण्याचा प्रयत्न केला तरी तुमचा दोष त्यांना दिसतोच. मग ते जे बोलतात ते सहन करणे कठीण जाते. एकदा त्यांचेकडे एक जण गेला तेव्हा ते त्याला म्हणाले ' ब्राह्मण म्हणतोस नि गळ्यात जानवे नाही ? कशाला आलास ? जा, जानवे घालून ये. ' आणि खरंच त्याच्या गळ्यात जानवे नव्हते. गेला बिचारा मुकाट्याने. एकदा एक साधाभोळा गरीब गृहस्थ स्वामींकडे आला होता. स्वामी लगेच म्हणाले ' उसने गौ काटा है, हकाल दो यहाँ से । ' आणि खरंच त्या माणसाच्या हातून पूर्वी गाय कापली होती. तेव्हा शंकरराव जपून रहा. "

स्वामी नागपूरला सदाशिवराव परांडे यांचेकडे गेले होते त्यावेळी शंकरराव आसकर त्यांच्या दर्शनास गेले होते. तेव्हा " वर्णाश्रम धर्म पाळायला नको, काही नको, उपयोग काय दीक्षा घेऊन ?" असे स्वामी म्हणाले आणि शंकररावांचे साधनच बंद झाले. स्वामींच्याकडून परत आले. साधनाच स्वामींनी बंद करून टाकली. फार वाईट वाटले शंकररावांना. मग महाराजांकडे आले. सर्व हकीगत सांगितली. कर्मधर्मसंयोगाने त्यावेळी स्वामीही पुण्यात होते. महाराजांनी शंकररावांच्याबद्दल स्वामींना समजावून सांगितले. ' हा दोष त्यांचा नाही. वारकरी संप्रदायातच हे नियम पाळण्याचे बंधन नाही. तरी त्यांच्यावर आपली कृपा व्हावी. ' तेव्हा वामनरावांच्या शब्दांसाठी स्वामींनी शंकररावांचेवर कृपा केली व त्यांची साधना सुरू करून दिली.

सद्गुरूंचे सामर्थ्य नुसते अनुग्रह करण्यापुरते नसते तर साधन-

निग्रह करण्याचेही त्यांचे सामर्थ्य असते हे या प्रसंगातून स्पष्ट होते. खरे सद्गुरु ' निग्रहानुग्रही ' असतात. हे सामर्थ्य महाराजांमध्येही होते.

शंकरराव आसकरांच्या साधनेसंबंधी महाराज एका पत्रात लिहितात. " शंकरराव आसकरांना साधनेत भ्रूमध्यामध्ये प्रकाशाचा चांगला अनुभव येतो. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव,वाक्यवृत्ती, सदाचार, वगैरे वेदांत ग्रंथांचा त्यांचा अभ्यास चांगला आहे. नेहमी प्रवचन–कीर्तन करतात. परंतु पैसा घेत नाहीत. निर्वाहाकरिता न्हाव्याचा धंदा करितात. "

या काळात बार्शीच्या प्रल्हादशास्त्रींना कॅन्सर झाला. परंतु त्यांचे मनोधैर्य फार मोठे. त्यांना दुर्धर रोगाची जाणीव झाल्याबर ते स्वतःहून म्हणाले " ईश्वराने आपणास ही देहत्यागाची पूर्वसूचना दिली आहे. ईशचिंतनाला अशी संधी दुर्मिळ आहे. " त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला व अक्षरशः अखंड ईशचिंतन समाधानाने सुरू केले.

ते ज्या दिवशी गेले त्यादिवशी सकाळी महाराजांचे थोरले बंधू आणि भगिनी गोदावरी सोलापूरहून शास्त्रीबोवांना भेटण्यासाठी बार्शीस गेले होते. शास्त्रीबोवानी त्यांना आग्रहाने भोजन करून जाण्यास सांगितले व पुरणपोळी करण्यास सांगितले. ही मंडळी भोजन करून पंढरपुराकडे गेली आणि थोड्या वेळाने शास्त्रीबोवांनी आत्मानुसंधान लावून देहत्याग केला. महाराज पुण्यात होते. त्यांना हे वृत्त समजल्यावर त्यांनी दादाशास्त्रींना हृदयस्पर्शी समाचाराचे पत्र पाठविले. ते ' सप्रेम आशीर्वाद ' पुस्तकात आले आहे. आध्यात्मिक उन्नति झाली तरच असे मनोधैर्य व चित्ताची शांती मृत्यूच्या कठिणतम वेदनाकाळात राहू शकते हे येथे पहाता येते.

५–सप्टेंबर १९३७ मधील एका पत्रात महाराज लिहितात,

" सोलापूरहून येथे आल्यापासून एकंदर सहा दीक्षा झाल्या. सर्वांना चांगला अनुभव आला. त्यामुळे प्रकृतीकडे लक्ष देण्यास होत नाही. अलिकडे हुशंगाबादचे दोन गृहस्थ येथे पंधरा दिवस राहून गेले. त्यांचा अभ्यास उत्तम चालल्याचे पत्र आले आहे. त्यानंतर मोहोळकर यांना दीक्षा झाली. उत्तम परिणाम झाला आहे. दररोज घरी येत असतात. याशिवाय यू. पी. मधून बरेली व इटावा येथून दोन पत्रे आली आहेत. त्यांना त्यांची सविस्तर हकीगत कळविण्याबद्दल लिहिले आहे. औन्धहून

तडित्कांत (शक्तिपात लेखाचे लेखक) यांचे आजच पत्र आले असून त्यांचेकडेही बरीच पत्रे आल्याचे त्यांनी लिहिले आहे. त्यापैकी दोन गृहस्थांना दीक्षा देण्याबद्दल त्यांचा आग्रह आहे. ते स्वतः २० तारखेला येथे येणार आहेत.

आपण पहाटेचा नियमित अभ्यास चालू ठेवावा. हा **अभ्यास सर्व विद्येचे सार आहे. यात उपासना, योग, ज्ञान या सर्वांचा अंतर्भाव होतो. प्रकृती उत्तम रहाते.** दादाशास्त्रींचे बार्शीहून पत्र आले आहे. तो नियमितपणे तीन वेळा साधनेस बसतो. सर्व दिवसभर अंगात कंप असतो. अभ्यासात तेजोवलयात, यतिवेषात, वडिलांचे (प्रल्हादशास्त्रींचे) दर्शन झाले असे लिहिले आहे. क्रिया जोरात सुरू झाली आहे. अभ्यास चालू ठेवील तर फार फायदा होईल.

६ – महाराजांनी बापूसाहेब कुबडे यांना वारंवार सविस्तर माहितीची पत्रे लिहिल्यामुळे व तो संग्रह बापूसाहेबांनी श्रीवासुदेव निवासास दिल्यामुळे महाराजांचे चरित्र फारच स्पष्टपणे आपल्या समोर येऊ शकत आहे. ती पत्रे हेच महाराजांचे आत्मचरित्र आहे. केवळ संदर्भाच्या स्पष्टीकरणासाठी वेगळे चार शब्द लिहावे लागतात इतकेच काय ते. या काळातील आणखी एक उत्तम माहितीचे पत्र–महाराजांची पत्रे शक्तिपात साधनेसंबंधी मार्गदर्शन करणारी असल्याने मूळ पत्रे सर्व दृष्टीने साधक भक्तांच्या वाचनात येणे आवश्यक आहेत. त्यातील व्यक्तिनिष्ठत्व काढून टाकले तर ते आपणासच मार्गदर्शक असते हेही वाचकांनी लक्षात घ्यावे.

" यापुढे अभ्यासात खंड पडू देऊ नये. मानेत ज्या ठिकाणी ओढ लागते त्या ठिकाणी अभ्यासाचे वेळी लक्ष ठेवावे म्हणजे मार्ग खुला होईल. उन्हाळा कमी होताच क्रिया जोरात सुरू होईल. श्री. तात्यासाहेब यांचा आसनाचा कार्यक्रम नियमित चालल्याचे वाचून समाधान झाले. आपण वरचेवर त्यांचेकडे लक्ष द्यावे म्हणजे त्यांचा उत्साह कायम टिकेल. श्री. पराडकर वैद्य यांचा अभ्यास ठीक चालल्याचे वाचून आनंद झाला. पहाटे स्नानापूर्वी बसण्यास हरकत नाही असे त्यांना सांगावे. प्रकृतीकरता व्यायाम म्हणून आसने करण्यास हरकत नाही असे सांगावे. मात्र त्यापासून या साधनात काही अधिक फायदा होईल असे नाही.

ज्या क्रियांची जरूरी असेल त्या आपोआपच होतील. त्याबद्दल विचार करण्याचे कारण नाही. नादपूर्वक रेचक करण्याबद्दल त्यांनी विचारले आहे, परंतु बुद्धिपूर्वक काहीच करणेची जरूरी नाही, असे त्यांना सांगावे. गडबड करून काही होणार नाही.

योगाभ्यासे प्रवृत्तस्तु शीघ्रं सिद्धिं न कामयेत् ।
कालेन दुरिते क्षीणे स्वतः सिद्धिः प्रजायते ।।

महत्‌भाग्याने मध्यमार्गात प्रवेश झाला आहे. नियमितपणे अभ्यास करणे. क्रमाक्रमाने सर्व गोष्टी ठीक होतील. त्यांचेकडेही आपले लक्ष असावे.

येथे आल्यावर गेल्या शुक्रवारी एका ६३ वर्षे वयाच्या वृद्ध गृहस्थांना दीक्षा झाली. प्रकृति निकोप असल्याने परिणाम ठीक झाला. रोज रात्री आठ वाजता आमचे येथेच बसण्यास येतात. गृहस्थ अंतः-करणाने फार कोमल असल्याने इतक्या उतार वयात उपयोग झाला. उड्डियान वगैरे क्रिया सुरू झाल्या आहेत."

असे शक्तिपात साधन दिव्य–भव्य असल्याने महाराजांच्या लेखणीतून आलेली पत्रे वाचून आपण पाहिले. यासंबंधी खालील भाव-पूर्ण व अर्थपूर्ण ओव्या वाचून हे प्रकरण संपवू.

ॐ श्रीसद्‌गुरुराजा । शक्तिपात महाराजा । साधनेच्या महातेजा । समर्थ प्रकाशका नमो नमस्ते ।। १ ।। आपण कृपाळू अफाट । साधन दिले बेफाट । थांबविली सारी खटपट । सहज मोक्षप्राप्तीची ।। २ ।। शक्तिपात साधन दिव्य । शक्तिपात साधन भव्य । शक्तिपात साधन सेव्य । परमामृत संजीवनी ।। ३ ।। शक्तिपात साधना । खरी आहे ज्ञान साधना । प्रचीतीच्या खाणाखुणा । स्वसंवेद्य येथे हो ।। ४ ।। पाप ताप जाईल । विशुद्ध आनंद लाभेल । रोज नवे नवे समजेल । साधन गंगा स्नानाने ।। ५ ।। परसार्थ साधनांचा विस्तार । शक्तिपात साधना हेचि सार । आहे ज्ञान साधना खरोखर । योगभक्ति सहित ।। ६ ।। असे हे शक्तिपात साधन । एकेक मार्ग उकलोन । जाणतेपणाचीही जाण । हळु हळू वाढविते ।। ७ ।। येथे काही करणे नाही । जे होते ते पाहात राही । त्यातूनच उमजत जाई । परब्रह्म स्वरूप ।। ८ ।।

## २० नारायण पेठेत व्यक्त झालेले व्यक्तिमत्त्व

महाराजांच्या साध्या राहणीवरून आणि साध्या खोलीवरून त्यांची खोली ओळखता येत नसे. पण २० नारायण पेठेत त्यांच्या खोलीत एकदा जाऊन आले आणि त्यांची भेट झाली की पुनः जाण्याची ओढ प्रत्येकाला लागत असे. बाहेरच्या खोलीत दारासमोरच्या खिडकी-जवळ सतरंजी टाकलेली असे. त्यावर भलेमोठे व्याघ्रजीन अंथरलेले आणि त्यावर उत्तराभिमुख महाराज बसलेले असायचे. खिडकीतून आत नजर टाकली की देवदर्शन होत असे. खिडकीच्या चौकटीवर चांदीची साखळी असलेले पॉकेट वॉच टांगलेले असे. वेस्टएण्ड कंपनीचे ते घड्याळ २॥ रुपयामध्ये पुण्यात आल्यावर, एका गुरुपौर्णिमेच्या प्रसंगी गुरुदक्षिणा म्हणून व्यंकू कुलकर्णी या शिष्याने दिलेले होते. हे घड्याळ महाराजांचे सर्व कार्यक्रम वेळेवर होण्यासाठी सदैव तत्पर असे. विशेषतः सायंकाळी महाराजांच्या समोर भक्त मंडळी बसलेलीं आहेत. प्रश्नोत्तरे—चौकशी—बोलणे चालू आहे. कोणालाही तेथून हला-वेसे वाटत नाही. आता सायंसंध्येची वेळ तर झाली आहे. आपल्याकडे आलेल्यांना ' जा ' म्हणून कसे सांगायचे ! मग महाराज ते घड्याळ जागेवरून न काढता फक्त हातात धरून, किती वाजलेत हे पाहून, अलगद जागेवर ठेवून देत. त्यांच्या एवढ्या कृतीवरून बसलेल्या भक्तांना वेळेची जाणीव होई व आता महाराजांना संध्येला उठायचे आहे हे लक्षात घेऊन, नमस्कार करून, महाराजांचा निरोप घेत. जणू यावेळी घड्याळ बोलके होई आणि भक्त यंत्रवत हालचाली करत. हा अनुभव रोजचा असे. ही गोष्ट सर्वांच्या इतकी अंगवळणी पडली होती की, महाराजांनी नुसते घड्याळाकडे पाहिले तरी त्यांची वेळ झाली आहे, आपण उठले पाहिजे असे समोरच्या व्यक्तीच्या चटकन लक्षात येई.

कोणीही खोलीच्या दारात गेले की महाराज त्यांना ' या ' म्हणायचे. महाराजांचे हे ' या ' म्हणणे इतके मधुर असायचे की जाणारा त्या शब्दाने आणि ध्वनीने देहभान हरपून जात असे. खोलीची शांतता शिवालयाच्या गाभाऱ्यासारखी असायची. ही शांतता, धोका-भीतीची नसायची, किंवा दडपणाची नसायची. तर विचार थांबल्याची, बाहेरची आठवण नाहीशी झाल्याची, मनाची खळबळ स्थिरावल्याची शांतता

असे. याच बरोबर महाराजांचे प्रसन्न हास्य सदैव अनुभवायला यायचे. त्या खोलीत चैतन्याच्या, गांभीर्याच्या, प्रसन्नतेच्या लहरी असल्याचे अनुभवायला यायचे. तेथल्या हास्याला मर्यादा होती पण प्रसन्नता अमर्याद होती. तेथल्या शब्दांना मर्यादा होती पण तेथले मौन अमर्याद होते. तेथे बुद्धीला बांध पडायचे पण भावांना पाझर फुटायचे. तेथे बाह्य जगाची विस्मृती होत असे, तर अंतरजगत् चैतन्य लहरींनी संचारत असे. तेथे जाताच मन निःशंक होऊन जाई. आपली प्रतिष्ठा आठवेनाशी होई. महाराजांच्या अंतस्थ व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावाने जो तो भारावला जाई. महाराज नेहमी कमी बोलत व जास्त ऐकत असत. त्यांच्या वाणीला वाचासिद्धी होती. जे बोलतील तसेच होत असे. त्यांची ऐकून घेण्याची सहनशीलता मोठी होती. ते शांतपणे ऐकून घेत, म्हणून येणारा बोलत असे. आपले दुःख सांगून तो हलका होत असे.

बाहेरच्या खोलीत श्री टेंबे स्वामींची व श्री लोकनाथतीर्थ स्वामींची अशा दोन मोठाल्या तसबिरी असत. दाराजवळच्या आत येताना डाव्या बाजूच्या खुंटीवर उत्तम बिलोरी आरसा असे. बाहेर पडताना आपला पोषाख-टोपी नीटनेटकी करण्यासाठी त्या आरशाचा ते उपयोग करीत. आत येताना उजव्या दाराच्या कोपऱ्यात त्यांचे बूट असत. तिथेच वर खुंटीवर हातात धरायची काठी व छत्री असे. त्या बाजूच्या भिंतीवर त्यांचा मत्स्येंद्रासनातील फुल साईजचा अत्यंत रेखीव आणि उत्कृष्ट फोटो होता. त्या एका फोटोवरून त्यांचे योगासनातील कौशल्य चांगलेच जाणवत असे. शेजारी श्रीचिन्मयानंदसरस्वतींचा, तरुणपणातील, सिद्धासनातील अत्यंत मोहक मोठा फोटो होता. त्यातील उदबत्ती जळते आहे व तिचा सुगंध दरवळत आहे असे जाणवत असे. महाराजांच्या बैठकीपुढे, कप्पे असलेले उत्तम डेस्क असे. त्यावर १/२ पुस्तके, डायरी, आलेल्या पत्रांचा गठ्ठा व कोरी पत्रे-पाकिटे जुळवून ठेवलेली असायची. महाराजांचे पत्रलेखन दुपारी चालत असे. पत्र लिहिण्यात तन्मय होऊन जात असत. त्यांची पत्रे छोटया मजकुराची पण मोठ्या आशयाची असत.

दिवसातून एक वेळ दुपारचे जेवण असे. तत्पूर्वी चहा दूध वगैरे काही घेत नसत. पहाटे ४/४।। ला उठल्यावर अजपासंकल्प करून एक

ग्लास पाणी मध घालून घेत असत. नंतर साधना होत असे. रोज साधनेला कमी अधिक साधक येत असत. ते ज्यांना सांगतील तेच साधक त्यांच्या समोर साधनेस बसत. बाकी त्यावेळी कोणी जात नसत. दीक्षेच्या वेळी दीक्षा घेणाऱ्या साधकाशिवाय त्या ठिकाणी कोणी नसे. येणारे साधक शिष्य महाराजांकडे येताना विशेष काही असल्यास हार, पेढे, फळे इ. विविध प्रसादवस्तू आणीत. कोणी आपल्या परिस्थितीपेक्षा थोडी जरी जास्त दक्षिणा ठेवली तर 'एवढी नको– प्रपंचाला पैसे लागतात' असे म्हणून जास्त दक्षिणेचा स्वीकार करीत नसत. त्यांच्या पुढे येणारी सर्व दक्षिणा देवकार्यासाठीच खर्च होत असे. दक्षिणेचा खर्च देवाकडे केला म्हणजे त्या साधकाला कळवीत व प्रसादही पाठवीत. सकाळची वेळ भेटीसाठी नसे. तरी तेवढ्यात कुणी काही विचारायला किंवा भेटीला आले तर त्याचेशी आत्मीयतेने बोलून विशेष बोलण्यासाठी दुपारी बोलवीत. पाहुणे म्हणजे परगावाहून आलेल्यांना संबंधाप्रमाणे भोजनास थांबण्यास सांगत. तशी सूचना नानांना घरात देण्यास सांगत.

प्रत्येकासंबंधी आस्था असे. चौकशी करीत असत. त्यामुळे येणारा अत्यंत समाधान पावत असे. चहापाण्याची वर्दळ कधी नसे. येणाऱ्याला पुढे आलेल्या पदार्थातून प्रसाद देत. दुपारी २॥ / ३ पासून भेटायला येणाऱ्यांची ये जा सुरू होई. कोणाला आतून साधनेची तीव्रता आली की त्याला आतल्या खोलीत बसण्यास सांगत. त्यावेळी मध्येच तिकडे जात, त्याची साधना पाहून त्याला स्पर्श करून त्याच्या साधनेला चालना देत. त्यामुळे त्या साधकालाही समाधान होत असे. समोर बसलेल्यांची चौकशी करून झाली की कोणताही विषय स्वतः काढीत नसत. अगदी गप्प बसत असत. चौकशी सुद्धा नेमकी करीत. त्यातही कधी पाल्हाळ नसे. समोरचे साधकही उगाच प्रश्न विचारीत नसत. बहुतेक जण प्रश्न न विचारता शांतच बसलेले असत. त्यांना फक्त ऐकण्याची इच्छा असे. महाराजांचे समोर न बोलता बसून राहण्यातही सर्वांना आनंद वाटत असे. तेथून हलावेसे वाटत नसे. मनात प्रश्न–विचार काही नसत. मेंदू गुंग होऊन जाई. वेळेकडे लक्ष नसे. महाराजांच्या सान्निध्याचा प्रभाव नेहमी सर्वांना अनुभवण्यास मिळत असे.

महाराजांच्याकडे जुन्या परिचयातल्या व्यक्ती आल्या म्हणजे चौकशीचा गोड संवाद चाले. तो ऐकताना सर्वांनाच आनंद वाटे आणि थोडी थोडी अधिक माहिती मिळत असे. यातूनच महाराजांचे व्यापक कार्य समजत जाई. गुरुद्वादशीला वाडीला जाण्याची तयारी महिना महिना आधी चालत असे. देवाला छाटया अर्पण करण्यासाठी—धारवाड बेळगाव कडच्या उत्तम हातमागवाल्याकडून उत्तम करवतीकाठी उपरणी मागवून घेण्याचा पत्रव्यवहार चाले. पार्सलचे पैसे पाठविले जात. त्या उपरण्यांची सारखी वाट पहात असत. या वाट पाहण्यात दिसे ती महाराजांची देवावरची भक्ती. कधी स्वारीच्या पगडीचा विषय चाले. स्वारीच्या डोक्याचे माप मागवून घ्यायचे. पगडबंदाकडे पगडी करायला टाकायची. त्याला सर्व सूचना द्यायच्या. उत्तम काम करण्याची आग्रहाची सूचना द्यायची. पैशाची कधीही घासाघीस करायची नाही. मागेल ती मजुरी देताना मनात किंचितही शंका येत नसे. आग्रह फक्त एक, काम उत्तम झाले पाहिजे. देवाला उत्तम केशर काश्मीरहून मागवीत. तो पत्रव्यवहार चालत असे. उत्तम अत्तर, अष्टगंध, उत्तम उदबत्त्या या सर्व गोष्टी वाडीला जाण्यापूर्वी जमविण्यात महाराज रमून गेले असायचे. या मधून त्यांच्या निष्ठेची-श्रद्धेची—भक्तीची पराकाष्ठा किती पराकोटीची होती हेच दिसायचे. ते पाहून ऐकूनसुद्धा साधकाला आपल्या अल्प स्वल्प भक्तीची, निष्ठेची, श्रद्धेची कीव वाटू लागे. अशी महाराजांची कृती सारखे शिकवीत असे.

देवाला शेवंतीची फुले आवडतात, म्हणून महाराज स्वतः पाटीभर शेवंतीची फुले स्वतः बरोबर नेत. नंतर जो कोणी पुण्याहून वाडीला येईल त्याला पाटी पाटी शेवंतीची फुले घेऊन येण्यासाठी पैसेसुद्धा देऊन ठेवीत. पण याहीपेक्षा विशेष की, नानांना फुलांचे पार्सल दर दोन दिवसांनी करायला सांगत. आपल्या पुढे आलेले पैसे पाहून देवाच्या पूजा साहित्याचा, महापूजेचा, अन्नदानाचा सर्व अंदाज आधी करून ठेवीत. त्यांना देवासाठी काय काय करू असे होऊन जाई.

महाराजांकडे नित्य गेल्याने हे लक्षात येई. कधी उपासक आले, योगाभ्यासी आले म्हणजे ते आपले अनुभव व काय करतात ते महाराजांना निवेदन करीत असत. महाराज त्यांना मधून मधून प्रश्न करीत.

हा संवाद ऐकण्यासारखा असे. अशा चर्चेतून निवेदन करणाऱ्याची तयारी समजत असे व तो महाराजांचे मार्गदर्शन मागतो आहे यामध्येच महाराजांचे मोठेपण जाणवे. पण खरा प्रभाव यापुढचा असतो. खरं म्हणजे आपल्याला त्यातलं काही कळत पण नसतं, तरीसुद्धा आलेली मंडळी जेव्हा निःशंक होतात व कृतज्ञतेने भारावून जातात, तेव्हा एवढंच जाणवतं की महाराजांच्या मोठेपणाला मर्यादाच नाही. येणारा किती मोठा उपासक किंवा योगाभ्यासी असला तरी तो ज्याअर्थी महाराजांपुढे संतुष्ट होऊन कृतज्ञतेने नतमस्तक होतो, त्याअर्थी महाराज खात्रीने फार फार मोठे आहेत. असे महाराजांचे मोठेपण प्रत्येक प्रसंगी–नित्य जाणवत असे. यालाच गुरुत्व म्हणतात. समर्थ म्हणतात, ज्याला सद्गुरूपेक्षा देव मोठा वाटतो तो करंटाच आहे. पण महाराजांचे मोठेपण ध्यानी येत आहे हेसुद्धा महाराजांचेच मोठेपण आहे. ते पूर्ण समजेल तो त्यांच्या परम कृपेचा परमोच्च क्षण !

महाराज पहाटेची साधना झाली म्हणजे फिरायला जात असत. त्यांना निसर्गातून फेरफटका मारून येण्याची आवड होती. बरीच वर्षे सकाळ संध्याकाळ फिरायला जात होते. पुढे पुढे सकाळी किंवा संध्याकाळी जात. त्यानंतर महाराजांचे फिरणे संध्याकाळचे होऊ लागले. व्यवहाराच्या कक्षेत महाराज कामात काम उरकत असत–पण परमार्थात मात्र एकच लक्ष असे. जाता जाता देवाला जाणे त्याना पसंत नसायचे. इकडे आलोच आहे तर चला महाराजांकडे जाऊन येऊ, हे वाक्य त्यांच्या कानाला आवडत नसे. देवाचे काम–देवाचे दर्शन मुद्दाम वेळ देऊन–केले पाहिजे असे त्यांचे सांगणे असे. त्यासाठी ते महर्षी आण्णासाहेब पटवर्धनांच्या देवदर्शनाचे उदाहरण देत असत. कसबा पेठेत ते गेले म्हणून गणपतीचे दर्शन उरकून येत नसत. घरी येऊन परत गणपतीच्या दर्शनासाठी कसबा पेठेत जात. देवाची निष्ठा जपली पाहिजे. महाराज सकाळी फिरायला गेले म्हणजे मात्र कारणपरत्वे किंवा मुद्दाम १–२ संबंधित मंडळींकडे जाऊन येत. यामध्ये कालापव्यय कधीही करीत नसत. गेलो होतो अमक्याकडे म्हणून उशीर झाला, असे त्यांनी कधीही होऊ दिले नाही. वैदिक संशोधक मंडळाचे अध्यक्ष श्री. नानासाहेब सोनटक्के यांचा संबंध या काळात आला व पुढे त्याचे स्नेहात रूपांतर

झाले. महाराजांचे नानासाहेबांकडे जाणे येणे वारंवार होत असे. महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष पैलू नानासाहेब सोनटक्के यांनी अनुभवला तो आता पाहू——

श्री. नानासाहेब सोनटक्के यांचे मुंबईचे एक स्नेही नामांकित ज्योतिषी होते. ते मधूनमधून पुण्यास त्यांचेकडे येत असत. नानासाहेबांचा आणि महाराजांचाही परिचय चांगलाच होता. एकदा नानासाहेबांनी महाराजांची कुंडली (जन्मपत्रिका) आपल्या स्नेह्याला दाखविली. तेव्हा महाराजही तेथे उपस्थित होते. नानासाहेबांनी पत्रिका पुढे ठेवल्यावर त्या ज्योतिषाने पत्रिका पाहून "हे गृहस्थ स्त्रीच्याबाबतीत नेहमी उदासच राहणार, हे लग्न करणार नाहीत. अगदी स्पष्टच सांगायचे झाले तर हे नपुंसक आहेत." असे सांगितले. त्यावर नानासाहेबांचा आणि त्या ज्योतिषाचा मोठा वाद झाला. नानासाहेबांना त्या ज्योतिषाच्या शब्दांनी अगदी अस्वस्थ करून टाकले होते. त्यांना महाराजांचा हा अपमान झालेला पाहून सुचेनासे झाले. महाराजांना नानासाहेब चांगले ओळखत होते. त्यांची आसने–प्राणायाम–योग याची कल्पना होती. त्यांचे आध्यात्मिक नि पारमार्थिक जीवन ठाऊक होते. अशा व्यक्तीला चमत्कारिक शब्दांनी ज्योतिषाच्या नावाखाली अपशब्द वापरणे अत्यंत अनुचित होते. म्हणून नानासाहेबांनी वाद घातला. ते स्नेही उठून गेले.

नानासाहेबांनी महाराजांची क्षमा मागितली. मी माझ्या स्नेह्याला पत्रिका उगाच दाखविली, आणि आपला अपमान करवून घेतला. नानासाहेबांचा सात्त्विक संताप महाराजांच्या लक्षात आला. पण महाराजांनी अतिशय शांतपणे त्यांना समजावून सांगितले.

"नानासाहेब, तुम्हाला जे वाटते ते बरोबर आहे. पण तुमच्या ज्योतिषी स्नेह्याला जे जसे वाटले तेही त्याच्या दृष्टीने बरोबरच आहे. त्यांची शब्दरचना चुकली असेल, कारण त्यांना ती दृष्टी नाही. त्याची व्यवहारी दृष्टी असल्यामुळे त्या शब्दाचा अर्थ चमत्कारिक तुम्हाला वाटला.

"अहो! त्यांच्या या शब्दांनी मला प्रशस्तीपत्र मिळाले आहे. श्रीसद्गुरु टेंबे स्वामीमहाराजांनी खऱ्या ब्रह्मचर्याचे वर्णन याच शब्दात केले आहे——

कुमारी आणि वृद्ध नारी । किंवा तरुणी सुंदरी । ह्या समान पाहुनि अंतरी । जो निर्विकारी तो नपुंसक ॥५९॥ यापरी वागूनी । योगचर्या धरूनी । जो अंतर्निष्ठ वागे मुनी । तो जनी वनी समान ॥ ६० ॥

द. मा. अध्याय १५

नुसते त्यांनी नपुंसक शब्द वापरल्यामुळे आपण अस्वस्थ का व्हायचे ? माणसाने स्त्रीच्या बाबतीत किती निर्विकार झाले पाहिजे ते ते सांगताना स्वामीमहाराजांनीसुद्धा नपुंसक शब्द वापरला. आणखी एका संस्कृत श्लोकात म्हटले आहे—

परद्रव्येषु योऽन्धश्च परस्त्रीषु नपुंसक: ।
परापवादे यो मूक: सर्वदा विजतेंद्रिय: ॥

नानासाहेब ! आज तुमच्या ज्योतिषाने आम्हाला सर्टिफिकेट दिले. लौकिकातल्या नपुंसकाची लक्षणे आणखी आहेतच की, एवढे एकच नाही. तो जसा कामवासनेत निर्विकार असतो तसे ब्रह्मचारी माणसाने असावे हे महत्त्वाचे. शरीराने तर ब्रह्मचर्य संभाळलेच पण मनाने संभाळले हे मी कोणाला सांगायला जातो का ? आज तुमच्या ज्योतिषाने शास्त्राचा आधार देऊन सांगितले. त्याला माहीत होते ते सांगितले. जाऊ द्या हा विषय. तुम्हीही मनाला शांत करा. रहस्य समजण्यात आनंद आहे. ''

महाराजांच्या असामान्य गुणाचा प्रत्यय तर आलाच पण त्याचबरोबर मनाचा समतोल केवढा ! शांतता केवढी ! महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू मूळचे आहेत. वेळ आल्यावर ज्या पैलूवर प्रकाश पडतो तो चमकून दिसतो. गुरुचरित्रात स्वत: श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांनी आपल्या आईला सांगितले ना– " आम्ही वैराग्यस्त्रीला वरले आहे. आता जगात अन्य कोणत्याही स्त्रीचा स्वीकार मनानेही होणार नाही." महाराजांची ही अवस्था आहे हेच यातून स्पष्ट दिसते.

निवृत्ती स्त्रियेसी विवाह केला । स्वात्मराजी अभिषेक झाला ।
आता काही मला । नावडे हे निश्चित ॥

दत्तमहात्म्य २९।९६

योग चर्या जाणता । चित्ता न ये खिन्नता ।
येऊनी स्वस्थता । सिद्धी मिळे अनायासे ॥७१॥

प्रीती वाढवी मान । उद्वेग करी अपमान ।
असे मूर्खजन । पाहती अज्ञान वेष्टित ।।७२।।
योगी जरी विपरीत । हे घेई मनात ।
सिद्धी तयाचे हातात । ये निश्चित जाणावे ।।७३।।
अमृत दृष्टीने मान । विष दृष्टीने अपमान ।
मानी जयाचे मन । तया बंधन येईल ।।७४।।
म्हणोनि योगीजन । विषदृष्टीने मान ।
अमृतदृष्टीने अपमान । मानिती जाण सर्वथा ।।७५।।
योगियाने सन्मान । मानावा विषासमान ।
होता अपमान । अमृतासमान मानावा ।।७६।।

## 'शक्तिपात' साधनेची महती वाढू लागली

श्रीगुरुमहाराज पुण्यात आल्यापासून आणि विशेषत: कल्याण योगांकामध्ये महाराजांचे नाव व पत्ता जाहीर झाल्यापासून दूर दूरच्या जिज्ञासूंची पत्रे येऊ लागली, भेटी होऊ लागल्या. पण महाराजांनी किंवा स्वामी श्रीलोकनाथतीर्थ महाराजांनी आपण आपले कार्य प्रसिद्धीच्या प्रकाशात यावे अशी इच्छाही केली नाही किंवा तसा चुकूनही प्रयत्न पण केला नाही. श्री. खरे ऑडिटर यांच्या लेखाने जी प्रसिद्धी दिली त्यामुळे लोकांना हे समजले. पं. सातवळेकरांसारख्यांना दीक्षा झाली ही गोष्ट कधी कोणाला सांगितली नाही. सतत दीक्षा देण्याचे चालू असे. पण खाजगीत ! त्याची चर्चा कधीही महाराज करीत नसत. यामुळे महाराजांकडे येणाऱ्या साधकांनाही या वाढत्या व्यापाची कल्पना येत नसे. परगावच्या साधकांचा संबंध पत्राने असे त्यामुळे ते कुणाला कळत नसे. पुण्यातील साधकांची संख्या मर्यादित होती. प्रत्येकाचा महाराजांशी वैयक्तिक संबंध होता. सामुदायिक साधना हा प्रकार त्या काळात नव्हता. साधकाने महाराज सांगतील त्याप्रमाणे सवडीने येऊन त्यांचे समोर साधना करावी आणि जावे. महाराज हे नियोजन फारच काळजीपूर्वक करीत असत. जागाही लहान होती. सर्वजण उद्योगातले होते. योगायोगाने महाराजांकडे साधकांच्या भेटीगाठी झाल्या तर परस्परांचा परिचय ते करून घेतील किंवा महाराज करून देतील अशातला प्रकार

नसे. मंदिरात देवदर्शनाला येणारे जसे येतात नि जातात तसा प्रकार असायचा. मंदिरात देव बोलत नसतो. इथे मात्र देवाशी बोलता येत होते. मंदिरातला देव काही सांगत नव्हता. इथे मात्र विचारल्यावर सांगणारा देव होता.

सोलापूरचे मोहोळकर बंधू कॉलेज शिक्षणासाठी पुण्यात होते. ते महाराजांकडे येत असत. दर्शनाला आला म्हणजे लगेच दीक्षा होत नसे. महाराज दीक्षा देण्याची कधी घाई करीत नसत. देवाचे काय चालले आहे ? वेळ किती असतो ? उद्योग काय चालू आहे ? इ. चौकशी करून ठेवीत असत. पण दीक्षेचे विचारले की काही तरी कारण दाखवून पुढे ढकलीत. मोहोळकरांची देवीची, शक्ती उपासना चालू होती. त्या उपासनेचे त्यांचे गुरु होते. मोहोळकरांना महाराजांची दीक्षा घेण्याची इच्छा झाली. महाराज म्हणाले पहिल्या गुरूंची लेखी परवानगी आणा म्हणजे दीक्षा होईल. त्यांनी पण आपल्या पहिल्या गुरूंना ही हकीगत सांगितली. ते श्रीविद्येतील अधिकारी पुरुष होते पण माहिती ऐकल्यावर दोनही साधना एकमेकाला पूरक आहेत हे लक्षात घेऊन नि:शंक मनाने लेखी परवानगी दिली. यांची दीक्षा पं. सातवळेकरांच्या आधी झाली व लगेच १॥–२ महिन्यांनी पंडितजींना दीक्षा झाली.

या काळात सोलापूरचे श्री. शंकरराव विद्वांस हेही कॉलेजमध्ये शिक्षणासाठी पुण्यास आलेले होते. त्यांना मित्राच्या संगतीने कुंडलिनी जागृत व्हावी ही इच्छा उत्पन्न झाली. त्यावेळी स. प. कॉलेजमध्ये प्रा. सोनोपंत दांडेकर हे प्रिन्सिपॉल होते. त्यांचा आणि शंकररावांचा परिचय होता. शंकररावांनी या कुंडलिनी जागृती–योगाभ्यास संबंधी प्रा. मामा दांडेकर यांना विचारले. तेव्हा त्यांनी गुळवणीमहाराजांचे नाव सांगितले. शंकररावांचे एक स्नेही श्री. गजाननराव जोशी म्हणून वर्ग मित्र होते. ते महाराजांचे अनुगृहीत होते. त्यांचेबरोबर शंकरराव महाराजांकडे आले. आपली सर्व हकीगत व इच्छा सांगितली तेव्हा महाराज म्हणाले, "आपण विद्यार्थी आहात. शिक्षण पूर्ण होऊ द्या. मग पुढे पाहू." त्यामुळे शंकररावांना शिक्षण पूर्ण होईपर्यंत दीक्षेसाठी थांबावे लागले. याची माहिती पुढे दीक्षेचा प्रसंग येईल तेव्हा पाहू.

## शंकरराव मार्कण्ड सहवासात आले

नागपूरजवळच्या भंडाऱ्याचे शंकरराव रामदास मार्कंड हे एम्.ए. एल्एल्. बी. झालेले गृहस्थ व्यवसायानिमित्त पुण्यास आले. त्यांचा योगायोगाने महाराजांशी परिचय झाला. ते महाराजांकडे येऊ लागले. शंकरराव मार्कंड हे मोठे दत्तभक्त होते. महाराजांकडे त्यांचा नि स्वामी लोकनाथतीर्थ महाराजांचा परिचय झाला. ते स्वामींना आपल्या घरी नेऊ लागले. स्वामींची सेवा करू लागले. पुढे स्वामींच्या अनुज्ञेने ते रेसमध्ये बुकी झाले. त्यांना स्वामींनी हा व्यवसाय फक्त सहा वर्षे करायचा व पुढे थांबायचे असे सांगितले. या काळात शंकरराव लक्षाधीश झाले. स्वामींची फार मोठी सेवा केली. पुढील ओव्यांतून थोडक्यात चांगली कल्पना येईल–

स्वामी आज्ञेने चालले। शंकरराव ' बुकी ' झाले।
संपत्तीचा पाऊस चाले। मुसळधार हत्तीचा ॥ १ ॥
पहिले दिवशी हजार आले। दुसरे दिवशी पाच हजार झाले।
हजारांचा पाढा चाले। लक्ष्मीचा रोज घरात ॥ २ ॥
एकदा तर वीस हजार आले। शंकरराव पाहातच राहिले।
काही न करता पैसे आले। स्वामी कृपा अफाट ॥ ३ ॥
मार्कंड होते दत्त भक्त। पारायणे, पारणे थाटात।
समारंभ असे गर्जत। घरी शंकररावांच्या ॥ ४ ॥
ऐंशी हजारांचा बंगला घेतला। वाहनसौख्या तोटा कसला।
गडी माणसांचा गल्बला। तोटा नसे परिवारा ॥ ५ ॥
याहून एक विशेष असे। स्वामीभक्तीत उणे नसे।
होईल ते ते करीतसे। स्वामीसाठी उदार हस्ते ॥ ६ ॥
स्वामींच्या यात्रा केल्या। बद्रीनारायणा दंड्या केल्या।
खास रेल्वे गाड्या झाल्या। ऐश्वर्याच्या ऐपतीने ॥ ७ ॥
काशीला एक आश्रम बांधला। दहा हजार रुपये खर्च केला।
स्वामी चरणी दान केला। गुरुभक्तीचा कळस ॥ ८ ॥
असे हे भक्त मार्कंड। जणू हे प्रतापी भक्त मार्तंड।
परि यासी झाला असे दंड। प्रारब्धाच्या गतीने ॥ ९ ॥

वर्षे लक्षात राहिली नाही। पैशाचा मोह थांबला नाही।
काय झाले ते कळले नाही। फटका लाखाचा बसला ॥ १० ॥
शंकरराव हादरले। घामाने शरीर दरदरले।
काळीज टचकन फाटले। कंठशोष जाहला ॥ ११ ॥

पुढे तो काशीचा आश्रम श्रीलोकनाथतीर्थ स्वामींमहाराजांनी १६ हजार रुपयाला विकला व ते पैसे शंकरराव मार्कंड यांना पाठविले. या सर्व व्यवहारात महाराजांचा संबंध अगदी जवळून होता. या प्रसंगातून स्वामींचे प्रखर वैराग्य महाराजांना चांगलेच कळून आले आणि आपल्या सद्गुरूंच्या या असामान्य गुणाने प्रभावित झाले. सत्शिष्याने सद्गुरूंच्या गुणांचे अनुकरण करावयाचे असते हे या प्रसंगातून आयुष्यभर अंतःकरणावर कोरून ठेवले.

## आफ्रिकेतून दीक्षेसाठी पत्र

आफ्रिकेहून श्री. जयंतीलाल दवे नावाच्या गुजराथी गृहस्थाचे पत्र आले. पंडित तडित्कांत यांची आफ्रिकेत भेट झाल्यापासून त्यांना दीक्षा घेण्याची तीव्र इच्छा झाली. ते गृहस्थ मुंबईला आले. मुंबईच्या पत्त्यावर त्यांना पत्र पाठविण्याचे त्यांनी लिहिले होते. ते दत्तभक्त होते. त्यांना पत्र पाठविल्यावर ते पुण्यास येऊन भेटून गेले. त्यांनाही दीक्षा झाली.

## कल्याण ‘कल्पतरू’ अंकात शक्तिपात विद्येचा उल्लेख

इ. स. १९४० च्या एप्रिल मधील, कल्याण ‘कल्पतरू’ अंकामध्ये श्री. भट्टाचार्य M. A. या नावाच्या गृहस्थाने प. प. श्रीनारायणदेवतीर्थस्वामी महाराजांचे अल्प जीवन चरित्र व शक्तिपात विद्येसंबंधी लिहिलेला लेख आला. हे श्रीनारायणतीर्थदेव स्वामीमहाराज म्हणजे श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांचे परम गुरु. ही माहिती ज्यांनी दिली ते गृहस्थ म्हणजे मुंबईचे प्रख्यात नागरिक सर चुनिलाल मेहता हे होत. ते श्रीगुरुमहाराजांचा शोध घेत २० नारायण पेठेत आले. पुढे आपण त्यांचा परिचय व महाराजांशी त्यांचा संबंध कसकसा आला ते पाहू.

## K. C. I. सर चुनिलाल शहा महाराजांकडे आले

मुंबईचे प्रसिद्ध नागरिक, धनाढ्य सज्जन, K. C. I. सर चुनिलाल शहा यांचा पुण्यामध्ये चतु:शृंगीजवळ बंगला आहे. ते मधून मधून पुण्यास येत असत. त्यांनी कल्याण कल्पतरूमध्ये महाराजाचा Transmission of Spiritual Power हा लेख वाचला. त्यामध्ये पत्ता दिलेला नव्हता. तेव्हा सर चुनिलाल यांनी 'कल्याण'च्या संपादकांकडून महाराजांचा पत्ता मिळविला. पुण्यातील महाराजांच्या पत्त्यावर माणूस पाठवून चौकशी केली, आणि निरोप देऊन, महाराजांच्या भेटीस २० नारायण पेठेतील, त्या छोटया जागेत भेटण्यास आले. 'गुणा: सर्वत्र पूज्यन्ते' या न्यायाने एक धनाढ्य मातब्बर व्यक्ती सर चुनिलाल महाराजांकडे आले. त्यांच्या उल्लेखाचे व माहितीचे पत्र महाराजांनी बापूसाहेबांना सोलापुरी पाठविले. ते मूळ पत्रच पुढे देत आहे–

१९–६–१९४०

दुपारी दोन वाजता स्वत: मोटार घेऊन आले. त्यांचेबरोबर त्यांची पत्नीही होती. उभयता वयातीत आहेत. त्यांनी मोटारने मला बंगल्यावर नेले. तेथे गेल्यावर त्यांनी त्यांची सर्व हकीकत सांगितली. त्यांना योगासंबंधी गेल्या वीस वर्षांपासून नाद असून, पुष्कळ साधुसत्पुरुषांच्या भेटीही घेतल्या आहेत. त्यांनी सांगितल्याप्रमाणे काही अभ्यासही करीत असतात. परंतु विशेष उपयोग झाला नाही असे त्यांनी सांगितले. एप्रिलच्या अंकातील लेख वाचून त्यांनी शक्तिपात संप्रदायाची सर्व माहिती त्या त्या ठिकाणाहून आणविली. ती माहिती त्यांनी मला दाखविली. मी त्यांना श्रीनारायणतीर्थ स्वामींच्या शिष्यांच्या शिष्यांचा अनुग्रह घेतला आहे हे सांगितल्यावर त्यांना फारच आश्चर्य व आनंद झाला. आपल्या स्वामींचे गुरु काशीत राहातात व त्यांचे गुरु श्री नारायणतीर्थस्वामीजी. श्रीनारायणतीर्थ स्वामीजींचा मठ बंगाल्यात मदारीपूर येथे असून श्रीस्वामीजी इ. स. १९३५ मध्ये समाधिस्थ झाल्यावर आता त्यांचे जागी त्यांचे जावई तो संप्रदाय चालवीत आहेत. सर चुनिलाल यांचा व श्रीनारायणतीर्थ स्वामीजींचा झालेला पत्रव्यवहार त्यांनी मला दाखविला व मलाही बरीच नवीन माहिती मिळाली.

श्रीनारायणतीर्थ स्वामींच्या शिष्यांचे तीन मठ असून त्या मार्फत या संप्रदायाचा प्रसार सुरू आहे. १. छोटा उदेपूर २. काशीत छोटीगैबी मध्ये आणि ३. एक बंगाल्यात. या शक्तिपातयोगाला ते ' सिद्धमहायोग ' असे म्हणतात.

दोन तासपर्यंत सर चुनिलाल व त्यांच्या पत्नीबरोबर बरीच चर्चा झाल्यावर त्यांनी दीक्षेबद्दल प्रार्थना केल्यावरून दुसऱ्या दिवशी गुरुवारी सकाळी ८ वाजता उभयतांना दीक्षा झाली. श्रीस्वामी महाराजांच्या आशीर्वादाने शक्तिसंचार उत्तम झाला व त्यांना फार आनंद झाला. गेल्या सोमवारपर्यंत ते स्वत: मोटार घेऊन येत, मला बंगल्यावर घेऊन जात व परत घरी आणून पोचवीत असत. एक तास क्रिया उत्तम चालते. "

असा एक विशेष शिष्यसंबंध आला. हे सर चुनिलाल इंग्रज सरकारच्या काळात मुंबई प्रांताचे सुप्रसिद्ध अर्थमंत्री होते. ते महाराजांकडे प्रथम आले तेव्हा महाराजांची साधी राहणी, सर्वसामान्यांप्रमाणे जीवन, हास्यमुद्रांकित अकृत्रिम विनय पाहून शेठजींना आश्चर्य वाटले. इतरत्र सहज दिसून येणारा दंभाचार येथे नाही हे पाहून शेठजींच्या अंत:करणाने विशेष पकड घेतली. दीक्षा झाल्यावर श्रीटेंबेस्वामी महाराजांच्या पुण्यतिथीला दोघेही पतिपत्नी २० नारायण पेठेत आले व प्रसाद घेऊन गेले. त्यांची श्रीमंती, ऐश्वर्य व सत्ता विचारात घेता २० नारायण पेठेत येऊन सर्वांप्रमाणे पंक्तीत बसून प्रसाद घेतला ही गोष्ट मेहता पतिपत्नींच्या श्रद्धा-भक्तीचे उदाहरण आहे. महाराजांनी त्यांच्या मोटारीतून बंगल्यावर जाताना बापूसाहेब कुबडे व जांबवंत सिंहजी (काशी) यांना मुद्दाम बरोबर घेतले होते.

बंगल्यात गेल्यावर शेटजींच्या पत्नीने महाराजांचे स्वागत निरांजन ओवाळून पादप्रक्षालन करून केले. उभयतांनी महाराजांना बंगला-बंगल्यातील दालने मोठ्या आस्थेने दाखविली. त्यांच्या बंगल्याच्या आवारात मोठी गोशाळा होती. ती दाखविली. शेठजी व त्यांच्या पत्नी गाईचे दूध व त्या दुधाचे पदार्थ याशिवाय काहीही घेत नसत. एक छोटे दालन साधनेसाठी होते. त्यात श्रीदत्तात्रेयांचा व महाराजांचा फोटो होता. तेथे म्हैसुरी उदबत्त्यांचा व सुगंधी पुष्पांचा सुगंध दरवळत होता.

तेथे काही आसनेही मांडून ठेवलेली होती. याच ठिकाणी शेठजींना व पत्नींना दीक्षा झाली होती. त्या साधनगृहात बापूसाहेब, जांबवंतसिंहजी व मेहताशेठजी पाऊण तास साधनेस बसले. महाराज समोरच बसले होते. सर्वांचे फारच उत्तम साधन झाले. सर्वांना समाधान मिळाले. मग सर्वांसाठी विविध फळांचा फलाहार व केशरी मसाला दूध आणवले. महाराजांनीही फळांच्या फोडी घेतल्या. दूध घेतले.

एवढा मोठा कोटयाधीश, राजैश्वर्य व ऐहिक सुखाची सर्व प्रकारची अनुकूलता असतानाही एका दर्भासनावर बसून निरतिशय आत्मसुखाकरिता किती आतुर आहे व श्रीगुरुमहाराजांवर केवढी नितांत श्रद्धा आहे, त्याचबरोबर किती तीव्र तळमळ आहे हे पाहिले म्हणजे निरतिशय आत्मसुखाची योग्यता व श्रीगुरुमहाराजांचा अधिकार केवढा मोठा आहे याची कल्पनाच केली पाहिजे.

महाराज व स्वामी डोंबिवलीला गोग्रासवाडीत श्री. कृष्णाजीपंत जोशी यांचेकडे जात तेव्हा मुंबईहून सर चुनिलाल शेठजी भेटण्यास येत असत. महाराजांच्या आयुष्यभराची योगक्षेमाची उत्तम व्यवस्था करण्याची शेठजींची इच्छा होती. त्यासाठी त्यांना एक घर त्यांच्या इच्छेप्रमाणे बांधून देणे आणि मासिक निर्वाहापुरते व्याज येईल एवढी रक्कम महाराजांच्या नावे बँकेत ठेवायची त्यांची योजना त्यांनी महाराजांना अनेकदा बोलून दाखविली. पण महाराज म्हणायचे– " आमचे प्रारब्ध आम्हीच भोगले पाहिजे. या जन्मी तुमचे उपकार घेतले की ते फिटेपर्यंत किती जन्म घ्यावे लागतील कुणी सांगावे. तुमचे प्रेम आहे तेच खूप आहे, " यावर शेठजींना उत्तर नसे. स्वामी लोकनाथ तीर्थ महाराज काशीत आजारी होते तेव्हा शेठजी आर्थिक मदत करीत असत.

## काशीचे जांबवंतसिंहजी महाराजांकडे कसे आले ?

जांबवतसिंह हे बनारस जिल्ह्यातील 'घरहरा' या गावचे राहणारे. माध्यमिक शाळेतून अर्धवट शिक्षण सोडले होते. नंतर त्यांना इंग्रजी शिकण्याची इच्छा झाली. म्हणून त्यांचे एक नातेवाईक श्री. रघुनाथसिंह यांचेकडे उ. प्रदेशातील प्रतापगड जिल्ह्यातील दादुपूर स्टेशन येथे गेले. हे रघुनाथसिंहजी तेथे स्टेशनमास्तर होते. त्यांना

योगाभ्यास प्राणायामाची आवड होती. त्यांचे गुरु श्री. समशेर शहा हे हटयोगी होते. त्यांचा जांबवंतसिंहाला परिचय करून दिला. श्रीसमशेर-गुरूंनी जांबवंतसिंहाला काही साधन व प्राणायाम सांगितला. तो अभ्यास जांबवंतसिंह दोन वर्षे करीत होते. त्याने त्यांचे डोळे खराब झाले. बनारसला डोळ्यावर उपाय होऊन बरे झाले. पण यामुळे जांबवंत सिंहजी गावी येऊन राहिले. तेथेही त्यांचा योगाभ्यास चालू होता. त्या अभ्यासात त्यांना एके रात्री भयंकर भीती वाटली. तेव्हा त्यांना गूरूच्या मार्गदर्शनाची फार आवश्यकता वाटली. गुरूच्या शोधार्थ ते आसपास खूप हिंडले. साधुसंतांना भेटले. ' मला तुमच्यातली थोडी शक्ती द्या, किंवा मी अपात्र असेन तर मला पुढे नेणाऱ्या महापुरुषाची भेट करून द्या. ' या प्रयत्नात त्यांची सात वर्षे गेली.

एके दिवशी ' घरहरा ' हून ते रेल्वेने बनारसला येत होते. तेवढ्यात कादीपूर रेल्वे स्टेशनवर श्रीशमशेरशाह यांचे गुरु श्री शिवलाक शाह यांचे दर्शन झाले. ते त्याच डब्यात होते. जांबवंतांनी त्यांना आपला परिचय करून दिला. श्रीशमशेरशाह यांचेकडून मिळालेली साधना व प्राणायाम यासंबंधी सर्व काही सांगितले. श्रीशिवलाक शाह यांचे शरीर म्हणजे केवळ हाडांचा सापळा होता. त्यांनाही बनारसला उतरायचे होते.

बनारस आल्यावर जांबवंतसिंहानी त्यांना अलगद उचलून प्लॅट-फॉर्मवर ठेवले, तेव्हा ते म्हणाले, 'मला तुझ्या खांद्यावर घे आणि राज-घाटावर माझ्या पत्त्यावर पोचते कर. ' स्टेशनपासून १।। मैलाचे अंतर होते. रिक्शा-टांग्याने जाऊ म्हणून जांबवंतसिंहाने खूप आग्रह करून सांगितले. पण त्यांनीही आग्रहाने सांगितले की तू तुझ्या खांद्यावरूनच मला पोचते कर. त्यांच्या इच्छेप्रमाणे जांबवंताने त्यांना १।। मैल खांद्यावरून नेऊन त्यांच्या पत्त्यावर पोचते केले. त्यांचे काहीही वजन जांबवंतसिहाना जाणवले नाही.

त्यांचा निरोप घेऊन निघताना जांबवंतसिंहाने प्रार्थना केली की, " मला आपले शिष्य करून घ्या. " त्यावर ते म्हणाले, " गृहस्थाश्रमी लोकांसाठी हा मार्ग योग्य नाही. म्हणून मी तुला शिष्य करीत नाही. परंतु तुला आशीर्वाद देतो की, तुझ्या संस्काराप्रमाणे सहा महिन्यात तुला तुझा गुरु दक्षिणेकडे भेटेल. तुला गुरुप्राप्ती व्हावी याच-

साठी तुझ्यावर संस्कार करण्यासाठी मी तुला तुझ्या खांद्यावरून, मला येथपर्यंत आणण्यास सांगितले. "

या सुमारास जांबवंतसिंहजी बनारसला 'गणेशराम नंदलाल फर्म,' चौखंबा येथे नोकरीस होते. (सध्या ही फर्म गणेशराम देवकिसन झँवर २५/४ चौकात आहे) ही बनारसी वस्त्र उत्पादनाची प्रमुख फर्म होती. फर्मच्या बाकी वसुलीसाठी जांबवंतसिंहजींना महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात वर्षातून एकदा जाऊन यावे लागत असे. यावेळी महाराष्ट्रात जळगावच्या एका पार्टीकडे फार मोठी रक्कम बरेच दिवसाची येणे राहिली होती—त्यासाठी जळगावला येणे झाले. त्या व्यापाऱ्याने १५ दिवसांचा वायदा दिला. हे पंधरा दिवस कसे काढायचे या विचारात ते पडले. रात्री तेथील भवानीच्या मंदिरात झोपले असता स्वप्न पडले व सूचना मिळाली. 'तू पुण्याला जा. तेथे तुला गुरुप्राप्ती होईल.'

स्वप्नातील आदेशाप्रमाणे जांबवंतसिंहजी दुसरे दिवशी सरळ पुण्याला आले. पुण्यातील मेघराज शेटजी यांची 'लादुराम रामकिसन फर्म' आहे. ते जांबवंतसिंहाचे पुण्यात उतरण्याचे ठिकाण. पुण्यात आल्यावर मित्रमंडळींच्या माहितीप्रमाणे जवळपासच्या ठिकाणी साधु-संतांची भेट घेऊन गुरूचा शोध घेतला. पण कुठेही समाधान झाले नाही. दुसरे दिवशी मेघराज शेटजींनी गोरखपूरचा कल्याणचा योगांक जांबवंतांना वाचायला दिला. तो अंक हातात घेऊन जे पान उघडले त्या पानावर 'महाकुंडलिनी शक्तियोग' प्रकरण होते. तो लेख श्री. त्र्यंबक भास्कर खरे यांनी लिहिलेला होता. या लेखात महाराजांचे नाव व पत्ता होता आणि ते कुंडलिनी जागृत करतात हाही उल्लेख होता.

महाराजांचा पत्ता व नाव मिळाल्यावर त्या शोधाला जांबवंतसिंह लागले. पहिल्या दिवशी पत्ता मिळाला नाही. तेव्हा दुसरे दिवशी त्यांचे स्नेही श्री लक्ष्मीनारायणजी राठी यांना बरोबर घेऊन ते २० नारायण पेठेत आले. परंतु महाराज नू. म. वि. शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारंभासाठी गेल्याचे समजले. जांबवंतसिंहजी आणि राठी नू. म. वि. मध्ये आले. पूजनीय गुळवणीमहाराजांना भेटायाला कोणी आले असल्याचा त्यांना निरोप गेला. त्यानुसार महाराज समारंभातून बाहेर आले.

महाराजांचा साधेपणा पहाताच जांबवंतसिहांना त्यांचेबद्दल आतूनच विश्वास व आदर निर्माण झाला. शांत, प्रसन्न, तेजस्वी चेहरा पाहून त्यांना वाटले ज्याच्या शोधार्थ आपण हिंडतो आहोत, ते स्थान, ते गुरु हेच आहेत. आजपर्यंत अनेक साधुसंताच्या भेटी घेतल्या पण जांबवंतसिहांना कुठेही समाधान वाटले नाही. प्रत्यक्ष काशीतच राहात होते. तेथे तर साधुसंतांना तोटा नाही. पण तेथेही मनाला समाधान वाटले नाही. ते समाधान नू. म. वि. शाळेच्या प्रांगणात भेटलेल्या महाराजांच्या दर्शनाने लाभले. याला ऋणानुबंध म्हणतात.

जांबवंतसिहांनी थोडक्यात आपला हेतू महाराजांच्या कानावर घातला. 'मला आपल्याकडून काही मिळावे एवढीच प्रार्थना आहे' हे जांबवंताचे भावपूर्ण वाक्य ऐकताच महाराज म्हणाले,

"मला माझ्या सद्गुरूंच्याकडून जे काही प्राप्त झाले आहे ते निःसंकोचपणे देण्याचा मी प्रयत्न करीन. तुमच्या संस्काराप्रमाणे जेवढे ग्रहण करण्याची तुमची क्षमता असेल तेवढे तुम्ही प्राप्त करू शकाल." असे निःसंदिग्धपणे सांगून पुढे म्हणाले, "माझेकडे जागेचा संकोच आहे. तुम्हीच तुमच्या स्नेह्याकडे एखादी निवांत खोली पाहून ठेवा. तेथे मी येईन." हे ऐकून जांबवंतसिह या अपार कृपापूर्ण सरळ बोलण्याने पार विरघळून गेले. महाराजांच्या बोलण्यात गुरुत्वाचा लौकिक मोठेपणा कुठेही नव्हता. फक्त आपलेपणा, सरळपणा, साधेपणा यांचे भांडार भरले होते.

मुख्य सद्गुरुचे लक्षण । आधी पाहिजे विमल ज्ञान ।
निश्चयाचे समाधान । स्वरूप स्थिती ।। १ ।।
याहीवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदास केवळ ।
विशेष आचारे निर्मळ । स्वधर्माविषयी ।। २ ।।
याहीवरी अध्यात्म श्रवण । हरिकथा निरुपण ।
जेथे परमार्थ विवरण । निरंतर ।। ३ ।।
अंतरी शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचे भजन ।
तेथ बहु भक्त जन । विश्रांती पावती ।। ४ ।।
म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्म कर्म आणि साधन ।
कथा निरुपण श्रवण मनन । नीति न्याय मर्यादा ।। ५ ।।

यामध्ये एक उणे नसे । तेणें ते विलक्षण दिसे ।
म्हणोनि सर्वही विलसे । श्रीसद्‌गुरुपासी ।। ६ ।।

जांबवंतसिंहाच्या अंतर्दृष्टीला महाराजांमधले सद्‌गुरूंचे सारे गुण दिसले. तो त्यांच्या शाळेत आहे, समारंभाची गर्दी आहे हे सर्व विसरून गेला आणि त्याने महाराजांच्या चरणावर मस्तक ठेवले. महाराजांनी तत्परतेने हाताने उठवून म्हटले, "हे नमस्कार वगैरे येथे नकोत. ही शाळा आहे."

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी जांबवंतसिंहाने २० नारायण पेठेत महाराजांना आणण्यासाठी मोटार नेली. आत घरात महाराज होते. जांबवंताने मनसोक्तपणे महाराजांचे चरणावर मस्तक ठेवले, हातांनी पाय चेपले. आनंदाश्रूंनी महाराजांचे चरणांना स्नान घातले. आणि मोटारीतून त्यांना सेठ लादूराम रामकिसन जाखोटिया यांचे घरी घेऊन आले.

स्वतंत्र खोलीत दीक्षेची व्यवस्था केली होती. महाराजांचे आसन पुष्पांनी सजविले होते. पूजा साहित्य, श्रीफल, फळे, प्रसाद, हार सर्व तयार होते. जांबवंताजवळ मंत्र नव्हते, मन होते. त्या मनाने पूजा केली. विधी विधान नव्हते, भाव भावना होत्या. त्यांच्या आधारे उपचार समर्पण केले. महाराजांना भरगच्च हार घातला—साष्टांग नमस्कार घातला आणि प्रार्थना केली 'प्रभु मुझे आपसे कुछ दो ।'

महाराजांनी त्यांना आसनावर बसण्यास सांगितले. डोळे मिटण्यास सांगितले. जवळ येऊन मस्तकाला स्पर्श केला. त्याबरोबर क्रिया सुरू झाल्याचे जाणवले. १। तास प्रकाश दिसत होता. चित्तवृत्ती पूर्ण अंतर्मुख झाली होती. दिव्य चैतन्याची प्राप्ती झाल्याचे जाणवले.

जांबवंतसिंहजींना कृतार्थ वाटले. आनंद वाटला.

जांबवंताच्या आठवणी भरपूर आहेत. त्या श्रीस्वामी लोकनाथतीर्थ चरित्रातून वाचल्या पाहिजेत. कारण काशीमध्ये जांबवंताने स्वामींची भरपूर सेवा केली. श्रीसद्‌गुरुमहाराजांचा सहवासही वारंवार घेतला. पत्रव्यवहार सतत ठेवला. महाराज आणि स्वामी लोकनाथतीर्थ महाराज यांच्या माहात्म्याची जांबवंताला चांगलीच जाणीव होती. ते जाणीवपूर्वक त्यांची सेवा करीत असत. त्यांचेशी विनम्रतेने वागत असत.

त्यांच्या आठवणींनी या महापुरुषांचे माहात्म्य समजून येण्यास मदत झाली.

इ. स. १९४० साल चालू होते. महाराजांचे अलौकिक गुरुत्व आणि त्यांनी दिलेली दिव्यशक्तिपात साधना याची महती चांगलीच वाढत चालली. ही साधना मिळालेले भाग्यवंत नित्य अनुभूतीत परमार्थाची वाटचाल निर्धास्तपणे-नित्यानंद घेत करू लागले. यामुळे जो जो गुरुमहाराजांकडे आला तो तो त्यांच्या गुरुत्वापुढे नतमस्तक झाला. जी शक्तिपात योगविद्या सद्गुरूंकडून प्राप्त होऊन अन्तस्थ दिव्य शक्तीची प्रत्यक्ष प्रचीती ते घेऊ लागले, त्यांची ती गोडी वाढत गेली.

श्रीगुरुमहाराजांच्या जीवनातील हा काळ लौकिक दृष्टीने अप्रसिद्ध म्हणून गणला जातो. या काळात महाराजांच्या भोवती गर्दी नव्हती. त्यांचा कुठेही आश्रम वा मठ नव्हता, कोणताही उत्सव, सभासमारंभ, सर्वांना एकत्र करून, होत नव्हता. २० नारायण पेठेतल्या छोटया खोलीत श्रीटेंबेस्वामींची पुण्यतिथी, साजरी होत होती. गुरुपौर्णिमेला ते सोलापूरला जात असत. सोलापूरची शिष्य मंडळी वैद्यमास्तरांच्या घरातील तिसऱ्या मजल्यावरील मोकळ्या जागेत गुरुपूजन करीत होते. दत्तजयंती बार्शीकडे व पुढे आजेगाव हिंगोलीकडे अशी होत असे. म्हणजे वार्षिक उत्सवसुद्धा अल्पप्रमाणात होत होते. वर्तमानपत्रात यासंबंधी कधी उल्लेखही येत नसे. कल्याणच्या अंकातील केवळ दोन लेखांनी जी प्रसिद्धी दिली होती तेवढीच ! यादृष्टीने श्रीगुरुमहाराजांचा हा काळ अप्रसिद्ध भासतो. वस्तुस्थिती मात्र भिन्न होती. प्रसिद्धीशिवाय कार्य जोमाने चालले होते. ईश्वरी योजनेने, संकेताने चाललेले हे कार्य होते. कोण, कोठून आणि कसा महाराजांच्याकडे येत असे हे कोणालाही कळत नसे. येणाऱ्यालाही कळत नसे. आल्यावर मात्र येथे स्थिरावला जात असे.

जीवन गंगेचा हा आद्यकलश अनेक दिव्य घटना अमृत-बिंदूंनी भरलेला आहे. ही भक्तांची संजीवनी आहे. कलश पृथ्वी तत्त्वाचा आहे. स्थूल आहे. नाशही पावणारा आहे. त्यातील संजीवनी प्राशनाने आपले परम कल्याण होणार आहे. श्रीगुरुचरणी आमची बुद्धी याच श्रद्धाभक्तीची राहो आणि गंगामृताने आम्हा सर्वांचे परम कल्याण होवो ही प्रार्थना आहे.

– आद्यकलश समाप्ती –

## गंगास्नानोत्तर श्रीसद्गुरुवंदन

ॐकारमय श्रीसद्गुरुराज । भक्तरूपाचा घालून साज ।
दत्तपुत्र वामनराज । तुमचे चरणी लोटांगण ॥१॥
भक्त सदैव लहान । म्हणोनी जाहला वामन ।
परि विराट रूप दर्शन । कलीबळीस दाखविले ॥२॥
भक्त कसा असावा । योग कसा साधावा ।
खरा परमार्थ कसा करावा । प्रपंच व्यापामधूनी ॥३॥
नेमके कर्म कोणते । नेमके साधन कोणते ।
ज्ञानभक्तीचे मर्म काय ते । श्रीवामन उकलवी स्वकृतीने ॥४॥
जो जो जसा आला । तसाच त्याचा हात धरला ।
हळुवारपणे पुढे नेला । ज्याच्या त्याच्या पायाने ॥५॥
आपुले स्मरण जरि झाले । तरी अमृत सिंचन केले ।
हृदय भडभडून आणिले । मार्गावरी चालण्या ॥६॥
महाराजा नमो नमः । सद्गुरुवर्या नमोनमः ।
गुणगौरवा नमोनमः । गुळवणी कुलभास्करा ॥७॥
नित्य निरंजन नमोनमः । भवभयभंजन नमोनमः ।
भक्त हृदयरंजन नमोनमः । वासुदेवनिवासी वामना ॥८॥
श्रीदत्तरूपा नमो नमः । वासुदेवरूपा नमोनमः ।
लोकनाथरूपा नमोनमः । महाराजा गुरुराजा ॥९॥
शक्तिरूपा नमो नमः । शक्तिदाता नमोनमः ।
शक्तिप्रेरका नमो नमः । शक्तिपातमहाप्रभू ॥१०॥
आचारदक्षा नमोनमः । व्यवहारदक्षा नमोनमः ।
परब्रह्म लक्षा नमो नमः । सद्गुरुस्थिती निधाना ॥११॥
आनंदघना नमो नमः । विरक्तधना नमो नमः ।
निग्रहीवामना नमो नमः । स्वानंद साम्राज्य सम्राटा ॥१२॥
पूर्ण कृपेची प्रार्थना । पूर्ण पूर्णतेची प्रार्थना ।
करून ही वंदना । याचक मी उभा आहे ॥१३॥

॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥

* * *